# क्वार्टर नंबर ३६५



मंदार कात्रे- तुषार घाग

# क्वार्टर नंबर ३६५

मंदार कात्रे

तुषार घाग

ई साहित्य प्रतिष्ठान

# क्वार्टर नंबर ३६५
## (गूढकथा संग्रह)


लेखक : मंदार कात्रे, तुषार घाग

मोबाइल -०९९२३९२०२६५

ईमेल- mandar.katre@yahoo.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com

Published : 30 January 2016



©esahity Pratishthan® 2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## तुषार घाग –



यांचे मूळ गाव रायगड जिल्ह्यातील माणगाव . व्यवसायाने इंजिनियर असून नोकरीसाठी परदेशात वास्तव्य करतात . परंतु मनाने सतत ते  भारतातच असतात . सोशल मीडिया द्वारे त्यांची नाळ इथल्या मातीशी अन माणसांशी चांगलीच जुळलेली आहे . गेल्या सुमारे पाच ते सहा वर्षांपासून फेसबुकसह अन्य सोशल मीडिया द्वारे त्यानी भरपूर लेखन केलेले आहे .

## मंदार कात्रे-



यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील नाणीज जवळचे चोरवणे . व्यवसायाने इंजिनियर असून नोकरीनिमित्त परदेशी वास्तव्य असते. लहानपणापासूनच अफाट वाचन अन लेखनाची प्रचंड आवड . सुमारे पंधरा वर्षापासून रत्नागिरीच्या स्थानिक वृत्तपत्रात तसेच विविध दिवाळी अंकांमध्ये विज्ञान व अध्यात्म यावर आधारित लेखमाला लिहीत असत . गेल्या सात वर्षापासून फेसबुक सह मायबोली , मिसळपाव , ऐसी अक्षरे , मी मराठी , उपक्रम इत्यादी मराठी सोशल साईट वर नियमितपणे लेखन. दोन वर्षापूर्वी “ईसाहित्य”तर्फे “आभास हा” नावाचा लोकप्रिय कथासंग्रह प्रकाशित . सध्या भारतात वास्तव्य असून एक लघुकादंबरी व अन्य काही परदेशकथा यांचे लेखनकार्य सुरू.

मोबाइल -०९९२३९२०२६५

ईमेल- mandar.katre@yahoo.com

# लेखकांचे मनोगत

“क्वार्टर नंबर ३६५” हा गूढकथा-संग्रह आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. सुमारे वर्षभरापूर्वी “भुताटकी” या फेसबुक पेजची स्थापना झाली आणि अल्पावधीतच त्याच्या लाईक्सची संख्या ४७००च्याही पुढे गेली . आम्ही लिहीलेल्या कथा रसिक वाचकांना अतिशय आवडल्या. त्यामुळेच या सर्व कथांचा एकत्रित संग्रह करून इबुक स्वरुपात प्रकाशित करावा असे ठरले. “ईसाहित्य” सारख्या प्रथितयश अन लोकप्रिय प्रकाशनसंस्थेने आमचा प्रस्ताव मान्य करून सदर कथासंग्रह अल्पावधीत प्रकाशित केला, त्याबद्दल अनेक आभार ...

यातील काही कथा आम्ही दोघांनी स्वतंत्रपणे लिहीलेल्या आहेत तर काही कथा दोघांनी एकत्रित चर्चा-विचारविमर्श करून जन्मास आल्या आहेत . काही कथा प्रचलित लोकसमजुतींवर आधारित असून काही घटनांवर आधारित तर काही काल्पनिक आहेत . आपल्या समाजात व विशेषत: कोकणात भुताखेतांबद्दल भरपूर गोष्टी ,प्रवाद अथवा अंधश्रद्धा म्हणा, पण प्रचलित असून पूर्वीच्या काळात जनमानसावर त्याचा खूप पगडा असे . अशा सर्व पार्श्वभूमीवर कोकणातील व अन्य  भूतकथा आपणासमोर सादर करत आहोत ...

मंदार कात्रे / तुषार घाग , दि. २६ जानेवारी २०१६

https://www.facebook.com/%E0%A4%AD%E0%A5%81%E0%A4%A4%E0%A4%BE%E0%A4%9F%E0%A4%95%E0%A5%80-1658549714378209/



अर्पणपत्रिका

आपले जीव धोक्यात घालून

प्राणप्रणाने भारतमातेचे रक्षण करणाऱ्या

अन हसत हसत शहीद होणाऱ्या

शूर भारतीय सैनिकांस

सादर समर्पण

This Book is Dedicated to all the Brave Soldiers of Indian Army !

“It takes a minute to have a crush on someone, an hour to like someone, and a day to love someone... but it takes a lifetime to forget someone.”

– Kahlil Gibran

या कथा

यातील स्थळे

यातील व्यक्ती

यातील घटना

सर्वच्या सर्व

# १००%

काल्पनिक आहेत.

# कथानुक्रम

भुतांबद्दल बोलु काही

कोकणच्या भूतकथा -1

कोकणच्या भूतकथा -2

कोकणच्या भूतकथा -3

कोकणाच्या भूतकथा- 4

कोकणच्या भूतकथा - 5

कोकणच्या भूतकथा -6

निवडणूक

पहिली अंघोळ

खबऱ्या

मागोवा

बाटली

रहस्य

डिसोझा चाळ

रात्र जागवणारी एक शाळा

बोकड

ट्रेक

बाळंतीण

लॉरी

झपाटलेला वाडा

पूर

ब्युटी पार्लर

पार्कच्या बाकड्यावर

टपरीवाला

पोलीस चौकी

अचंभित

गुरु

किल्लेदार

शाळा

पाऊस

जंगल

कॉलनी

साधू आणि भूत

विहीर

फेसबुक

वीज

बंगला

मुंबई लोकल

वस्तीची गाडी

विडी

हळदीची रात्र

बाजारपेठ

Quarter No - 365

# भुतांबद्दल बोलु काही. . !! □□

या कथा वाचताना भुतांबद्दलच्या काही शब्दप्रयोगांची माहिती असणं आवश्यक आहे. त्यामुळे कथांची रंजकता वाढेल. ही माहिती एका Whatsapp मेसेजवरून घेतली आहे. त्या अनाम मेसेजकर्त्याचे आभार.

कोकणात १४ प्रकाराची भूते पहावयास मिळतात.

१) वेताळ: कोकणात वेताळाला भूतांचा राजा म्हणतात कोकणातील पिशाच्च हे वेताळाच्या आधीन असतात. जो अंगातून भूत काढणाऱ्याच्या देहात प्रवेश करतो. व त्याच्या कडून इतर त्रासदायक भूतांना पळवून लावतो.

२) ब्रम्हग्रह / ब्रह्मराक्षस : हे भूत ब्राम्हणाचे मानले जाते. जो वेदात निपूण आहे. पण ज्याला त्याच्या बुध्दीचा गर्व झाला. व त्यातच त्याचा अंत झाला.

३) समंध: ज्याची इच्छा पूर्ण न होता जो मरतो तो समंध होतो. हे भूत प्रमुख्याने गावाच्या वेशीवर जूनाट झाड किंवा तीठा अशा ठिकाणी पकडते. हे एक संतान नसलेला(निर्वंशी) ज्याचे कोणी काही कार्य केलेले नसते. त्यापैकी असते. कोकणात सर्वात ताकदवान भूत मानले जाते. ह्याला जर कोणी देवथ्यानाच्या आड मार्गे केला तर देवथ्यान देखिल पुढे येत नाही.

४) देवचार : हे मागास वर्गीयांचे भूत आहे. जो लग्नांनंतर थोड्याच दिवसांत मरतो. ही भूते गावाच्या चारही बाजूला असतात. कोकणात ह्यांना डावे अंग म्हटले जाते. कोकणी माणसांच्या गाऱ्हाण्यांत यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. ह्याची सहानुभूती मिळवण्यासाठी दरवर्षी याला नारळ, साखर, कोंबडा द्यावा लागतो.

५) मुंजा: हे ब्राह्मणां पैकी भूत असते. जो ब्राह्मण मुलगा मुंज झाल्यानंतर सोड मुंज होण्याआधीच मरतो. हे त्याचे भूत असते. ह्याचे मुख्य स्थान हे पिंपळाच्या झाडावर तसेच विहीरीवर असते. हे लोकांना छळत नाही पण घाबरवण्याचे काम करते.

६) खविस: हा प्रकार मुस्लिमांन मध्ये मोडतो. हे फार त्रासदायक भूत असते. ज्याला अतिशय क्रुर रीत्या मारले जाते. तो मेल्यानंतर खविस होतो असा समज आहे.

७) गिर्या / गिर्हा - जो माणूस बूडून मेला किंव्हा ज्याचा खून झाला हे त्याचे भूत आहे. हे भूत पाण्याच्या आसऱ्याला रहाते. हे फार त्रासदायक असे भूत आहे. रात्रीच्या प्रहरात कोणी नदीपार खाडीपार करताना ह्याच्या तावडीत गावला तर ते त्याला खोल ठीकाणी घेऊन जाते. कोकणात रात्रीच्या वेळी जे कुर्ले, मुळे पकडायला जातात त्यांना हमखास ह्या भूतांचा अनूभव आला असेल.

कोकणात असे सांगीतले जाते की जो कोणी या भूताचा केस मिळवू शकला तर हा भूत त्याचा गुलाम बनतो. त्याला हवे ते आणून देतो. पण तो केस त्याला पुन्हा मिळाला तर तो त्या माणसावर सर्व तऱ्हेची संकटे आणून सोडतो.

८) चेटकीन : हे मागासवर्गीयांचे भूत असते. याला कोकणात डाव असेही संबोधले जाते.

९ ) झोटिंग: हे भूत खारवी किंवा कोळी समाजातील भूतांमध्ये गणले जाते.

१०) विर - हे भूत क्षत्रीय समाजाच्या व्यकीचे असते. जो लग्न न होता मरण पावतो. याला निमा असेही म्हटले जाते.

11) लावसट - ओली बाळंतीण मरण पावल्यास तिचे रुपांतर मृत्यूनंतर लावसट मध्ये होते.

12) खुन्या - हे अतिशय क्रूर भूत असून हरिजन समाजातील असते

13) बायंगी - हे भूत विकत घेता येते. रत्नागिरी लांजा गोळवशी किम्वा मालवण चौक येथे सुमारे 10000/- रुपये खर्च केल्यास विकत मिळते. मालकाची भरभराट करुन शत्रूना त्रास देते.

14) चकवा - हे रात्री बेरात्री जंगलात किंवा पायवाटेने जाणाऱ्या लोकांचा रस्ता चुकविते. सकाळ झाल्याशिवाय योग्य रस्ता सापडत नाही.

# कोकणच्या भूतकथा -1

आमच्या कोकणातील गावची चाळीस-पन्नास वर्षापूर्वीची गोष्ट आहे. आमच्या वडिलांच्या वेळी घरी गुरेढोरे शेती असा सगळा पसारा होता. आमच्याकडे सोन्या म्हणून एक गडी कामाला होता. आणि त्याच्या सोबतीला पक्या, तुकया, खाक्या आणि अनंता नावाचे त्याचे चार मित्र होते. दिवसा आमच्याकडे काम करून हे सगळे रात्री आपआपल्या घरी जायचे पण सोन्या आमच्याकडेच शेतावरच्या घरावर राहायचा कारण त्याचे लग्न झालेले नव्हते. मग कधीकधी रात्री हे पाचजण शेतघरात पार्ट्या करायचे. पार्टी म्हणजे गावठी दारू भरपूर पीवून मग जेवायचे आणि रात्री अकरानंतर मासे पकडायला जायचे असा त्यांचा प्रोग्राम असे.

अशाच एका रात्री सगळेजण दारू पिऊन फुल्ल टाम झालेले होते. मग भाकरी खावून रात्री साडे अकरा वाजता मासे पकडायला निघाले. त्या वेळी आजच्या सारख्या बॅटरी वगैरे नसायच्या. मग रॉकेलचा कंदील घेवून जायचे. नदी गावाच्या दुसऱ्या टोकाला होती, त्यामुळे सात-आठ किलोमीटर चालत जावे लागायचे. तर रात्री दोन वाजताच्या सुमारास सगळे नदीवर पोहोचले, आणि मासे पकडायला सुरुवात झाली.

अर्धा एक तास गेला आणि पक्या आनंदाने ओरडला. “अरे हे बघा काय आहे ते? “ सगळे धावत धावत पक्याजवळ आले. नदीतून वाहून एक मानवी हाडांचा सांगाडा वाहत आला होता. कदाचित महिन्याभरापूर्वी आलेल्या मोठ्या पुरात कोणीतरी मनुष्य वाहून गेला असावा आणि माशांनी त्याचे सर्व मांस खाल्ल्याने फक्त हाडे उरली होती. पण त्या सांगाड्याच्या कमरेला एक मोठी सोनसाखळी होती. जवळजवळ साडेचार तोळ्याची.

सगळे मनातून घाबरले होते कारण त्यांनी यापूर्वी असे काहीच पाहिले नव्हते. पण पक्या तसा हुशार आणि लबाड देखील. तो म्हणाला, “ कुणाला काहीही सांगायचे नाही, गुपचुप ही साखळी काढूया आणि रत्नागिरीला नेवून विकुया. चांगले पैसे येतील. ते आपण पाचजनात वाटून घेवू. “ मग घाबरत घाबरत सगळे राजी झाले. मग पक्याने हळूच ती सोनसाखळी सोडवली आणि जे काही थोडेफार मासे मिळाले होते ते घेवून निघाले आणि सकाळी सहा वाजता घरी पोचले. साखळी पक्या जवळच होती.

रात्रभर जागरण झाल्याने दुसऱ्या दिवशी सगळयांनी सुट्टी घेतली आणि झोपून राहिले. संध्याकाळी सगळे शेतावर एकत्र जमले. पण पक्याचा पत्ता नव्हता. म्हणून सगळेजण पक्याच्या घरी गेले, जावून बघतात तो पक्या अजून झोपलेलाच होता आणि तापाने फणफणला होता. आणि झोपेत सतत "माझं सोनं. . . . माझं सोनं " म्हणून बरळत होता. आता मात्र सगळे घाबरले आणि तसाच उचलून पक्याला डॉक्टर कडे घेवून गेले. डॉक्टरने गोळया इंजेक्शन दिले त्यामुळे तात्पुरता आराम वाटला. दुसऱ्या दिवशी पुन्हा ताप चढला. आणि बरळणे सुरू झाले. मग सगळेजण पक्याला घेवून गावातील गोपाल नावाच्या भगताकडे (देवर्षी) गेले.

गोपालने मग कौल लावून देवाला प्रश्न विचारला की पक्या असे का करतोय? तेव्हा असे उत्तर मिळाले की पक्याने कुणाचे तरी सोने पळवून आणले आहे, तो आत्मा पक्याला त्रास देत आहे. आता मात्र पक्यासकट सगळयांची पाचावर धारण बसली. नदीत आपण जे काही केले तेच आपल्यावर उलटले आहे, हे सगळयांनी ओळखले. मग यावर उपाय काय? असे विचारताच गोपालने सांगितले की नदीवरच्या राखणदार भुताला एक नारळ-कोंबडा द्या आणि माफी मागा व ते सोने जिथून काढलेत तिथे परत नेवून ठेवा. म्हणजे पक्या बरा होईल नाहीतर आठ दिवसात तापाने पक्या मरेल.

आता सगळेजण घाबरले. झक मारली आणि त्या सोन-साखळीच्या फंदात पडलो असे सगळयांना झाले. शेवटी नाइलाजाने त्याच रात्री घाबरत घाबरत परत नदीवर जावून नारळ-कोंबडा दिला आणि जिथे सांगाडा होता तिथे सोन-साखळी ठेवून माफी मागितली आणि "आता पक्याला सोड" अशी विनंती करून घरी आले. दोन दिवसात पक्या खडखडीत बरा झाला.

कोंबडीचा भुर्दंड बसलाच पण पक्या जीवंत राहिला हे नशीब मानून सगळे गप्प बसले !

*• ही पन्नास वर्षापूर्वी घडलेली ऐकीव कथा आहे. श्रद्धा अंधश्रद्धा यापेक्षा एक मनोरंजक भूतकथा म्हणून पहावे ही विनंती. पात्रांची नावे काल्पनिक. धन्यवाद*

# कोकणच्या भूतकथा -2

सुमारे ७०-८० वर्षापूर्वीचीही गोष्ट आहे. आमचे चोरवणे गाव रत्नागिरी – कोल्हापूर हायवे वर आहे. मुंबई-गोवा महामार्गावर पाली पासून ५ कि. मि. अंतर आहे. सरकारने सर्व्हे करून गावाजवळून वाहणाऱ्या बावनदी वर एक मोठे धरण बांधायचे ठरवले, ज्यामुळे देवळे व आजू-बाजूच्या गावांचा पाण्याचा प्रश्न सुटून शेतीलाही बारमाही पाणी उपलब्ध होऊ शकले असते. परंतु हे धरण बांधल्यास चोरवणे हा गाव बुडीत जावून गावकऱ्यांचे मोठे नुकसान होणार होते, कारण शेतकऱ्यांची जमीन व शेती त्या भागात होती.

त्याकाळी देव-देवस्की आणि गाव-राहाटी यांचे मोठे प्रस्थ होते, चोरवणे गावात ८०० उंबरा आणि ९०० भुते होती असे म्हटले जाते. यास्तव सर्व गावकऱ्यांनी सभा घेवून असे ठरले कि सरकारी अर्ज-विनंत्या करून काही होणार नाही, त्यामुळे आपण हा विषय आपल्या ग्राम-देवते कडे मांडू. त्यानुसार देवीला कौल लावून प्रश्न विचारण्यात आले, त्यात देवीने गावाला वाचविण्याची तयारी दर्शविली. मिळालेल्या आदेश नुसार सर्व गावाने एकत्र येवून असा जाप केला व गावच्या राखणदार असलेल्या शक्तींपैकी "एक भूत" या शक्तीला आवाहन करण्यात आले. त्या ठिकाणी असा जाप केला गेला, कि "गावाच्या मुळावर येणारे हे धरण तू फोडून टाक आणि गावाला वाचव, म्हणजे तुला आम्ही दरवर्षी १ नारळाचा मान देऊ"

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या धरणाचे काम चालू होते, तेथील कामगार व इंजिनियर यांना त्रास होवू लागला. मशीन बंद पडू लागली, त्याचप्रमाणे बांधलेले धरणही फुटून वाहून गेले. असे म्हणतात कि गावाने पाठविलेल्या भूताने जोरदार लाथ मारून ते धरण फोडले, त्यामुळे त्या भुताचा पाय मोडला, आणि त्याला "लंगडे भूत"असे म्हटले जाऊ लागले. त्यानंतर ७ वेळा ते धारण बांधण्याचा प्रयत्न केला गेला, पण एकदाही ते टिकू शकले नाही.

गावकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला आणि त्यानंतर आजतागायत त्या लंगड्या भूताला दरवर्षी “आराधन” या कार्यक्रमाच्या वेळी १ नारळ आठवणीने दिला जातो.

तर अशी आहे आमच्या गावातील लंगड्या भूताची गोष्ट, आजही कोणाला काही अडचण किंवा त्रास असल्यास गावदेवी जुगादेवी त्या भक्ताच्या हाकेला ओ देते आणि नवस केल्यास काम पूर्ण होते, असा अनुभव आहे.



# कोकणच्या भूतकथा -3

माझे वडील खूप डेअरिंगबाज होते, आमच्या कुटुंबात त्यांच्या मुळे कोणालाही भीती हा शब्दही माहीत नव्हता. रात्री-बेरात्री कोकणातील आमच्या गावाच्या आजूबाजूच्या १०-१५ किमी परिसरात ते एकटे पायी फिरत असत.

सुमारे १९७०चा काळ होता. माझे बाबा आणि त्यांचा चुलत-भाऊ दत्ता हे संध्याकाळी ५च्या सुमारास घराबाहेर पडले, गावापासून १० किमी वरच्या देवळे गावी उत्सवासाठी पायी चालत जायचे होते.

बोलता बोलता चालताना वाट कधी संपली कळलेच नाही, देवूळ जवळ आले असे समजून त्यांनी एका ठिकाण विश्रांती घेण्याचे ठरवले. एव्हाना संध्याकाळचे ७-३० झाले होते, आणि बऱ्यापैकी काळोख होता. निघताना घरून घेतलेली झुणका -भाकरी कांदा आणि पाणी होती. ती भाकरी खाण्याचे ठरले. मग तिथेच एका मोठ्या दगडावर बसून दोघांनी आरामात गप्पा मारत झुणका-भाकर संपवली. आणि नंतर चालत-चालत चांदण्यातून दिसेल त्या वाटेने रात्री ९ वाजता उत्सवाच्या ठिकाणी पोचले.

उत्सवाच्या ठिकाणी त्यांना जेवणार का? म्हणून विचारले असता त्यांनी वाटेत झुणका भाकरी खाल्ल्याचे सांगितले, ते ऐकताच गावकऱ्यांनी कुठे खाल्ली? असे विचारले. त्यावर बाबांनी सांगितले कि मोठ्या झाडाखाली जिथे पाणी वाहते आहे, तिथे एका मोठ्या दगडावर बसून आम्ही जेवण केले. त्यावर गावकरी म्हणाले अहो ते तर स्मशान आहे. . काय तुम्ही काका? स्मशानात बसून जेवलात?

हे ऐकताच दोघे चपापले, दत्ता तर पार घाबरला. पण बाबांनी त्याही परिस्थितीत न घाबरता नेटाने उत्सवात भाग घेतला. दुसऱ्या दिवशी दोघे घरी आले. दत्ताला जो ताप भरला, तो १५ दिवस अंथरुणातून उठला नाही. पण माझे बाबा मात्र सर्व कामे "जणू काही घडलेच नाही'अशा आविर्भावात करत राहिले !

आजही तो विषय निघाला कि दत्ता-काकांच्या अंगावर रोमांच उभे राहतात, माझे वडील आता हयात नाहीत. अशी आहे ही गोष्ट

# कोकणाच्या भूतकथा- 4

सुमारे 100 वर्षापूर्वी आमच्या कुटुंबात एक भाऊकाका म्हणून होते. त्यांची मांत्रिक म्हणून कीर्ती प्रसिद्ध होती. ते वाघावर बसून गावात फिरत असत. अनेक भूतांवर त्यांची सत्ता चाले, म्हणजे एखादी भुताने झपाटलेली व्यक्ति त्यांच्यासमोर आणली, तर ते भुताला जबरदस्त घाणेरड्या शिव्या घालून त्या बाधित व्यक्तीच्या एक कानफाटीत वाजवत असत, मग ते भूत पुन्हा त्या व्यक्तिला त्रास देत नसे.

त्यांचा एक किस्सा असा आहे की ते एकदा राजापूरला उत्सवाला गेले होते. तिथे रात्री संगीत नाटक सुरू होते. तर या भाऊकाकांना नाटकात काम करण्याची फार हौस, म्हणून ते नाटकवाल्या मंडळींकडे जावून म्हणाले की माला कोणतेही काम द्या, छोटीशी भूमिका असली तरी चालेल, पण मला नाटकात काम करायचेच आहे.

पण नाटकवाल्या मंडळींनी त्यांचे काहीएक ऐकले नाही, व त्यांना परत पाठवले. त्यावेळी ते म्हणाले, ठीक आहे. कसे होते तुमचे नाटक ते बघतो आता.

असे म्हणून ते नाटक बघायला बसले. त्यावेळी वीज नव्हती, व पेट्रोमॅक्सच्या बत्त्या लावून नाटक करत. इकडे नाटक सुरू झाल्यावर काही वेळाने दिवे गेले व अंधार पसरला. नाटक बंद पडले.

आयोजकांनी कशाबशा बत्त्या पुन्हा पेटवल्या आणि नाटक सुरू झाले, पुन्हा 15 मिनिटांनी बत्त्या विझल्या आणि नाटक बंद. असा प्रकार 3-4 वेळा झाला. नाटकवाले आणि पब्लिक हैराण.

शेवटी कोणीतरी म्हणाले, तुम्ही त्या पाहुण्यांना नाटकात काम दिले नाहीत, त्याचा तर हा परिणाम नसेल? मग त्या भाऊकाका ना शोधून आयोजकांनी त्यांची माफी मागितली. आणि त्यांना नाटकात एका वाघाचे सोंग आणायचे होते, ते काम दिले.

तेवढ्याने खुश होवून भाऊकाकानी ते स्वीकारले आणि नाटक सुरू करायला परवानगी दिली. त्यानंतर नाटक पूर्ण होईपर्यंत बत्त्या अजिबात विझल्या नाहीत! असे म्हणतात की भाऊकाकानी त्यांच्या ताब्यातील एका भुताला बत्त्या फुंकर घालून विझवायला सांगितल्या होत्या, पण नाटकात काम मिळाल्या नंतर त्या भुताला परत बोलावून घेतले!

# कोकणच्या भूतकथा - 5

आमच्या गावातील दहा-बारा वर्षांपूर्वी घडलेली गोष्ट आहे. संध्याकाळी सात वाजले होते. नजीकच्या पाली गावी एक ट्रकचा ॲक्सिडेंट झाला होता. त्यातील जखमींना मदत करण्यासाठी रवी आणि अमर पालीला गेले होते आणि घरी परत यायला थोडा उशीरच झाला होता. अमरचे घर नाणीजला तर रवीचे चोरवणे ला. मग रवी अमरला सोडायला बाइक घेवून आला.

हायवे वरून गाडी आतल्या गावाच्या रोडला घातल्या नंतर एकदम कुत्री गाडीचा पाठलाग करू लागली. त्यांना हाकलण्यासाठी अमर आणि रवीने गाडी थांबवली तर कुत्री त्यांच्याकडे पाहून विचित्र किंचाळू –रडू लागली. दोघेही मनातून चरकले. पण मग कुत्र्यांकडे दुर्लक्ष करून परत गाडी चालू केली.

अर्धा किलोमीटर गाडी चालवल्यावर माळ लागला. माळावर धुके पसरले होते. आणि एका तरुणीची धूसर आकृती लांबवर दिसत होती. हळूहळू ती आकृती जवळ येवू लागली. एक फाटकी साडी नेसलेली विशीची तरुणी होती, तिचं संपूर्ण अंग भाजलेलं होतं, दिसायला एकदम विद्रूप. ती नावानिशी अमरला हाक मारून गाडी थांबवायला सांगत होती. अमरने गाडीचा स्पीड कमी केला आणि थांबणार इतक्यात रवी चपापला आणि अमरला बोलला स्पीड वाढव अमर स्पीड वाढव .... अमर भुताटकी हाय अमर पळव गाडी पळव. आणि त्या स्पीड वाढवण्याच्या नादात मोटर सायकलचा गेयर अडकला आणि गाडी बंद पडली. अमर आणि रवी गाडीवरून उतरले नाहीत, अमर गाडीला बसूनच किक मारत होता, पण लक्ष मागून जवळ जवळ येणाऱ्या मुलीकडे होतं. अमरच्या अंगातलं अवसान गळायला लागलं होतं. ती मुलगी जवळ आली, “ मला जरा गावाच्या वेशी पाशी सोड रे अमर” ....... दोघांची बोबडीच वळाली. तिने अमरचा हात पकडला ...अमर जोरात ओरडायला लागला ...ए आये ए आये, आये वाचव मला आये. रवी पार घाबरला, घामाने भिजला ...तोच गाडी आपोआप चालू झाली ... गाडी चालू होताच अमरने जो गाडीचा वेग वाढवला, दगड खड्डे न बघता ते दोघे थेट

गावात आले. गावात येताच घराच्या अंगणात गाडी दिली सोडून आणि दोघे पण अंगणातच उताणी पडले. आजू बाजूची लोकं आली धावत, त्यांना वाटलं नक्की काहीतरी झालंय, हे दोघे एवढ्या स्पीड मध्ये येत नाही कधी .... लोकांनी विचारताच रवी रडायला लागला आणि सगळी हकीकत लोकांना सांगयला लागला. लोकं पण घाबरून गेले होते. महिन्याभरापूर्वी जीवाला कंटाळून मीराने स्वत:ला जाळून घेतले होते, पण तिच्या अनेक इच्छा अपूर्ण राहिल्याने तिचे भूत झाले होते आणि ते रस्त्याने फिरत असे. गेल्या काही दिवसात कित्येक जणांना ती दिसली होती. हाका मारायची, बोलवायची आणि मोटरसायकल वाल्यांकडे लिफ्ट देखील मागायची !

कसेबसे अमरला शांत करून गावतले मित्र त्याला त्याच्या घरी सोडून आले.ही घटना आजूबाजूच्या ५ गावात वाऱ्या सारखी पसरली. अमावस्ये पौर्णिमेला ती लोकांना दिसतेच दिसते. आत्ता गावातून नवीन रस्ता बनवला आहे सरकार ने, आत्ता त्या जुन्या रस्त्याने कोणी जात नाही.

कथा सौजन्य- रवींद्र शिंदे, चोरवणे.

# कोकणच्या भूतकथा -6

“अरे रिक्शा जरा हळू चालव. पाऊस किती पडतोय? पावसात जर रस्त्यावर ऑइल सांडलेले असेल तर गाडी लगेच स्लिप होते रे बाबा. . . . . ” मी रिक्षावाल्या दिलीपला म्हणालो. तातडीने पुण्याला जायचे होते म्हणून मी गावाहून रिक्षाने रत्नागिरीला निघालो होतो. तिथून मग रात्री पुण्याची बस पकडणार होतो. रिक्शा रत्नागिरी \सिटीत प्रवेश करत होती तेवढ्यात रस्त्याच्या कडेला समीरची मोटरसायकल उभी दिसली म्हणून मी रिक्शा थांबवली आणि खाली उतरलो. समीर समोरच्या दुकानातच सिगारेट घेत होता, मी हाक मारली तसा वळून माझ्याकडे बघून हसू लागला. “अरे भल्या माणसा आहेस कुठे? किती वर्षांनी भेटलास? ”मी म्हणालो.

मग मी रिक्षातून बॅग काढून घेतली आणि दिलीपला रिक्षाचे भाडे देवून समीर बरोबर निघालो. बसला अजून 2/3 तास वेळ होता. इतक्या वर्षांनी भेट झाली तर चला सेलिब्रेट करू म्हणून मग आम्ही बारमध्ये बसलो आणि बियरच्या संगतीने जुन्या आठवणींना उजाळा देण्याचे काम सुरू झाले. . . .

समीरची आणि माझी पहिली भेट अठरा वर्षांपूर्वी झाली. मी कॉलेज पूर्ण करून नुकताच रत्नागिरीतील एका कंपनीत जॉइन झालो होतो. आमची तिघा जणांची टीम होती. मी, समीर आणि अल्ताफ ! समीर आणि अल्ताफ मला सीनियर होते. . पण आमची दोस्ती मात्र एकदम पक्की झाली होती. मी नवखा असल्याने मला फारसे काही कळत नव्हते. मग अल्ताफ आणि समीरने मला सांभाळून घेत सर्वकाही शिकवले. आमची कंपनी भगवती बंदरला होती आणि मी गावाहून रत्नागिरीला अप –डावून करत असे, मग एस टी स्टँड पासून भगवती बंदर पर्यन्त सकाळी आणि संध्याकाळी परत असे आम्ही तिघे एकाच बाईकवरून जायचो !

पुढच्याच महिन्यात आम्हाला तिघांना कंपनीतर्फे तीन महिन्यासाठी विजयदुर्ग बंदरावर कामाला पाठवण्यात आले. तिथे पावसाळ्यात दोन मोठी जहाजे रीपेयरसाठी आली होती. मग काय? आमच्या तिघांचीही राहायची सोय विजयादुर्ग किल्ल्यावर एका धर्मशाळेत करण्यात आली. जेवण तिथेच एका हॉटेलमध्ये ! या तीन महिन्यात आम्ही खूप धूम धमाल

आणि मस्ती केली. सकाळी आठ ते संध्याकाळी आठ पर्यन्त बोटीवर काम चालायचे! मग घरी येवून आंघोळ वगैरे करून जेवायला निघणार इतक्यात तिघांपैकी एकाला हुक्की यायची. मग बाइक काढून देवगडला 40 किमी जायचे आणि खंबा आणायचा. आमच्याबरोबर चंदू गाडगीळ म्हणून बोटीवरचा एक कर्मचारीदेखील असायचा ! मग जेवण पार्सल घेवून रानात रात्री 2/3 वाजेपर्यंत पार्ट्या चालायच्या. . . सकाळी पुन्हा कामावर हजर! खरोखर ते दिवस अविस्मरणीय होते यात शंका नाही!

ते तीन महीने संपल्यावर आम्ही परत रत्नागिरीला आलो आणि आणखी सहा महीने आम्ही एकत्र होतो. मग मी आणि अल्ताफने तो जॉब सोडला. अल्ताफ दुबईला गेला तर मी दाभोळ पॉवर कंपनीत जॉइन झालो. पण समीर मात्र तिथेच होता. आणखी 3 वर्षे. तीन वर्षानी त्यानेदेखील जॉब बदलला आणि रत्नागिरीतच दुसऱ्या कंपनीत जॉइन झाला. या दरम्याने समिरने कंपनीतीलच एका मुलीशी लग्न केले आणि त्यांना तीन गोंडस मुले देखील झाली.

मी मग नोकरीनिमित्त गल्फला गेलो. अल्ताफचा दुबईलाच दुर्दैवी मृत्यू झाला होता.

आणि. . . . . . . . . . . . .

मी एकदम चपापलो. चार वर्षापूर्वीच समीर मासिव्ह हार्ट अटॅकने गेला. असे कसे? काहीतरी गडबड आहे. आपण आत्ता समीर बरोबरच तर बसलो आहोत बियर पीत ! मग. . . . मग. . . . . तो चार वर्षापूर्वीच गेलेला? हे कसे काय? बियरची सगळी धुंदी उतरली आणि मी निरखून समीरकडे पाहू लागलो. काहीतरी गडबड आहे. . . काळजीपूर्वक निरीक्षण केल्यावर मला समजले की समीरचे शरीर पारदर्शक दिसतेय. एक वेगळीच चमक त्याच्या डोळयात होती. . . . .

शेवटी मी धीर करून समीरला बोललो. . .

मी- अरे समीर पण तू तर. ? चार वर्षापूर्वी तू गेलास रे. हार्ट अटॅक ने. मग आत्ता इथे कसा काय?

समीर - तुला काय वेड लागलाय का? काहीतरी बडबड करतोयस? बियर जास्त झाली काय तुला?

मी- नाही रे समीर, आईशप्पथ. तुझ्याबरोबर काम करणाऱ्या पाटीलनेच मला सांगितले यार. . 1 डिसेंबर 2011. . . त्या दिवशी संध्याकाळी साडेचार वाजता तू काम संपवून कंपनीतून निघालास, गाडीवर बसून किक मारलीस तेव्हाच छातीत कळ आली आणि तू तिथेच जाग्यावर कोसळलास. समीर हसत होता. माझं बोलून झाल्यावर समीरने आणखी २ बियर मागवल्या. काय भंकस लावलीस तू पण, बियर पी. एक मला दिली आणि एक त्याने स्वतःच्या ग्लास मध्ये ओतली.

त्या दिवशी बार मध्ये दारू पिता पिता कधी वेळ निघून गेली समजलच नाही. अचानक माझ्या लक्षात आलं आपल्या बसची वेळ निघून गेली. मी समीरला बोललो सम्या अरे माझी गाडी निघून गेली. समीर बोलला जाऊ दे रे, कशाला काळजी करतोस. आज वस्तीलाच थांब माझ्या घरी, खूप वर्षांनी आपली भेट झाली आहे. मी पण विचार केला ठीक आहे पहाटेची बस पकडली तरीपण मी पुण्यात वेळेत पोहोचेन. संध्याकाळी साधारण ९ वाजता आम्ही दोघेही बार मधून बाहेर निघालो. पण मला समीरचं शरीर स्पष्ट दिसत न्हवतं. आपण नशेत आहोत म्हणून होत असावं. मनाला समजावत मी त्याच्या पाठोपाठ निघालो. समीरने झाडाखाली उभी असलेली आपली बाईक काढली, मला बोलला बस मागे आणि गाडी बाहेर हायवे वर काढली.

गाडीवर बसल्यावर थोड्यावेळाने मी माझा हात त्याच्या खांद्यावर टाकला, पण माझा हात थेट सीट वर पडला. बियर खूप झाल्या होत्या डोळे झाकायला लागले होते म्हणून जो काही प्रकार घडत होता तो माझ्या लक्षात येत न्हवता मी पुन्हा त्याच्या खांद्यावर हात टाकला पुन्हा माझा हात खाली सीट वर पडला. मी त्याच्या डोक्यावरच्या केसांना हात लावला पण हाताला काहीच लागत न्हवतं. आत्ता माझी नशाच उतरली. मी त्याला बोललो समीर गाडी थांबव मला लघवीला झाली आहे. त्याने गाडी थांबवली नाही. गाडी हायवेवर भरधाव वेगाने पळवत होता. बोलला अरे आपल्याला घरी जायला उशीर होतोय पुढे थांबवतो. मी बोललो अरे थांबव इथेच पुढे नको. तो ऐकायला तयार न्हवता. मी खूप घाबरलो. चालत्या गाडीवरून उडी मारायचा मनात बेत ठरवला. तेवढ्यात त्याच्या छातीत कळ आली, तो जोरात ओरडला, मी बोललो काय झालं समीर. त्याचा एक हात त्याने छातीवर ठेवला मोटरसायकल डगमग करायला लागली, गाडीचा तोल गेला आणि आम्ही दोघेही रस्त्यावर पडलो, मागून

भरधाव वेगाने एक डंपर येत होता. गाडी माझ्या पायावरून गेली आणि समीरच्या अंगावरून. डंपर वाला थांबला नाही तो निघून गेला. माझा पाय मोडला आहे हे माझ्या आधी लक्षातच आलं नाही. समोर समीरच्या शरीराच्या चिंध्या चिंध्या झाल्या होत्या. ते बघून माझं शरीर थरथर कापायला लागलं. बाजूने गाड्या जात होत्या पण कोणीच थांबत न्हवता. हळूहळू माझ्या पायातून वेदना यायला सुरवात झाली. मी कसा बसा घसपटत आपला जीव वाचवण्यासाठी रस्त्याच्या बाजूला गेलो. आत्ता रस्ता शांत झाला होता एकही गाडी न्हवती चांदणे पडले होते. मी जमिनीवर उताणी पडलो होतो. माझ्या लक्षात आलं कोणीतरी माला उचलतय. मी डोळे उघडले आणि बघितलं समीर चं ते फाटलेलं शरीर रक्ताच्या धारा वाहणारं ते विद्रूप शरीर माझा हात पकडून मला उचलत होतं. समीर मोठ्या मोठ्याने हसत होता. बोलत होता चल चल माझ्या सोबत. आणि मी बेशुद्ध पडलो. नंतर काय झालं मला काहीच माहिती न्हवतं. डोळे उघडले, खिडकीतून येणारा उजेड दिसला. आजूबाजूला बघितलं मी हॉस्पिटल मध्ये होतो. बायको आणि आई माझ्या बाजूला बसल्या होत्या. ३-४ नातेवाईक पण होते. गावातली २ माणसं होती. माझ्या पायाला प्लास्टर लावलं होतं.

आई रडत रडत बोलली, बाबू हॉस्पिटल मध्ये आहेस. चांदोरकर हॉस्पिटल - रत्नागिरी.

माझ्या जीवात जीव आला. आपण मरणाच्या दारातून परत आलोय ह्या विचाराने निश्वासाचा श्वास सोडला आणि निश्चिंत झालो. दुपारी बायको एकटीच माझ्या बाजूला बसली होती. मी तिच्याकडे विषय काढला. झाली घटना तिला सांगितली. गावातल्या २-३ मित्रांना पण सांगितली नंतर गावातल्या माणसांकडून समजलं कि माझा अपघात त्याच ठिकाणी झाला होता ज्या ठिकाणी समीर मोरे ५-६ वर्षांपूर्वी मोटरसायकल वरून पडून मेला होता. हे ऐकून मी थक्क झालो.

१५ दिवसांनी हॉस्पिटल मधून डिस्चार्ज मिळाला, आणि मी महिना भराने एकदा त्याच मार्गावरून चाललो होतो, ज्या ठिकाणी माझा अपघात झाला होता, समीर पहिल्यांदा मला जो भेटला तो त्याच ठिकाणी. जेव्हा मी रिक्षा पकडून रत्नागिरीला चाललो होतो.

समीर हा खरोखर २०११ ह्याच वर्षी मेला होता, मला भेटलेला समीर हा समीर नसून त्याचं भूत होतं. झाला प्रकार आजही आठवतो अंगावर शहारे येतात.

# " निवडणूक "

कलाबाद जिल्हा परिषदेची निवडणूक जाहीर झाली अन सगळीकडे एकाच धूळवड चालू झाली. सगळया राजकीय पक्षांचे नेते अन इच्छुक उमेदवार तिकिटवाटपाच्या धांदलीत बुडाले. मग एकदाची तिकीट वाटपाची यादी जाहीर झाली, आणि मग उमेदवारी अर्ज भरून प्रचाराचे धुमशान सुरू झाले.

सुभानराव खंडू –पाटील हे जिल्ह्यातील मोठं प्रस्थ. साखर कारखाना अन दूध डेअरी त्यांच्याच ताब्यात, गावातील मुख्य चौकात बंगला अन गावाच्या एका टोकाला त्यांचं भलमोठ फार्महाऊस होते. 150 एकर शेती होती. त्यांनी हजार भानगडी करून, थेट दिल्लीपर्यंत जॅक लावून झेड पी चं तिकीट पदरात पाडून घेतलं. आणि आता त्यांच्या जनशक्ती पक्षाच्या प्रचाराला सुरुवात झाली होती.

पण अडचण अशी होती की त्यांच्या विरोधात जनसेनेची एक महीला उमेदवार होती, मनालीताई सावंत. मनालीताईंचे यजमान मोरेश्वर सावंत गेली 10 वर्षे जनसेनेचे आमदार होते आणि मागच्याच्च वर्षी मोरेश्वर सावंत यांचा कार अपघातात मृत्यू झाला होता. त्यामुळे लोकांच्या सहानुभूतीच्या जोरावर मनालीताई नक्की निवडून येणार असे चित्र स्पष्ट दिसत होते.

आशा परिस्थितीत सुभानरावाने आपला खास माणूस जग्गुदादा उर्फ जगदीश साळवे याला मुंबईहून गावी बोलावले. जग्गुदादाला सर्व परिस्थिति सांगितली. सध्याच्या परिस्थितिमध्ये प्रचाराची कितीही धूम उडवली अन कितीही पैसा ओतला, तरीही विरोधी पार्टीची बाजू स्ट्रॉंग आहे, हे सत्यच होते. मग जग्गुदादाने एक शक्कल लढवली.

गावात सिद्धूमहाराज म्हणून एक नावाजलेला मांत्रिक होता. सुभानराव व जग्गु सिद्धू महाराज कडे गेले. आणि सर्व परिस्थिति सांगितली. सिद्धू महाराजने मग ध्यान लावले आणि 15-20 मिनिटांनी डोळे उघडले जगगुला म्हणाला, " बघ बाबा, परिस्थिति कठीण आहे, पण एक उपाय आहे. आपल्या गावाबाहेर एक कबर आहे, ३ दिवसांनी आमावस्या आहे, तू तिथे जा आणि अकरा बोकडांचा नवस बोल. कबरीत झोपलेला सैतान तुझी नक्की मदत करेल, त्याला कसा आणि कधी उठवायचा ते मी बघतो. तू ११ बोकडांचा बंदोबस्त कर "

सुभानराव आणि जग्गुदादा अमावास्येच्या रात्री त्या कबरीवर त्च्या दिशेने गेले, गावाबाहेर जंगलात झाडाझुडपात झाकली गेलेली ती कबर. कोणाची कबर आहे, कधीची कबर आहे कोणाला काहीच माहिती न्हवतं. पण सहसा गावातला कोणीही जाणकार माणूस इथे फिरकत नसे. घाबरत घाबरत सुभानराव कबरीजवळ गेला आणि जावून नवस बोलला.

" येत्या निवडणुकीत माझा विजय झाला पाहिजे, मी तुला ११ बोकडांचा प्रसाद देईन "

सुभानराव आणि जग्गुदादा तिथून उठले आणि तिथून झपाट्याने पावलं टाकत गावात पोहोचले. मांत्रिकाने दोघांना सक्त ताकीत दिली होती, भूतं उठतील पण मागे वळून बघू नका. . . . . दोघांनी एकदाही मागे वळून बघितलं नाही.

निवडणूक अजून पंधरा दिवसांनी होती. आणि मग सुभानरावने प्रचार जोरात सुरू केला, प्रचंड पैसा ओतला. . . शेवटी अटीतटीची निवडणूक झाली अन सुभानराव फक्त 200 मतांनी विजयी झाले. मग त्या दिवशी गावात सुभानरावची भव्य विजयी मिरवणूक निघाली, रात्री जंगी पार्टी झाली. सगळेजण आनंदात होते. सुभानरावाने जग्गुला एक अल्टो कार बक्षीस म्हणून दिली.

आत्ता वेळ आली नवस फेडायची, आणि ठरल्या प्रमाणे पुढच्या अमावास्येला रात्री ट्रक मधून बळी चढवायला बोकड आणले गेले. ट्रक खाली टेकडीच्या खालीच उभा होता. ट्रकच्या सोबतीला जग्गुची अल्टो उभी केली. सुभानराव अन जग्गु त्या बेनाम कबरीवर गेले, सिद्ध महाराज् अगोदरच तिकडे बसून मंत्र तंत्र बोलत होते. त्यांच्या पुढ्यात त्यांनी शेणक्या पेटवलेल्या आणि हातात एक सुरा, त्याच्या टोकाला लिंबू खोचलेला. सुभानराव आणि जग्गू येताच सिद्ध महाराजाने विचारलं

" बरोबर ११ बोकड आनलेत ना, आनी शिजवलेला भात. . . .? ? ? त्याचं काय रं?

"महाराज सगळं समान आणलंय, ११ बोकड आणि टोपलीभर शिजवलेला पांढरा भात बी आणलाय " जग्गूने शांतपणे हळू आवाजात उत्तर दिलं.

सुभानरावने इकडे तिकडे बघितलं, घनदाट जंगलात आत्ता त्या झाडांच्या आकृत्या पण कोणीतरी उभं असल्यासारख्या वाटत होत्या. कुठे कसला फांदीचा आवाज झाला कि सुभानराव दचकायचे.

महाराजांनी पुन्हा ताकीत दिली. . . . .

" काही झालं तरी घाबरायचं नाय, आपन जे बोललो ते आपन करनार, इथला सैतान आपल्या बाजूने हाय. ११ बोकडाचा प्रसाद ह्याला दिला कि आपला नवस संपला, भिऊन पलू नका "

आणि साधारण १ तास महाराजाने मंत्र मारले, आत्ता त्या कबरीतून आवाज यायला लागले. सिद्ध महाराजने डोळे उघडले, जग्गुला बोलला. . . .

" तो टोपला आन, सैतान आलाय, आनी आत्ता मी सांगतो तसा एक एक करून बोकड आनायचा "

जग्गुने बाजूचं भाताचं टोपलं उचलून महाराजाच्या फुड्यात ठेवलं. बोकड घेऊन आला. . . सुभानरावला सांगितलं. . . . " बोकड पकडा " आणि महाराजाने एका खटक्यात बोकडाचं मुंडकं वेगळं केलं, बाजूला पडलेल्या बोकडाच्या शरीरातून रक्ताची धार लागली, सिद्ध महाराजाने ते रक्त त्या भातात पकडलं. मेलेला बोकड कबरीच्या बाजूला ठेवला आणि मुंडकं त्या दगडावर.

आत्ता जे होणार होतं त्याची कल्पना सुभानराव आणि जग्गुला अजिबात न्हवती. . . . . . . . सिद्ध महाराजाने टोपल्यातला भात हाताने कालवला. . . आणि मुठीत धरून ते तो भात हवेत उडवायला लागले. . . . . . . सैतान जागा झाला, रानातली भूतं उठली आणि कबरीच्या दगडावर ठेवलेलं मुंडकं अचानक हवेत उडवून नेलं गेलं, बाजूला पडलेला बोकड आपोआप बाजूच्या झुडपात खेचला जात होता. . . . . हाडं चावल्याचे आवाज कानावर पडत होते.

हे सगळं बघून सुभानराव घाबरले, त्यांचे हात पाय लटपट कापायला लागले आणि डोक्यावर हात ठेवून ते जमिनीवर बसले. जग्गू हे सगळं बघत होता. . . .

" महाराजाने दुसरी हाक दिली. . . . . "दुसरा बोकड आन " जग्गू ताबडतोब दुसरा बोकड घेऊन आला. . . . . " या सुभानराव पकडा ह्याला " सुभानरावने बोकड पकडला आणि डोळे मिटले. . . . . . पुन्हा खटका पडला आणि पुन्हा महाराजाने तेच केलं, मुंडकं कबरीवर ठेवलं आणि धड बाजूला. . . पुन्हा तेच घडलं. . . . . .

हे जे काही होत होतं ते खूप अघोरी होतं,. . . . एक दोन तीन चार. . बघता बघता खटके पडत होते, बोकड कापले जात होते आणि सैतान आणि तिथली भूतं त्या अमावस्येची रात्र जागवत होते.

बघता बघता आत्ता १० बोकड कापले गेले, महाराजाने हाक दिली " जग्गू शेवटचा प्रसाद घेऊन ये "

जग्गू चाचपडला. . . . कारण बोकड सगळे संपले, जग्गूने ट्रक ड्रायवर रविला फोन लावला, तो खालीच थांबलेला ट्रक जवळ. "रव्या एक बोकड गाडीतच राहिला बघ आन तो इकडे लवकर "

" साहेब, १० च व्हते बोकड, पोरांनी एक बोकड मला उतरवायला लावला गावात, त्यांची आज पार्टी व्हती "

" रव्या बेअक्लीच्या. . . . . . . . . . . . "

महाराजाने जोराने आवाज दिला " शेवटचा प्रसाद लवकर घेऊन ये जग्गू"

जग्गूने सुभानरावच्या कानात घडला प्रकार सांगितला, सुभानराव ना काय बोलायचं समजेना.

"महाराज. . . . १० च बोकड आणले म्हणतोय, पोरांनी एक बोकड गावात उतरवला, माहिती न्हवतं महाराज आमाला बी "

महाराजने दोघांकडे बघितलं. . . . . "अरे मूर्खांनो मरा आत्ता, सैतान उठवला आत्ता ह्याला आवरायचा कसा हा काय आज आपल्याला सोडत नाय"

ह्या संभाषणात वेळ निघून जात होता. . . . . . . . आत्ता कबरीवरचा दगड हलायला लागला. . . . . . हवेतून आवाज यायला लागले. . . . . . . . . . . . .

" मास दे, मास घेऊन ये. . . . . मास दे लवकर " आत्ता ती भूतं जवळ जवळ यायला लागली, जग्गू आणि सुभानराव तर भीतीने कापायला लागले, सिद्ध महाराजाला एवढा घाबरलेला बघून आत्ता हे दोघं तिथून पाळायच्या तयारीला लागले, हळूच चप्पल काढून

हातात घेतल्या, आणि अचानक कबरीवरचा दगड thermocol सारखा हवेत भिरकावला गेला. . . .

सिद्ध महाराज जोराने ओरडले. . . . . " आत्ता खपलो आपन, पला आत्ता पला इथून. . . . जीव वाचवा पला " आणि जग्गू आणि सुभानरावने तिथून जीव घेऊन बोंबलत धडपडत टेकडीवरून खाली उतरायची सुरवात केली. इकडे सिद्ध महाराजाने भाताची टोपली हातात उचलली आणि मुठी मुठीने तो रक्तात कालवलेला भात ते मागे फेकत धावत सुटले. . . . . . . . मागून भूतांचा कल्ला चालू झाला. . . . . चित्र विचित्र आवाज काढत ती भूतं थैमान घालू लागली.

सुभानराव आणि जग्गू खाली आपल्या गाडीपाशी पोहोचले आणि रव्याला हाक दिली. . .

" रव्या गाडी काढ रव्या पळ. . . . . . गावात भेटू "

आणि जग्गूने आपल्या अल्टोला स्टार्टर मारला आणि गाडी बेफाम वेगात पळवायची सुरवात केली. . . . . .

इकडे सिद्ध महाराज एकटा पडला, हातातल्या टोपल्यातला भात संपला हे लक्षात येताच त्यांनी ते टोपलं फेकून दिलं आणि जीवाच्या आकांताने ओरडत किंचाळत ते धावत सुटले. . . . . पण भात मिळायचा बंद होताच त्या भुतांनी त्यांना दाबलं. . . त्या टेकडीच्या खाली आणि त्या जंगलात आत्ता एकच भयाण शांतता पसरली. . . . . . . . . . कीर्र्र्र्र किर्र्र्र् किर्र्र्र फक्त आणि फक्त रातकिड्यांचा आवाज.

इकडे सुभानराव आणि जग्गू बेफाम वेगाने गाडी पळवत गावात पोहोचले. पाठोपाठ रावि पण पोहोचला. . . . . . जग्गूने रवीला कोपऱ्यात घेतलं रव्या कोणाला काय सांगू नकोस, तिकडे आपण कशाला गेलो होतो काय झालं कोणाला काहीच सांगू समजता कामा नये. . . . . . . . " नाय सांगनार साहेब, तुमी कालजीच करू नका" आणि रवी आपल्या घरी गेला.

नक्की तिथे काय झालं हे त्याला पण माहिती न्हावतं, पण हे दोघे जीव टाकून पळत आले, म्हणजे नक्की काहीतरी घडलं तिकडे. आणि ते बोकड बिकड घेऊन तिकडे रानात हे काय करत होते. . . . . ते बी " १० बोकड ". . . . . . . रवीच्या डोक्यात चक्र फिरायला लागली.

रवीने रात्री झोपण्याआधी सगळं आपल्या बायकोला सांगितलं, आणि सकाळी उठून तिने गावभर बोंब केली. बातमी वाऱ्यासारखी पसरली. . . सिद्ध महाराजाचा शोध चालू झाला, महाराज घरात आणि गावात कुठेच सापडेना, गाव निघाला सिद्ध महाराजाला शोधायला. जग्गू आणि सुभानराव शेवट पर्यंत हेच बोलत होते, आम्हाला काहीच माहिती नाही, आम्ही तिकडे गेलोच न्हवतो. . . . " हा रव्या बेवडा प्यायला असेल रात्री "

आत्ता गावकरी त्या टेकडीवर पोहोचले, रवीने जागा दाखवली. . . इकडे तिकडे बघता बघता गावातल्या एका माणसाला, झुडपात सिद्ध महाराजांचे पिवळे कपडे दिसले, लोकं जवळ गेले, कापडाला हात लावला तर तो फक्त त्यांचा उजवा पाय होता. बाकी शरीर गायब. . . . . .

" अरे रे रे रे महाराजाला प्राण्याने खाल्ला वाटतंय, नखाने पाय कसा वर्बडलाय बघा. . . . . "

तिथे त्या रात्री काय घडलं हे शेवटपर्यंत कोणालाच समजलं नाही. . . . . सुभानराव आणि जग्गू आयुष्यभर आपलं तोंड बंद ठेवून आहेत. आत्ता दोघेपण म्हातारे झालेत. जग्गू आपल्या पोरांसोबत मुंबईत राहतो आणि सुभानरावांना लखवा गेला आहे. . . ते खुर्चीतच पडून असतात.

# " पहिली अंघोळ "

" शकू, शकू दार उघड, दार उघड शकू " साळवी काकी हाका मारत होत्या पण शकू दार उघडायला तयारच न्हवती. शेवटी शेजाऱ्यांनी दरवाजावर लाथा मारून तो उघडला आणि साळवी काकींनी एकच आरोळी फोडली. . . . . . .

" शकू, शकू माझे बाय, काय करून घेतलस हे पोरी, काय झालं हे " आणि त्या चक्कर येऊन खाली पडल्या. शकूने पंख्याला टांगून गळफास लावून घेतला होता.

दत्ताराम साळवी हे आपल्या कुटुंबासह माहिमला साईकृपा चाळीत रहात होते. एक मुलगा सचिन, एक मुलगी शकुंतला आणि पत्नी. दत्ताराम साळवी जवळच्या एका मिलमध्ये कामाला होते. पोरं लहानाची मोठी झाली, मुलाचं शिक्षण चालू होतं, मुलगी लग्नाला झालेली आणि अचानक मिलमध्ये संप पुकारला गेला. हा संप आत्ता किती महिने चालणार कोणालाच माहिती न्हवतं. बघता बघता संप चालू होऊन ८ महिने निघून गेले. त्यांच्याकडे जेवढे पैसे साठवलेले होते ते आत्ता हळू हळू करून संपायला लागले. मुलाचं शिक्षण थांबवलं गेलं पोरीच्या लग्नाला साठवलेले पैसे सगळेच्या सगळे खर्च झाले, दत्ताराम साळवी आर्थिक अडचणीत सापडले. दररोज टेन्शन, कुठेही नोकरी मिळेना, मुलगा कुठल्यातरी ऑफिसात शिपायाची नोकरी करू लागला, पत्नी आणि मुलगी शेजाऱ्यांकडे पापड लाटायला जाऊ लागल्या. . . . थोडेफार पैसे मिळायला लागले. २ वेळचं अन्न मिळायला लागलं.

पण दत्ताराम समोर अडचणींचा डोंगर उभा होता, डोक्यावर कर्ज झालं, तरुण मुलगी घरात लग्नाला झालेली, हलाखीची परिस्थिती पोरीचं लग्न करायचं कसं?

आणि मग घरात दररोज टेन्शन टेन्शन. . . . . . " शकू, पोरी तुझं लग्न मी राणी सारखं लावून देईन तू चिंता करू नको पोरी ". आणि एकदिवस दत्तारामचा मृतदेह जवळच्या रेल्वे फाटकात सापडला. त्याने आपलं आयुष्य संपवलं.

पंधरा दिवसांनी दिवाळी आली, दिवस होता दिवाळीच्या पहिल्या अंघोळीचा. सर्वत्र दिवाळीचा जल्लोष पण साईकृपा चाळीत कोपऱ्यात असणाऱ्या खोलीत राहणारे साळवी कुटुंबीय मात्र भकास जीवन व्यथित करत होते. त्या दिवशी साळवी काकी बाजारात काहीतरी समान आणायला गेल्या होत्या, सचिन कामावर होता. शकुंतला एकटीच घरी. काकी बाजारातून परत आल्या, दरवाजा ठोकला, " शकू. . . दार उघड " वारंवार त्या हाकामारत होत्या, पण घरातून कोणताच आवाज येईना. त्या घाबरल्या. शेजाऱ्यांना गोळा केलं. . "आहो पोरगी आत एकटीच आहे, खूप वेळ झाला दार वाजवते मी, पण उघडतच नाही" शेजाऱ्यांनी दारावर लाथा मारून दार उघडलं. . . . . . समोर शकुंतलाचं शरीर पंख्यावर लटकत होतं. फासावर लटकलेली शकुंतला समोर बघून. . . साळवी काकींनी हंबरडा फोडला. . . . " काय केलस हे पोरी, पोरी कुठं गेलीस मला सोडून. . . काय केलस पोरी " आणि त्या चक्कर येऊन खाली पडल्या. सचिनला ताबडतोब निरोप पाठवला गेला. . . . . . . . . . . .

आई आणि भाऊ, शकुंतला चं शरीर तिच्या गावी मालवणला घेऊन गेले, तिथेच तिचे अंत्यसंस्कार पण झाले. साळवी काकी आणि सचिन त्या दिवशी जे निघून गेले ते पुन्हा कधीच मुंबईत परतले नाही. कारण मुंबई मध्ये आत्ता दिवस काढणं त्यांना जमेना. राहत्या खोलीत पोरीने केलेली आत्महत्या साळवी काकींच्या डोळयासमोर दिसायला लागली. सचिनने ठरवलं खोली भाड्याने देऊया, पण त्या खोलीत जे झालं ते ऐकून कोणीच भाडेकरू पण मिळेना. खोली विकून चार पैसे मिळतील, पण ती खोली कोणी विकत पण घेईना.

ह्या घटनेला आत्ता १ वर्ष उलटून गेलं. त्या खोलीच्या दरवाजांना वाळवी लागलेली. खोली चाळीच्या एका कोपऱ्यात गल्लीत होती, म्हणून तिकडे कोण जायचं पण

नाही. शेजाऱ्यांनी आपले प्लास्टिकचे ड्रम वगैरे असं भंगार समान त्या खोलीच्या समोर कोपऱ्यात टाकून ठेवलेलं.

प्रत्येकवर्षी प्रमाणे यंदाही दिवाळी आली. दिवाळीची पहिली अंघोळ, सगळीकडे दिवाळीचा जल्लोष, चाळीत सर्वत्र लायटिंग आणि फटाक्यांची आतिषबाजी होती. लोकांच्या दारांना तोरणं लावलेली दरवाजात आकाश कंदील चमकत होते. पण त्या शेवटच्या खोलीत मात्र कायमचा अंधार दाटलेला. तो कोपरा तसाच ओसाड पडलेला. संध्याकाळ झाली, चाळीतल्या मुलांनी फटाक्यांची आतिषबाजी चालू केली आणि त्या खोलीतून आवाज येऊ लागले.

शेजारी राहणारी सुमेधा तिच्या दरवाजात रांगोळी काढण्यात मग्न होती, रांगोळी काढून पूर्ण झाली आणि ती तिच्या आईला बोलवायला आतमध्ये गेली. . . .

"आई बघ रांगोळी काय मस्त झाली आहे " दोघी बाहेर आल्या तर त्या रांगोळीवर एक पायाचा ठसा उमटलेला.

"काय नालायक पोरं आहेत, मी एवढ्या आवडीने रांगोळी काढली आणि हे पाय देऊन गेले "

थोडं निरखून बघितलं तर त्याच्या खाली लिहिलं होतं. . . . . " मी आज आली आहे "

हे काय लिहिलंय? सुमेधा बोलली. . तिने रांगोळी पुसून टाकली आणि पुन्हा नवीन रांगोळी काढायला बसली. . . . . . रांगोळी काढत असताना तिला शेजारच्या बंद खोलीतून आवाज ऐकायला यायला लागले. ती थांबली, उठून घरात गेली. . टी. व्ही.चा आवाज बंद केला आणि पुन्हा बाहेर आली, रांगोळी जवळ बसली रांगोळी काढता काढता पुन्हा लक्ष देऊन ऐकत होती. . त्या खोलीतूनच हा आवाज येतो नक्की. . . . म्हणून तीने घरात जाऊन तिच्या आईला सांगितलं. आई बोलली " उंदीर घुशी असतील ग, वर्ष झालं ती खोली बंद आहे "

सुमेधा पुन्हा बाहेर आली रांगोळी पूर्ण केली आणि कसला आवाज येतोय ऐकायला म्हणून त्या दरवाजाच्या फटीतून वाकून बघायला लागली. आत मध्ये अंधार होता, पण आवाज आत्ता पण येत होते. काही दिसेना म्हणून ती त्या खोलीच्या खिडकीपाशी गेली आणि फटीतून काही दिसतंय का म्हणून बघायला लागली. . . . तर आत मध्ये त्या खोलीत कोणीतरी मुलगी दिवाळीच्या पणत्या पेटवत बसलेली दिसली. सुमेधा तिथून घाबरून पळत आपल्या घरात आली. . . " ए आई त्या खोलीत कोणतरी मुलगी पणत्या पेटवत बसलेली आहे" तिची आई पण घाबरली

" काय बोलतेस काय, तू कशाला गेलीस तिकडे बघायला "

" अगं आवाज येत होते म्हणून मी त्या खिडकीतून आत बघितलं " आत्ता सुमेधाचे वडील तिकडे आले, असा असा प्रकार बाजूच्या खोलीत होतोय हे त्यांना सुमेधाने सांगितलं. ते हातात Torch घेऊन निघाले, दरवाजाच्या बाहेर आले आणि बघतात तर समोर त्या खोलीच्या दरवाजात किमान २०-२५ पणत्या ठेवल्या होत्या, आणि त्या सगळया पणत्या पेटत्या होत्या. हे बघून ते म्हणाले "सुमेधा, बाळा इकडे ये, ह्या पणत्या तू ठेवल्यास का तीकडे " " घाबरलेली सुमेधा बोलली नाही बाबा मी तिथून पळून आले मगाशीच"

आत्ता तिचे वडील हातात Torch घेऊन पुढे गेले सुमेधा आणि तिची आई त्यांच्या खोलीच्या दरवाजातच उभ्या राहून बघत होत्या. वडील त्या खोलीजवळ गेले, दरवाजा उघडा होता, आत कोणी दिसतंय का म्हणून त्यांनी घरात Torch मारली. . . . . . . आणि जीव घेऊन तिथून मागे पळाले, भूत भूत बोंबलत ते जोराने पळून मागे आले सुमेधा आणि तिच्या आईने त्यांना पळत आपल्या दिशेने येताना बघतच दोघीपण घरात पळाल्या, वडील घरात शिरले आणि धाड करून दरवाजा लावून घेतला. . . .

" भुताटकी आहे त्या खोलीत, हो ती भुताटकीच आहे " बाळा एक ग्लास पाणी घेऊन ये रे. . . . . आणि गळयाचा कंठ हालवत त्यांनी तोंडातली थुंकी गिळली. . . . कपाळावर

घाम सुटलेला, पायातली एक चप्पल घरात आणि दुसरी चप्पल त्या शेवटच्या खोलीच्या दारातच टाकून पळून आले होते.

सुमेधा हातात ग्लास घेऊन आली " काय झालं बाबा, काय होतं तिकडे "

" मी आत मध्ये टोर्च मारली तर समोर शकुंतला उभी दिसली, तिच्या दोन्ही हातात पेटत्या पणत्या होत्या "

सुमेधाची आई थक्क होऊन जमिनीवर बसली " अरे देवा, काय रे हे "

पाण्याचे ३-४ घोट घेऊन तिच्या वडिलांनी ताबडतोब चाळीच्या अध्यक्षांना फोन फिरवला. . .

" गायकवाड साहेब, आमच्या घरी याल का, होय होय आत्ता, लगेच या "

थोड्याच वेळात दरवाजाची बेल वाजली,

कोण आहे? . . . . " मी गायकवाड, आहो बोलवलत ना मला. . . . . . . "

दरवाजा उघडला आणि गायकवाडांना त्यांनी घरात घेतलं आणि दरवाजा बंद केला.

" आहो आज दिवाळीचा सण, आणि तुम्ही कशाला दरवाजे लावताय " झाला प्रकार त्यांनी गायकवाडला सांगितला. हे ऐकून तो पण थोडा टरकला. . . .

" थांबा बघुया काय प्रकार आहे, गायकवाडने त्यांच्याच फोनवरून आणखी चाळीतल्या ४-५ लोकांना बोलावून घेतलं. . . . . . आणिही सगळी माणसं सुमेधाच्या घराबाहेर जमा झाली.

सुमेधाचे वडील घराच्या दरवाजातच उभे, सुमेधा आणि तिची आई घरात बसली, चाळीतल्या काही बायका पण त्यांच्या घरात येऊन बसल्या. चाळीतल्या ५-१० लोकांचा गट हातात टोर्च घेऊन त्या कोपऱ्यात हळू हळू पुढे सरकत होता, दरवाजा अजूनपण उघडाच होता. आतमध्ये टोर्च मारली. . काहीच दिसेना म्हणून ३-४ लोकं धाडस करून आतमध्ये खोलीत शिरले इकडे तिकडे टॉर्च मारून बघायला लागले. . . . . . . . . त्या खोलीत लादीवर पणतीच्या वाती दिसल्या आणि २-३ पेटत्या पणत्या पण लादीवर होत्या, लोकं आपआपसात बोलायला लागले " ओ ओ हे बघा इथे वाती पडलेल्या आहेत आणि हे बघा पेटत्या पणत्या. . . . . एवढ्यात अचानक बाईच्या हसण्याचा आवाज आला. . . . . सगळे घाबरले. . टोर्च फिरवली तर खिडकीत उभी राहिलेली शकुंतला दिसली. . . . " ओ काका मी शकू. . आज दिवाळी ना म्हणून आले मी, हा हा हा हा हा हा हा हा हा " आणि ह्यांच्याकडे बघून ती पुन्हा हसायला लागली. . . . . . .

शकुंतलाला समोर उभी बघताच सगळे लोकं आरडा ओरडा करून धूम ठोकून त्या खोलीतून बाहेर पाळाले, जखिण जखिण शकूचं भूत. . . . . भूत करत सगळे लोकं पळून चाळीच्या बाहेर येऊन उभे राहिले. त्यांची पळापळ बघताच सुमेधाच्या वडिलांनी खोलीचं दार लावून घेतलं.

हा प्रकार घडला संध्याकाळी ७ वाजता. . . . . . . घरात बसलेल्या बायका मागच्या दरवाजाने त्यांच्या घरी निघून गेल्या.

रात्रभर सुमेधाच्या कुटुंबियांना झोप लागली नाही, शहरात वाजणाऱ्या फटाक्यांचे आवाज येत होते. खिडकीच्या काचेतून बाहेर चमकणाऱ्या लायटिंगचे बदलणारे रंग आणि डोक्यावर कु कु आवज करत फिरणारा पंखा वातावरण भयाण करून टाकत होता. रात्र सरली आणि दिवस उजाडला, सकाळी ७ वाजता पुन्हा चाळीतले लोकं जमा झाले. आत्ता बातमी अक्ख्या चाळीत पसरली होती, पोलिसांना पण बोलावण्यात आलं. पोलिसांनी चाळीतल्या लोकांना वेड्यात काढलं, " कोणीतरी वेडी शिरली असेल त्या खोलीत, आणि तुम्ही लोकं भूत भूत बोंबलत बसलात "

खोलीचा दरवाजा उघडाच होता, २ हवालदार हातात काठ्या घेऊन आत खोलीत शिरले, चाळीतली माणसं बाहेर होती. हवालदार पुन्हा बाहेर आले, कुठे कोण आहे तिकडे, उगाच आमचा वेळ वाया घालवत बसलात. . . .

आणि हवालदार तिथून निघून गेले, पाठोपाठ लोकं पण घाबरत घाबरत आत त्या खोलीत शिरले, आतमध्ये कोणीच न्हवतं. लोकांनी दरवाजा बंद करून घेतला आणि एक मेस्त्री बोलावून त्या दरवाजावर आणि खिडकीवर २ लाकडी वाशे " X " अश्याप्रकारे ठोकून घेतले.

दुसऱ्यादिवशी काही हालचाली जाणवतात का म्हणून लोकं सतर्क होतेच, पण तसं पुन्हा कधीच काही घडलं नाही.

त्या खोलीला आत्ता "शक्कूची खोली " म्हणून लोकं ओळखतात. चाळीत कोणाचं लहान मुल जेवत नसेल तर त्याला भीती घालायला म्हणटलं जातं. . . . . . " बाबू खा बघू, नाहीतर शक्कुच्या खोलीत नेऊन सोडेन "

"शक्कुची भीती लहान मुलांच्या मनात अशी काय भासवली गेली आहे, कि आत्ता शक्कुचं नाव घेताच पोर खोड्या करणं बंद करतात.

# " खबऱ्या "

१९९५-९६ची घटना, त्या वेळी राज्यात सर्वत्र अंडरवर्ल्डने थैमान घातलं होतं, छोट्यात छोट्या उद्योगपती पासून ते मोठ मोठ्या कारखानदारापर्यंत सगळेच त्रस्त झाले, आपला कारोबार विकून दुसऱ्या राज्यात आपलं बस्तान बसवूया म्हणून राज्यातले उद्योग एक एक करून बंद करून गुजरात राजस्थान कडे जायला लागले. बघता बघता शेयर बाजारात घसरण चालू झाली. . . सरकार समोर मोठा पेच होता आत्ता राज्याची आर्थिक धुरा कशी सांभाळायची. ५ सदस्य कमिटी बसवली गेली, अहवाल सादर झाला आणि सगळयांचे डोळे चापापतील असा निष्कर्ष समोर आला तो होता. . . . . . . " अंडरवर्ल्ड"

ताबडतोब गृहमंत्रालयाने आदेश काढले, राज्यात थैमान घालणाऱ्या गुंडांची यादी मागवली गेली आणि थेट एन्काउनटरचे आदेश दिले गेले

" कोणाचीही हयगय करू नका, दिसताच क्षणी ठार करा "

आत्ता पोलिसांचे हात मोकळे झाले, पोलिसांनी आपली सूत्र हालवायला सुरवात केली आणि ३ दिवसातच राज्यात एक चक्रीवादळ सुरु झालं, जिकडे तिकडे वर्तमानपत्रात बातम्या छापून येऊ लागल्या. . . "आज पहाटे पोलिसांच्या कारवाईत ७ गुंड ठार "

"बिल्डरला धमकी दिल्या प्रकरणी ३ गुंडांचा एन्काउनटर"

आणि कर्तबगार ऑफिसर लोकांचे फोटो वर्तमान पत्रांतून छापून येऊ लागले.

गुंडांच्या एन्काउनटर आणि धरपकड मागे सिंहाचा वाटा होता तो त्यांच्या खबऱ्यांचा. एका पाठोपाठ एक गुंडगिरी करणाऱ्या टोळयांचा सफाया होऊ लागला. खबरी लोकं अचूक टीप द्यायचे आणि टीप मिळताच पोलिसांची कारवाई. आत्ता सगळे गुंड भयभीत झाले, पोलिसांवर आपण पण आत्ता पलटवार करायची आखणी केली गेली आणि एका मागून एक खबरी लोकांच्या हत्येचं सत्र चालू झालं.

असाच एक खबऱ्या होता कमलाकर शिंदे. . उर्फ " काजळया ". कुलकर्णी साहेबांचा हा खास खबऱ्या, फक्त पैसे मिळतात म्हणून टीप देणं हा त्याचा धंदा न्हवता, पण राज्यात वाढणाऱ्या ह्या गुंडगिरीला आळा घालू, ह्या देशभक्तीने तो पछाडलेला. गेल्या ४ वर्षापासून तो कुलकर्णी साहेबांचा खास खबऱ्या होता. १९९५-९६च्या एन्काउनटर सत्रात कुलकर्णी साहेबांना जर सुर्वण पदक मिळालं तर त्यात पडद्या मागे असलेल्या "काजळया" चंही श्रेय होतच.

गुंडांकडून पोलिसांवर पलटवार होण्याचे सत्र चालू झालं. कुलकर्णी साहेबांना माहिती मिळाली कि काजळया गुंडांच्या टार्गेट वर आहे. ते ताबडतोब तो रहात होता त्या धारावी झोपडपट्टीत गेले, काजळयाला बाहेर बोलावलं, त्याच्या खिशात पैसे कोंबले आणि म्हणाले " काजळया आत्ताच्या आत्ता मुंबई सोड " राजस्थान गुजरात कुठे जायचं तिकडे जा, नाहीतर तुझी करून टाकतील "

हे ऐकताच काजळया बिथरला. मान हलवली आणि ताबडतोब रात्रीची ट्रेन पकडायला तो छत्रपती शिवाजी टर्मिनसला आला. राजस्थानला जाणाऱ्या ट्रेन चं तिकीट काढलं डब्यात बसला आणि राजस्थानला निघून गेला.

इकडे राज्यातला अंडरवर्ल्ड पोलिसांनी साफ केला, खूप गुंड मारले गेले, काही देश सोडून पळून गेले तर काही गुंड आजूबाजूच्या राज्यात पळून दबा धरून बसले.

तिकडे काजळया राजस्थानला, भारत पाक सीमेलगत असलेल्या " कुलधारा" नावाच्या एका गावात रहायला लागला. कुलकर्णी साहेबांनी किमान २०-३० हजार त्याला दिले होते. त्याने तिकडेच एका हॉटेलात वेटर चं काम पकडलं. आत्ता कुलधारा मध्ये येऊन त्याला किमान ६-७ महिने झाले होते. तिथे पण त्याला चैन पडेना, आपण पोलिसांना मदत करणं चालू करुया, आणि मग अंगात असलेल्या कलेने तो माहिती गोळा करायला लागला. पण यावेळी त्याची कार्यपद्धती वेगळी होती, अनोळखी प्रदेश आणि अनोळखी पोलीस ऑफिसर्स म्हणून तो पोलिसांना रात्री १ वाजता लोकल फोनवरून खबर द्यायचा.

" कोण बोल रहा है, कोण है तू भायो "

"साहब मै काजळया " असं बोलून तो फोन ठेवून द्यायचा. पोलिसांना खबर मिळताच ते वायरलेस काढून कारवाई करायचे, आत्ता पोलिसांचा ह्या फोन कॉल वर विश्वास बसलेला.

मुंबईतून पळून काही गुंड राजस्थानात येऊन दबा धरून बसलेले. एकदा काजळया सहज बाजारात फिरत होता, त्या गुंडांपैकी कोणीतरी त्याला बघितलं.

"अरे हा साला काजळया, कुलकर्णीचा खबरी" झालं त्याच्यावर टेळणी ठेवली गेली. . . . . . . . नेहमीप्रमाणे काम संपवून काजळया हॉटेलातून बाहेर निघाला, आज त्याला एका मटक्याच्या अड्ड्याची माहिती पोलिसांना द्यायची होती, तो एका लोकल पी. सी. ओ जवळ गेला, दुकान बंद होतं पण तो कॉईन बॉक्स वाला फोन बाहेरच होता. आजूबाजूची दुकानं बंद, रस्त्यावर कोणीच न्हवतं एकदम सामसूम रोड, त्याने इकडे तिकडे बघितलं आणि पोलिसांना फोन फिरवला

" साहब बस स्टेन्ड के पीछे खेत में मटके का अड्डा चल रहा है "

"तुम कौण हो भाई? "

"साहब मै काजळया "

आणि तेवढ्यात मागून त्या गुंडांनी त्याला पकडलं, शिवीगाळ चालू केली, हातातला फोन खाली पडला पण फोन चालूच होता, गुंडांनी त्याला मारहाण चालू केली तिकडे पोलीसांना सगळं ऐकायला येत होतं, ताबडतोब फोन ट्याप केला, लोकेशन समजलं आणि वायरलेस पोहोचली. समोर बघतात तर काजळयाचा मृतदेह रक्ताच्या थारोळयात पडलेला. पण फोनवर झालेलं संभाषण मराठी भाषेतून होतं, म्हणून पोलिसांनी आपल्या राज्यातल्या पोलिसांना संपर्क साधला. . . ओळख पटली "कमलाकर शिंदे उर्फ काजळया, राहणार-धारावी झोपडपट्टी.

" काजळया, येही खबर देता था " दुसऱ्या दिवशी पोलीस एकमेकांशी बोलायला लागले

" अच्छा आदमी था ये भायो, रातको १ बाजे फोण करके खबर देता था, कौण मारा भगवाण जाणे. . . . . . . . . "

दिवस निघून गेला संध्याकाळ झाली आणि बघता बघता रात्र झाली. . . . पोलीस एकमेकांशी मस्करीत बोलत होते

" आज कोई फोण वोण न आवेगा भायो, उ फोणवालो तो मारीगयो"

आणि फोनची घंटी वाजली, घड्याळात बरोबर १ वाजला होता. पोलीस दचकले, एक हवालदार जोराने हासत हासत फोनजवळ गेला आणि फोन उचलून कानाला लावला. . . .

" आज रात ३ बजे कूछ आतंकवादी सीमापार करके कुलधारा में आनेवाले है साहब"

हवालदाराने विचारलं " अब तू कोण है भायो "

पलीकडून आवाज आला " साहब मै काजळया " हे ऐकताच हवालदाराच्या हातातला फोन खाली पडला कपाळावर घाम आला आणि तो फोन पासून लांब झाला.

"क्या हुवा रतन जी? " दुसऱ्या हवालदाराने विचारलं. . .

" काजळया का फोण था. . . खबर दे गया. . . "काजळया का फोण?

" वो तो मर गया, अब कौण उसका भूत खबर दे गया "

"काली मां कि कसम, झूट णा बोलू मै "

पोलिसांनी दुर्लक्ष न करता ताबडतोब वायरलेस काढली आणि सैनिकांच्या सहाय्याने काजळयाने सांगितलेल्या भागात फिल्डिंग लावली. . . . एक नाही दोन नाही तब्बल २२ अतिरेकी सीमेतून आत घुलेले दिसले. . . . सिमेच्या आत येताच सैनिकांनी त्यांच्यावर गोळयांचा वर्षाव केला. . . आणि १० मिनिटांच्या आत सगळेच्या सगळे अतिरेकी ठार करण्यात आले, मोठा शस्त्रसाठा आणि काही GPS Navigator हाती लागले.

सैनिकी दलाकडून पोलिसांना शाब्बासकी मिळाली. आणि पोलीस अधिकाऱ्याने आणि सर्व पोलीस दलाने मनातून काजळयाचे आभार मानले. दुसऱ्याच दिवशी बातमी वतर्मान पत्रात पण छापून आली. . . . . . त्या कुलधारा पोलीस स्टेशनात त्या दिवसापासून पुढे किमान

वर्षभर असे फोन येतच राहिले आणि पोलीस आपली कारवाई चोख बजावत राहिले, बातम्या छापून येत राहिल्या. . . .

पोलिसांनी घडत असलेली घटना गावकऱ्यांना सांगितली, मिडिया आली आणिही बातमी आत्ता टेलिव्हिजन वर प्रसारित व्हायला लागली. . . .

" राजस्थान के सीमा इलाखे के गाव में, काजळया नाम का एक भूत कर रहा है पुलिस कि मदद"

इकडे कुलकर्णी साहेब एकदा टीव्ही. लावून बसले होते, त्यांनीही बातमी बघितली आणि आश्चर्यचकित झाले, " हा आपला काजळया तर नाही ". . . ते गालातल्या गालात हसले आणि पुन्हा चहाचे झुरके मारत बातमी बघत बसले. . . . . .

काजळया ज्या ठिकाणी मेला होता त्या ठिकाणी काही हवालदार लोकांनी एका झाडाखाली एक दगड बसवला आणि अमावस्या पौर्णिमेला तिथे जाऊन अगरबत्ती लावून नारळ फोडायला सुरवात केली. . . . . .

आत्ता गावकरी पण त्या दगडावर नारळ देतात अगरबत्ती लावतात.

वर्षभरानंतर ते फोन येणं बंद झाल. . . . . . पण ती प्रथा मात्र लोकांनी अजून चालूच ठेवली आहे.

# " मागोवा "

सुधीर, अक्षय, परेश आणि मी असे कंपनीतले आम्ही ४ मित्र. सगळे Bachelor, मुंबईत वेगवेगळया ठिकाणी फ़्लॅट भाड्याने घेऊन राहायचो.

दिवाळीचा बोनस हातात पडला आणि गोव्याला फिरायला जाण्याचा बेत ठरला. गोवा म्हणजे फक्त धमाल, शरीर उघडं टाकून फिरणाऱ्या विदेशी बायका, रंगीबेरंगी कपडे, आणि गोवा म्हणजेच दारूचं माहेरघर, हे म्हणजे अगदी लहानपणापासून मनात रुजलेलं. गोव्याला फिरायला जाण्याचा तसा मूळ हेतू पण तोच होता.

२५ डिसेंबर ते २ जानेवारी, म्हणजे ३१ डिसेंबरची धूम पण बघायला मिळेल, कोकण रेल्वेची तिकिटं काढली आणि २४ तारखेला रात्री आम्ही मडगावला पोहोचलो. स्टेशनच्या बाहेर येताच ३-४ गाईड जवळ आले, "साहब होटल चाहिये. . . ये देखिये साहब फोटो देखिये, सस्ते में दिलवा दुंगा साहब "

हॉटेल ग्रीन पार्क. २००० रुपये खोली, आम्ही ४ जण होतं म्हणून २ खोल्या घेतल्या. हॉटेलवर पोहोचलो हातातलं सामान टाकलं मस्त अंघोळ केली आणि दिली ताणून त्या बेडवर, डोळे उघडले ते थेट सकाळी ८ वाजताच. खिडकीचे पडदे सरकवले आणि समोर दिसला अथांग पसरलेला तो समुद्रकिनारा. किनाऱ्यावर फिरणारे पर्यटक, नजर जे शोधत होती त्या वाळूत झोपलेल्या बायका पण दिसत होत्या. तेवढ्यात बाजूच्या रूम मधून अक्षय आणि परेश तोंडात ब्रश घेऊन दात घासत माझ्या रूम मध्ये आले, आणि म्हणाले

"ए चला समोरच्या बीचवर जाऊ. . . . . "

नाही हो नाही हो करता सगळे निघालो, बॅग मधून स्विमिंग कोस्च्युम काढलं आणि निघालो किनाऱ्याच्या दिशेने. जाताना परत फिरून जाणारे पर्यटक आमच्या समोरून जात होते, सुधीर अक्षय आणि परेश त्या कमी कपड्यातल्या बायका बघून भलतेच खुश होत होते. मी त्यांना वारंवार समजावत होतो. . .

"ए इकडे फिरायला आलोय, जास्त आगावपणा करू नका "

पण गोवा म्हणजे जसं काय खुलं आकाश त्यांना वाटू लागलं होतं. मी आणि अक्षय समुद्राच्या लाटांवर तरंगत त्या निळया समुद्राची मजा लुटण्यात मग्न होतो, तिकडे परेश आणि सुधीर बायका बघण्यात मजा घेत घेत होते. परेश तसा बायकांच्या बाबतीत थोडा आंबट शौकीनच, त्याने सुधीरला आमच्याकडे पाठवलं,. . . . "सुधीर तू जा त्यांच्या सोबत मजा कर, मी आलोच " आणि तो चालत चालत कुठे त्या गर्दीत गेला समजलं नाही. थोड्यावेळाने आम्ही पाण्यातून निघालो, जवळच शॉवर घेतला, कपडे बदलले आणि हॉटेलकडे जायला निघालो. चालता चालता माझं लक्ष गेलं. . . . . .

"ए ए तो बघा, परेश. . "

" कुठे रे "

"अरे तो बघा समोर वाळूत आडवा झोपला आहे, त्या बाईच्या बाजूला"

"आयला हो रे. . . . "

परेश त्या विदेशी बाईबरोबर निवांत गप्पा मारत त्या वाळूवर आडवा पडलेला. आम्ही तिथून निघून गेलो. . विचार केला येईल तेव्हा येईल. . . रूमवर गेलो अंघोळया केल्या, कपडे चढवले आणि नास्ता करायला निघालो, परेशला फोन केला, बोलला " आलोच २ मिनटात ". . . . तो आल्यावर तो पण तयार झाला आणि आम्ही सगळे जिना उतरत असताना त्याला विचारलं. . "काय रे, कोण होती ती बाई? "

" काय नाय रे टाईमपास, फीलाडेल्फियाची आहे, आत्ता आपली खासमखास झाली ती"

तेवढ्यात सुधीरने त्याला विचारलं. "काय नाव काय तिचं. . . काय नंबर वगैरे घेतलास कि नाही? "

" Paola pareira नाव, नंबर घेतल्याशिवाय आपण रिकाम कधी येत नसतो " एकदम आवाज कडक करून परेश बोलला. . . . . .

"च्यायला तू पण ना सुधारणार नाही "

नंतर आम्ही तिथे एकदम मजेत २-३ दिवस गोवा फिरण्यात घालवले, एकदा आम्ही सगळे नाईट क्लब मध्ये गेलो. . . विचार केला बियर पिऊन डांस वगैरे करूया. . . आतमध्ये गेलो छाती दणाणून टाकणारं जोरदार म्युझिक वाजत होतं, बियर घेतल्या आणि संपवून आम्ही पण नाचायला लागलो. . . . रात्री साधारण २ वाजता आम्ही तिथून बाहेर पडलो. आत जाताना आम्ही आम्ही चौघेजण होतो पण बाहेर आल्यावर परेश आमच्या मध्ये न्हवता. परेशला फोन केला आणि समजलं कि त्याला क्लब मध्ये "पावला " भेटली. आणि तो आत्ता तिच्याबरोबर कुठल्यातरी आउटहाउस मध्ये आहे. अक्षयच्या हातातून मी फोन खेचला

" ए परेश, दारू प्यायला आहेस, त्या बाई पासून जरा जपून रहा, चोरट्या असतात, आणि भलतं सलतं तिच्या बरोबर काही करू नको. . . . फुकट मरशील"

" अरे नाही रे, मला कळतं तेवढं"

एवढं बोलून त्याने फोन कट केला.

आम्ही सगळे तिथून हॉटेलवर निघून गेलो. . . हा रात्रभर हॉटेलवर आला नाही, तो आला तो थेट सकाळी ७ वाजताच. दुपारी २ वाजता मी त्याच्या रूम मध्ये गेलो. . . . रात्री कुठे होतास काय केलस. . . . अश्या ह्या तिघांच्या तिथे गप्पा रंगलेल्या. परेशने फोन करून

अक्षय आणि सुधीरची पण त्या बाई बरोबर ओळख करून दिली. . . . . आत्ता मात्र आमच्यासोबत ती बाई पण सामील झाली.

आम्ही जिथे जाऊ तिथे ती आमच्या सोबतच, तिचा सगळा खर्च हे तिघेजण करत होते. पुढचे सगळे दिवस ह्या लोकांनी त्या बाई बरोबर मजा मारली. . . . ती सांगेल त्या आउटहाउस मध्ये जाऊन रात्ररात्रभर हे लोकं राहायचे. एवढच काय त्या आउटहाउस चं भाडं पण हेच भरत होते.

बघता बघता दिवस फटाफट निघून गेले आणि २ तारीख उजाडली. सकाळी ९ वाजता चेकआउट करून आम्ही सामान घेऊन पोहोचलो पणजी रेल्वे स्टेशनला.

संपूर्ण प्रवासात हे लोकं त्या Paola बरोबर गप्पा मारण्यात बिझी. . . , फक्त गप्पाच नाही, ह्या लोकांनी तिला ह्यांच्या घरचे पत्ते आणि फोन नंबर पण देऊन टाकले.

" मुंबईला आलीस कि ये आमच्याकडे. . राहण्याची जेवणाची सगळी व्यवस्था करू आम्ही. . . . . . "

रात्री ११ वाजता आम्ही मुंबईत पोहोचलो. दुसऱ्याच दिवसापासून ड्युटी जॉईन केली, आणि पुन्हा आयुष्याचा गाडा चालू झाला. बघता बघता १ महिना उलटून गेला. मनातून गोव्याच्या आठवणी आत्ता धूसर झालेल्या. पण ह्या तिघांच्या मनात अजूनही Paola च होती.

महिना उलटून गेला आणि एकदिवस अक्षयच्या घरी नेहमीप्रमाणे पोस्टमनने बेल मारली. . . अक्षय घरातच होता, त्याने पत्र घेतलं. लाल शाईने पत्ता लिहिलेला, पत्र आलं होतं गोव्यावरून. मागे नाव बघितलं "Paola pareira" अक्षयचा आनंद गगनात मावेना. ताबडतोब पत्र उघडलं. आतमधला मजकूर पण संपूर्ण लाल शाईनेच लिहिलेला होता. . पत्र वाचता वाचता तो चक्कर येऊन खाली पडला. थोड्या वेळाने शुद्धीवर आला आणि खचलेल्या मनाने सोफ्यावर पडून राहिला. . . संध्याकाळ झाली, बाहेर अंधार पडला. . पण ह्याला कश्याचच भान न्हवतं. . रात्रभर त्या अंधारात एकटाच बसून राहिला, डोळयातून पाण्याच्या धारा गळत

होत्या आणि सकाळपर्यंत तो खूप डिप्रेशन मध्ये गेला. . . . . . . आणि त्याच दिवशी दुपारी बातमी कानावर आली. . . . "अक्षयने आत्महत्या केली "

ताबडतोब आम्ही त्याच्या फ़्लॅट वर धाव घेतली. हसत खेळत राहणारा हा माणूस, असं कसं काय आत्महत्या करू शकतो. . . . . . आम्हाला काहीच समजेनासं झालं. शेजाऱ्यांनी त्याच्या गावी फोन करून कळवलं आणि त्याला त्याच्या गावी पाठवलं गेलं. . . .

ठीक ३ दिवसांनी पुन्हा एक बातमी कानावर आली "परेशने रेल्वे फाटकात जाऊन आत्महत्या केली "

हे नक्की काय चाललंय काहीच कळेना. अक्षयच्या पाठोपाठ परेशने आत्महत्या केली. . . , ह्या घटनेने मला आणि सुधीरला घाम फोडला. पोलिसांनी आम्हाला चौकशीसाठी बोलावलं आणि कसून चौकशी केली. . .

"साहेब महिनाभरापूर्वी आम्ही गोव्याला गेलो होतो, त्याच्या नंतर आम्ही कामावर रुजू झालो, कधीच कोणाशी भांडण वगैरे नाही "

"बर मग ह्या दोघांचं कुठल्या पोरीबरोबर काही लफडं, म्हणजे काही प्रेम प्रकरण वगैरे? "

हा प्रश्न कानावर पडताच माझे डोळे चपापले,

"साहेब प्रेम प्रकरण करणारे न्हवते हे दोघे, पण पोरींच्या मागे पागल होते, एकदम आंबट शौकीन.

आम्ही गोव्याला गेलो होतो तिकडे ह्यांची ओळख एका फीलाडेल्फियन बाई सोबत झाली. हा सुधीर पण होता त्यांच्या सोबत "

" काय रे काय घडलं तिकडे? "

सुधीर म्हणाला " काही नाही साहेब, भांडण लफडं काहीच नाही, फक्त २-४ दिवस मजा मारली आम्ही तिच्या सोबत, पण तिची संमती होती साहेब "

पोलिसांनी दोघांना जायला सांगितलं. . . . नेहमीप्रमाणे सकाळी मी कामावर गेलो सुधीर माझ्या समोरच बसायचा, पण आज तो दिसत न्हवता, साहेबांना विचारलं सुधीर कामावर आला नाही हे मला समजलं. मी घाबरलो, अक्षय परेश आणि आत्ता सुधीर तर नाही. . . . मी ताबडतोब सुधीरला फोन केला, आणि माझ्याबरोबर फोनवर बोलता बोलता तो अक्षरशः रडायला लागला. . . .

"सगळं संपलं रे, सगळं संपलं. . . . परेश गेला, अक्षय गेला, मी पण मरणार"

"अरे थांब थांब शुधीर मी आलोच तुझ्याकडे, मी आलोच सुधीर आपण बोलू "

आणि मी ताबडतोब त्याच्या Flat वर गेलो, मी आत गेल्या गेल्या त्याने मला मिठी मारली आणि ढसाढसा रडायला लागला. त्याच्या हातात एक पत्र होतं.

त्याने ते पत्र माझ्या समोर केलं. . . . . पत्ता बघितला, तो गोव्याचा होता. नाव "Paola pareira "

लाल शाईने लिहिलेलं ते पत्र वाचून मी हैराण झालो. त्यात फक्त एक ओळ लिहिली होती. .

" I am extremely sorry sudhir, i am suffering by aids; please forgive me for my sin "

सुधीरने टाहो फोडला, त्याची ती अवस्था बघून मला वाईट वाटलं. मी त्याला बोललो,

"थांब सुधीर घाबरून जाऊ नको. असं काही असेलच असं नाही, आपण मेडिकल चेकप करून घेऊया"

त्याचं सांत्वन केलं आणि ताबडतोब त्याला घेऊन मी इस्पितळात गेलो. त्यादिवशी संपूर्ण दिवस आणि रात्र मी सुधीर बरोबरच राहिलो, त्याला एकटं सोडणं म्हणजे

त्याला मृत्युच्या दारात ढकलण्याचा प्रकार होता. २ मित्र गमावले मला अजून एक मित्र गमवायचा न्हवता. दुसऱ्याच दिवशी जाऊन रिपोर्ट घेतला. . . . . रिपोर्ट एकदम नॉर्मल.

"सुधीर तुला काहीच झालं नाही मित्रा, मित्रा You are safe"

हे शब्द ऐकताच तो भारावून गेला, त्याने आनंदाने मला मिठी मारली.

"हे बघ आत्ता असल्या पत्रांना भिक घालू नको, मी अगोदरच सांगितलं होतं, ह्या गोव्यात फिरणाऱ्या काही विदेशी बायका Fraud असतात, पण तुम्ही लोकांनी ऐकलं नाही माझं "

सुधीर आत्ता एकदम Relax झाला, आणि दुसऱ्या दिवसापासून पुन्हा कामावर रुजू झाला.

माझ्या मनात त्या बाईबद्दल भलतीच चीड निर्माण झाली,ही बाई हे सगळं मुद्दाम करत आहे, किती लोकांचे जीव घेतले असतील माहिती नाही, पण आपण हे थांबवूया ह्या विचाराने मी ताबडतोब पोलीस स्टेशन गाठलं, सुधीरला आलेलं पत्र मी त्यांना दाखवलं. मेडिकल रिपोर्ट दाखवले.

पोलिसांनी गोवा पोलिसांना संपर्क साधला, मी दिलेला "Paola pareira"चा फोटो त्यांनी गोवा पोलिसांना Fax केला.

२ दिवसांनी पोलिसांनी मला आणि सुधीरला बोलावून घेतलं. . . आणि दम दिला

"काय रे काय मूर्ख वाटलो काय आम्ही, तुम्ही दिलेला फोटो कोणाचा आहे? "

"मी दबक्या आवाजात बोललो, साहेब त्या बाईचा Paola pareiraचा आहे, तीच बाई आमच्यासोबत फिरत होती, हे तीघेपण त्याच बाई सोबत मजा मारायचे"

पोलीस अधिकारी आमच्या अंगावर एकदाच खेकसला

"ही बाई ३ वर्षांपूर्वीच त्या गोव्यात एका आउटहाउस मध्ये मेली आहे, मेलेल्या बाईच्या भूतासोबत मजा मारत होतेत काय? "

हे ऐकताच आमच्या पायाखालची जमीन सरकली.

"नाही साहेब खरं सांगतोय हीच बाई होती साहेब, साहेब विश्वास ठेवा साहेब हिच बाई होती"

" डोकी फिरलेत तुमची, दारू कमी पीत जा " आणि आम्हाला तिथून जायला सांगितलं.

मी आणि सुधीर त्याच संध्याकाळी गोव्याला जाणाऱ्या बस मध्ये बसलो, नक्की काय भानगड आहे, हे समजून घेणं गरजेचं होतं.

आम्ही मडगावला पोहोचलो, सकाळचे ९ वाजले होते. गाडी पकडली आणि थेट त्या आउटहाउसच्या दिशेने गेलो. बाहेर गेटवर वॉचमन बसलेला, त्याला बोललो

" रूम चाहिये भाडे से "

" मिलेगा ना साहब, एकदम सस्ते में दुंगा साहब, आप किधर भी जा के देखो मेरा रेट एकदम कम रहेगा"

"कितना लेगा? "

" सिर्फ ५०० रुपिया ". . . . आणि मी Paola pareiraचा फोटो त्याच्या समोर केला,

"इसको जानता है क्या? , कौन है ये? "

आत्ता तो गडबडला, "आप कौन है? पुलीस्वाले है क्या. . . . . "

" नही, लेकीन पुलिस को लेके आयेंगे, कौन है ये? "

माझ्या दोन मित्रांचा हिच्यामुळे जीव गेला आहे, तिसऱ्याचा पण गेला असता. अजून जीव जातील, जर तू नाही बोललास तर.

आत्ता तो सगळं बोलायला लागला, त्याच्या सांगण्यावरून, Paola pareiraचा ३ वर्षांपूर्वी डिसेंबर महिन्यात त्या आउटहाउस मध्येच मृत्यू झालेला, तिला तिच्या बॉयफ्रेंड मुळे एड्स झाला होता, शेवटपर्यंत ती ह्याच आउटहाउस मध्ये खितपत पडलेली, पण तिच्या देशातून नियमित पैसा यायचा. . . . आउट हाउसचं भाडं नियमित मिळत होतं म्हणून तिला इथेच ठेवलेलं. शेवटी ती इथेच मेली आणि जवळच्या सिमेट्री मध्ये तिला पोलिसांच्या निरीक्षणात पुरलं.

" झूट लग रहा है तो आप नजदीक के पुलिस स्टेशन में जाके पुछो साहब, हमको क्या हमको पैसा मिलता है साहब, हमारा भी धंदा है "

डिसेंबर महिन्यात तिचं हे भूत ह्या आउटहाउस मध्ये जागं होतं. पण आउटहाउसचा धंदा जाईल म्हणून आम्ही कोणाला काही सांगत नाही असंही त्याने स्पष्टीकरण दिलं. पर्यटक इथे येतात राहतात मजा करतात पण आजपर्यंत इथे कोणालाही कसलाच त्रास झाला नाही. म्हणजे कोणालाही भुताटकी असल्याचा पण भास कधी झाला नाही.

हे सगळं ऐकून डोकं गरगरलं. आम्ही दोघेही तिथून निघून परत मुंबईला आलो.

परेश आणि अक्षयची आठवण आजपण येते, पण जे झालं ते झालं. . . .

काळ आला होता पण वेळ आली न्हवती, आज सुधीर माझ्यासोबत आहे. . . ह्यात मी खूप समाधानी आहे.

गोव्याच्या त्या समुद्रकिनारी Paola Pareira चं सावज कोण होत असेल माहिती नाही. पण तुम्ही कधी गेलात तर वाईट मार्गाने काही कृत्य करू नका एवढं मनापासून सांगतो.

# " बाटली "

सखाराम वडार, राहणार आटपाडी, संगमनेर. घटना :- २००८.

घाटावरून खाली उतरून सखाराम वडार हा त्याच्या बायको समेत संगमनेरच्या आटपाडी गावात रहायला आला. पोटापाण्यासाठी लोकांच्या घरासाठी लागणाऱ्या जोत्याची दगडं घडवायचा. बायको काशीबाई, आई बापाने लग्न लावून दिल्यापासून आपल्या धन्याच्या खांद्याला खांदा लावून ती पण राबायची. संसार एकदम सुखाचा चालला होता. हळू हळू सखारामने थोडे पैसे जमवून २ मेंढरं घेतली, सकाळी उठून मेंढरांना चरून आणलं कि दोघंपण त्यांना घेऊन कामाला जायचे. काम म्हणजे आजूबाजूच्या ५-६ गावात जिथे कुठे कोणाच्या घराचं काम चालू असेल तिथे जाऊन दिवसभर दगडं घडवायचा. पण गावातली लोकं काय दररोज कोणी घरं बांधत नाहीत म्हणून ह्या गावातून पुन्हा त्या गावात. पण आत्ता त्याला बिऱ्हाड घेऊन गावोगावी फिरण्याचा कंटाळा आला होता. आत्ता जे काही २ वेळचं मिळेल ते खाऊन आटपाडी गावातच राहायचं त्याने ठरवलं. काम नसल्यावर तो गावातल्या लोकांची छोटी मोठी कामं करू लागला, कधी कुणाच्या शेतीसाठी मजुरी तर कधी कुणाचं कुंपण शिवायचा. असं करता करता त्याच्या आयुष्याची गाडी चालू होती.

सखाराम वडार आत्ता आजूबाजूच्या गावात नावाजला गेला, कोणाला कामानिमित्त मजूर हवा असल्यास. . सखाराम हजर.

आत्ता सखारामला आटपाडी गावात २ वर्ष उलटून गेली, ओळखीचे मित्र झाले, आत्ता तो त्याच गावाचा एक भाग झाला होता. पण त्याला एक वाईट सांगत लागली. गावातल्या टवाळ मुलांच्या नादी लागून आत्ता त्याला दारूचं व्यसन लागलं, दारू पाठोपाठ जुगाराचा नाद लागला. मग हळू हळू उशिरा घरी येणं, दारू पिऊन बायकोला मारझोड करणं वाढतच गेलं. जसं काय त्याच्या संसाराला कोणाची तरी वाईट नजरच लागली.

एकदा तो मटका खेळायला बाजूच्या शिंगोला गावात गेला, खेळता खेळता खिशातले सगळे पैसे हरला आणि मग टेंशन मध्ये खूप दारू प्यायला, दारूच्या गुत्थ्यावरून येताना हातात अजून एक बाटली घेऊन निघाला. दुपारचे २ वाजले होते, आटपाडी ते शिंगोला मध्ये दाट जंगल होतं. पायवाटेने झेकांड्या घेत तो आटपाडीच्या दिशेने येत असता, त्याला वाटेत एक दगड दिसला, कोणीतरी त्याला शेंदूर फासलेला. नशिबावर रडत देवाला दोष देत नशेच्या भरात त्याने हातातल्या बाटलीतली दारू त्या दगडावर ओतली. आणि बाटली बाजूच्या झुडपात फेकून दिली. त्याच क्षणापासून त्याच्या नशिबाची चक्र फिरायला लागली, आत्ता त्याने जे काही केलं होतं त्याची फळं त्याला भविष्यात भोगावी लागतील हे त्याच्या लक्षात येईपर्यंत खूप उशीर झाला होता. कारण आपल्या ह्या कृत्याने त्याने तिथे झोपलेल्या त्या अतृप्त आत्म्याला उठवलं.

सवईप्रमाणे दुसऱ्या दिवशीपण तो शिंगोल्यात मटका खेळायला निघाला. वाटेतल्या जंगलातून चालता चालता तो त्या दगडाच्या जवळ पोहोचला तोच त्याच्या कानात एक आवाज आला. . . . "दारू दे मला "

सखारामने इकडे तिकडे बघितलं. कोणीच न्हवतं, आपल्याला भास झाला असावा. म्हणून तो पुन्हा चालू लागला. पुन्हा त्याच्या कानात हळूच आवाज आला

"दारू दे मला "तो थांबला, २ मिनिटं शांत उभा राहिला आणि अचानक त्याच्या पाठीत जोरात थाप बसली. आत्ता मात्र तो गडबडला. काहीतरी गडबड आहे नक्की. आत्ता तो वेगाने चालायला लागला. त्याच्या कानाजवळ कोणीतरी जोरात येऊन ओरड्लं. . . . . .

" दारू दे. . . दारू दे मला "

सखाराम खूप घाबरला, त्याने खिशातून पावशेर काढली आणि ती बाटली तिथेच टाकून तो पळाला. धापा टाकत टाकत शिंगोल्यात पोहोचला. शिंगोल्यात गेल्या गेल्या दारूच्या गुत्थ्यावरून अर्धी पावशेर घेतली आणि बाटलीचे २ घोट घशात टाकले. थोड्यावेळाने मटक्याच्या अड्ड्यावर पोहोचला. त्यादिवशी सखाराम जुगारात खूप पैसे हरला आणि संध्याकाळी उशिरा पुन्हा आटपाडी कडे निघाला. आजपण तो खूप प्यायलेला. परत येत असताना त्याला त्या ठिकाणी पुन्हा आवाज आला " दारू दे मला "

हा भास नसून हा काहीतरी भुताटकीचा प्रकार आहे हे त्याच्या लक्षात आलं होतं. तो तिथून धूम ठोकून गावात पाळला.

घरी येऊन त्याने झाला प्रकार काशीबाईला सांगितला. काशीबाईने त्याला खूप शिव्या दिल्या "बेवड्या दारू ढोसतोस आणि जातोस, तुला भूतं काय उद्याच्याला राक्षसं बी भेटतील"

तिने त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. रागाच्या भरात उठली आणि फळीवर ठेवलेली दारूची बाटली उचलून तिने दरवाजातून बाहेर फेकली, पण बाटली हवेतच अधांतरी तरंगत राहिली. समोर हवेत तरंगणारी बाटली बघून ती पुरती घाबरून गेली आणि जोराने किंचाळली. सखाराम पण उठला आणि समोर बाटली बघून खूप घाबरला. . त्याने ताबडतोब दरवाजा बंद करून घेतला. रात्र निघून गेली आणि सकाळी दरवाजा उघडून बघितलं तर रिकामी बाटली अंगणात पडलेली दिसली. भूत आपल्या मागावर घरापाशी आलंय ह्या विचाराने आत्ता दोघेपण हैराण झाले.

आटपाडीतून बाहेर कोणत्याही गावात जायचं झालं तरी रस्ता हा एकच होता. आणि ह्याच रस्त्यातल्या जंगलात हे घडत होतं, लोकांकडे आपण मजुरीला जायचं तरी कसं. आणि जंगलातून जाताना दारू नाही टाकली तर भूत जीवावर उठेल. सखाराम पार गोंधळून गेला. जाता येता भूतासाठी बाटली टाकायचा खर्च काय त्याला परवडेना. हळू हळू त्याची उपासमार व्हायला लागली.

आपला नवरा दारूच्या आणि मटक्याच्या आहारी जाऊन संसाराची राख रांगोळी करत सुटलाय ह्या विचाराने काशीबाई हैराण झाली आणि आत्ता घराभोवती घडलेली ती घटना तिला आतून खात होती. एकदिवस निर्णय घेतला आणि दोघांनी गाव सोडून लांब कुठेतरी जायचं ठरवलं.

भल्या पहाटे दोघांनी पिशव्या बांधल्या आणि जंगलाच्या वाटेने निघाले. चालता चालता आत्ता ते त्या दगडाच्या जवळ आले. सखारामने काशीबाईला खुणावलं हीच ती जागा. आत्ता दोघेपण मनातून घाबरले. आणि आवाज आलाच " दारू दे, दारू दे मला "

दोघेपण दचकले. आपला नवरा जे सांगत होता ते खरं आहे. आत्ता दोघांनी एकमेकांचे हात पकडले आणि भराभरा चालयला लागले. पुन्हा एक कर्कश आवाज आला. . . . "दारू दारू दे दारू नायतर आज दोघांना बी इथच दाबून टाकतो "

सखाराम कडे त्यादिवशी दारू न्हवती. वेळ निघून जात होती, आणि अचानक पाठीमागून कोणीतरी दोघांच्या पाठीत लाथ मारली. दोघेपण जमिनीवर कोसळले. जमिनीवर कोसळताच त्यांच्या दिशेने एक भला मोठा दगड ढकलला गेला, जीव वाचवून ओरडत किंचाळत दोघे मागे फिरले आणि धापा टाकत पुन्हा आटपाडीत आले. झाला प्रकार त्यांनी गावातल्या माणसांना सांगितला.

मांत्रिकाकडे गेले, झाली घटना सांगितली. मांत्रिकाने सखारामला एक बाटली दारू घेऊन यायला सांगितलं, तो ती घेऊन आला, मांत्रिकाने त्या बाटलीवर काही मंत्र मारले आणि सखारामला म्हणाला,ही बाटली घेऊन जा आणि पुन्हा आवाज आला तरही बाटली जमिनीवर ठेव आणि निघून ये.

सखारामने तसंच केलं. तो आटपाडीतून निघाला, जंगलाच्या वाटेने जाता जाता त्या ठिकाणी पोहोचला आणि पुन्हा तेच घडलं जे नेहमी घडत आलं होतं. सखारामने बाटली जमिनीवर ठेवली आणि हळूच तो मागे वळला. त्याच्या समोर ती बाटली गडाबडा जमिनीवर लोळायला लागली. बाटली इकडे तिकडे घरंगळत होती आणि तिथे त्या ठिकाणी किंचाळयांचा आवाज चालू झाला. घाबरलेला सखाराम त्या ठिकाणाहून निघून मांत्रिकाकडे आला. थोड्यावेळाने मांत्रिकाने त्याला सोबत नेलं आणि बाटली हातात पकडली. भूत बाटलीत कैद केलं गेलं होतं. मांत्रिक बाटली घेऊन गावात आला. गावदेवीच्या मंदिरापाशी त्याने एक मोठा खड्डा खोदून ती बाटली त्या खड्ड्यात पुरली.

त्या ठिकाणी कोणी पुन्हा खोदकाम करू नये म्हणून आटपाडी ग्राम पंचायतीने त्या ठिकाणी जात्याचं एक चाक उभं करून ठेवलं आहे.

सखाराम आणि काशीबाई आत्ता त्या गावात राहत नाहीत. आटपाडी सोडून ते दोघेपण कुठेतरी जुन्नर कडे निघून गेलेत असं गावातले लोकं बोलतात.


# " रहस्य "

" म्हातारी चार पाच दिवस झाले कसल्या तरी विचारात असते. धड खात पीत पण नाही. बघा हो नाहीतर पाटील डॉक्टरला दाखवून आणा "

सुमित्रा तिच्या नवऱ्याला काशिनाथला सांगत होती. पण हलाखीची परिस्थिती होती, पगार पण झाला न्हवता म्हणून काशिनाथ बायकोची समजूत काढून बोलला " बघुया उद्या बघतो नाही ठीक झाली तर घेऊन जातो "

आणि नेमका त्याच संध्याकाळी घात झाला, म्हातारीने घरामागे असलेल्या विहिरीत उडी टाकून जीव दिला.

हि घटना आहे कोकणातल्या केळशी गावातली. साधारण १००-१५० घरांची वस्ती. तो काळ होता १९८० चा. समुद्रकिनारी नारळाच्या वाडीत काशिनाथचं कुडाचं घर होतं. घरामागे पूर्वजांनी बांधलेली एक विहीर आणि वाडीत नारळी पोफळी सुपारीची झाडं. घरात तो त्याची बायको सुमित्रा आणि म्हातारी आई राहायचे. काशिनाथ गावातल्या जमीनदाराकडे कामाला जायचा. नेहमी प्रमाणे तो सकाळी लवकर उठून कामावर निघून गेला. सुमित्राने कोंबड्या सोडल्या, वाडा सारवून घेतला आणि अंगणात खराटा मारत होती. थंडीचे दिवस आणि वाडीत धुकं पडलेलं. म्हातारीने हांडा उचलला आणि घरामागच्या विहिरी जवळ गेली. रहाट फिरवत हांडा खाली टाकला आणि भरलेला हांडा वर काढता काढता दोर तुटला आणि तो हांडा त्या विहिरीत पडला. हांडा तांब्याचा होता, म्हातारी डोक्याला हात लावून विहीर जवळ बसली. आणि थोड्या वेळाने हळू हळू चालत पुन्हा घरात आली. " ओ आई पाणी आणलात का? "



म्हातारी म्हणाली " मसणात गेला तो पाणी, दोर तुटून हांडा विहिरीत पडला, दुपारी काश्या आला कि सांगते त्याला काढायला "

नेहमीप्रमाणे काशिनाथ दुपारी जेवायला आला आणि सुमित्राने त्याला तो हांडा काढायला सांगितलं. काशिनाथ हांडा घेऊन वर आला आणि म्हातारीला बोलला "जरा सांभाळून काढत जा पाणी, झेपत नसेल तर सुमित्राला सांग"

सुमित्राने त्याच्याकडे लगेच डोळे मोठे करून बघितलं, तो जेवला आणि कामावर निघून गेला.

संध्याकाळी ४ वाजता म्हातारी पुन्हा हांडा घेऊन विहिरीवर गेली, रहाटाला हांडा बांधला आणि हांडा खाली सोडता सोडता बोलली. . . "बाबा रे आत्ता तरी वर ये "

म्हातारीने हांडा पाण्यात सोडला आणि सांभाळून हळू हळू हांडा वर काढला. डोक्यावर चींबूल ठेवली आणि हांडा उचलणार एवढ्यात त्या विहिरीतून एक घोगरा आवाज आला,

" मी वर येऊ का? "

म्हातारीने मागे वळून बघितलं, तिला वाटलं काश्या आला, पण वाडीत कोणीच दिसत न्हवतं, तिने हांडा उचलून डोक्यावर घेतला मागे वळली आणि पुन्हा त्या विहिरीतून आवाज आला. . . . . .

" म्हातारे मी वर येऊ का" म्हातारी थोडी गडबडली. डोक्यावरचा हांडा जमिनीवर ठेवला आणि विहिरीत वाकून बघितलं तर विहिरीत कोणीच न्हवतं. ती हांडा तसाच टाकून तिथून घरात निघून गेली.

म्हातारीला रिकामी येताना बघून, सुमित्रा बोलली " ओ आई आत्ता परत हांडा विहिरीत टाकून आलात काय "

सुमित्रा काय बोलत होती त्याकडे म्हातारीचं बिलकुल लक्ष न्हवतं. सुमित्रा पुन्हा मोठ्याने बोलली. . . . . " हांडा विहिरीत पाडलात काय? "

म्हातारीने विहिरीच्या दिशेने हात दाखवला आणि बोलली " नाय पाडला, हांडा बावडी जवळ भरून ठेवलाय, उचलवत नाय मला "

सुमित्रा मागे त्या विहिरीजवळ गेली आणि हांडा घेऊन पुन्हा घरात आली. संध्याकाळी काशिनाथ घरी आला, हात पाय धुवून घोंगडी टाकून मधल्या खोलीत बसला, म्हातारी कोंबड्या झाकत होती. काम आटपून ती गुपचूप एका कोपऱ्यात बसून राहिली. आज म्हातारीने आपली बसायची जागा बदललेली बघून, काशिनाथ बोलला " म्हातारे इकडे बस, त्या तिकडं कोपऱ्यात कशाला बसलीस"

"म्हातारी उठून आपल्या नेहमीच्या जागेवर येऊन गुपचूप बसली, आणि बसल्या बसल्या तिथेच झोपली. सुमित्रा आत चुलीवर भाकऱ्या टाकत होती.

" म्हातारीला जेवायला वाढ गं, झोपायला लागली ती"

सुमित्रा घरातून भाकरी आणि मासळी चं ताट घेऊन बाहेर आली, पण म्हातारीने त्या दिवशी जेवायला नकार दिला. म्हातारीला अंथरून टाकून दिलं आणि ती झोपली.

दुसरा दिवस उजाडला, सुमित्रा नेहमीप्रमाणे अंगणात खराटा मारत होती, विहिरीवरून पाणी नाही आणलं तर सून कटकट करेल, म्हणून म्हातारीने चींबूल हातात घेतली हांडा उचलला आणि विहीरी जवळ गेली. हंड्याला दोर बांधला आणि हळू हळू सांभाळून हांडा खाली विहिरीत सोडता सोडता पुन्हा बोलली " बाबा रे सांभाळून वर ये, नायतर सून परत कटकट करील"

म्हातारीने हांडा भरून वर काढला, चींबूल डोक्यावर ठेवली आणि हांडा डोक्यावर घेणार इतक्यात विहिरीतून पुन्हा घोगरा आवाज आला. . . . . . . .

" मी वर येऊ काय "

आज आलेला आवाज इतका विचित्र होता कि तो आवाज माणसाचा आहे का बाईचा हेच कळेना, आत्ता मात्र म्हातारी पार घाबरली. थंडीचे दिवस होते कडाक्याची थंडी पडलेली पण म्हातारी भीतीने घामाघूम झाली आणि तिथून ताबडतोब निघून घरात आली, आणि मागचा दरवाजा बंद केला.

दिवसा उजेडी म्हातारीने मागचा दरवाजा का बंद केला, म्हणून सुमित्रा हातातला खराटा टाकून घरात आली, " काय झालं ओ आई? " कुठं गेला होतात, परसाला गेला होतात काय? "

" म्हातारीचा अवतार बघून सुमित्रा पण घाबरली, म्हातारी घामाने भिजेलेली आणि थरथर कापत होती.

" काय झालं, थंडी वाजते का, पण घाम कश्याने आला तुम्हाला, का भिजलात"

म्हातारी फक्त त्या विहिरीच्या दिशेने हात दाखवत होती, सुमित्राने पाठीमागचा दरवाजा उघडला आणि ती मागे गेली, विहिरी जवळ हांडा तसाच होता भरलेला. तिने हांडा उचलला आणि घरात आली.

त्या दिवसापासून म्हातारीने खूप धसका घेतला, त्या विहिरीच्या दिशेने बघत एकटीच काहीतरी बडबड करत बसायची. म्हातारीने जेवण टाकून दिलं आणि तिची तब्बेत दिवसेंदिवस खालावली जायला लागली.

तिचीही अवस्था बघून एकदा सुमित्रा काशिनाथला बोलली म्हातारीला गावातल्या पाटील डॉक्टरकडे घेऊन जा. काशिनाथची आर्थीक परिस्थिती खूप हालाखीची होती, डॉक्टर म्हणजे खर्च आला, म्हणून तो टाळाटाळ करत होता आणि म्हातारी बरोबर घडणारीही घटना तिला दररोज मानसिक त्रास देत होती.

एकदा काशिनाथ आणि सुमित्रा काही कामानिमित्त शहरात गेले असता, म्हातारी गुपचूप गावातल्या भगताकडे गेली. घरामागच्या बावडीत घडणारा प्रकार तिने त्याला सविस्तर सांगितला. भगत तिला बोलला " म्हातारे त्या बावीत तुझ्या पूर्वजांचं ठेवणं आहे, तू त्याला वर यायला हाक मारलीस आणि आत्ता ते तुझ्या पाठी लागलंय"

" तू जर त्याला वर ये बोललीस तर ते वर येईल, ठेवणं घरात आलं तर भरभराटी होईल पण घरातल्या कोणाचा तरी बळी घेईल ते, बघ तुला काय कारायचं आहे ते"

म्हातारीच्या मनातली भीती कमी होऊन आत्ता लोभ जागा झाला. ती दुपारी घरी परतली, एक नारळ घेऊन विहिरीजवळ गेली, नारळ विहिरीत टाकला आणि बोलली " बाबा रे नारळा सांभाळून वर ये रे "

आणि नारळ आपोआप वर आलं. म्हातारीने नारळ हातात घेतला आणि विहिरीच्या कठड्यावर ठेवला. म्हातारी मागे वळली आणि विहिरीतून आवाज आला. . . . " मी वर येऊ काय "

म्हातारी थोडा वेळ शांत उभी राहिली आणि बोलली. . . " तू वर ये पण मी जो पर्यंत मागच्या दारातून परत घरात येत नाय तो पर्यंत तू माझ्या घरातून जायचं नाय "

आणि म्हातारी पुन्हा घरा जवळ आली, पण ती पुढच्या दाराने घरात शिरली, आणि मागच्या दराने बाहेर पडली, मागचा दरवाजा बंद केला आणि म्हातारीने मागच्या विहिरीत जाऊन उडी टाकली.

म्हातारी विहिरीत बुडून मेली. काशिनाथ आणि सुमित्रा संध्याकाळी घरी आले, म्हातारी कुठे दिसेना म्हणून शोधायला लागले, सुमित्रा मागे विहिरीजवळ गेली, वाटलं म्हातारी पाणी भरायला आली असावी. तर तिथे हांडा न्हवता, विहिरीत लक्ष टाकलं तर म्हातारी विहिरीत तरंगताना दिसली. . . . . .

आरडाओरड झाली, गावातली माणसं धावत आली आणि म्हातारीला बाहेर काढलं. म्हातारी मेलेली.

म्हातारीचे अंत्यसंस्कार झाले. बघता बघता दोन आठवडे निघून गेले, असाच एक दिवस सुमित्रा चुलीवर भाकऱ्या टाकत होती, तिला मागून आवाज आला. . . " माझं पण ताट वाढ " सुमित्रा दचकली, आवाज ओळखीचा वाटला म्हणून वळून बघितलं तर जमिनीवरून सरपटत एक ताट आणि वाटी तिच्या दिशेने येत होती.

भाकरी तशीच चुलीवर टाकून किंचाळत ती घराबाहेर आली. आजूबाजूची लोकं जमा झाली,

" काय झालं काय झालं. . . .? ? ? ? ? "

सुमित्रा भीतीने कापत होती. . . " घरात भूत हाय "

लोकं घरात शिरले, तिथे काहीच न्हवतं. त्यांनी सुमित्राची समजूत काढली, काशिनाथला बोलावून घेतलं. आणि दोघेपण घरात गेले, सुमित्रा मात्र भीतीनी घाबरली होती.

त्या घरात तिला आत्ता रहावसं वाटेना. ती काशिनाथला सांगत होती, जेवणाचं ताट माझ्या दिशेने येत होतं. . . . . . काशिनाथ तिची समजूत काढत होता. थोड्या वेळाने तो उठला, शर्ट काढला आणि खुंटीवर टांगायला म्हणून आतल्या खोलीत गेला, त्याला त्या खोलीत कोपऱ्यात म्हातारी बसलेली दिसली. . . म्हातारीला बघून तो घाबरून धावत धडपडत सुमित्राचा हात पकडून घराबाहेर पळून आला. ह्या घरात भुताटकी आहे. " म्हातारी झाली ह्या घरात " घरात "म्हातारी झाली " म्हणून गावात बोंब झाली.

काशिनाथ आणि सुमित्राने त्या घरात राहायचं सोडून दिलं. जागा बदलली आणि गावात दुसरीकडे एक छोटसं खोपट उभं केलं.

आत्ता त्या ओसाड पडलेल्या घरात भांडी पडल्याचा, कळशी हांडे आपटल्याचे आवाज येणं चालू झालं. शेजारी राहणारे लोकं सुरवातीला घाबरायचे, पण कधी कधी रात्री बेरात्री येणाऱ्या ह्या आवाजांची आत्ता त्यांना जशी काय सवयच झाली होती.

म्हातारी खूप वेळा त्या घराच्या खिडकीत उभी असलेली दिसायची. रात्रीच्या वेळी त्या खिडकीतून रडायचे आवाज यायचे. "काश्या काश्या. . . . म्हणून केविलवाणी रडायची म्हातारी"

हे आवाज खूप दिवस येत होते, पण नंतर २-३ महिन्यांनी ते प्रकार हळू हळू बंद झाले. आत्ता तर केळशी मध्ये लोक वस्ती खूप वाढली आहे. काशिनाथ आणि सुमित्रा पण आत्ता हयात नाहीत. ते ओसाड घर अजूनपण तसच आहे. त्यातली सगळी भांडी कुंडी चोरट्यांनी पळवून नेली, पण ते ओसाड घर आणि ती ओसाड विहीर अजून आहे त्या ठिकाणी.

# डिसोझा चाळ"

शहर मुंबई, गिरगाव: साल १९६०

आबासाहेब परांजपे ह्यांनी गिरगावात एक घर विकत घेतलं, पोर्तुगीज बनावटीचं प्रशस्त घर, वर एक माडी आणि किमान १० ते १२ खोल्या असतील असं हवेशीर.

आबासाहेब त्यांची पत्नी दोन मुली स्वाती शीतल आणि एक मुलगा समाधान.

आबासाहेब तसे पुण्याचे, सरकारी खात्यात कारकून पण सरकारी नोकरी असल्या कारणाने त्यांची बदली मुंबईत केली गेली. आत्ता मुंबईतच आपण पुढचं आयुष्य काढूया ह्या विचाराने त्यांनी पुण्याचं एक घर विकून मुंबईत हे घर विकत घेतलं, नाव होतं "डिसोझा चाळ" नाव चाळ असलं तरी घर मात्र एखाद्या प्रशस्त बंगल्यासारखं होतं.

दुसऱ्याच आठवड्यात त्यांनी आपलं बिराड पुण्याहून मुंबईत हालवलं. नजीकच्या शाळेत मुलांचे दाखले टाकले, आणि ते पण कामावर रुजू झाले. नवीन घर बघून मुलं पण खूप आनंदात होती, वर माडीवर एकूण ४ खोल्या होत्या आणि त्यात जुनं लाकडी फर्निचर. अगोदर जो कोणी मालक होता तो कधीच त्या घरात राहायला आला न्हवता. पण त्या घराची डागडूजी मात्र नियमित ठेवायचा, म्हणून घरातले सर्व लाकडी काम जसंच्या तसं सुस्थितीत होतं.

चांगला मुहूर्त बघून आबासाहेबांनी घरात पूजा घालायचं ठरवलं तारीख ठरली, तयारी झाली आणि एक दिवस अगोदर आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना पूजेचे आमंत्रण दिलं. पूजा सकाळी ७ वाजताच चालू झाली, घरामागे लोकं जेवणाच्या तपेल्या उतरवत होते. ब्राम्हण आला, घरात एक मोठा होम केला गेला, आबासाहेब आणि त्यांच्या पत्नी पूजेसाठी बसले होते.

होम साधारण २ तास चालला. पण झालं काय होम केल्या मुळे संपूर्ण घरात धूर झाला, आणि आत्ता २ तासानंतर तो धूर इतका झाला कि लोकांच्या नाकातोंडात जायला लागला. दरवाजे उघडे होतेच पण तरीही तो धूर काही कमी होईना. होम आटोपला आणि आबा साहेबांनी त्यांच्या पत्नीला वर माडीवरच्या सगळया खोल्यांच्या खिडक्या उघडायला पाठवलं. त्यांच्या पत्नी लाकडी जिना चढून वर माडीवर गेल्या. माडीवर धूर इतका दाट होता कि समोरचं काही दिसेना. भिंतीवर चाचपडत त्यांनी एक एक करून दोन खोल्यांच्या खिडक्या उघडल्या आणि तिसऱ्या खोलीकडे गेल्या. त्या खोलीच्या दरवाजाला कुलूप होतं, म्हणून त्यांनी आबासाहेबांना हाक मारली

" अहो, जरा घराच्या किल्ल्या वर फेका, मी आहे जिन्यात उभी "

आबासाहेब उठले आणि खुंटीवरून किल्ल्या काढल्या आणि वर माडीवर फेकल्या. किल्ल्या लाकडी माळयावर घसरत त्यांच्या पत्नीच्या पायाला लागल्या. त्यांनी त्या उचलल्या आणि दरवाजा उघडला. त्या खोलीत पण धूर खूप दाट होता. खोलीत असलेला लाकडी झुला मात्र हालत होता. त्याच्या लोखंडी कड्यांचा आवाज त्यांनी ऐकला. नक्कीच झुल्याच्या कड्यांचा आवाज आहे.

"पणही खोली बंद होती, झुल्यावर पोरं पण आली नाहीत, मग हा झुलतोय कसा ". . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . त्या थोड्या विचारात पडल्या.

पण वेळ सकाळी ९-१०ची होती आणि घरामागे लोकांची पूजेच्या कामाची गडबड ऐकू येत होती, खालून लोकांच्या बोलण्याचा आवाज वर माडीवर पण येत होता, म्हणून त्या घाबरल्या नाही. पण मनातून थोड्या गांगरल्या. धूर नाकात झोंबत होता म्हणून त्यांनी पदर नाकातोंडावर घेतला आणि एका हाताने खिडकीची कडी उघडणार, इतक्यात कोणीतरी त्यांचा हात पकडला. त्या दचकल्या.

" कोण आहे "

कोणी काहीच बोललं नाही. त्या धुरात समोर कोण आहे त्यांना दिसत न्हवतं, पण तो हात मात्र त्यांना दिसत होता, हातात हिरव्या बांगड्या होत्या, म्हणजे नक्कीच कोणीतरी बाई आहे. त्यांनी हात झटकला, आणि पळत त्या खोलीतून बाहेर पडल्या जिना धडाधडा उतरत खाली उतरल्या आणि घाबरलेल्या गांगरलेल्या आबासाहेबांच्या जवळ आल्या.

"तिकडे माडीवर, कोपऱ्यातल्या खोलीत कोणीतरी बाई आहे, खिडकी उघडायला गेले तर माझा पकडला". . . . . . . . . . . . . . . . आणि त्यांनी आपला हात आबासाहेबांच्या समोर केला. हातावर बोटांचे वळ दिसत होते.

" थांब मी बघतो कोण आहे ". . आबासाहेब एक एक पाउल टाकत वर जिना चढून गेले, दोन खोल्यांच्या खिडक्या उघड्या असल्यामुळे आत्ता धूर बऱ्यापैकी कमी झाला होता. आबासाहेबांनी सगळया खोल्या तपासून बघितल्या पण तिथे कोणीच न्हवतं. ते खाली आले, बायकोने त्यांच्याकडे बघितलं. . . आबासाहेब बोलले

"कोणीच नाही तिकडे "

घराच्या माडीवरून बाहेर पडायला फक्त एकच मार्ग होता, आणि त्यासाठी खाली आल्याशिवाय कोणी बाहेर जाऊच शकत नाही. मग ती बाई गेली कुठे?

आबासाहेब चिंतेत पडले. पत्नी अधिकच घाबरली. पूजेला आलेले शेजारी एक एक करून न जेवताच काही न काही कारणं सांगून निघून गेले.

घडलेल्या घटनेने आत्ता मात्र संपूर्ण कुटुंब चिंतेत पडलं. ब्राम्हणाने पूजा आटोपली आणि तो पण ताबडतोब तिथून निघून गेला. पाठीमागे जेवणाच्या तपेल्या उचलणाऱ्या लोकांनाही बातमी समजताच ते पण निघून गेले. सगळं जेवण तसच पडून राहिलं. |

पूजा उरकली आणि सर्व साफसफाई करून संध्याकाळी त्यांनी सर्व पूजेचं साहित्य जवळच्या समुद्रात विसर्जित केलं.

पुढे किमान आठवडाभर त्यांच्या पत्नी माडीवर गेल्या नाहीत आणि मुलांना पण जाऊन दिलं नाही. पण त्या दिवसापासून त्या घरात भीती वाटेल असं काहीच घडलं नाही. आबासाहेब नेहमी त्यांच्या पत्नीची समजूत काढायचे, कोणीतरी मस्करी केली असेल.

त्यादिवशी पूजेला आलेल्यांपैकी कोणीतरी तुझी मस्करी केली असेल, हळू हळू बघता बघता महिना उलटून गेला. आत्ता त्यांच्या पत्नीच्या मनातून भीती पण कमी झाली.

एक दिवस आबासाहेब कामावर गेले होते. मुलं शाळेत, वेळ मोकळा होता म्हणून त्यांच्या पत्नीने ठरवलं थोडं झाड लोट करून घेऊ. एक एक करून आत्ता त्यांनी संपूर्ण तळघर साफ करून घेतलं. तेवढ्यात मुलं शाळेतून आली. भूक लागली म्हणून त्या त्यांच्यासाठी चपात्या बनवत होत्या. तिन्ही मुलं वर माडीवर गेली आणि झोपाळयावर झोके घायायला लागले. माडीवरून मुलांच्या धावण्याचा आवाज त्यांना खाली ऐकू येत होता. मैत्रिणीने हाक मारली म्हणून स्वाती आणि शीतल खाली आल्या आणि समोरच्या अंगणात खेळायला गेल्या. समाधान माडीवर एकटाच होता. थोड्यावेळाने तो पण खाली आला. हातात एक छान रंगीबेरंगी लाकडी बस, त्याच्या हातातली लाकडी बस बघून स्वाती आणि शीतलने विचारलं

" कुठे मिळाली रेही बस गाडी "

तो बोलला " वर माडीवर त्या काकूंनी दिली "

" कुठल्या काकूंनी? "

म्हणून त्याने वर बोट करून माडीकडे दाखवलं. . . . दोघींनी वर बघितलं तर वर माडीच्या कोपऱ्यातल्या खोलीच्या ग्यालरीत एक बाई उभी होती आणि हाताने खुणा करून त्या दोघींना वर बोलवत होती.

त्या दोघी घाबरल्या आणि धावत त्यांच्या आईकडे गेल्या. . . आणि सांगितलं वर माडीवर एक बाई आहे आम्हाला वर बोलवत होती. . . . . . . हे ऐकून आबासाहेबांच्या पत्नी घाबरल्या आणि पळत अंगणात आल्या. . . . वर माडीवर कोपऱ्यातल्या खोलीच्या ग्यालरीत नजर टाकली. पण तिथे कोणीच न्हवतं.

त्यांनी समाधानच्या हातातली बस घेतली आणि अंगणाबाहेर रस्त्यावर फेकून दिली. त्यांनी आपल्या मुलांना बजावलं

"परत वर माडीवर गेलात तर तंगडं तोडून ठेवेन". . . . . . . . . . . . . . . . . . संध्याकाळी आबासाहेब आले, झाला प्रकार त्यांनी आबासाहेबांना सांगितला. हे ऐकून ते पण घाबरले. काय करायचं कळेना. पुन्हा त्यांनी त्यांच्या बायकोची समजूत काढली.

" दरवाजा उघडा असताना कोणीतरी बाई गेली असेल वर माडीवर, घरात लक्ष ठेवत जा"

टाळाटाळ करून त्यांनी तो विषय बंद केला.

वारंवार ह्या घडणाऱ्या घटनांनी त्यांची बायको नेहमी मनातून घाबरलेली असायची, एकदिवस त्यांनी आबासाहेबांना सुचवलं

"मी घरात एकटी असते मला इथे भीती वाटते, पुण्याहून माझ्या भावाला इथे बोलावून घेऊया. त्याचा मेणबत्ती बनवायचा उद्योग आहे, तो इथे पण करू शकेल. वर माडीवर खोल्या रिकाम्याच असतात, तो तिथे राहून त्याचा उद्योग पण करेल आणि खोल्या पण वापरात राहतील"

आबासाहेबांनी मान्यता देताच " भाऊराव आपटे " त्यांचा मेहुणा पुण्याहून मुंबईत आला. हळू हळू कामात त्याचा जम बसला. वर माडीवर असलेल्या एका खोलीत तो मेणबत्त्या बनवायचा आणि दुसऱ्या खोलीत राहायचा. कोपऱ्यातली खोली मात्र बंदच होती. भाऊराव आपटे तयार झालेल्या मेणबत्त्या खोक्यात भरून ते खोके व्यवस्तीत रचून ठेवायचा. पण नेहमी कोणी न कोणी ते खोके खाली पडायचा. त्याला वाटायचं मुलं करत असतील, पण हा प्रकार रात्रीच घडायचा, आणि रात्री तर मुलं कोणीच माडीवर येत नसत. उंदीर किंवा घुशी असतील, म्हणून भाऊरावने ह्या गोष्टीकडे कधी लक्ष दिलं नाही. घरात बाई दिसते हा प्रकार आबासाहेब किंवा त्यांच्या पत्नीने भाऊरावला कधीच सांगितला न्हवता कारण भाऊराव आपटे एक नंबरचा घाबरट माणूस होता.

एक दिवशी संध्याकाळचं जेवण झालं आणि भाऊराव आपटेंनी मेणबत्त्यांचे खोके ठेवायला ती कोपऱ्यातली खोली उघडली. खिडक्या बंद होत्या, पण वर कौलांना असलेल्या

काचेतून चंद्रप्रकाश खाली खोलीत येत होता, त्याने २०-२५ खोके त्या खोलीत ठेवले थंड हवा घ्यायला बाहेर ग्यालेरीत येऊन उभा राहिला, समोर अथांग दिसणारा समुद्र आणि त्यात दिसणारी चंद्राची प्रतिमा मन हेलावून टाकणारा नजारा होता. तिथे उभा राहून तो तोंडातल्या तोंडात गाणं गुणगुणत होता. त्याला बांगड्यांचा आवाज आला. त्याला वाटलं त्याची बहिण असेल.

तो सहज बोलला " ताई समोर समुद्र बघ काय छान दिसतोय "

आणि आवाज आला. . . . . . . . .

" मांझेसाठी तो नवीन नाय, खूप वरसां झायली मिनी बघते तो "

आवाज बाईचा होता पण त्याच्या बहिणीचा न्हवता, आवाज भाषा शैली जरा वेगळीच वाटली त्याने भुवया वर केल्या आणि वळून मागे बघितलं. एक हिरवं लुगडं घातलेली बाई त्याला त्या खोलीत जाताना दिसली. "ही कोण बाई "

आणि तो झटकन मागे त्या खोलीच्या दिशेने गेला. खोलीत आत नजर टाकली, तर एक बाई त्या झोपाळयावर बसलेली दिसली. खिडक्या बंद होत्या पण त्या काचेतून येणारा चंद्रप्रकाश बरोबर त्या बाईच्या अंगावर पडत होता. त्या प्रकाशात ती अजूनच भयावह दिसत होती. भाऊराव आपटे घाबरला, तोंडातली थुंकी गिळत त्याने विचारलं. . " ए, ए कोण तू, कोण आहेस " आणि भिंत चाचपडत तो लाईट चं बटन शोधायला लागला. बटन सापडलं आणि त्याने बल्ब चालू केला.

ती बाई दरवाजाच्या दिशेने पाठ करून बसलेली, रागीट आवाजात बोलली

" मालकीण, ह्या घराची मालकीण ". . . . . . . . . . .

बाईचा आवाज तर व्यवस्थित वाटला, म्हणून तो अजून २ पावलं पुढे गेला. आणि म्हणाला

" कोण मालकीण, हे घर माझ्या भाओजींचं आहे "

ऐकून ती जोर जोराने हसायला लागली. . . . आणि केस मोकळे करून गरागरा मान फिरवायला लागली. अंगात देवी आलेल्या बाईसारखी ती हुंदके देत होती आणि मान जोराने फिरवत कर्कश आवाजात हसायला लागली दोन हात वर केले, हातातला हिरवा चुडा. . खणाखणा वाजवायला लागली. . . . तिची मान आणि ते मोकळे केस गरागरा फिरतच होते आणि आपोआप झोपाळा जोर जोराने झोके घेऊ लागला. . . . . .

तिचं हे रूप बघून भाऊराव आपटे धोतर उचलून तिथून खाली पळाले. पळता पाळता जिन्यातून जे पडले ते थेट खाली तळघराच्या लादीवर येऊन आपटले पळत बाहेर अंगणात आले. . . . . आणि मोठ्याने ओरडायला लागले

" अबो बो बो बो बो, अबो बो बो बो " भूत भूत भूत. . . . .

आबासाहेबांची बायको मोरीत भांडी घासत होती होती, पोरं अभ्यास करत बसलेली, आबासाहेब परांजपे संडासात होते, भाऊरावचा आवाज ऐकून ते सगळे धावत बाहेर आले. . .

" काय झालं, काय झालं काय "

आपटे घामाने भिजलेला, कमरेवर धोतर राहिलं न्हवतं फक्त पट्टेवाली नाडीची अर्धी चड्डी आणि अंगावर बनियन. . . ती पण घामाने चिंब झालेली.

त्याच्या तोंडातून शब्द बाहेर येईना इतका तो घाबरला होता.

आत्ता मात्र सगळयांचीच खात्री झाली कि त्या वरच्या कोपऱ्यातल्या खोलीत भुताटकी आहे.

भाऊराव आपटेने झाला प्रकार त्यांना सांगितला. ती रात्र सगळे जण एकत्र खालच्या खोलीत झोपले. पण भीतीने कोणालाच झोप लागेना.

सकाळ उजाडली अंघोळया पांघोळया उरकल्या आणि चहा नास्ता करून आबासाहेब परांजपे त्यांची पत्नी आणि भाऊराव आपटे बाहेर येऊन पडवीत बसले. काय करायचं विषय निघाला.

त्यांना चिंतेत बसलेलं बघून समोरच्या घरातले एक वृद्ध काका त्यांच्याकडे आले. बोलले. . " ह्या घरात भुताटकीचा प्रकार आहे आम्ही ऐकून होतो, पण त्याला खूप वर्ष झाली, आम्हाला वाटलं आता असं काही नसावं "

आबासाहेबांनी त्यांना विचारलं, , " जुन्या घरमालकाला कधी त्रास झाला नाही का"

त्या काकांनी सांगितलं. . . " सुरवातीला झाला, पण त्यांनी ती माडीवरची कोपऱ्यातली खोली कायमची बंद ठेवलेली. त्या घरात त्या जुन्या मालकाच्या सावत्र आईचं भूतं आहे. ती बाई जिवंत असताना त्याच्या बापाने त्या सावत्र आईला कधीच मान दिला नाय, म्हातारी होऊन खितपत पडलेली त्या कोपऱ्यातल्या खोलीत. तीतच मेली ती "

"तुम्ही एक काम करा, ती खोली कायमची बंद करा, कुलूप लावून कायमची बंद ठेवा, काय बी त्रास होणार नाय"

आबासाहेबांनी ओळखीच्या पुरोहितांना सांगितलं, सल्ला घेतला आणि माडीवरच्या त्या खोलीला एक लोखंडी कुलूप लावून टाकलं. दरवाजावर भैरव कवच ठोकलं.

त्यानंतर परांजपे कुटुंबं त्या घरात खूप वर्ष राहिलं, नंतर मुलं मोठी झाली, दोन्ही मुलींची लग्न झाली, मुलगा कंप्युटर इंजिनियर झाला, आत्ता तो अमेरिकेत असतो. दोन्ही मुलींना पुण्याला दिलं आत्ता त्या त्यांच्या कुटुंबियांसोबट पुण्यातच राहतात. आबासाहेब परांजपे आणि त्यांच्या पत्नी पण आत्ता पुण्याला मुलाच्या फ़्लॅट वर राहतात.

ते गिरगावातलं घर आत्ता बंदच आहे. आहे सुस्थितीत पण बंद पडलेलं आहे. त्या घरात आत्ता भुताटकी आहे कि नाही माहिती नाही, पण आजूबाजूच्या लोकांना त्याचा कधी त्रास झाला नाही.

# " रात्र जागवणारी एक शाळा "

पावसाळ्याचे दिवस आणि श्रावण महिना, म्हणजे उन पावसाचा खेळ. समीर आणि सुजाताने बाईकवर कोकणात फिरायला जायचं ठरवलं. मुंबईहून निघून अलिबाग मार्गे मालवण पर्यंत प्रवास करून मग परतायचं असा त्यांचा बेत ठरला. किमान आठवडाभर फिरून कोकणची मजा लुटुया आणि मग पुन्हा नोकरी आहेच. . तेच रुटीन.

शनिवारी पहाटे ६ वाजता दोघांनी आपापलं समान घेऊन बॅग भरल्या, समीरकडे काळया रंगाची बुलेट गाडी होती. दोघांनी गाडीला बॅग बांधल्या आणि आपल्या प्रवासाला निघाले. मुंबईमधून बाहेर पडल्यावर साधारण ३ तास प्रवास करून ते अलिबाग मध्ये पोहोचले, तिथे मस्त चहा नास्ता करून अलिबाग शहर फिरले, जवळपास असलेल्या किल्ल्यात फिरून आले, फोटो घेतले आणि नंतर साधारण ४ वाजता ते तिथून मुरूडच्या दिशेने निघाले. रस्त्यात काशिद बीच वर थोडा वेळ थांबून पुन्हा मुरुडकडे निघाले. मुरुड मध्ये पोहोचता पोहोचता सूर्य मावळायला लागला. जंजिरा किल्ला आणि मुरुड शहर आत्ता आपण येतेवेळी बघूया असा बेत ठरला. संध्याकाळी मुरुडहून काही अंतरावर असणाऱ्या राजापुरीहून त्यांनी आपली बाईक होडीत टाकली आणि पलीकडे दिघी बंदर गाठलं. तिथून हरिहरेश्वरला जाण्याचा बेत ठरवला. आत्ता घड्याळात संध्याकाळचे साधारण ८ वाजले होते.

सुजाता समीरला बोलली

" ए साम्या रात्रीचा प्रवास न करता आपण उद्या सकाळी इथून निघूया"

समीरने उत्तर दिलं

"अरे हम है तो क्या गम है". . . . . .

समीरने सुजाताचं बोलणं मस्करीत उडवलं आणि तो बोलला चल बस मागे आणि बुलेटला स्टार्टर मारून

" चल धन्नो " बोलून तो दिघी मधून हरिहरेश्वर कडे निघाला. आत्ता काळोख अजूनच गडद होत चालला होता. श्रावण महिना असला तरी कोकणात मात्र आकाश काळया ढगांनी भरलं होतं. पाउस येण्याची चिन्ह दिसत होती. समीर आणि सुजाता आत्ता ज्या रस्त्याने प्रवास करत होते तो रस्ता डोंगराळ आणि निर्जन होता. थंड हवा सुटली होती, गारवा अंगाला टोचत होता. समीरने रस्त्यात गाडी थांवली, आणि दोघांनी अंगावर Jacket घातले, पाणी प्यायले आणि पुन्हा पुढे निघाले. त्या रस्त्यावर पसरलेल्या भयाण शांततेला बुलेटचा आवाज भेदत होता. खूप लांब लांब डोंगरात खेडेगावांचे दिवे मिणमिणताना दिसत होते. अचानक मातीचा वास सुटला, अर्थ सरळ होता, त्या डोंगरात पाउस चालू झाला असणार. आत्ता मात्र दोघेही विचारात पडले, पाउस आला तर कुठे थांबायचं, थंडी पण वाजत होती, आणि जर पावसात भिजलो तर दोघेही आजारी पडणार, मग कोकण टूर जागच्या जागीच राहिल.

रस्ता खराब असल्यामुळे आत्ता समीरला गाडीचा वेगही वाढवता येत न्हवता. पण जमेल तसं खड्डे चुकवत तो मार्ग काढतच होता, इतक्यात मोठा मुसळधार पाउस चालू झाला. समीरने गाडी बाजूला एका झाडाखाली थांबवली. झाड वडाचं होतं, त्याच्या लांबलांब पारंब्या त्या झाडाचा व्यास वाढवून बसलेल्या. लटकणाऱ्या पारंब्या त्या झाडाला अजूनच भयाण बनवत होत्या.

दोघे पण गाडीवरच बसून राहिले, खाली उतरलेच नाही, समीरने गाडी बंद केली. अनोळखी ठिकाण, गडद काळोख मुसळधार पाउस आणि त्यात हे भयाण दिसणारं अजस्त्र अवाढव्य वडाचं झाड. सुजाता मनातून घाबरली आणि तिने समीरला पाठीमागून घट्ट पकडून ठेवलं. दोघेही इकडे तिकडे बघत होते, कुठे काही प्रकाश दिसतोय का. तेवढ्यात बरोबर समोर रस्त्याच्या पलीकडे एक लोखंडी गेट दिसलं.

समीर सुजाताला बोलला. . . . . . . . . . . . . . . . . . . .

" सुजाता समोर कोणाचं तरी घर दिसतंय, चल बघूया "

आणि त्याने गाडी चालू केली गाडीचं Handle वळवलं, दोघेही झाडाखालून निघणार, इतक्यात त्या वडावरून एका लहान मुलाचा मोठ्याने ओरडण्याचा आवाज आला. . . . .

"जाऊ नका तिकडं "

कानावर आवाज पडतातच, दोघांनी वर बघितलं, वर झाडावर एक लहान मुलगा पारंबीला उलटा लटकून झोके घेताना दिसला, दोघेपण दचकले, एवढ्या रात्री ह्या पावसात आणि ह्या जंगलात हा पोरगा कोण? आणि ते पण झाडावर. . . .

कोण रे तू? समीरने विचारलं, एवढ्या काळोखात पावसात इथं काय करतोस?

"मी इथलाच आहे, ह्याच झाडावर असतो समोरच्या शाळत शिकतो"

त्याचं हे उत्तर ऐकून सुजाता एकदम मोठ्याने किंचाळली,

"समीर पळ इथून, समीर चल लवकर इथून मला भीती वाटते"

आत्ता समीरपण घाबरला त्याने गाडीचं ऍक्सिलरेटर वाढवलं आणि रेस करून गाडी गेटजवळ नेली, चाकानेच गेट ढकलला आणि तो उघडला, गाडी थेट आतमध्ये घेतली, आत बघितलं तर एक मोठं पटांगण होतं आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला एक इमारत दिसत होती, नक्कीचही शाळा असणार, समीरने गाडी शाळेजवळ नेऊन उभी केली, दोघेही पटापट गाडीवरून खाली उतरले, समीरने गाडी स्टॅंड वर उभी केली आणि दोघेहि घाबरलेले पळत पळत त्या शाळेच्या पडवीत जाऊन उभे राहिले. पण दोघांचंही लक्ष समोर त्या झाडावर होतं.

सुजाताने विचारलं

" कोण असेल रे तो मुलगा, आणि एवढ्या रात्री त्या पारंबीवर असा कसा उलटा लटकलेला, मला काहीतरी भलताच प्रकार वाटतोय समीर"

समीर ओळखून गेला होता, हा साधारण प्रकार नसून नक्कीच काहीतरी भुताटकीचा प्रकार असावा, पण त्याने सुजाताची समजूत काढायला उत्तर दिलं

" कोणीतरी आदिवासी असावा " ह्या जंगलात आदिवासी वाड्या असतील कुठेतरी जवळपास तिथलाच कोणीतरी असावा"

आणि दोघांनी अंगावरचे ओले Jacket काढले. आजूबाजूला बघितलं, ती एक जिल्हा परिषदेची शाळाच होती. एखादा वर्ग उघडा आहे का म्हणून दोघेही त्या शाळेचे दरवाजे हाताने ढकलून बघत होते, पण सगळयाच वर्गांना टाळं लावलेलं.

पावसाचा काही नेम नाही आणि आत्ता रात्रीचे १२ वाजले आहेत म्हणून दोघांनी ठरवलं, आज रात्र इथेच थांबून उद्या उजेड पडतातच इथून निघूया. पाउसही थांबला, समीरने गाडीवरून एक बॅग काढली, त्यातून दोघांना २ स्लीपिंग बॅग्स बाहेर काढल्या. सुजाताने कानात mp3 अडकवलं आणि ती गाणी ऐकण्यात मग्न झाली. समीरचं मात्र चित्त थाऱ्यावर न्हवतं, त्याला समोरच्या वडावर असणाऱ्या त्या मुलाची घटना आठवून झोप येईना. तो खूप घाबरलेला पण सुजाताला तसं दाखवत न्हवता.

थोड्यावेळाने शाळेच्या पडवीतला एक बल्ब चालू झाला. बल्ब चालू होताच पडवीत प्रकाश पसरला. सुजाता पटकन उठली, समीरही उभा राहिला, दोघांनी एकमेकांकडे बघितलं, तेवढ्यात त्यांना एक माणूस दिसला. पडवीतून सरळ त्यांच्या दिशेने येत होता. अंगावर खाकी कपडे आणि डोक्यावर खाकी टोपी.

समीरने विचार केला हा नक्कीच ह्या शाळेचा शिपाई असावा. . . . . . . .

सुजाता बोलली

" चला, बरं झालं हा आला "

दोघांनाही धीर आला, तो माणूस त्यांच्या जवळ आला, त्याला बघून समीरने विचारलं

"काय हो शिपाई का इथले"

तो माणूस काहीच बोलला नाही दोघांच्या बाजूने तसाच चालत पुढे निघून गेला आणि समोरच्या वर्गात बंद असलेल्या दरवाजातून आत गेला. . . . . . . . . बंद दरवाजातून तो त्या वर्गात गेला हे बघून आत्ता मात्र दोघांना पण घाम सुटला, सुजाता किंचाळत सुटली, आणि मोठ्यामोठ्याने रडायला लागली. . . . .

" समीर पळ, समीर चल इथून"

तिने समीरचा हात पकडला आणि स्लीपिंग बॅग्स तिथेच टाकून दोघेही पळाले, गाडीवर बसले आणि समीरने त्या शाळेच्या पाटांगणातून गाडी वेगाने पळवली, सुजाता एवढी घाबरलेली कि ति भीतीने थरथर कापत होती, तिने समीरला घट्ट पकडून ठेवलं आणि सारखं मागे वळून बघत होती. आत्ता गाडी गेटजवळ आली, समीरने गेटला पुन्हा चाकाने धक्का मारला, गेट उघडला नाही, लाईट मारून बघितलं तर गेटची कडी लावलेली, मनातल्या मनात समीरने विचार केला

" आपणच इथे आलो, मगाशी गेट उघडा होता मग आत्ताही कडी कोणी लावली" समीर समजून गेला, ह्या जागेत भुताटकीचा प्रकार आहे, आणि आपण आत्ता त्यात अडकलोय"

क्षणाचाही विचार न करता त्याने सुजाताला सांगितलं खाली उतर, ती उतरली, आणि तिने त्याला पकडूनच ठेवलं होतं, सारखं मागे वळून बघत होती,

"समीर मला खूप भीती वाटते समीर", तिचं अंग भीतीने थरथर कापत होतं, समीरला पण भीतीने घाम सुटलेला पण आत्ता इथून सुटका करायची म्हणजे समीरला धाडस करून सुजाताची साथ देऊन इथून निघणं गरजेचं होतं

ताबडतोब समीरपण उतरला, कडी उघडली, गाडीवर बसणार इतक्यात त्या शाळेची घंटा वाजायला लागली. . . दोघांनी मागेवळून बघितलं तर बल्बच्या उजेडात त्यांना तो शिपाई शाळेची घंटा वाजवताना दिसला. . . . दोघेही गाडीवर बसले, समीरने गाडी चालूच ठेवली होती, सुजाता मागे बसताच त्याने एक्सिलेटर फिरवलं, पण गाडी पुढे जाईना. . . . . . काय होतंय त्याला समजेना, सुजाता त्याला सारखं म्हणत होती. . . "काय झालं समीर, चल लवकर इथून"

समीर बोलला " सुजाता गाडी पुढे जात नाही" हे ऐकताच आत्ता ती पुन्हा रडायला लागली. . . . . . . . " ए समीर वाचव रे मला, मला इथून घेऊन चाल समीर. . . Please"

समीरपण भीतीने घाबरलेला, पाठीमागून ते भूत शाळेची घंटा वाजवतच होतं, समोर दिसणारं वडाचं अजस्त्र झाड आणि त्यावर लटकलेल्या त्या मुलाची घटना. . . . . आणि त्यात आत्ता गाडी पुढे जाईना. . . . . . .

समीरने डोळे मिटले, मन शांत केलं आणि जोराने गाडीचं एक्सिलेटर फिरवलं. . . . गाडीचं मागचं चाक चिखलात असल्यामुळे गरगर फिरत होतं, कुठेतरी ग्रीप मिळाली आणि गाडी निघाली. . . . . .

क्षणाचाही विलंब न करता समीरने गाडी रोडवर आणली आणि फुल रेस्कारून गाडी पळवली. . . त्या झाडाच्या बाजूने जाताना त्यांना त्या वडाच्या झाडाखाली तो मुलगा उभा दिसला, त्याचे पांढरे फटक डोळे गाडीच्या लाईटवर स्पष्ट दिसत होते. . . त्याला बघताच क्षणी सुजाताने डोळे बंद केले. . . . आणि समीर वर आपली पकड अजून घट्ट केली. समीरने

गाडीचा बेफाम वेग वाढवला आणि खड्डे चाकाखाली तुडवत तो गाडी पळवतच सुटला. . . . . . . . . .

सुजाताने मागे वळून बघितलं. . . तो मुलगा त्यांच्या मागे धावत होता. . . . सुजाता समीरला ओरून ओरडून सांगत होती. . . "समीर तो मागे धावतोय आपल्या " हे ऐकताच समीरने गाडीचा वेग अजून वाढवला. . . साधारण ३००-४०० मीटर पुढे गेल्यावर तो मुलगा दिसेनासा झाला.

सुजाताने मागे वळून बघितलं आत्ता तो मुलगा दिसत न्हवता. तिच्या जीवातजीव आला. समीर गाडी वेगात पळवतच होता साधाराण १ तासानंतर त्यांना रस्त्याच्या बाजूला एक एक करून घरं दिसायला लागली. . . . . . . . .

हे गाव असणार नक्कीच. तेवढ्यात एक गाडीच्या लाईटवर बोर्ड चमकला " कवीळवाल "

पुढे जाताच एक वळण टाकल्यावर त्यांना देऊळ दिसलं. देवळात खूप लोकं दिसली. समीरने ताबडतोब गाडी देवळाजवळ घेतली. आतमध्ये भजन चाललं होतं, गाडीचा आवाज ऐकताच आतून ७-८ लोकं उठून बाहेर आले, एवढ्या रात्री कोण आलं बघायला ते पुढे आले.

दोघेही पावसाने ओलेचिंब भिजलेले आणि सुजाता थरथर कापत होती. झाला प्रकार तिच्या मनावर परिणाम करून गेला. त्या लोकांनी ह्यांना दोघांना आत मंदिरात घेतलं, एका बाकड्यावर बसवलं, पायायला पाणी दिलं आणि मग एकाने विचारलं. . . .

" काय वो, एवढ्या रातच्याला कुठं निंघालेव"

समीरने उत्तर दिलं " आम्ही कोकण फिरायला निघालोय, मुंबईहून आलोय, पाउस मुसळधार लागला, म्हणून मागे एका शाळेजवळ थांबलो होतो पण. . . . . . तिथे "

पुढे बोलणार इतक्यात एकजण बोलला, "शाळेजवळ, कुठं त्या वडाजवळ"

समीर बोलला. . . " हो "

आणि समीरने झाला प्रकार सांगितला. . . . सांगता सांगता सुजाता हळूहळू रडायला लागली. . . . . .

तो गावकरी पुन्हा बोलला " हो, तिकडं गेल्या वर्षी शालेच्या समोरच एस.टी. बस खाली शालेतला एक पोरगा मेला, त्याला वाचवायला शिपाई गेला, तो बी मेला, दोघं बी भूत झालेत तिकडं शालेजवल. . . दिसतात कवा कवा लोकांना "

हे ऐकताच सुजाता आणि समीरला धक्काच बसला. दोघांना घाबरलेलं बघून, त्यांच्यातला एक गव्हाणे आडनावाचा गावकरी म्हणाला

" चला तुमी दोघांव बी सुखरूप आलव न, गावदेवीची किरपा झाली, आत्ता एवढ्या रातच्याला फटफटीवर जाऊ नका, चला तुमची राहायची सोय करतो, सकाळी उठून अंघोळया आटपून मंग निघा"

गव्हाणेच्या बायकोने सुजाताला तिच्या घरी नेलं, समीरही गव्हाणेच्या सोबत त्यांच्या घरी गेला, गाडी त्यांच्या अंगणात लावली.

अंघोळ करून कपडे बदलून दोघेही त्या रात्री " कवीळवाल " गावात गव्हाणेच्या घरी झोपले.

सकाळ झाली आणि साधारण ८ वाजता दोघेही पुढल्याप्रवासाला निघाले. . . .

पुढे त्यांनी संपूर्ण कोकण सफर केली, पण प्रवास मात्र दिवसा उजेडातच केला. कोकण सफर पूर्ण झाली आणि निसर्गरम्य कोकणच्या सौंदर्याने समीर मनातून तो घडलेला भुताटकीचा प्रकार पुसून टाकला, पण सुजाता मात्र अजूनही झोपेतून दचकून उठते, कधीकधी झोपेतच किंचाळते. ती घटना तिच्यामनात अजूनही आपलं प्रतिबिंब घेऊन जिवंत आहे.

" येवा कोकण आपलाच असा "

# " बोकड "

बुधवारचा दिवस म्हणून आज त्याने दुकान उशिरापर्यंत चालू ठेवलं, दुकान तसं गावाच्या बाहेरच, आणि गाव मुंबई गोवा महामार्गावर. . . "कशेणे ", इंदापूर आणि माणगावच्या मध्ये. जागा तशी निर्जन आणि ह्याचं दुकान खाली शेतात अंधारात होतं.

दुकान बंद केलं आणि प्रदीप एक एक करून बोकड त्याच्या रिक्षा टेंपोत चढवत होता. आत्ता रात्रीचे साधारण ११ वाजले होते, सगळे बोकड गाडीत टाकून झाले, आणि आत्ता तो दुकानाची ताडपत्री खाली खेचतच होता इतक्यात एक स्कॉर्पियो गाडी येऊन उभी समोरच्या रस्त्यावर उभी राहिली. गाडीतून २ माणसं उतरले आणि प्रदीपच्या दुकानाजवळ आले.

"प्रदीप म्हणाला "साहेब दुकान बंद केलं आत्ता मटण शिल्लक नाही, आत्ताच दुकान बंद केलंय "

त्यांच्यातला एक माणूस गंभीर आवाजात बोलला बोकड पायजे काय?

प्रदीप एक मिनिट थांबला आणि त्यांच्याकडे बघून बोलला " कुठाय बोकड "

"हाय गाडीत, घेणार काय?

प्रदीप बोलला बघू दाखवा. . . . . . . . . आणि प्रदीप त्यांच्या गाडीजवळ गेला, त्यांच्यातल्या एकाने गाडीचा मागचा दरवाजा उघडून एक बोकड खाली काढला. . . प्रदीपने बघितलं तर त्या बोकडाचा पुढचा एक पाय तुटलेला.

" हा एक पाय कुठं तुटला ह्याचा, आणि आत्ताच तुटलेला दिसतोय. . . . . रक्त सांड्तय बघा साहेब "

त्यांच्यातला एकजण बोलला " मोजमाप करत बसू नको, पायजे असला तर घे नायतर सोडून दे"

प्रदीपने किंमत विचारली. . . हो नाय करता ते दोघं तो १५-२० किलोचा बोकड फक्त २००० रुपयात विकून तिथून गाडी काढून निघून गेले. थेट ३-४ हजाराचा फायदा झाला. ह्या खुशीत प्रदीप मनातल्या मनात हासत होता, नवीन विकत घेतलेल्या बोकडाच्या पायाला कापड बांधून त्याला पण टेंपोत टाकला, दुकान बंद केलं आणि रिक्षा टेंपो घेऊन आत्ता रस्त्याने आपल्या घरी जायला निघाला,

गाडी चालवताना त्याच्या डोक्यात सारखा एकच विचार येत होता कि नक्कीच हा बोकड चोरीचा असावा. . . पण स्वस्तात मिळाला म्हणून त्याने तो घेऊन ठेवला.

दुकानापासून गाव तसं १ किलोमीटर अंतरावरच होतं, रिक्षा टेंपो हायवेने जात होता, इतक्यात त्याला मागे टेंपोत कोणीतरी उड्या मारत असल्याचे आवाज ऐकायला आले. . . . धाड धूड धाड धूड. . . . . आणि संपूर्ण रिक्षा टेंपोच हलायला लागला, मागच्या पत्र्यावर कोणीतरी धपाधप हात मारतोय असे आवाज यायला लागले, म्हणून त्याने ताबडतोब गाडी रस्त्याच्या बाजूला घेतली.

त्याला असा भास झाला कि कोणीतरी माणूस मागून गाडी हालवतोय, पत्रा वाजवतोय. . .

"आज ह्या बोकडांना काय झालंय काय, कधी अश्या उड्या मारत नाहीत, काय झालं आज "

त्याने टेंपोचा मागचा दरवाजा उघडला आणि बघितलं तर सगळे बोकड शांत उभे होते. काय झालं त्याला समजेना, त्याने गाडी पुन्हा चालू केली आणि काशेण्या कडे

निघाला, पुन्हा जोर जोराने आवाज यायला लागले. . . . आत्ता तो न थांबता सरळ गावात आपल्या घरी आला. टेंपो अंगणात थांबवला आमी त्याने टेंपोतून बोकड खाली उतरवून अंगणात बांधले. आणि हातपाय धुवून झोपायच्या तयारीला लागला, इतक्यात फोन वाजला. . . . " सुधीर पांचाळ" एवढ्या रात्री ह्याने कशाला फोन केला हा विचार करत प्रदीपने त्याचा फोन घेतला. . . . . "ह्यालो, बोला पांचाळ साहेब काय झालं, एवढ्या रात्री फोन केलात "

समोरून पांचाळ बोलला " अरे बोकड आणलाय, कापून देशील काय, नुकताच मेलेला हाय "

प्रदीपच्या डोळयावर झोप येत होती. . . तो म्हणाला आत्ता नाही जमणार उद्या सकाळी दुकानावर घेऊन या. . . . आणि फोन ठेवून तो झोपला.

अर्ध्या तासाने त्याला पुन्हा एकाचा फोन आला. . . . . "अरे प्रदीप बोकड कापून देशील काय, अर्जंट आहे "

"प्रदीपने त्याला पण तेच उत्तर दिलं. . . "नाही हो साहेब, आत्ता नाही जमणार, उद्या दुकानावर घेऊन या देतो कापून"

आणि प्रदीपने आपला मोबाईल फोन स्वीच ऑफ केला. . . आणि तोंडातल्या तोंडात पुटपुटत शिव्या देत बोलला. . . "आज काय सगळयांना बोकड कापायचे आहेत, आणि एवढ्या रात्री, उद्या माझा धंदा बंद पाडतील बहुतेक " आणि डोक्यावर चादर ओढून तो झोपुन गेला. . . . .

नेहमीप्रमाणे तो सकाळी ४ वाजता उठला आणि सगळे बोकड टेंपोत टाकून पुन्हा आपल्या दुकानावर गेला. एक एक करून बोकड खाली काढून त्याने मागे शेतात बांधले,

पहाटे ४:१५च्या सुमारास इब्राहीम पण आला, इब्राहीम म्हणजे बोकड कापायला येणारा गावातलाच एक माणूस, गावात कोणाकडेही लग्न असलं, नवस फेडायचा असला आणि बोकड कापायचा असला तर ते काम इब्राहीम कडेच असायचं.

इब्राहीम आल्यानंतर प्रदीपने दुकानातून सुरा आणला, पाण्याने धुवून घेतला आणि सगळयात आधी त्याने पाय मोडलेला बोकड कापायला घेतला. प्रदीपने बोकड दोन पायात पकडून ठेवला, इब्राहीमने खिशातून रुमाल काढला, डोक्याला बांधला आणि सुरा बोकडाच्या मानेवर फिरवणार इतक्यात त्या बोकडाने एवढ्या जोरात झटका दिला कि प्रदीप किमान ८-१० फुट लांब शेतात जाऊन पडला. इब्राहीमला पण धक्का मारून त्याने पुढे उडवलं,

आजपर्यंत असं कधी झालं नाही, आणि ह्या बोकडाच्या अंगात एवढी ताकद आली कुठून, हा प्रकार त्या दोघान्नापण विचित्र वाटला,

पुन्हा प्रदीपने तो बोकड आपल्या २ पायात पकडला, इब्राहीमने हातातला सुरा पुढे केला सुरा त्या बोकडाच्या मानेवर फिरवला आणि तो बोकड खूप मोठ्याने माणसाच्या आवाजात ओरडला. . . . . . हे ऐकून प्रदीप शेतात पळाला, इब्राहीम हातातला सुरा टाकून मागे पळाला आणि म्हणाला. . . . . .

"कयामत कयामत " प्रदीप भाई कयामत. . . . . "येह कैसा जानवर आप ले आये, मैने पेहले कभी नै देखा ऐसावाला जानवर"

येह शैतान है प्रदीप भाई. . . येह शैतान है. . . . . असं ओरडत इब्राहीम हातातला सुरा टाकून. . . . . . जीव घेऊन त्या शेतातून बाहेर रस्त्यावर पळाला, गाव १ किलोमीटरवर च होतं. . . . न थांबता इब्राहीम तिथून रस्त्याने गावात पळून गेला. . .

प्रदीप शेतात मागच्या दशेने पळाला होता, आत्ता पहाटेचे ५ वाजायला आले होते, आकाशात सूर्यप्रकाशाचा तांबडा रंग दिसायला लागलेला आणि त्या अंधुक उजेडात प्रदीपने बघितलं तर काय. . . . . . तो बोकड माणसा सारखा दोन पायावर उभा होता, तोंडातून लाळ गळत होती. शरीर बोकडाच पण तो माणसा सारखा उभा होता. . . . . गुरगरत होता, मानेवरून रक्ताची धार लागलेली आणि आत्ता तो वेगाने चालत प्रदीपच्या दिशेने येत होता, हे बघतच प्रदीपने जीव घेऊन शेताच्या बांधांवरून. . . . " भूत भूत भूत वाचवा वाचवा "

ओरडत किंचाळत तो पळत होता आणि बोकड मागून मोठ मोठ्याने हासत होता, आणि प्रदीपच्या अंगावर दगडं फेकत होता, २-३ दगड प्रदीपच्या पाठीत बसले आणि बाजूने पण दगडं फेकली जात होती. . . .

त्या परिस्थितीतून कसा बसा जीव वाचवून तो घरी पोहोचला. . . . प्रदीप गावात येताच घरात येऊन दरवाजा बंद करून कडी लावून खाटेवर आडवा पडला.

थोड्या वेळाने घराची कडी वाजली. . . . . . प्रदीप दचकला. . हळूच उठून दाराच्या फटीतून बघितलं. . . . . दरवाजात घाबरलेला धापा टाकत इब्राहीम उभा होता, प्रदीपने दरवाजा उघडला. . . . . .

आत्ता सकाळचे ६ वाजले होते. . . . बाहेर सगळीकडे उजेड पसरला होता, इब्राहीम घरात येऊन खाटेवर बसला. . . . . " आज अपुन लोग बच गये प्रदीप भाय, आज कयामत आई थी, वोह बकरा नै था. . . शैतान था शैतान "

" मगर आप वो बकरा किदर से ले आये "

आपल्याला तो बोकड कसा मिळाला हे त्याने इब्राहीमला सांगितलं. . " काल रात्री स्कॉर्पियो घेऊन २ माणसं आली आणि मला हा बोकड विकून गेले, स्वस्तात मिळाला म्हणून मी घेतला. . . . .

एवढ्यात दरवाजात पांचाळ येऊन उभा राहिला, "अरे बाबा तुझ्या दुकानावर जाऊन आलो, कुठं आहेस तू. . . चल लवकर बोकड कापून दे, बोकड घेऊन भाऊ उभा आहे तुझ्या दुकानावर, काल रात्रीच आणून ठेवलंय, मेलेला हाय म्हणून घाई करतोय. . . . चल लवकर चल. . . . .

पांचाळचं बोलणं संपतंय इतक्यात गावातले अजून दोघेजण आले. . . . . तीच तक्रार आरे बाबा चाल लवकर दुकानावर ते बोकड कापून दे आम्हाला. . . . . . रात्री घेऊन आलोय. . . . . मेलेला बोकड सकाळ पर्यंत टिकलाय. . . . थंडीचे दिवस आहेत म्हणून टिकला. . . . पाणी मारून गोंत्यात ठेवलाय. . चल बाबा लवकर चल "

प्रदीपने त्या सगळ्यांना विचारलं. . . . . . " माझ्या दुकानावर गेला होतात, तिकडं शेतात बोकड दिसला काय? "

ते लोकं बोलले. . . " कुठला बोकड, शेतात बोकड बिकड न्हवता. . . तुझा रिक्षा टेंपो उभा दिसला शेतात"

हे ऐकून प्रदीपला थोडा धीर आला. . . . त्याने सगळयांना विचारलं. . . " तुम्हाला हे मेलेले बोकड कुठं भेटले? "

एवढ्यात पांचाळ बोलला. . . " अरे काल सेकंड शिफ्ट करून कामावरून येत होतो. . . . तर रस्त्यात ८-१० बोकड रस्त्यावर पडलेले दिसले. . . . बाजूला एक धनगर पण पडलेला. . . गाडी वाल्याने उडवला असेल. . . . . जागीच ठार मेला होता धनगर. . तिथूनच बाईकवर टाकून आणला उचलून बोकड, कशाला सोडायचा"

प्रदीपने विचारलं. . . . " आणि मग तो धनगर? "

पांचाळ बोलला. . . " त्याचं काय, तो मेला जागीच ठार. . . पोलीस स्टेशनात जाऊन सांगितलं. . . नेला असेल सरकारी दवाखान्यात माणगावला"

आत्ता मात्र प्रदीप आणि इब्राहीमने एकमेकांकडे बघून मान हलवली. . . . . .

म्हणजे तो बोकड तिथेच जागीच ठार झालेला आणि त्याच्यात त्या धनगराचं भूत शिरलेलं. . . . .

त्यादिवसापासून प्रदीपने कानाला खडा लावला, पुन्हा कोणाकडून असा बोकड घेणार नाही. एकदा जीव वाचला पुन्हा संकट अंगावर ओढून घेणं नाही. . .

नंतर काही दिवसांनी व्यवस्थित जागा बघून प्रदीपने आपलं दुकान त्या ठिकाणाहून उचलून काशेण्याच्या जवळ आणून बसवलं. . . . . .

# " ट्रेक "

सिद्धार्थ कॉलेज - वाशी नवी मुंबई :- २००२

हे नियोजन म्हणजे ट्रेक कम ट्रीप असच होतं आणि त्यात वैदेही अंकितची प्रेयसी म्हणजे रोमांस हा होणार होता. स्वप्नील मनातून सुजातावर प्रेम करत होता पण त्याने तिला तसं कधी सांगितलं न्हवतं, अंकित आणि वैदेहीने ह्या दोघांना एकत्र आणण्यासाठीच हा बेत आखला होता, पण सुजाताला ह्याबद्दल काहीच कल्पना न्हवती.

परीक्षा संपताच अंकित स्वप्नील सुजाता आणि वैदेही ह्यांनी ट्रेकिंगला जाऊन जंगलात २ दिवस मुक्काम करायचं ठरवलं, वाशी पासून जवळच असलेल्या पनवेल नजीक कर्नाळा खिंडीत जाऊन ट्रेक करायचं नियोजन केलं. महिना होता एप्रिल.

आदल्या दिवशी म्हणजे ५ एप्रिलला हे चौघेपण वाशी स्टेशनला एकत्र जमले तिथून इनोर्बिट मॉल गाठलं आणि ट्रेकला लागणारं सगळं साहित्य खरेदी केलं. जंगलात मुक्कामाचाही बेत होता, म्हणून त्यांनी २ टेंट विकत घेतले, जेवणाचं साहित्य खरेदी केलं आणि आपापल्या घरी येऊन उद्यासाठी बॅग पॅक केल्या.

सुजातापण घरी आली, जेवण केलं आणि तिनेही आपली बॅग भरायला घेतली. बाजूलाच खाटेवर तिची आजी टी. व्ही. बघत बसलेली,

" काय गं पोरी, कसली तयारी म्हणायची "

सुजाताने स्मित हास्य देत उत्तर दिलं ;- " काय नाय गं आजी, उद्या आम्ही ट्रेकिंगला जाणार आहोत कर्नाळयाला, जंगलात २ दिवस मुक्काम पण करणार आहोत"

आजीने रिमोट उचललं आणि ताबडतोब टी. व्ही. बंद केला म्हणाली

" उद्या, आगं उद्या ६ तारीख ना, उद्या सर्वपित्री आमावस्या आहे, बाई जाऊ नको कुठे आडमार्गी, जागा वाईट असतात, सांग तुझ्या मैत्रिणींना मी नाही येत म्हणून "

सुजाता आजीची समजूत काढत म्हणाली

"आगं आजी आत्ता कुठे राहिलय हे सगळं, आगं लोकं जंगलात जाऊन घरं बांधायला लागलेत, काही होत नाही"

असं म्हणून तिने आजीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं, बॅग उचलून बाजूला ठेवली आणि लाईट बंद करून झोपली.

सकाळचा गजर झाला, सकाळी ६ वाजता अंघोळ करून फ्रेश होऊन ती आपल्या बिल्डींगच्या खाली आली, ठरल्याप्रमाणे अंकित आणि स्वप्नीलही त्यांच्या बाईक घेऊन आले. अंकितच्या गाडीवर मागे वैदेही बसलेली सहाजिकच बसणार कारण वैदेही अंकितची प्रेयसी होती आणि स्वप्नील एकटाच होता, सुजाता जाऊन स्वप्नीलच्या गाडीवर बसली आणि ते चौघे वाशीतून पनवेलच्या दिशेने निघाले. बघता बघता रस्ता निघून गेला आणि काही तासाभरात ते कर्नाळा अभयारण्याच्या गेटवर येऊन थबकले. खिडकीवर तिकिटं काढली, बाईक तिथेच बाजूला पार्क केल्या आणि पाठीवर बॅग अडकवून ते सगळे निघाले समोर दिसणाऱ्या घनदाट अरण्यात. सकाळचे ८ वाजले होते, चौघांच्या मस्त गप्पा रंगल्या. एकीकडे गप्पा चालू होत्या तर दुसरीकडे डोंगराचा पायथा नजीक येत होता. बघता बघता ते सगळे डोंगराच्या पायथ्याला येऊन पोहोचले, पाठीवरच्या बॅग खाली ठेवल्या पाणी प्यायले, सोबत आणलेला नास्ता केला आणि डोंगर चढायला सुरवात केली, वेळ निघून जात होती, मनोरंजक असं वातावरण, सर्वत्र हिरवळ पसरलेली आत्ता ते किमान निम्मा डोंगर चढून वर आले, त्यांनी आपला ट्रेकिंगचा मार्ग पकडला, पायवाट धरून ते बाजूच्या डोंगराच्या दिशेने निघाले. . . .

दुपार झाली, सूर्य डोक्यावर आला पोटात कावळे ओरडायला लागले म्हणून थांबले, डबे काढले आणि जेवण करून घेतलं. दुपारचे २ वाजले, लवकरच संध्याकाळ होईल म्हणून त्यांनी आवरून घेतलं आणि पुन्हा पुढे निघाले, दरी उतरून ते एका नदी जवळ जाऊन थांबले, तो स्पॉट खूपच Romantic वाटला, बाजूला नदी, तीन बाजूने मोठ मोठे डोंगर, नदीच्या बाजूला मोकळी जागा आणि समोर दिसणाऱ्या डोंगराच्या पायथ्यापासून चालू होणारं ते घनदाट आरण्य.

वैदेहीने अंकितला खुणावलं आपण इथेच थांबूया.

अंकित पुढे येऊन बोलला

" ए चला आजसाठी आपण इथेच थांबूया, ५ वाजले आहेत, उद्या आपण सकाळी इथून निघून ह्या समोर दिसणाऱ्या कोकणी माउंट एवरेस्टची सर करू" अंकितच्या कोकणी माउंट एव्हरेस्ट ह्या शब्दावर सगळे हसायला लागले, एकमेकांना टाळया देत होते आणि अचानक बाजूच्या नदीत मोठ्याने आवाज आला. . . . , , , , धबाक आणि नदीतलं पाणी वर उडालं.

सगळेजण दचकले सगळयांच्या नजरा नदीच्या दिशेने वळल्या. पण समोर काहीच न्हवतं.

वैदेही सुजाताला बोलली. . . . " तू ऐकलंसना काहीतरी पडलं त्या पाण्यात"

सुजाता बोलली

" हो मी पण ऐकलं, कोणीतरी पाण्यात उडी मारली किंवा मोठा दगड पडल्या सारखा आवाज आला "

स्वप्नील पटकन बोलला. . . कोण उडी मारेल इथे. . . जरा वर बघा. . . . केवढा मोठा कडा आहे ह्या डोंगराचा असं बोलत विषयाला गत्यंतर देत स्वप्नीलने सुजाताचा हात पकडला आणि म्हणाला. . .

"चला फ्रेंड्स. . . . जे पडलं ते नदीच्या तळात गेलं आपण आपले तंबू बांधून घेऊ "

स्वप्नीलने हात पकडणं सुजाताच्या अंगावर शहारे देऊन गेलं. . . तिने स्वप्निलकडे पाहिलं. स्वप्नीलनेही तिच्याकडे बघितलं. . . . अंकित आणि वैदेही दोघेही त्यांच्याकडे बघून हसत होते. सुजाताने स्वप्नीलचा हात हळूच सोडवला आणि तिने तिच्या बॅग जवळ जाऊन सामान काढायला सुरवात केली.

सगळ्यांनी लागणारं सामान काढलं, एकीकडे वैदेही आणि सुजाता जेवण बनवायचं साहित्य बाहेर काढत होत्या तर दुसरीकडे अंकित आणि स्वप्नील तंबू उभे करत होते.

अंधार पडायला सुरवात झाली, हवेत गारवा जाणवायला लागला, मागे मोठे डोंगर आणि समोर मनमोहक नदी, आकाशात पसरलेला तांबूस रंग आणि सोनेरी ढग. आत्ता मात्र सुजाताच्या मनातही चलबिचल व्हायला लागली, स्वप्नीलही मुद्दाम तिच्या जवळ जवळ जाण्याचा प्रयत्न करत होता, समोर अंकित आणि वैदेही एकमेकांना बिलगून बसलेले त्यांना न्याहाळत होते. थोडावेळ गप्पा मारून झाल्यावर जेवणाच्या तयारीला लागले. लाकडं जमवली, दगडं लावली आणि चूल पेटवली, सोबत आणलेलं चिकन बनवलं भात बनवला आणि जेवायला बसले. जेवणाची टोपं जवळच ठेवली लागेल तसं प्रत्येकजण घेत होता. स्वप्नील मुद्दाम सुजाताची काळजी घेत हे घे ते घे करायला लागला, तिला कळत होतं कि स्वप्नील आपल्याकडे आकर्षित आहे, मनातून तीही त्याच मूड मध्ये होती.

जेवण झालं आणि सुजाताने आपलं ताट आणि एक रिकामं टोप उचललं आणि म्हणाली

" मी आलेच, थोडं धुवून घेतेही भांडी "

स्वप्नीलचंही जेवण आटोपलंच होतं, पण अंकित आणि वैदेही एकमेकांसोबत रोमांटिक मूड मध्ये गप्पा गोष्टी करत एकमेकांना जेवण भरवत होते. सुजाता उठून नदी जवळ आली, खाली बसली आणि एका हाताने पाणी घेऊन आपलं ताट आणि ते सोबत आणलेलं टोप

धुवतच होती इतक्यात स्वप्नीलही पाठोपाठ आला, स्वप्नील जवळ येताच सुजाता उठली आणि त्याला म्हणाली. . . "अरे तुझं पण झालं जेवून, दे तुझं ताट मी धुवून घेते"

स्वप्नीलने सुजाताचा हात पकडला, खाली गुडघ्यावर बसला आणि तिला म्हणाला

"सुजाता आय लव यु "

सुजाता लाजली आणि तिने स्मित हास्य दिलं, त्या चांदण्यात ती मादक दिसत होती, तिचं ते रसरसलेलं रूप बघून त्याला राहवलं गेलं नाही आणि त्याने तिला घट्ट मिठी मारली. . . नकळत सुजाताचेही दोन हात त्याच्या पाठीवर गेले आणि तिनेही त्याला आलिंगन दिलं. . . . .

समोर जेवायला बसलेले अंकित आणि वैदेही सुजाताला दिसत होते तर समोर नदीत चमकणारं चांदण स्वप्नीलचं मन हेलावत होती. . . . अचानक स्वप्नील मोठ्याने किंचाळला त्याने सुजाताला झटकन ढकललं आणि तो तंबूच्या दिशेने धावत किंचाळत. . .

" ए ए भूत भूत. . . ए भूत " करत पळून गेला. सुजाताला कळेनासं झालं नक्की स्वप्नील का असा पळत गेला, तीही त्याच्या मागे धावत गेली.

घाबरलेला घामाघूम झालेला स्वप्नील थरथर कापत होता, सगळ्यांनी त्याला पकडलं. . .

" काय झालं, कसलं भूत... काय झालं स्वप्नील? ? ? ? "

पण स्वप्नीलच्या तोंडातून शब्दच निघत न्हवते. . . तो नदीच्या दिशेने बोट दाखवत बोलत होता. . . " भू भू. . . समोर नदीत बाई दिसली मला, भुताटकी आहे तिथे "

अंकित स्वप्नीलला बोलला अरे नक्की काय झालं सांग. .

स्वप्नीलने सांगायला सुरवात केली. . .

" आम्ही दोघे तिथे नदी जवळ होतो, मला तिथे पाण्यात बाई दिसली. . . . . तिने आपलं डोकं वर काढलं आणि एका हाताने मला पाण्यात बोलवत होती. . . . बाई आहे तिथे. . . . अंकित चल इथून अंकित जाऊया आपण इथून"

अंकित सुजाता आणि वैदेही त्याची समजूत काढत म्हणाले. . . अरे आत्ता एवढ्या रात्री आपण कुठे जाणार, आपण खूप पुढे आलोय जंगलात, आजूबाजूला काहीच नाही, फक्त हे घनदाट जंगल आहे, आपण उद्या पहाटेच लवकर निघू इथून, अरे भूत बित काही नसतं रे घाबरून जाऊ नको"

कसं बसं त्यांनी त्याला शांत केलं. . . . . सुजाताने त्याचा हात पकडला आणि म्हणाली. .

" स्वप्नील भास झाला असेल रे तुला, असा घाबरून जाऊ नको, काही नसतं भूत बित, आपण सगळे एकत्र आहोत काही होणार नाही"

आत्ता स्वप्नील हळू हळू शांत झाला त्यानेही दोन हातांनी सुजाताचा हात पकडला.

स्वप्नीलची समजूत काढून अंकित आणि वैदेही दोघेही उठून उभे राहिले आणि म्हणाले चला आम्ही आमच्या टेंट मध्ये चाललो. . . . . "टुडे हनिमून स्पेशल, जंगल में मंगल "

. . . सुजाता लाजत हासत उभी राहिली. . . .

"ए वैदेही प्लीज यार, आज नका जाऊ, आपण दोघी एका tent मध्ये झोपू, ह्यांना दोघांना त्या दुसऱ्या tent मध्ये जाऊ दे "

पण वैदेहीने एकच उत्तर दिलं. . . . " no way "

तिने अंकितच्या खांद्यावर हात टाकला आणि ते दोघेही tent मध्ये गेले. सुजाता आणि स्वप्नील बाहेर बसले होते, दोघांना थोडं Awkward वाटत होतं, पण स्वप्नीलने पुढाकार घेतला आणि सुजाताला म्हणाला, चल झोपूया रात्र खूप झाली आहे.

दोघेही आत गेले, आणि अंथरुणावर पडून राहिले, दोघांचे डोळे उघडे होते. .

स्वप्नील पुन्हा टेंट मधून बाहेर आला, सुजाताला म्हणाला मी आलो एक सिगारेट ओढून येतो. तो सिगारेट ओढायला म्हणून बाहेर गेला आणि थोड्यावेळाने पुन्हा आत आला. आत्ता सुजाताला झोप लागत न्हवती, आज तिचं मनही कासावीस झालं होतं स्वप्नीलची मिठी तिच्या सर्वांगाला आग लावून गेली. थोड्या वेळाने स्वप्नील आत आला, आणि अंथरुणावर आडवा पडला. सुजाताने हळूच आपला हात त्याच्या हातावर ठेवला, बाजूच्या tent मधून अंकित आणि वैदेहीचे अश्लील आवाज ऐकू येत होते, इथे सुजाता अजूनच कासावीस व्हायला लागली, तिने अचानक स्वप्नीलला मिठी मारली आणि आत्ता दोघं ही एकमेकांत गुंतून गेले.

थोड्यावेळाने स्वप्नील आणि सुजाता पुन्हा वेगळे झाले, आणि झोपले.

मध्यरात्र झाली, सुजाताची झोप मोडली, तिला कोणीतरी बोलत असल्याचा आवाज आला. . म्हणून तिने हळूच डोळे उघडले, स्वप्नील झोपेत बडबडत होता. . . सुजाता ताड करून उठली. . कारण स्वप्नील जे बडबड करत होता तो आवाज त्याचा न्हवता. स्वप्नील बाईच्या आवाजात बडबड करत होता. .

" का आलात, का आलात इथं. . . . यक नाय जायचा परत हिथून. . . . हं हं हं यक नाय जायचा परत "

हे सगळं बघून सुजाता तशीच अंथरुणातून किंचाळत बाहेर आली, बाजूच्या तंबूत झोपलेले अंकित आणि वैदेही पण उठून बाहेर आले. . .

" " काय झालं सुजाता? "

सुजाता म्हणाली. . . " तो स्वप्नील, बघा कसं करतोय, बाईच्या आवाजात बोलतोय तो, विचित्र आवाजात बोलतोय काहीतरी "

ताबडतोब अंकित आणि वैदेही दोघांनी तंबूत झाकून बघितलं तर स्वप्नील अजूनही तेच बडबड करत होता. . . .

" हितच दाबून मारून टाकेन सगल्यान्ला. . . आज नाय सोडायचे में कोनाला "

हे ऐकताच वैदेहीपण घाबरली आणि धावत येऊन सुजाताला पकडून उभी राहिली.

अंकितने स्वप्नीलला हाताने हालवलं. . . . स्वप्नील झोपेतून जागा झाला, आणि म्हणाला

" काय झालं? "

अंकित त्याला बोलला. . . . . अरे तू झोपेत काहीतरी बडबड करत होतास. . . .

स्वप्नीलचं अंग तापाने भरलेलं, त्याचं अंग घामाने भिजलेलं. त्याला काहीच कळत न्हवतं नक्की आपल्यासोबत काय झालं.

अंकितने सुजाताला सांगितलं काही नाही तू जा झोप. . . झोपेत बडबड करत होता, आम्ही पण झोपतो सकाळी बघूया. आणि सुजाता पुन्हा जाऊन स्वप्नीलच्या बाजूला झोपली.

रात्रभर तिला काही झोप लागली नाही. अंथरुणात पडून ती रातकिड्यांचा आवाज ऐकत जागीच राहिली.

हळूहळू पहाट व्हायला सुरवात झाली, तिचा नकळत डोळा लागला, पण थोड्याच वेळाने जाग आली. तिने विचार केला थोडं प्रातःकाळ विधी आटोपून येते. म्हणून ती उठली, बाजूला स्वप्नील न्हवता. . . . ती TENT मधून बाहेर आली, इकडे तिकडे बघितलं तर स्वप्नील कुठेच दिसत न्हवता, तिला वाटलं स्वप्निलपण विधी करायला गेला असेल, ती नदीकडे गेली, जवळच झुडपात ती विधी करायला बसली, ती ह्याच विचारात होती कि हा स्वप्नीलपण इथेच जवळपास कुठेतरी असेल, विधी आटोपून ती नदीजवळ हात धुवायला आली. . . . . . . अचानक स्वप्नीलने पाण्यातून आपलं डोकं वर काढलं. पुढ्यातच स्वप्नीलला बाहेर आलेला बघून ती पार घाबरली आणि मोठ्याने किंचाळली. . . धडपडत मागे पडली. . . . . . त. . . त. . . . प. . . प करत थोडी सावरली. . . समोर पाण्यातून फक्त डोकवर काढलेला स्वप्नील तिला एका हाताने पाण्यात बोलवत होता.

क्षणात तिला काल रात्री स्वप्नील सोबत नदीजवळ काय घडलं ते आठवलं. . . त्याला पण पाण्यातली बाई असेच हातवारे करून बोलवत होती. . . .

ती स्वप्नीलला बोलली. . . . . . " ए स्वप्नील अशी मस्करी पुन्हा करू नको. . . , घाबरले ना मी, चल बाहेर ये चल "

आणि स्वप्नील त्या पाण्यातून काही न बोलता बाहेर आला. सुजाताच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून इकडे अंकित आणि वैदेही दोघेही टेंट मधून बाहेर येऊन सुजाता स्वप्नीलला हाका मारत होते. . . . . समोरून ह्यांना दोघांना चालत येताना बघून त्यांनी विचारलं. . .

" काय ग सुजाता तूच किंचाळलीस ना "

ती म्हणाली

" हो, मीच किंचाळले, ह्या नालायकाने घाबरवलं मला "

सुजाता अंकित स्वप्नील आणि वैदेही चौघेही आत्ता त्या अघटीत काळाच्या कचाट्यात पुरते अडकलेले, काळ त्यांना खुणावत होता धोक्याची सूचना वारंवार देत होता पण हे त्यांच्या लक्षात यायला खूप उशीर झाला.

थोड्यावेळाने ते सगळे नदीत जाऊन अंघोळया करून फ्रेश झाले. पुन्हा दगडांची चूल पेटवली आणि गरम गरम चहा बनवून प्यायले. त्यांनी दोन्ही तंबू गुंडाळून घेतले आप आपल्या BAG पाठीवर टाकल्या आणि निघाले समोर दिसणारा उंच डोंगर सर करायला.

सकाळच्या खेळीमेळीच्या वातावरणात काल रात्री जे जे काही घडलं ते फक्त भास होते बाकी काहीही नाही ह्या आत्मविश्वासाने ते पुन्हा निघाले पुढल्या वाटेवर.

हळू हळू बघता बघता एक एक पाउल टाकत ट्रेकिंगची मजा लुटत फोटो काढत चौघेही डोंगर चढत होते. मध्यावर गेल्यानंतर ते एका झाडाखाली विसाव्याला थांबले, समोर दिसत होता अथांग मोकळा परिसर. पुढ्यात किमान २० फुटांवरच खोल दरी होती, दरीच्या बरोबर खाली ती खाली घनदाट आरण्य होतं. . . . अंकित आणि वैदेही फोटो काढण्यात मग्न झाले, सुजाता स्वप्निलकडे बघून विचार करत होती, हा स्वप्नील सकाळ पासून ट्रेक मध्ये शांत का. सकाळपासून तो एक शब्दही बोलला नाही. तिने स्वप्नीलच्या कपाळाला हात लावला,

आणि मस्करीत बोलायला लागली :-

" ताप तर नाही आहे. . . . . "

"जीभ दाखव. . . . "

स्वप्नीलने जीभ बाहेर काढली. . पण स्वप्नीलची जीभ खूप लांब बाहेर आली. . . . हे बघून सुजाता थोडी गांगरली. .

पुन्हा म्हणाली

"डोळे दाखव. . . . . . "

आणि असं म्हणताच स्वप्नीलचे दोन्ही डोळे उलटे फिरले आणि त्याचे ते गोल गोल मोठे पांढरे फटक डोळे बघून सुजाता तिथून पटकन उठली आणि अंकित वैदेही जवळ जाऊन उभी राहिली. . .

स्वप्नील तिथेच बसून होता, जीभ बाहेर काढून डोळे पांढरे फटक करून. . . त्याचं हे रूप बघून अंकित आणि वैदेही तिघेही घाबरले. ते समजून गेले काहीतरी गडबड आहे, स्वप्नील नॉर्मल नाही राहिला आणि ते तिथून खाली जाणाऱ्या वाटेच्या दिशेने मागे पळाले, जाऊन एका झाडाच्या मागे लपून बघायला लागले. . . .

इकडे स्वप्नील त्या दगडावरून उठून उभा राहिला आणि बाईच्या आवाजाने तोंडातल्या तोंडात पुटपुटत. . बोलायला लागला

" घेऊन चालली मी ह्याला, चालले मी घेऊन ह्याला. . . . . हा हा हा हा हा हा हा हा हा " असं एक विलक्षण आवाजात हासत स्वप्नील धावत सुटला आणि त्याने थेट समोरच्या दरीत उडी टाकली.

समोर हे दृश्य बघताच सुजाता मोठ्याने किंचाळली. . . . . . "स्वप्नील". . . आणि ती मोठमोठ्याने रडायला लागली. . . . . अंकित आणि वैदेहीने तिला घट्ट मिठी मारली. . . सुजाता शांत हो शांत हो सुजाता. . . चल आपण जाऊया इथून आत्ता ताबडतोब. . . . . . अंकित पळत त्या ठिकाणी गेला जिथून स्वप्नीलने खाली उडी मारली होती, बरोबर खाली त्या दरीत तीच नदी होती ज्या नदीच्या बाजूला ते लोकं काल रात्री टेंट लावून वस्तीला थांबले होते. वरून पडलेला स्वप्नील थेट जाऊन त्या नदीच्या पात्रात पडला.

क्षणाचाही विलंब न करता घाबरलेल्या त्या तिघांनी आपापल्या Bag तिथेच जवळ जंगलात फेकून दिल्या आणि खाली उतरणाऱ्या पायवाटेने एकमेकांचे हात पकडून थेट धावत सुटले. . . . . .

पटापट डोंगर उतरून ते कर्नाळयाला खाली आले, अंकितने सुजाता आणि वैदेहीला त्या तिकीट घराजवळ थांबवलं. आणि तो स्वतःची बाईक घेऊन पनवेलला निघून

गेला. तिथे त्याने त्याच्याच एका मित्राला बोलावलं आणि सांगितलं माझीही बाईक घेऊन तू माझ्या घरी जा, मी संध्याकाळी येईन म्हणून सांग घरी.

तिथून त्याने पनवेल अलिबाग एस. टी. बस पकडली आणि तो पुन्हा कर्नाळ्यात आला. वैदेही सुजाताला घेऊन तिथून हायवेवरून त्याने मिनीडोर पकडली आणि पनवेल गाठलं. तिथून वाशीला आपापल्या घरी गेले.

वाटेत येताना त्यांनी ठरवलं कि झाला प्रकार कोणालाही सांगायचा नाही. . काहीही झालं तरी.

हे चौघेजण ट्रेकिंगला जाणार होते ह्याची माहिती ह्यांच्या व्यतिरिक्त कॉलेजात कोणालाच न्हवती. इकडे स्वप्नील सापडत नाही म्हणून जळगावहून त्याचे आई बाबा वाशिला आले. पोलिसात तक्रार नोंदवली पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

आजीने सुजाताला जेव्हा सांगितलं होतं कि अमावस्येची रात्र आहे, अजाण ठिकाणी जाऊ नका, तेव्हा तिने आजीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं, पण जर त्यावेळी सुजाताने आजीचं ऐकलं असतं आणि इतर मित्रांनाही समजावलं असतं तरही वेळ आलीच नसती.

लोकं म्हणतात त्यांना तिथे दरीत एक माणसाच्या हाडांचा सापळा सापडला होता. . . . . . प्राण्यांनी अर्धवट खाल्लेली बॉडी होती. ओळख पटवण कठीण होतं. त्या जंगलातल्या आदिवासींना हे प्रकार काय नवीन न्हवते. अधून मधून अश्या घटना तिथे खूप पूर्वीपासून घडत आलेल्या. . कधी कोणी आदिवासी मेलेला सापडायचा तर कधी एखादा गुराखी तर कधी वरून डोंगरावरून एखादा पर्यटक खाली पडायचा.

नंतर पोलीस तपास चालू होता, पण स्वप्नीलचं त्या दरीत पडून पुढे काय झालं आज पर्यंत समजलं नाही.

# बाळंतीण"

स्वातीला अगदी कॉलेज पासून भुतांच्या कथा वाचण्यात रस होता, कॉलेजात शिकत असताना तर ती फेसबुकवर भूतांवर ब्लॉग पण लिहायची, गावाला गेली आणि एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीने काही अनुभवलेली गोष्ट सांगितली कि स्वाती त्या कथेत थोडा मसाला टाकून लगेच ती उतरवून काढायची. पुढे स्वातीचं लग्न झालं, पण तिने हा छंद काही सोडला नाही.

साल २००४ला तिचं अविनाश सोबत लग्न झालं आणि ती संसारात रमली. नवरा तहसील कचेरीत क्लार्क म्हणून कामाला होता, तो कामावर गेला कि स्वाती आपला संगणक चालू करून. . भूतांवर कथा लिहायला बसायची.

आत्ता लग्न होऊन ३ वर्ष झाली आणि २००७ साली ती गरोदर राहिली. म्हणून अविनाशने तिला ७ व्या महिन्यातच माहेरी पाठवून दिली. घरात वातावरण आनंदाचं, त्यात ७ व्या महिन्यात माहेरी आलेल्या स्वातीची खूप देखरेख चालली होती. तिची आई तर तिला दिवसभर गोडधोड खायला घालत होती, वडील बाजारात तालुक्याच्या ठिकाणी गेले कि आवर्जून तिच्यासाठी केळी सफरचंद आणायचे. स्वातीचा नवरा तालुक्याच्या ठिकाणी खरवलीला कामाला होता. स्वातीचं माहेर, उसर हे खरवली पासून साधारण १०-ते १२ किलोमीटर अंतरावर, गाव तसं खूप लहान, वस्ती असेल साधारण ५०-६० घरांची.

माहेरी येताना स्वातीने सोबत laptop पण आणला होता, भरपूर वेळ मोकळा मिळायचा, ह्या फावल्या वेळात ती सतत काही न काही हॉरर सस्पेन्स कथा लिहून काढायची. एकदा तिच्या आईने तिला सहज विचारलं. . .

" काय ग स्वाते हे दिवस रात्र बसून काय लिहून काढत अस्तेस "

स्वातीने तेच जुनं उत्तर दिलं. . . . " आग आई, काही नाही सहज भुतांच्या कथा लिहित असते "

हे उत्तर ऐकून तिच्या आईच्या संतापाचा पारा चढला म्हणाली "ही औदसा अजून तुझ्या डोक्यातून गेली नाही काय, लग्नाच्या आधी कॉलेजात असताना ठीक होतं सगळं, आत्ता गरोदर आहेस आणि हे काय दळभद्री लिहित असतेस, पोटात बाळ आहे तुझ्या देवा धर्माची पुस्तकं वाचायची सोडून हे काय भलतंच "

स्वातीने आईचं बोलणं टाळून तिच्याकडे दुर्लक्ष केलं आणि पुन्हा उशिरा रात्रीपर्यंत कथा लिहायला बसली.

स्वातीच्या वडिलांच्या घराच्या मागच्या मैदानातच होळीचं मैदान होतं, त्या पलीकडे नदी आणि नदीच्या पलीकडे ५ गावांचं स्मशान. स्वाती खिडकी उघडी ठेवून थंड हवा घेत लेख लिहित होती, अधून मधून पुढचं सुचावं म्हणून ती खिडकीतून बाहेर बघून विचार करायची, पुन्हा लिहायची. त्या रात्री साधारण १२ - १२:३० झाले असतील. खेडे गावात लोकं लवकर जेवणं आटोपून झोपून जातात, म्हणून गावात कसलाही आवाज ऐकू येत न्हवता, बाहेर रातकिड्यांचा आवाज, आणि होळीच्या मैदानात भटकी कुत्री दिसत होती. स्वातीला सस्पेंस असं काही दिसलं वाटलं कि तिला रोमांच वाटायचा. लेख लिहिता लिहिता साधारण १-१:३०च्या सुमारास त्या होळीच्या मैदानात कुत्री रडायला लागली. सगळेच्या सगळे कुत्रे एकदाच रडायला लागले. त्यांच्या आवाजाने तिच्या आईची झोप मोड झाली. पलीकडच्या खोलीतून ती काहीतरी बडबड करायला लागली आणि पुन्हा झोपली. कुत्र्यांचा आवाज त्या मैदानात खुपवेळ येत होता म्हणून स्वातीने घरा मागचा दरवाजा उघडला आणि ती दरवाजात उभी राहून निरखून बघत होती, जवळच थोड्या अंतरावर तिला कुत्र्यांचा कळप वर तोंडं करून रडताना दिसला. मैदानात चंद्राचा प्रकाश पडलेला तिने एक खडा उचलला आणि त्या कुत्र्यांना फेकून मारला. दगड फेकून मारताच त्या कुत्र्याचं रडणं थांबलं. स्वाती पुन्हा घरात आली, दरवाजा बंद करणार इतक्यात तिला दरवाजातून आत कोणीतरी चालत आल्याचा भास झाला. ती मनातून थोडी घाबरली, तिने पुन्हा बाहेर डोकवून बघितलं, वळून मागे घरात बघितलं पण काहीच दिसलं नाही. दरवाजा बंद करून ती पुन्हा खाटेवर येऊन बसली, laptop मांडीवर

ठेवला आणि पुन्हा आपला लेख लिहायला बसली. लेख लिहिताना तिची नजर laptop कडे होती पण बाजूला उघड्या खिडकीत कोणीतरी उभं आहे असा तिला भास झाला, नजरेने बाजूला काहीतरी हालचाली होत आहेत असं जाणवायला लागलं, पण खिडकीकडे बघण्याची तिची हिंमत होईना. आत्ता तो कुत्र्यांचा कळप तिच्या खिडकीपाशी येऊन रडायला लागला. एकदाच रडायला सुरवात केलेल्या त्या कुत्र्यांच्या आवाजाने तिच्या आईची झोपमोड झाली आणि ती उठून स्वातीच्या खोलीत आली, आई खोलीत येताच त्या खिडकीची झाप खाड करून जोराने आपटली गेली. . . . एवढ्या जोरात आपटलेल्या त्या झापेच्या आवाजाने स्वाती दचकली आणि हातातला laptop गादीवर टाकून ती झटकन उभी राहिली.

तिच्या आईला खिडकीत कोणीतरी दिसलं होतं. . . ती स्वातीला म्हणाली. . "स्वाती खिडकीत कोण होतं गं? "

स्वाती म्हणाली " कोणीच नाही "

तिची आई पुन्हा म्हणाली. . . " नाही नाही स्वाती कोणीतरी होतं खिडकीत, आणि ती कुत्री पण रडत होती, हे वाईट लक्षण आहे, तू चल इथून चल आमच्या सोबत आपण बाजूच्या खोलीत जाऊन झोपू "

स्वतीपण मनातून थोडी घाबरली होती, तिने laptop बंद केला आणि ती तिच्या आई सोबत बाजूच्या खोलीत झोपायला गेली.

तारीख होती १८ जुलै २००७,

स्वातीचं बाळंत होण्याची चिन्ह दिसू लागली, हळू हळू तिच्या पोटात कुरकुर व्हायला लागली, लगेच तिच्या वडिलांनी गावातलीच रिक्षा बोलावली आणि ते तिला गावतल्याच सरकारी दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टर शिंदेंनी तिला तपासली आणि वेळ दिली संध्याकाळी साधारण ७-८च्या दरम्यान डीलेवरी होईल. तिच्या वडिलांनी अविनाशला फोन करून कळवलं, अविनाश कामावर होता, म्हणाला संध्याकाळी कामावरून थेट गावात येतो. आत्ता संध्याकाळ झाली ८ वाजले आणि तिच्या पोटात दुखण चालू झालं, डॉक्टर आले, आणि

नर्सने तिला OT मध्ये नेलं. हॉस्पिटलच्या मागच्या बाजूला नदी होती, स्वातीला आत OT मध्ये घेऊन गेले, तिच्या ओरडण्याचा आवाज यायला लागला आणि बाहेर खिडकीच्या मागे कुत्र्यांचा कळप जमून मोठ्याने रडायला लागला. कुत्र्यांचा रडण्याचा आवाज बाहेर बसलेल्या लोकांना स्पष्ट ऐकू येत होता, तिची आई तोंडातल्या तोंडात त्या कुत्र्यांना शिव्या द्यायला लागली. . . . . .

"ही मेली कुत्री काल पासून रडत आहेत, जा हो बघा जरा, दगड घाला आणि हाकला त्यांना "

स्वातीचे वडील उठून बाहेर गेले आणि कुत्र्यांना दगड मारणार, इतक्यात ते थांबले, त्यांनी बघितलं कि OTच्या खिडकी बाहेरून कोणीतरी बाई आत त्या खोलीत चोरून डोकावत होती. अंधुक चंद्राच्या उजेडात त्यांना ती स्पष्ट दिसत न्हवती पण लांब केस आणि अंगावरची साडी त्यांना स्पष्ट दिसत होती. ते मोठ्याने ओरडले. . . " ए. . कोण आहे. . . ए "

त्यांनी आवाज दिला आणि ती आकृती तिथून क्षणात नाहीशी झाली, दगड न मारताच तो कुत्र्यांचा कळप भुंकत भुंकत नदीच्या दिशेने पळत सुटला. . . . .

स्वातीच्या वडिलांना हा प्रकार काहीसा विचित्रच वाटला. . . . पण त्यांच्या डोक्यात टेन्शन होतं स्वातीच्या बाळंतपणाचं. ते आत आले आणि बाकड्यावर बसले.

बाहेर आपल्याला काय दिसलं हे स्वातीच्या आईला सांगणार इतक्यात नर्स बाहेर आली आणि म्हणाली " मुलगा झाला आहे " थोड्यावेळाने तुम्ही आत जाऊ शकता.

स्वातीच्या आई वडिलांचा चेहरा आनंदाने फुलला, कारण मुलीचीही पहिलीच डीलेवरी होती, इतक्यात जावई बापू आले, येताना सोबत मिठाई घेऊनच आले होते. आनंदाने उत्साहित झालेल्या अविनाशने संपूर्ण हॉस्पिटल मध्ये असलेल्या स्टाफला मिठाई वाटली. . . . थोड्या वेळाने त्यांना आत जाण्याची परवानगी मिळाली आणि त्यांनी बाळाला पाहिलं, बाळ गोंडस होतं, सुदृढ होतं.

बघता बघता रात्रीचे ११ वाजले, स्वातीची आई म्हणाली

"मी थांबते हिच्या जवळ तुम्ही दोघे जा घरी, सकाळी या तुम्ही "

आणि ते दोघे तिथून निघून गेले. स्वाती आणि बाळ खाटेवर होते, बाजूला बेड रिकामा होता, स्वातीच्या आईने तिथेच चादर टाकली आणि ती आडवी पडली. रात्र वाढत गेली. . . . . . आणि ती रात्र काळरात्र बनायला आपलं भयाण रूप धारण करायला लागली. रात्री हॉस्पिटल मध्ये फक्त २ नर्स होत्या, आज नेमकं तिथे अजून कोणी रुग्णही न्हवते. आत्ता त्या हॉस्पिटल मध्ये फक्त स्वाती तिची आई आणि त्या २ नर्स.

बघता बघता २ वाजले, स्वातीच्या आईला कसला तरी आवाज आला म्हणून तिने डोळे उघडले, तिला त्या हॉस्पिटलच्या खोलीत कोणीतरी फिरत असल्याचा भास झाला, तिने तसंच खाटेवर पडून आपली नजर त्या खोलीत फिरवली, बल्बच्या उजेडात तिला सावली फिरताना दिसत होती पण आकृती दिसत न्हवती. तिला भीतीने घाम सुटला, तिने हळूच स्वातीला हात लावला. . . पण स्वाती गाढ झोपेत होती, आत्ता मात्र पायाचा खास्पटण्याचा आवाज स्पष्ट ऐकू यायला लागला. खाटेवर बाळ आहे ह्या विचाराने मनातली भीती झटकून तिची आई ताड करून उठून खाटेवर बसली. एक माणसाच्या आकृतीची सावली खोलीतून बाहेर जाताना दिसली पण आकृती काही दिसली नाही. . . . . तीने स्वातीला हाक मारली. . . . आणि २ हाताने हालवून तिला उठवलं. .

" स्वाती. . ए स्वाती. . . . आगं उठं, बाय, इथे कोणीतरी आलं होतं खोलीत"

स्वाती झोपेतच होती, डोळे न उघडता ती म्हणाली. . . " आगं नर्स असेल, आली असेल राउंड मारायला, झोप तू "

तिच्या आईला पण वाटलं आली असेल एखादी नर्स. . . म्हणून ती पुन्हा खाटेवर आडवी पडली. किमान १५-२० मिनिटं ती अशीच डोळे उघडे ठेवून पडून राहिली आणि कधी तिचा डोळा लागला समजलं नाही. थोड्या वेळाने पुन्हा तिला जाग आली. पुन्हा तोच पायाचा खास्पटण्याचा आवाज आणि खोलीत फिरणारी सावली दिसायला लागली. आत्ता मात्र तिची आई उठून उभी राहिली. . . तिने बघित्तलं ती सावली आत्ता स्वातीच्या बाळाजवळ होती, बाळ

स्वातीच्या पुढ्यात होतं आणि स्वातीने त्याला आपल्या पदरात घेतलं होतं. सावली स्वातीच्या खाटेजवळ तशीच उभी होती.

स्वातीची आई घाबरली आणि मोठ्याने किंचाळली, स्वाती झटकन उठली आणि म्हणाली

" काय झालं आई "

इतक्यात ती सावली समोरच्या खिडकी पाशी जाऊन उभी राहिली आणि अचानक गायब झाली. बाहेरून २ नर्स धावत आल्या. . . . " ओ काय झालं, इतक्या मोठ्याने कोण ओरडलं? काय झालं "

स्वातीच्या आईला घाम सुटलेला पाय थरथर कापत होते, " इथे सावली उभी होती, बाळाच्या जवळ उभी होती. . . . . . . . . . "

बाळाच्या जवळ सावली उभी होती हे ऐकताच स्वातीने बाजूला खाटेवर बघितलं, खाटेवर बाळ न्हवतं.

ती मोठ्याने ओरडली. . . " आई, बाळ कुठे आहे? "

बाळ खाटेवर नाही हे बघताच त्या नर्सने खाटेखाली बघितलं, पण बाळ तिथे न्हवतं.

आत्ता मात्र आरडाओरड सुरु झाली, स्वातीची आई मोठ्याने ओरडली. . . . " भुताटकी झाली, हो भुताटकी झाली इथं, मी बघितली डोळ्याने, सावली फिरत होती ह्या खोलीत "

तिची आई आणि त्या २ नर्स धावत हॉस्पिटल मधून बाहेर निघाल्या आणि जवळच असलेल्या घराचा दरवाजा वाजवून त्यांना उठवलं, झाला प्रकार सांगितला, आणि बघता बघता गावात बोंबाबोंब झाली. अक्खा उसर हॉस्पिटलच्या बाहेर जमा झाला, अविनाश आणि स्वातीचे वडील पण धावत आले. बाळ गायब झालं हे ऐकताच गावातले १०-१२ लोकं हातात टोर्च घेऊन हॉस्पिटलच्या मागच्या बाजूला धावत गेले, शोधाशोध चालू झाली. इकडे

अविनाश आणि स्वातीचे वडील स्वातीच्या खोलीत गेले, स्वाती केस मोकळे सोडून मान खाली घालून खाटेवर बसलेली.

अविनाश तिच्या जवळ गेला तिचं सांत्वन करत म्हणाला " काही होणार नाही, मिळेल आपलं बाळ. . . . . "

हे ऐकताच खाटेवर बसलेल्या स्वातीने मान वर केली, आणि दात विचकत हसायला लागली. . . . . .

घोगऱ्या आवाजात बोलायला लागली. . . . " मिळालं मला माझं बाळ "

पुन्हा पुन्हा एकच वाक्य बोलत होती. . . . . . . " मिळालं मला माझं बाळ "

आणि एका विलक्षण आवाजात हसायला लागली. . . . स्वातीचं हे रूप बघून गावातल्या म्हाताऱ्या बायका एका क्षणात समजून गेल्या कि हिला झपाटलय. हॉस्पिटलच्या मागच्या बाजूला गेलेल्या लोकांना नदीच्या बाजूला झुडपाजवळ कुत्र्यांचा कळप दिसला, त्यांनी त्या कुत्र्यांना दगड मारून हकललं आणि टोर्च मारत त्या जागेवर पोहोचले. तिथे झुडपात त्यांना ते बाळ दिसलं, ताबडतोब एकाने अंगावरचा टॉवेल काढला आणि बाळाला त्यात उचललं, बाळाचा काहीच आवज येत न्हवता. . . लगेच त्यांनी हॉस्पिटलच्या दिशेने धाव घेतली. . . . . . .

माणसं धावत आत आली, बाळाला खाटेवर झोपवलं आणि नर्स ना बोलवलं. . . . . नर्स धावत पळत आल्या त्यांनी बाळाला तपासलं, पण उशीर झाला होता. स्वातीच्या बाळाचे प्राण गेले होते. इकडे स्वाती खाटेवर गुडघ्यात मान घालून दात विचकत खिदळत होती. . . . . . .

लोकं त्या खोलीच्या बाहेर उभे राहून बघत होते पण आत जायची कोणाचीच हिंमत होईना.

हळू हळू सरकत सरकत काही लोकं आत शिरले. . . . . . स्वाती खाटेवर उभी राहिली. . . . तिने हात पाय एकदम ताठ सरळ केले. . . . केस झटकून मागे टाकली आणि डोळे पांढरे करून. . . . . . घोगऱ्या आवाजात पुन्हा बोलायला लागली. . . . . .

" माझं बाळ मिळालं मला. . . . . हा हा हा हा हा हा हा "

काय करावं कोणालाच सुचेना, गावात कोणी मांत्रिक ही न्हवता जो त्यांची मदत करू शकेल. आत्ता साधारण ५ वाजायला आले होते. . . . लोकं वाट बघत होते सूर्यप्रकाश होण्याची. हळू हळू आकाशात प्रकाश व्हायला लागला आणि गावातल्या ६-७ लोकांनी पकडून स्वातीला रस्सीने बांधली. . . . आणि आत्ता तिला गावातल्या जागृत गावदेवीच्या मंदिरात घेऊन निघाले, सगळा गाव मागून चालत होता, आणि त्यांच्या बाजूने थोड्या अंतरावरून २-३ कुत्री भुंकत होती.

निरोप मिळताच तालुक्याच्या ठिकाणाहून ७ वाजता शिंदे डॉक्टर पण आले, त्यांनी बाळाला तपासलं आणि सांगितलं “नाही, बाळ गेलं.”

इकडे स्वातीला लोकं मंदिराच्या दिशेने घेऊन चालले होते आणि ती घोगऱ्या आवाजात जोर काढून लोकांना धक्के मारत होती. . . . . खिदळत होती, चालता चालता हवेत ३-४ फुट उंच उंच उड्या मारत होती. . . चवताळलेल्या स्वातीला आवरता आवरता गावातल्या लोकांच्या नाकी ९ आले. बघता बघता मंदिर जवळ आलं आणि मंदिर जवळ येताच अचानक स्वाती बेशुद्ध होऊन खाली पडली. . . . . बाजूने भुंकणारी कुत्री. . . . . भुंकत भुंकत नदीच्या दिशेने पळून गेली. . . . . . . .

गावातल्या म्हाताऱ्या बायकांनी आवाज दिला. . . " गावदेवी पावली, पावली ग माझी माय पावली, पोरीची सुटका झाली "

बया गेली पळून. . . . . . . पोरगी मोकळी झाली. . . . . . .

लोकांनी स्वातीला उचलून मंदिरात नेली, देवीचा अंगारा तिच्या माथ्यावर लावला आणि तिला थेट हॉस्पिटल मध्ये घेऊन आले.

डॉक्टरांनी तिला तपासून एक इंजेक्शन दिलं. थोड्याच वेळात स्वाती शुद्धीवर आली आणि आपल्या बाळाची आठवण काढायला लागली.

आपलं बाळ गेलं ह्या दुःखाने अविनाश आणि स्वाती मनातून पार खचून गेले, तर इकडे स्वातीची आई, तिच्या वडिलांना सांगत होती, ते जे काही होतं ते काल पासून पोरीच्या मागावर होतं. काल रात्री मी खिडकीत पण बघितलं होतं काहीतरी होतं तिथे.

जे काही आजूबाजूला अमानवीय घडत होतं त्याची चाहूल स्वातीला पण ओळखता आली नाही आणि शेवटी तिच्या बाळाचा जीव गेला.

हॉस्पिटलच्या नर्सच्या माहिती नुसार १ वर्षांपूर्वी इथे एकदिवस बाईकवर एक बाई आणि एक माणूस आला होता, बाई गरोदर होती, तिला प्रसूती कळा यायला सुरवात झाल्या म्हणून ते लोकं इथे आले, पण बाईकच्या गचक्यांनी तिचं Complication वाढलं आणि इथे बाई आणि तिचं मुल दोघेही expire झाले. शिंदे डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले पण त्या लोकांनी इथे यायलाच उशीर केला होता. तो माणूस मुंबईचा होता, इथे कोकणात फिरायला आलेला, नंतर त्याचे नातेवाईक आले आणि ते लोकं त्यांना इथून घेऊन गेले. . . . . .

बहुतेक तीच बाई इथे भूत झाली असावी. . . . . . .ही घटना गावातल्या लोकांना पण माहिती होती, पण त्यानंतर वर्षभरात तिथे हॉस्पिटल मध्ये कोणाचीच प्रसूती झाली न्हवती. म्हणून इथे भुताटकी आहे ह्याची कोणालाच काहीच माहिती न्हवती.

अधून मधून होळीच्या मैदानात कुत्री रडायची पण त्याकडे लोकांनी कधी एवढं लक्ष, दिलं न्हवतं.

त्या दिवसापासून त्या हॉस्पिटल मध्ये एकाही गरोदर बाईला कोणी घेऊन जात नाही, एवढंच काय गावातली गरोदर बाई रात्रीच नाही दिवसापण होळीच्या मैदानाकडे जात नाही.

# " लॉरी "

"सलामे इश्क मेरी जान जरा कुबूल किजीये तुम हमसे प्यार करणे कि जरा सी भूल किजीये "

जुनी गाणी ऐकत ड्रायवर सुधीर आणि क्लीनर राजू मस्त मजा घेत ट्रकचे गियर बदलत महाबळेश्वरचा घाट उतरून पोलादपूर कडे चालले होता. गाडी मध्ये भाजी लोड केली होती. वेळ रात्री ११:३०ची होती. पहाटे ४ वाजेपर्यंत त्यांनाही भाजी वाशी नवी मुंबईच्या ए. पी. एम. सी. मार्केट मध्ये पोहोच करायची होती. सुधीर आणि राजूचा हा प्रवास नेहमीचाच. त्यांना ह्या रस्त्याची सवयच झाली होती. घाटात एका निर्जन ठिकाणी ह्यांच्या ट्रकला एका माणसाने हात दाखवला. राजू बोलला सुधीर बघ रे कोण आहे. गाडी थांबली. काय व कुठं जायचं. मला महाडला जायचं आहे. सोडाल का. राजूने ड्रायवर सुधीर कडे बघितलं. सुधीरने नजरेनेच होकार दिला, राजूने त्याला व येण्यासाठी हात दिला आणि तो माणूस गाडीत चढला. गाडी घाट उतरून आत्ता पोलादपुरात उतरली. एका हातगाडीवर चहा प्यायला दोघेपण उतरले. गाडीतला माणूस गाडीतच झोपला. चहा पिऊन आले आणि गाडी पुन्हा महाडच्या दिशेने हायवे वरून धावायला लागली. थोडं अंतर पुढे गेल्यावर एका खिंडीत रस्त्याच्या कडेला एक बाई उभी होती. शरीरयष्टीने एकदम मादक होती. राजू क्लीनर. त्याची नजर तिच्यावर पडली. सुधीर चं पण लक्ष गेलं. राजू बोलला अरे थांब थांब. गाडी थांबली. राजूने त्या बाईला विचारलं काय व कुठं जायचं?

बाईने कामुक हावभाव केले. तिचे कपडे तिचे हाव भाव बघून राजू समजून गेलाही वेश्या आहे. त्याने आपल्या नाकावर बोट लावून सुधीरला खुणावलं. सुधीर त्याच्याकडे बघून गालातल्या गालात हसला. सुधीरने गाडी रस्त्यावरून खाली उतरवली आणि एका झाडाखाली उभी केली. गाडीत झोपलेला पेसेंजर जागा झाला. त्याने विचारलं काय हो का थांबवली गाडी? काय झालं?

राजू बोलला आलो जरा अर्ध्या तासात येतो आम्ही दोघे. तो माणूस बोलला ओ रात्रीची वेळ आहे. कुठे चाललात? ते दोघेपण मिश्कीलपणे बोलले “यायचं का तुमाला? चला तुमाला बी आज जन्नत दाखवतो.”

पेसेंजरने त्यांना सांगितलं. “ओ इकडे रात्री रस्त्यावर थांबू नका.ही जागा चांगली नाही, इथे विचित्र प्रकार घडतात”. पण त्या दोघांनी त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही आणि दोघेपण खाली उतरले. पेसेंजर काही गाडीतून खाली उतरला नाही. तो ह्यांच्याकडे बघून मोठ्या मोठ्याने हसला, हा असं का हसतोय हे त्यांच्या लक्षात आलं नाही ते निघून गेले. राजू आणि सुधीर त्या बाई बरोबर चाळे करत तिच्या सोबत खाली शेतात गेले. शेतातच त्या बाईचं झोपडं होतं. राजू त्या झोपडीच्या बाहेर थांबला सुधीर आतमध्ये गेला. थोड्या वेळाने सुधीर बाहेर आला आणि त्याने राजूला आत जाण्यासाठी इशारा केला. राजू :- कशी आहे? सुधीर :- अरे मस्त माल आहे. . . आज एकदम जन्नत. . जा आत जा.

राजू आत्ता आत झोपड्यात शिरला आणि सुधीर बाजूला थोड्या अंतरावर लघवी करायला उभा राहिला. त्याला राजूच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला. मेलो मेलो वाचवा वाचवा. . सुधीर वाचव सुधीर मेलो मेलो. सुधीर पटकन मागे वळला आणि त्या झोपडीच्या दिशेने धावला. तेवढ्यात राजू आपले कपडे हातात घेऊन धावत पळत बाहेर पळाला. त्याने सुधीरचा हात पकडला आणि बोलला पळ पळ सुधीर. . भुताटकी आहे सुधीर पळ. . . . आणि दोघेपण जीव घेऊन पळत पळत ट्रक जवळ आले. सुधीर गाडीला स्टार्टर मार चल निघूया सुधीर जाऊन स्टेरिंग वर बसला आणि राजू तसाच अंडरवेयर वर शर्ट पेंट हातात घेऊन ट्रकच्या दुसऱ्या बाजूने बसला. सुधीरने गाडीला स्टार्टर मारला आणि गाडी चालू केली. गाडीचे लाईट चालू केले आणि गाडी काढली. . . . . आत्ता मात्र सुधीर गाडी जोरात पळवायला लागला, बाजूला बसलेला पेसेंजर ह्या दोघांकडे बघतच बसला, त्याला समजेना हे दोघे बोंबलत बोंबलत धावत एवढ्या घाईने गाडीत का आले आणि हा एवढ्या जोरात गाडी का पळवतोय. त्याने राजूकडे बघितलं, राजू घामाने पार भिजला होता आणि थरथर कापत होता. पेसेंजर आणि सुधीर दोघांनीपण राजूला विचारलं काय रे काय झालं काय? आणि तो पेसेंजर पुन्हा हसायला लागला.

डोळयात पाणी आणून घाबरलेला राजू आत्ता झालेली घटना सांगत होता. अरे मी आत गेलो, ती बाई खाटेवर झोपली होती, बाजूला दिवा होता. नंतर मी कपडे काढले आणि त्या बाईच्या बाजूला जाऊन झोपलो. मी तिच्या अंगावर हात फिरवायला सुरवात केली, झोपडीत दिव्याचा मंद प्रकाश होता आणि अचानक ती बाई हाताला लागेनाशी झाली. म्हणून मी अंथरुणात इकडे तिकडे हात फिरवला. तर ती बाई खाटेवर न्हवती. ती अचानकपणे खाटेवरून गायब झाली. म्हणून मी त्या खाटेवरून उठायचा प्रयत्न केला. ती लाकडी खाट अचानक हवेत वर झाली आणि जोरात खाली आपटली. मी त्या खाटेवरून कशीबशी खाली उडी मारली. तर कोणीतरी माझे दोन्ही पाय पकडून मला जोरात जमिनीवर आपटला. सुधीर ती बाई न्हवती सुधीर. . . ती भुताटकी होती. हे ऐकून सुधीरला पण जाम भीती वाटायला लागली. म्हणजे आत्ता आपण ज्या बाई बरोबर अनैतिक संबंध ठेवले ती वेश्या नसून भुताटकी होती.

राजू एवढा घाबरला होता कि अजून त्याचे दोन्ही हात पाय थर थर कापतच होते. त्याने ट्रकचा तो फळीचा दरवाजा बंद करून घेतला. गाडीत बसलेला पेसेंजर सांगायला लागला, ह्या रस्त्यावर असे खूप प्रकार घडतात. इथे हायवेवर अपघातात खूप लोकं मेलेली आहेत. रात्रीच्या वेळीही भूतं उठतात. म्हणून परत कधीच इथे रात्रीच्या वेळी अशी गाडी थांबवत जाऊ नका. महाड आत्ता जवळ आलं होतं. सुधीर चं लक्ष समोर रस्त्यावर होतं. समोरून येणाऱ्या गाड्यांचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर चमकत होता. गाडीतल्या देव्हाऱ्यात लावलेले एल. इ. डी.चे दिवे मंद प्रकाश फेकत होते. आत्ता ट्रक मधली गाणी वगैरे सगळी बंद होती. वातावरण भीतीने ग्रासलं होतं. पेसेंजरने विचारलं किती पैसे देऊ. राजू सांग रे किती घ्यायचे राजूला आत्ता पर्यंत झोप लागली होती, तो डुलक्या मारत होता. . . . . राजू हळू आवाजात बोलला ३० रुपये द्या. पेसेंजर कडून काहीच उत्तर आलं नाही. कुठं थांबवायची व? सुधीरने विचारलं.

पेसेंजर कडून काहीच उत्तर आलं नाही. पुन्हा २ मिनिटांनी सुधीरने आवाज दिला. . काय व कुठं थांबवू विचारलं?

काहीच उत्तर नाही, झोपले वाटतंय म्हणत सुधीरने नजर मागे सीट फिरवली. सुधीर चाट पडला. गाडीत कोणीच न्हवता. त्याने राजूला जोरात हाक मारली. . . . राज्या. .

पेसेंजर कुठं गेलं. राजूची झोप उडाली त्याने गाडीत बघितलं तर गाडीत फक्त हे दोघेच होते. आत्ता मात्र राजूने जो काही रडण्याचा टाहो फोद्लां तो ऐकेनाच. . . . . आई आई मला वाचव आई. . . ए सुधीर. . . . सुधीर. . . . करत राजू मोठ्याने रडायला लागला होता. तेवढ्यात गाडी महाड चेकपोस्ट जवळ पोहोचली. सुधीरने गाडी एका बाजूला उजेडात थांबवली. दोघेपण गाडीतून ताबडतोब उतरले आणि बाजूच्या एका टपरीवर जाऊन बाकड्यावर बसले. दोघेपण पार घाबरले होते. हातात स्टीलचा जग पकडून सुधीर आणि राजू तोंड धुवायला लागले. टपरीवर असलेल्या माणसाने ह्यांना बघितलं दोघेपण घाबरले होते. त्याने विचारलं काय हो काय झालं घाबरलेले दिसताय, कोणाला उडवून आलेत काय. नाय वो. . . सुधीर बोलला. मग त्याने झाली हकीकत त्या टपरीवाल्याला सांगितली. टपरी वाला बोलला तुम्हाला कोणी थांबायला सांगितलं होतं. हितं होतात असले प्रकार. हे काय नवीन नाय बगा.

राजू आणि सुधीर तिथेच त्या बाकड्यावर रात्रभर झोपले आणि पहाटे ६ वजता गाडी काढून वाशीकडे रवाना झाले.

आत्ता राजू आणि सुधीर महाबळेश्वर घाटातून येणं टाळतात. . ते थेट मुंबई- पुणे द्रुतगती मार्गाने निघून जातात.

ह्या मुंबई गोवा हायवेवर खूप लोकांना असे भुताटकीचे प्रकार अनुभवायला मिळतात. अनेक अपघात झाले, कित्येक लोकं इथे मेले आहेत. रात्रीबेरात्री मोटर सायकल वाले सहसा ह्या मार्गाने जाणं टाळतात.

काळजी घ्या. . . . . . . . . . . .

# "झपाटलेला वाडा "

आंब्याची घनदाट झाडं, त्यात नारळी पोफळी सुपारीचे उंच मनोरे बाजूलाच असणारा अथांग समुद्र किनारा, आणि अश्या निसर्गरम्य वातावरणात एक मोठा वाडा. भरपूर लाकूडकाम आणि दिसायला जसा काय एखाद्या राजाचा छोटासा महालच. एकदम डौलदार आणि प्रशस्त.

रत्नागिरीच्या बेलवडे गावातील घटना, साल साधारण १९९०. खटकूल नावाचा हा वाडा २०० वर्षांपूर्वी देशमुख आडनावाच्या एका इसमाने बांधला होता. पुढे हे देशमुख लोकं पुण्यात जाऊन स्थाईक झाले. वाडा तसा बंदच असायचा. १९७५ साली साधारण ४५ वर्षाचा माणूस आणि त्याची बायको ह्या वाड्यात राहायला आले. हे कोणीतरी त्या देशमुखांपैकीच होते. आल्यानंतर त्यांनी सर्व कागदपत्र काढून गावच्या पाटलांची भेट घेतली आणि आपल्या जमिनी कुठेकुठे आहेत हे समजून घेतलं. नंतर ह्यांनी त्या जमिनी गावातल्याच कोणाकोणाला करायला दिल्या. वर्षाकाठी भाताचा मगता मिळायचा, वाडीतले आंबे पण मिळायचे. मिळालेलं धान्य ते वाड्याच्या तळघरात असलेल्या कोठारात साठवून ठेवायचे. देशमुख माणूस तसा तोंडाने फटकळ आणि खूप घमेंडी होता. शेतावर काम करणारी माणसं म्हणजे जसे काय ह्याचे गुलामच अशी वागणूक तो त्यांना द्यायचा. देशमुखची बायको पार्वतीबाई वारंवार आपल्या पतीला सांगायची लोकांना अशी वागणूक देऊ नका, ती पण माणसच आहेत. पण देशमुखने तिचं कधीच ऐकलं नाही. एक दिवस एका कामगाराने वाडीतले आंबे आणि २-४ फणस चोरले. देशमुखला समजलं, पुढे त्याने त्या कामगाराला जीव जाईपर्यंत मारला, तो मजूर मुळातच शरीराने सडपातळ होता, देशमुखचा जबर मार खाऊन तो उपाशी पोटी असलेला मजूर जागीच मेला. संपूर्ण गावाने हा तमाशा बघितला होता पण कोणीच पुढे आलं नाही. कारण सगळा गाव देशमुखाकडून कर्ज घेऊन बसला होता. काहीपण अडचण आली कि गावातली गोरगरीब लोकं त्याच्यापुढे हात पसरायचे. म्हणून सगळा गाव देशमुखचे अत्याचार आणि निंदानालस्ती सहन करायचा.

साधारण १९९०च्या आसपास देशमुख वृद्धापकाळाने मेला. पार्वतीबाई पण वृद्ध झाल्या होत्या. बहुतांशी लोकांनी त्यांच्या जमिनी हडप केल्या. काही उरले सुरलेले लोकं

अजूनपण इमानदारीत त्यांना दर वर्षी भात आणून द्यायचे. मुल नसल्यामुळे म्हातारी एकटीच रहायची. साफसफाईसाठी गावातलाच एक गडी माणूस ठेवला सखाराम. हळू हळू सखाराम म्हातारीला सांगायला लागला, पार्वतीबाई घरात वाळवी पडायला लागली आहे. लाकडांना पांढऱ्या मुंग्या लागायला लागल्या आहेत आणि तळ घरात धान्याला किडे पडायला लागलेत. म्हातारीने त्याला सल्ला दिला, एक काम कर निलगिरीचा पाला आण आणि त्याचा धूर कर वाड्यात, जिकडे तिकडे तो पाला बांधून ठेव, आणि धान्याच्या कोठारात त्याची पानं टाक. सखाराम बोलला "ठीक आहे. रानात जाईन २-४ दिवसात आणि घेऊन येईन."

नेहमीप्रमाणे साफ सफाई करता करता तो तळघरात गेला कि त्याला तिथे कोणीतरी असल्याचे भास व्हायचे, तो हे सगळं त्याच्या बायकोला सांगायचा पण, ती त्याची थट्टा उडवायची, खरोखर हे भासच असतील. पण जस जसे दिवस निघून जायला लागले, हे भास वाढायला लागले, त्याला नेहमी तळघरात गेल्यावर असे भास व्हायला लागले, कधी कोणाची सावली आपल्या मागून गेल्याचा भास तर कधी भाताच्या कणग्यातून कोणीतरी हाक आपल्याला हाक मारल्याचा भास, एक दिवस त्याने रानात जाऊन म्हातारीने सांगितल्याप्रमाणे निलगिरीचा पाला आणला आणि सगळया वाड्यात धूर केला, जिकडे तिकडे वाड्यात तो पाला बांधून ठेवला आणि खाली तळघरातल्या भाताच्या कणग्यात पण पाला पसरवून टाकला

दुसऱ्या दिवशी तो सकाळी वाड्यात आला. बघतो तर काय पालापाचोळा कुठेच दिसेना, म्हणून मुद्दाम तळघरात धान्याच्या कोठारात गेला. खाली गेल्यावर त्याने बघितलं तर धान्यात पण पाला न्हवता. असं कसं होईल, काल आपण पाला टाकून गेलो होतो, बांधून पण गेलो होतो, आणि असा धान्यात टाकलेला पाला गायब कसा होईल. त्याला काही समजेना. त्याने पुन्हा वर येऊन हे म्हातारीला सांगायला पाठ फिरवली. जिन्याच्या जवळ जाणार इतक्यात त्याला एक सावली दिसली. आपल्या मागून कोणीतरी धावत गेल्याचा भास त्याला झाला. म्हणून तो मागे वळला.

"कोण? कोण आहे तिकडे? कोण आहे रे? मालकीण बाई तुम्ही आहात काय?"

काहीच आवाज नाही.

सखारामला नेहमीप्रमाणे भास झाला होता, पण आज तिथे कोणीतरी काहीतरी खात असल्याचा त्याला आवाज आला, जिभेने कोणीतरी काहीतरी चप चप केल्याचा आवाज येत होता. त्याने कोपऱ्यातली काठी हातात घेतली, कुठलातरी प्राणी आत घुसलाय नक्की. म्हणून तो आणखी पुढे गेला, त्याला भाताच्या कणग्या जवळ कोपऱ्यात एक माणूस बसलेला दिसला, त्याच्या हातात तो निलगिरीचा पाला होता, आणि तो, तो पाला खात होता, उघडा बम माणूस आणि कमरेला फक्त लंगोटी होती. सखारामने त्याला विचारलं कोण रे? कोण आहेस? इथं कधी आलास. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . "लय वारसां झाली मी इथच हाय. ."

एवढं बोलून तो माणूस तिथून अचानक गायब झाला. सखाराम दचकला आणि पळत पळत वर आला. त्याने तळघराच्या दरवाजाला कडी लावून कुलूप ठोकलं. पळत पळत तो म्हातारीपाशी आला आणि सांगायला लागला, तळ घरात असा - असा माणूस दिसला आणि गायब झाला. म्हातारीने ऐकून घेतलं, आणि एवढंच म्हणाली. . . . देशमुखाची पापं माझ्यावर उलटी फिरणार, मलाच हे भोगायला लागणार. . . आणि म्हातारीने सखारामचा हात पकडून तिच्या खोलीकडे नेण्यासाठी इशारा केला. सखारामने म्हातारीला तिच्या खोलीत सोडलं आणि तो आपल्या घरी निघून गेला. त्या दिवसानंतर पुन्हा काय तो तळघरात गेला नाही. घरात वाळवी वाढतच चालली होती, काही केल्या थांबेना. असं करता करता साधारण १०-१२ दिवस उलटून गेले. दुपारची वेळ होती, सखाराम झाडू मारत होता, म्हातारी तिच्या खोलीत जमिनीवरच गोधडी टाकून झोपलेली. सखाराम मधल्या सभागृहाला झाडू मारत होता. त्याला काहीतरी जळल्याचा वास आला. म्हणून तो नाकाने वास घेत इकडे तिकडे बघायला लागला. त्याचं लक्षं म्हातारीकडे गेलं, म्हातारीचे केस पेटले होते. पण म्हातारीला काहीच माहिती न्हवतं ती झोपली होती. सखाराम धावत गेला आणि त्याने म्हातारीच्या डोक्यावर जवळच पडलेली चादर टाकली.

म्हातारी जमिनीला हात टेकत टेकत उठली, "काय रे बाबा काय झालं."

"मालकीण बाई तुमचे केस गेले. केस गेले. . . . हो जळले तुमचे केस." म्हातारीने आपल्या डोक्यावर हात फिरवला तर खरोखर तिचे सगळे केस जळले होते.

“तुमचे केस पेटले होते मी चादरीने विजवले”

आत्ता मात्र म्हतारीपण घाबरली. हे असं कसं झालं. सखारामने इकडे तिकडे बघितलं पण आग लागण्यासारखं दिवा मेणबत्ती वगैरे असं तिथे काहीच न्हवतं. चूल पण चूल घरातच होती. आत्ता मात्र हा सगळा प्रकार त्याला विचित्र वाटायला लागला. तो समजून गेला हा वाडाच झपाटलेला आहे. इथं कोणाचं तरी भूत आहे हे नक्की.

त्याने विचार केला आपण उद्यापासून इथे यायचं नाही, पण मग म्हातारीचं काय? तिला कोण बघणार. नंतर त्याने हा विषय गावकीत मांडला. म्हातारी आहे तो पर्यंत तू तिथं रहा. म्हातारी काय जास्त दिवस जगत नाय. तू पण मोकळा होशील, म्हातारीला आत्ता ह्या वयात एकटीला टाकू नको. सखारामने पण विचार केला ठीक आहे काढू थोडे दिवस.

पण हे प्रकार पुढे वाढायला लागले. संध्याकाळची वेळ होती, अंधार पडायला सुरवात झालीच होती समुद्राच्या लाटांचा आवाज त्यात नारळाच्या झावळयांचा आवाज येत होता. खूप वारा सुटला होता, वाड्यातलं काम आटपून सखाराम मागचा दरवाजा बंद करत होता, सखाराम दरवाजा बंद करणार एवढ्यात त्याच्या समोर त्या दरवाजात एक माणूस उभा राहिला दचकून तो मागे पळाला. हा तोच माणूस होता जो आपल्याला खाली तळघरात दिसला होता. सखारामची बोबडी वळली आणि त्याने तिथून पळ काढला, बोंबलत बोंबलत धावत तो गावात आला. आणि माणसं जमवून त्यांना सगळं सांगायला लागला. लोक जमाव करून वाड्याच्या दिशेने निघाले. सखाराम त्यांच्यात न्हवता. ह्या लोकांमध्ये गावातल्या काही बायका पण निघाल्या. सगळयांनी मिळून म्हातारीला गावात आणलं. वाड्याला कुलूप लावलं गेलं. थोडे दिवस म्हातारीला गावातल्याच एका कुटुंबाने सांभाळलं, नंतर काही महिन्यातच म्हातारी पण मेली.

तो वाडा तसाच ओसाड पडून राहिला. अजून पण हा वाडा तसाच ओसाड पडून आहे, आत्ता त्याची कौलं पण ढासळल्या लागली आहेत. गावातला एकही माणूस रात्रीच काय दिवसा पण ह्या वाड्याजवळ फिरकत नाही.

# " पूर "

पावसाळ्याचे दिवस होते, त्या आठवड्यात पाउस सतत दिवसरात्र कोसळत होता, मुसळधार पाउस, जिकडे तिकडे शेतं पाण्याने भरली होती, रस्ते, पूल, सगळे पाण्याखाली बुडून गेले होते, शाळांना सुट्या जाहीर केल्या गेल्या. सरकारी कार्यालये पण आठवडाभरा पासून बंद होते.

आणि अशातच एक काळरात्र आली सोबत मृत्युचं तांडव घेऊन. तारीख होती २४ जुलै १९८९. गाव जांभूळपाडा. संध्याकाळी जेवणं आटोपून सगळे लोकं लवकर झोपले. हवा थंडगार आणि त्यात पावसाची झोड, अंगणात पूर्ण पाणी भरलेलं. अंबा नदीला पूर आला होता, नदी ओसंडून वाहत होती. सगळा गाव गाढ झोपेत असताना अचानक रात्रीच्या वेळी लोकांच्या घरात पाणी शिरायला लागलं. जमिनीवर अंथरूण टाकून झोपलेली लोकं अंगाला ओल लागायला लागली तसे जागे व्हायला लागले. हळू हळू बघता बघता पाणी झपाट्याने वाढतच गेलं आणि बघता बघता संपूर्ण गाव त्या पुरात वाहून गेला. अनेक मृतदेह नदीच्या पाण्याने इकडे तिकडे वाहून गेले. ह्या पुरात फक्त जांभूळपाडाच नाही इतर गावातली लोकंही वाहून गेली.

हि घटना आहे कोलाड मधली, सकाळची वेळ होती, २-३ बायका नदीवर कपडे धुवायला गेल्या होत्या. पण तिकडे त्यांना खूप घाण वास यायला लागला, त्या तिथून निघून गेल्या आणि जाताजाता वाटेत भेटणाऱ्या ओळखीच्या लोकांना हे सांगत होत्या. पण तिकडे कोणीच जास्त लक्ष दिलं नाही. एखादं मेलेलं ढोर पुरात वाहून आलं असेल. संध्याकाळची वेळ होती सूर्य अस्ताला गेला आणि काळोख पडायला लागला. एक दारुड्या त्याच नदीवर संडास

करायला गेला, त्याला पण तिथे घाण वास आला. कसला वास येतोय म्हणून तो बघायला गेला तर झुडपात एका बाईचा मृतदेह अडकला होता. तो मृतदेह उपडी होता आणि फुगला होता. अंगावर साडी होती केसं लांब होती.ही कोणीतरी बाई आहे. त्याला तिच्या हातात सोन्याच्या बांगड्या दिसल्या. मनात लालच आली, त्याने कसाबसा ओढून ओढून तो अर्धवट सडलेला मृतदेह किनाऱ्यावर खेचून आणला. आत्ता तो त्या बाईच्या अंगावरचे दागिने खेचायला लागला. वास इतका भयंकर होता कि त्याची प्यायलेली उतरली. दागिने ओढून निघत न्हवते. म्हणून आत्ता तो पूर्ण जोर लावून तिच्या हातातल्या बांगड्या खेचायला लागला. अचानक ती बाई जोरजोराने हसायला लागली. आधी हा चपापला. दोन मिनिटं थांबला, इकडे तिकडे बघायला लागला, पण कोणीच न्हवतं.

पुन्हा ह्याने त्या बांगड्या ओढायला सुरवात केली, पुन्हा ती बाई हसायला लागली आणि आणि तो मृतदेह हलायला लागला. आत्ता मात्र हा चरकला, चप्पल टाकून धडपत तिथून पळून गेला. वर रस्त्यावर आला आणि जोरात पळून निघून गेला. बाजूच्या टपरीवर एक हवालदार बसला होता. हवालदाराने त्याला पळताना बघितलं, टपरी वाल्याला विचारलं. . . काय रे हा का पळत गेला? कोण होता कोण हा?

टपरी वाला बोलला साहेब हा बबन, एक नंबरचा बेवडा आणि चोरटा माणूस. कोणीतरी कानफटला असेल म्हणून गेला असेल पळत.

चहा पिऊन झाल्यावर हवालदार उठला, त्याला संशय आला, नक्की काहीतरी गडबड आहे. म्हणून तो नदीच्या दिशेने गेला. आत्ता वेळ झाली होती संध्याकाळचे ७:३०. पूर्ण अंधार पडलेला. हवालदार हातात Torch घेऊन नदीच्या रस्त्याने निघाला. इकडे तिकडे Torch मारत मारत तो किनाऱ्यावर पोहोचला. बघतो तर काय समोर एका बाईचा मृतदेह पडला होता. हवालदार धावत तिच्या जवळ गेला. खूप घाण वास मारत होता. तोंडाला रुमाल बांधून तो तिच्या जवळ पोहोचला. तिच्या अंगावर Torch मारली. बाई उपडी पडली होती. बॉडी सडली होती. त्याला तिच्या अंगावर भरपूर दागिने दिसले. ह्याने इकडे तिकडे बघितलं कोणीच न्हवतं. Torch बंद करून खिशात ठेवली आणि हा त्या बाईच्या गळयातल्या

सोन्याच्या साखळया खेचायला लागला. . कशी बशी एक साखळी खेचून तोडून काढली. आत्ता ह्याने तिच्या हातातल्या बांगड्या ओढायला सुरवात केली. तो मृतदेह आपोआप उताणी झाला आणि जोर जोराने हसायला लागला. समोर पडलेला मृतदेह हसतोय बघून त्याची Pant ओली झाली, तो त्या मृतदेहापासून ४ फुट लांब उडाला आणि जीव घेऊन तिथून बोंबलत पळाला. पळून पळून वर रस्त्यावर आला.

संपूर्ण चिखलाने माखलेला आणि घामाने भिजलेला. हवालदार जीव घेऊन रस्त्याने पळतोय बघून लोकांना आश्चर्य वाटलं. २-३ लोकांनी त्याला आडवलं पकडलं आणि विचारलं, काय झालं साहेब, साहेब काय झालं. त्याने झाला प्रकार लोकांना सांगितला. वेळ संध्याकाळची होती. हवालदार सांगतोय म्हणजे खरी गोष्ट आहे. पण त्या नदीकडे जायचं कोणीच धाडस केलं नाही. नंतर २-४ दिवसांनी खूपच घाण वास परिसरात पसरला. लोकांनी जाऊन पोलीस स्टेशन मध्ये तक्रार टाकली. ग्रामपंचायतीत पण तक्रार केली. तेव्हा कुठे पोलिसांनी घंटा गाडी वाल्यांच्या सोबत जाऊन तो मृतदेह उचलला आणि त्याचा फोटो पेपरात छापला. मृतदेह खूप घाणेरड्या अवस्थेत होता. पुढे पोलिसांनी त्या मृतदेहाचे अंत्यविधी केले.

४-५ दिवसांनी तो बेवडा पणही घटना लोकांना सांगत सुटला कि पोलिसांच्या ताब्यात असलेला बाईचा मृतदेह म्हणजे भुताटकी आहे. . . . . .

त्या घटनेनंतर त्या नदीवर कोणालाच कसलाही त्रास झाला नाही, कधी कोणाला भूत वगैरे काही दिसलं नाही.

# " ब्युटी पार्लर "

आई लवकर ये ना, खूप भूक लागली आहे. . येते येते आज लवकर येते, महाडिक काकुंच आटपलं कि लगेच निघते. रोशनीला तिच्या मुलीचा फोन आला, फोनवरचा संवाद संपवून ती पुन्हा महाडिक काकुंचे Eye Brows करायला लागली.

हि घटना आहे सुपेकर मार्ग नाशिक येथली. "रोशनी ब्युटी पार्लर", शहराच्या एका बाजूला असलेल्या बिझनेस पार्क मधलं हे रोशनी साळवी यांचं ब्युटीपार्लर. रोशनी साळवी हा व्यवसाय गेले ४-५ वर्ष चालवत होत्या. व्यवसायाची सुरवात त्यांनी आपल्या घरातूनच केली, नंतर त्यांनी एक लहानसं दुकान भाड्याने घेतलं. नवरा महिंद्रा मध्ये कामाला होता. ठरवलं कि आपण आपलं स्वतःचं असं एक दुकान घेऊया. दुकानाचा शोध सुरु झाला, रस्त्याच्या बाजूलाच झालेल्या बिझनेस पार्क मध्ये गेले. हे पार्क म्हणजे एकदम अवाढव्य होतं. किमान ३०० दुकानांचे गाळे होते तिथे. बरेचसे गाळे बंद अवस्थेतच होते. आत मध्ये गेल्यावर रोशनी मनातून थोडी घाबरली. कारण ती इमारत एवढी भव्य होती कि दिवसा पण त्यात अंधार दाटला होता. आतमध्ये वातावरण एकदम भयाण होतं. जास्तीत जास्त १०-१२ गाळेच उघडे होते त्यांनी आपापल्या दुकानाच्या बाहेर ट्यूब लाईट लावल्या होत्या. ते गाळे एवढ्या अंतरावर होते कि कोणी हाक मारली तरी ऐकायला जाणार नाही. तिथेच एक गाळा रोशनीला आवडला. बिल्डरच्या सांगण्यावरून त्यांना समजलं कि त्या गाळयात अगोदर पण एका बाईंनी ब्युटी पार्लर टाकलं होतं, नंतर त्या बाई मलेरियाने आजारी पडल्या आणि पुन्हा काही आल्याच नाहीत. त्यांचा मुलगा आला माझं भाडं मला दिलं आणि ते सगळं सामान घेऊन गेला.

अगोदर पण ब्युटी पार्लर होतं ऐकून रोशनी खुश झाली, म्हणजे जुने गिऱ्हाईक पण आपल्याला मिळणार, तिने आपल्या नवऱ्याला सांगितलं आपण हाच गाळा बघूया. झालं मग ठरलं त्यांनी त्या पार्क मध्ये तो छानसा गाळा बघितला. आणि Bank loan करून त्यांनी

तो गाळा घेतला. आणि रोशनीने तिला हवं तसं फर्निचर बनवून आपलं पार्लर सजवलं. बघता बघता २ वर्ष निघून गेली. व्यवसाय पण चांगला चालला होता.

लग्नाचा मोसम होता, रोशनीकडे खूप लेडीज येत होत्या. रोशनी एकटीच होती. भराभरा ती काम आटपत होती. पण तिची तारांबळ उडत होती. त्यातल्याच एका लेडीजने तिला सुचवलं एखादी मुलगी ठेव मदतीला. तुझा व्यवसाय पण चांगला वाढवू शकतेस. रोशनीने त्या लेडीजला सांगितलं बघा तुमच्या ओळखी मध्ये कोणी ब्युटी पार्लरचा कोर्स केलेली असेल मुलगी तर पाठवून द्या.

दुसऱ्या दिवशी विद्या नावाची एक मुलगी तिच्याकडे आली. तिने त्या बाईंची ओळख सांगितली. रोश्नीने तिला आपल्या सोबत ठेवून घेतली. बघता बघता दिवस निघून जात होते. लग्नाचा मोसम पण संपला. आत्ता गर्दी थोडी कमी असायची. एकदिवस विद्याने आपल्याला घरी लवकर जायचं आहे म्हणून सांगितलं. त्यादिवशी गर्दी पण न्हवती, रोशनी म्हणाली ठीक आहे जा तू, मी पण बघते जमलं तर आज मी पण लवकर जाईन. दुपारपासून पोरीने पण १७ फोन केलेत, आई लवकर ये आई लवकर ये. एक एक लेडीज चं काम उरकता उरकता संध्याकाळचे ७ वाजले. रोशनीने आपलं पार्लर बंद करायला घेतलं. त्या इमारतीत संध्याकाळी ६ वाजताच भयाण वातावरण निर्माण व्हायचं. खूप दुकानांच्या शटरमध्ये बसलेली वटवाघळं त्या अंधारात बाहेर निघायची. एवढ्या मोठ्या त्या इमारतीत घुमणारा त्यांचा तो आवाज ह्या भयाण वातावरणात आणखी भर घालून जात होता. रोशनीने पार्लरची साफसफाई केली आणि ती दरवाजापाशी आली. पार्लरला काचेचा दरवाजा होता आणि त्यावर एक पडदा. रोशनीने पडदा बाजूला केला. तिच्या समोरचं दृश्य बघून ती दचकली.

एक बाई आपले केस मोकळे सोडून तिच्या दरवाजाच्या समोर उभी होती. एकटक तिच्याकडे बघत होती. हातात पर्स पायात चप्पल अंगावर दागिने आणि घातलेली साडी पण चांगलीच होती. बाई तर चांगल्या घरातल्या दिसत आहेत. ती थोडं पुढे आली, दरवाजा उघडला आणि विचारलं हेयर सेटिंग करायची आहे का? ती बाई फक्त हो म्हणाली आणि थेट तिच्या पार्लर मध्ये शिरली. तिचं वागणं बघून रोशनीला थोडं विचित्रच वाटलं.ही बाई असे केस का मोकळे सोडून आली आहे. कोण आहे कोण हि, हिला ह्या अगोदर आपण कधीच बघितलं नाही. बाई या, ह्या खुर्चीत बसा. काय करू सांगा, हा बघा हा आल्बम. कोणती स्टाईल बनवायची सांगा.

बाई काहीच बोलेना. ओ ताई काय झालं बोला. त्या बाईने तिच्या अल्बम वरच्या एका फोटोवर बोट ठेवलं. ठीक आहे स्टेप कट. रोशनीने घड्याळात बघितलं ७:१५ झाले होते.

तेवढ्यात तिच्या पार्लर मध्ये एक जुनी ओळखीची बाई आली. रोशनी अगं थोडं फेशियल करायचं होतं.

“नाही हो उद्या आलात तर बरं होईल, हे बघा ह्यांचं स्टेप कट करायला अजून १ तास तरी जाईल”. बाईने दुकानात बघितलं कोणीच न्हवतं.

पुन्हा ती बाई बोलली “कोणाचं?”

रोशनीने खुर्चीकडे बोट दाखवलं. . . .

ती बाई पुन्हा म्हणाली “काय रोशनी! नाही करायचं तर सांग ना तसं मस्करी कशाला करतेस. . . . . बरं उद्या येते ग.” आणि ती बाई हसत हसत तिथून निघून गेली.

रोशनीने त्या बाईचे केस कापायला सुरवात केली. हळू हळू बघता बघता ८:०० वाजले. रोशनी तिचे केस कापतच होती. पण तरीपण तिच्या केसांना तो कट येत न्हवता. रोशनी विचारात पडली असं कसं होतंय. आपण हिचे केस तर कापतोय मग केसं कमी का होत नाही. रोशनीने पुन्हा केस कापायला सुरवात केली. . . बघता बघता ८:३० झाले. आत्ता रोशनी हैराण झाली. ती त्या बाईला बोलली ओ ताई मी कधीपासून केसं कापते पण तुमच्या केसांना कट येतच नाहीय. ती बाई थोडसं तोंडात हसली, काय होतंय? का कट बसत नाहीय? तू ब्युटी पार्लर वाली ना मग मार कट.

रोशनी आश्चर्यचकित झाली, असं कसं काय होईल. हळूच ती थोडं बाजूला झाली. आपल्या पर्स मधून तिने फोन काढला, ती बाई ऐकेल म्हणून ती आतल्या खोलीत गेली. आणि तिने आपल्या एका मैत्रिणीला फोन केला. “सुजाता जरा पार्लर मध्ये येशील का गं?”

“ का गं काय झालं? काही problem झालाय का?”

“ नाही गं, तसं problem वगैरे नाही. पण आलीस तर बरं होईल. सुजाताने तिला विचारलं

“येते, पण काय झालं सांग.”

रोशनीने खूप हळू आवाजात तिला सांगितलं असं असं होतंय.

सुजाता फोनवरून हसायला लागली. म्हणाली “मग तर यावंच लागेल. मला पण आज जादू बघायला मिळेल.”

“ये ये गं बाई ये लवकर” आणि रोशनीने फोन ठेवला. ती दरवाजा उघडून बाहेर आली. पुन्हा हातात कैची घेऊन ती आपलं काम सुरु करणार एवढ्यात लाईट गेली.

रोशनी म्हणाली. . "ओ शीट. . . ह्या लाईटला पण आत्ताच जायचं होतं " आणि ती सर्च लाईट आणायला पुन्हा आत मधल्या खोलीत गेली. दुकान नवीनच होतं म्हणून तिने इनव्हरटर पण लावला न्हवता. रोशनी मोबाईलच्या उजेडावर आत गेली पण तिथे तो लाईट सापडला नाही म्हणून ती बाहेर आली. इकडे तिकडे लाईट शोधत होती. लाईट सापडली लाईट चालू करणार इतक्यात तिचं लक्ष त्या बाईकडे गेलं. बाई शांतपणे खुर्चीतच बसलेली. आरशात कसला तरी उजेड दिसला म्हणून रोशनीने निरखून बघितलं.

त्या बाईचे दोन्ही डोळे वटारलेले आणि हिरव्या उजेडाने चमकत होते. हे बघून रोशनी जोर जोरात किंचाळत सुटली. अंग भीतीने थर थर कापत होतं आणि जीवाच्या आकांताने ती किंचाळतच होती. पार्लरचा काचेचा दरवाजा बंद होता तिचा आवाज काही बाहेर पडलाच नाही.

बाई खुर्चीतून उठली आणि त्या भयानक नजरेने रोशनीकडे पुन्हा एकटक बघत बसली तेवढ्यात रोश्नीने हातातल्या लाईट चं बटन दाबलं. त्या बाईचे केस इतके लांबलचक झाले होते कि ते केस खुर्चीपासून दरवाजापर्यंत पोहोचले, जे काही दिसलं ते बघून रोशनी किंचाळत किंचाळत दरवाजा जवळ आली दरवाजा उघडून बाहेर पळणार इतक्यात त्या भुताटकीने रोशनीचे केस पकडले आणि तिला जोरात भिंतीवर आपटलं. जे काही घडत होतं त्या मानसिक धक्क्याने ती जागीच बेशुद्ध पडली.

थोड्यावेळाने लाईट आली. सुजाता पण आत्ता रोशनीच्या पार्लर मध्ये पोहोचली होती. काचेतूनच बघितलं तर रोशनी जमिनीवर पडली होती. दुकानात कोणीच न्हवतं. तिने

रोशनीला उठवण्याचा प्रयत्न केला पण रोशनी बेशुद्ध अवस्थेत होती. सुजाताने धावपळ करून आजूबाजूच्या लोकांना जमवलं. लोकांनी तिला नजीकच्या इस्पितळात नेऊन सोडलं. सुजाताने तिच्या नवऱ्याला इस्पितळात बोलावलं. नक्की काय झालं हे कोणालाच माहिती न्हावतं. पण रोशनीने आपल्याला फोन करून जे काही सांगितलं होतं ते तिने तिच्या नवऱ्याला जसंच्या तसं सांगितलं.

डॉक्टरांनी सांगितलं, रोशनीला कसला तरी मानसिक धक्का बसला आहे. तिचं ब्लड प्रेशर काल संध्याकाळी खूप Low झालं होतं म्हणून ती बेशुद्ध आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी रोशनीचे डोळे उघडले. आजूबाजूला नर्स दिसत होत्या. समोर नवरा दिसला आणि तिच्या जीवात जीव आला. तिने त्याला घट्ट मिठी मारली आणि ढसढसा रडायला लागली.

२-३ तास निघून गेले. हॉस्पिटल मधून डिस्चार्ज पण मिळाला आणि रोशनीला घरी आणलं. २-३ तास गेल्यानंतर नवऱ्याने तिला काय झालं म्हणून विचारलं. आणि रोशनीने जे काही सांगितलं ते ऐकून तो थक्क झाला.

त्या दोघांनी तो पार्लर बंद केला. ह्या दुकानात असा असा प्रकार घडला म्हणून तो गाळा कोणीच भाड्याने घेईना. तो दुकानाचा गाळा तसाच बंद अवस्थेत आहे. ह्याला आत्ता ३ वर्ष उलटून गेली.

अगोदर येऊन गेलेली बाई तिचा किस्सा सगळयांना सांगत सुटली होती, मी पण गेले होते तिच्याकडे ७ वाजता, मला खुर्चीकडे हात करून बोलत होती. . . त्या बाईंचं हेयर कट करायचं आहे, पण त्या खुर्चीत कोणीच न्हवतं, काही बायका नंतर सांगायला लागल्या, त्या दुकानात अगोदर ज्या बाईचं पार्लर होतं ती बाई डेंग्यूने मृत झाली होती. तिचाच आत्मा त्या पार्लर मध्ये असू शकेल. कारण त्या बाईने पण तिथे नवीनच पार्लर टाकलं होतं.

आत्ता रोशनी ब्युटी पार्लर सखाराम भोसले मार्गावर चालू झालं आहे.

वेळ :- सकाळी ०९:०० ते सायं ०६:००

# " पार्कच्या बाकड्यावर "

“ओ ऐकलत का, अनघा तिच्या खोलीत नाही”

“काय झालं सकाळी सकाळी आरडा ओरड करायला?”

“आहो अनघा घरात कुठेच नाहीय. आणि हे बघा काय लिहून ठेवलय ह्या चिट्ठीत. . .”

" आई बाबा मला माफ करा, पण माझं समीर वर मनापासून प्रेम आहे. तुम्ही सतत मला विरोध करत राहिलात म्हणून मला आज हा निर्णय घ्यावा लागतोय. मी समीर बरोबर लग्न करत आहे "

कोण हा समीर, ह्या मुलीच्या डोक्यात काय खूळ भरलं आहे देव जाणे. तरी मी सांगत होतो तिला एखाद्या चांगल्या Psychiatricला दाखवून येऊ. पण नेहमी तुझं तेच तुनतूनं, माझी मुलगी वेडी आहे काय माझी मुलगी वेडी आहे काय. आहो जे झालं ते झालं चला पटकन पोलिसात तक्रार नोंदवूया. कुलकर्णी चिंतेत पडले आणि त्यांची पत्नी ढसाढसा रडायला लागली. कुठे असेल माझी मुलगी, कशी असेल कुठे गेली असेल. . . . . .

अनघा कुलकर्णी, BSC उत्तीर्ण झाली आणि एका नावाजलेल्या कंपनीत कामाला लागली. घरी फक्त वडील आई आणि मोठा भाऊ. भाऊ पण एका चांगल्या कंपनीत कामाला होता. दोघांचीही लग्न झाली न्हवती. वडील दोघांसाठी स्थळं शोधतच होते. अनघा दिसायला सुंदर होती. कोणीही तिच्या प्रेमात पडेल अशी. त्या कंपनीत आत्ता तिला २ वर्ष झाली आणि पगार वाढही मिळाली. अनघाने आपल्या लग्नाचे सर्व दागिने स्वतःच बनवून ठेवलेले. मोठा भाऊ अनिल तो पण चांगल्या पदावर होता. अनिल आणि अनघा हे दोघे एकाच MIDC मध्ये

कामाला होते. दोघांच्या कंपन्या वेगवेगळया होत्या पण कामाची वेळ एकसारखीच. अनिल सकाळी जाताना अनघाला आपल्या सोबतच घेऊन जायचा आणि संध्याकाळी सोबत घेऊन पण यायचा.

एक दिवस अनघाने त्याला फोन करून सांगितलं, अरे दादा तू हो पुढे, मला आज थोडा उशीर होईल. मी येईन बस पकडून. म्हणून अनिल पुढे निघून गेला. त्यादिवशी अनघा संध्याकाळी ८ वाजता आली. जेवण वगैरे केलं आणि हातात मोबाईल घेऊन कुणाबरोबर तरी Chatting करत बसली.

असं करता करता दिवस निघून जात होते. अनघा आत्ता वारंवार अनिलला पुढे जायला सांगायची आणि स्वतः उशिराने घरी परतायची. का उशीर झाला विचारलं तर अनघा उलट सुलट उत्तरं देऊन आपल्या खोलीत निघून जायची. आत्ता मात्र तिच्या आईला अनघाचा थोडा संशय यायला सुरवात झाली.

एक दिवस अनिलने ठरवलं आपण लक्ष ठेवूया नक्की काय प्रकार आहे. त्या संध्याकाळी अनिल, अनघाच्या कंपनीच्या गेट जवळच असणाऱ्या एका चहाच्या टपरीवर थांबला. अनघा संध्याकाळी तिच्या नेहमीच्या वेळेतच बाहेर पडली. चालत चालत पुढे सिगनल जवळ आली, आणि फुटपाथच्या नजीक असलेल्या पार्क मध्ये गेली. अनिल पण लपत लपत त्या पार्कच्या एका कोपऱ्यावर उभा राहिला. अनघा बाकड्यावर बसली, कुणालातरी shake hand करावा असा हात पुढे केला आणि आपली पर्स मांडीवर घेऊन बसली. कोणाबरोबर तरी गप्पा मारत होती, पण तिच्या बाजूला कोणीच न्हवतं. अनिलला हा प्रकार विचित्र वाटला. नंतर ती तिथून उठली आणि तिने घरी येण्यासाठी बस पकडली. बसच्या खिडकीतून तिने टाटा बाय बाय पण केलं. अनिलने आपली बाईक काढली आणि तो थेट घरी आला. पाठोपाठ अनघा पण घरी आली. अनिलने हा प्रकार ३-ते ४ वेळा पहिला.ही नक्की कोणाबरोबर बोलते. काहीच समजायला मार्ग न्हवता. त्याने हा प्रकार आपल्या वडिलांना सांगितला आणि एकदिवस त्यांना प्रत्यक्ष दाखवलाही.

वडिलांनी विचार केला मुलीच्या लग्नाला उशीर होतोय म्हणून तिचं मानसिक संतुलन बिघडत असावं. त्यांनी तिच्यासाठी स्थळ शोधायला सुरवात केली. नात्यातलाच एक

मुलगा तिला बघायला येणार होता. आदल्या दिवशी अनघाने साफ नकार दिला. म्हणाली माझं समीर वर प्रेम आहे आणि मी लग्न करेन तर त्याच्याशीच. कोण हा समीर?

समीर जाधव, माझ्या ओळखीचा आहे आमचं प्रेम आहे. कुठे राहतो काय करतो?

एम. जी. रोड जवळ पार्कच्या मागेच त्याचं घर आहे. अष्टविनायक बिल्डर्सचा मुलगा.

वडील वैतागले ते तिच्यावर ओरडले हि. म्हणाले आम्ही सांगू तिथेच लग्न करावं लागेल. हे कसले जाधव बिधव बिल्डर, गुंड आहेत सगळे गुंड. कोण कधी कोणाची गोळी खाऊन मरेल शाश्वती नाही. ते काही नाही आम्ही सांगतो तिथेच लग्न करावं लागेल.

आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी अनघा घर सोडून पळून गेली जाताना खाटेवर एक चिठ्ठी टाकून गेली.

आई वडिलांनी पोलिसात तक्रार केली. अष्टविनायक बिल्डर्सच्या मुलाने आमच्या मुलीला पळवून नेलं आहे. पोलिसांनी ताबडतोब फोन करून बिल्डरला बोलावून घेतलं.

हे काय म्हणतात ते खरं आहे का? कसलं काय हो साहेब तुम्ही कोणाचं ऐकताय ह्यांचं, डोकी फिरलेत ह्यांची.

कुलकर्णी जोराने ओरडले डोकं तुमचं फिरलं आहे, तुमच्या मुलाने समीर जाधवने आमच्या मुलीला भडकवून पळवून नेलं आहे.

जाधव बिल्डर पुन्हा बोलले जा जाऊन स्वतःचा इलाज करून घ्या. पोलीस इन्स्पेक्टर कडक आवाजात बोलले, जाधव काय प्रकार आहे हा?

ताबडतोब तुमच्या मुलाला फोन लावून विचारा कुठे आहे तो. जाधव बिल्डर रागाने बोलले कुठे फोन लावू स्वर्गात, आणि त्यांच्या डोळयात पाणी आलं, खिशातून रुमाल काढून ते खूप रडले खूप रडले. साहेब माझा मुलगा २ वर्षांपूर्वीच सिग्नल जवळच्या पार्क मध्ये मेला. खंडणीसाठी समीरची कोणीतरी हत्या केली. हे ऐकताच कुलकर्णी कुटुंबीय दचकले. अनिलने आपल्या वडिलांकडे बघितलं आणि ते दोघेही तिथून निघून गेले.

समीर जाधव मेला आहे हे खरं आहे कारण पोलिसात तशी नोंद पण आहे कि त्याची हत्या झाली होती. मग अनघा गेली कुठे? आणि ती त्याचं नाव का घेत होती? पार्क मध्ये एकटीच कोणा बरोबर बोलायची? अनेक प्रश्न उभे झाले.

पुन्हा दोघे पोलीस स्टेशन मध्ये गेले. आणि इन्स्पेक्टर साहेबांना सगळा प्रकार सांगू लागले. इन्स्पेक्टरने खिल्ली उडवली, मग जा तुमची मुलगी तिथेच सापडेल पार्क मध्ये त्या समीर जाधव सोबत. आणि आजूबाजूचे सगळे हवालदार हसायला लागले. आत्ता संध्याकाळचे १० वाजले होते. अंधार पडला होता. अनिलने गाडीला किक मारली मागे वडील बसले आणि दोघेही त्या पार्क जवळ आले. अनिलने बाहेरूनच त्या नेहमीच्या बाकड्यावर नजर मारली. कोणीतरी मुलगी तिथे बसली होती. दोघे धावत तिच्या जवळ गेले. ती अनघाच होती, त्यांनी तिचा हात पकडला अनु. . . . बेटा इथे काय करतेस?

ती सारखं एकच बोलत होती, समीर नाही आला आज, त्याने फसवलं मला. चल बेटा घरी चल आम्ही त्याच्या वडिलांना भेटून आलोय. हे ऐकताच तिचे डोळे चमकले. खरच बाबा तुम्ही त्यांना भेटून आलात. होय. चल आधी घरी चाल निवांत बोलू. आणि त्यांनी तिची Bag उचलली, रिक्षा पकडली आणि घरी आले.

घरी आल्यावर त्यांनी तिला सगळा झाला प्रकार सांगितला. आपले वडील आणि भाऊ खोटं बोलत आहेत. तिचा विश्वास बसेना, म्हणून ती स्वतः अष्टविनायक बिल्डर्सच्या ऑफिसात गेली. तिथे तिला सर्व सत्य समजलं.

त्या पार्क मध्ये समीर जाधव भूत बनून वावरत आहे हे लक्षात येताच अनघा मनातून गडबडली. आपल्याला जो दिसत होता आपल्याशी जो बोलत होता तो माणूस नसून ते भूत होतं.

त्या दिवसापासून तिने कामावर जाण्याचा आपला मार्ग कायमचा बदलला.

# " टपरीवाला "

माणगाव हून पुण्याकडे जाताना लागतो तो ताम्हाणी घाट. पावसाळयात ह्या घाटात निसर्ग आपल्या सौंदर्याचं अप्रतिम प्रदर्शन घडवतो. सर्वत्र हिरवंगार पसरलेला गवताचा गालिचा, डोंगर माथ्याला टेकलेल ढग आणि वळणाच्या रस्त्याने उतरणाऱ्या गाड्या. ह्या घाटात पावसाळयात अनेक लोकं पर्यटक म्हणून येतात. सर्वत्र धबधबे आणि त्यात मजा लुटणारे पर्यटक. असं म्हणतात इथे घाटात रस्ता होण्यापूर्वी जंगलाची पायवाट होती. माझे आजोबा सांगायचे त्या डोंगराच्या पलीकडे पुणे आहे. तिथले आदिवासी लोकं पायीच पुण्याला जायचे. पण हे जंगल खूप घनदाट असल्यामुळे गावातले लोकं ह्या रस्त्याने जायला घाबरायचे. अनेक आदिवासींना वाघाने किंवा काही जंगली प्राण्यांनी खाल्ल्याच्या गोष्टी इथे खूप प्रचलित होत्या. पण आत्ता सरकारने मोठा रस्ता बनवला आहे, सतत गाड्यांची रेलचेल असते.

सखाराम हा बिबवेवाडी गावात राहणारा एक गरीब माणूस. बिबवेवाडी म्हणजे ह्याच घाटातल्या डोंगरावर असलेलं एक गाव. गाव तसं रस्त्यापासून किमान ५ किलोमीटर आतमध्ये जंगलात होतं. रस्त्यापासून गावात जाणाऱ्या फाट्यावर सखारामने एक छोटीशी चहाची टपरी टाकली. बायको आणि हा दिवसभर टपरीवर असायचे, संध्याकाळ झाली कि बायको गावात घरी निघून जायची. पावसाळयाच्या मोसमात खूप पर्यटक असायचे म्हणून सखाराम संध्याकाळी अगदी ९ वाजेपर्यंत टपरी चालू ठेवायचा.

त्या दिवशी पाउस रीमझीम होता. श्रावण महिना उनपावसाचा खेळ दिवसभर चालू होता. संध्याकाळ होता होता संपूर्ण घाटात धुकं पसरलं. इतकं दाट कि रस्त्याने जाणाऱ्या गाड्या पण कमी झाल्या. घाटात दूर दूर नजर टाकली कि जाणवायचं अनेक गाड्या रस्त्याच्या बाजूलाच उभ्या आहेत. कारण त्यांचे लाईट हलेनासे होते. धुकच एवढ दाट होतं. सखारामची बायको एव्हाना आपल्या घरी निघून गेली होती. संध्याकाळ झाली अंधार पडायला लागला, सखारामने वर वाश्याला अडकवलेला पेट्रोमास काढला. खाली जमिनीवर बसला आणि पंप

मारून तो पेटवला. वर स्टोव्ह वर चहा उकळत होता. नजर टाकावी म्हणून तो उठला. उठल्यावर समोर एक माणूस अंगावर घोंगडी घेऊन उभा होता. तो दिसायला एवढा विचित्र होता कि सुरवातीला सखाराम मनातून घाबरला. पाउस अजिबात न्हवता पण थंड गार वारा सुटला होता. त्या माणसाच्या घोंगडीला घाण वास येत होता. माणूस तसा तीस पस्तीशीतला असावा. पण दिसायला एकदम विद्रूप.

काय कुठं निघालास? सखारामने आपल्या बोलक्या स्वभावाने विचारलं.

चहा दे रं. . . . . . . . . तो माणूस बोलला.

त्याच्याकडे बघून वाटत न्हवतं कि तो पैसे वगैरे देईल.

४ रुपये होतील. . . सखाराम हळूच बोलला.

देतो रं. . . .

सखारामने चहा मध्ये चमचा घोटवला आणि बाजूलाच असलेल्या प्लास्टिकच्या कप मध्ये किटलीतून चहा भरला. हात पुढे केला हा घे. . . .

त्या माणसाने घोंगडीतून हात बाहेर काढला. . . . . त्याचा हात बघून सखाराम घाबरला, त्याने पटकन हातात चहा असलेला आपला हात मागे घेतला आणि थोडा मागे सरकला. . . . . . . हे हे काय. . . . त्याचा हात म्हणजे फक्त हाडांचा सापळा होता आणि त्या मधून रक्त गळत होतं.

आरं आस्वलानं खाल्ला. . . . . .

सखारामची बोबडी वळली. चहा दे रं. . . सखारामने ग्लास पुढे टेबलावर ठेवला आणि तो पुन्हा मागे सरकला. त्या माणसाने तो ग्लास उचलला आणि सखाराम कडे पाठ करून उभा राहिला. ह्याला समजेना नक्की हा काय प्रकार आहे. गावात आपण खूप ऐकलं होतं ह्या घाटात भुताटकीचे प्रकार आहेत. आत्ता मात्र सखारामला घाम सुटायला लागला.

धारिष्ट करून त्याने विचारलं. . कुठं कधी खाल्ला?



लय वारसां झाली. अरे पण रक्त अजून गळतंय. तो माणूस पुन्हा वळला आणि सखाराम कडे बघून हसायला लागला. . . . . डोळे मोठे केले त्याने आणि अंगावरच्या घोंगडीत आत शिरला. आत्ता सखाराम समोर फक्त घोंगडी दिसत होती. त्यातला माणूस गायब झाला त्या घोंगडीत. सखाराम तसाच तिथून पळाला, रस्त्याने धावता धावता त्याची एक चप्पल पायातून निघायला आली, मागे वळून बघतो तर तो हाडांचा तो सापळा ह्याच्या मागे उभा होता. . जोर जोराने आजूबाजूच्या झाडांमधून विचित्र आवाज काढायला, जीव घेऊन सखाराम पळला, धावत धावत धापा टाकत रस्त्याने बोंबलत "वाचवा वाचवा भूत भूत भूत वाचवा " करत सखाराम कसाबसा घरी आला.

आल्या आल्या तो घरात शिरला आणि त्याने दरवाजा खाड करून बंद केला, वरची कडी लावली आणि घाबरून भिंतीला पाठ टेकून खाली बसला. डोक्याला हात लाऊन काहीतरी तोंडातल्या तोंडात बडबड करत होता, बायको चुलीपाशी भाकऱ्या टाकत होती. ती पण झटकन उठली नवऱ्या जवळ आली. .

विचारलं काय व काय झालं?

सखाराम फक्त भूत भूत टपरीवर भूत भूत व्हतं टपरीवर. . . . . . काय झालं सांगा व काय झालं

सखारामने बायकोला झालेली हकीकत सांगितली. . पन ग्यास बत्ती तिथच टाकून आलात काय, आनं स्टोव्ह पन तसाच टाकून आलात. . . . आवं काय म्हनावं तुम्हाला. . .

जावू दे बायको म्हणाली आपण सकाली जाऊन बघू. . . . .

दुसऱ्या दिवशी दोघेपण टपरीवर जायला निघाले. . . बायको रस्त्याने जाताना भेटेल त्या बाईला सांगत होती. . भूत दिसलं काल टपरीवर, ग्यास बत्ती बी टाकून आलं तिकडं.

दोघेपण टपरीवर पोहोचले, समोर बघतात तर टपरीचा अर्धा भाग कोसळला होता, स्टोव्ह आणि टोपं खाली पडलेली, पेट्रोमासच्या काचेचा चुराडा झालेला बाकडा रस्त्याच्या बाजूला गेला होता. . . . . . . . त्या टपरीची संपूर्णपणे नासधूस झाली होती. पण त्या टपरीच्या जागे पासून पुढे रस्त्यापर्यंत जमिनीवर कोणाचं तरी रक्त सांडलेलं दिसत होतं.

गावातल्या खूप लोकांना फाट्यापासून गावाच्या वेशी पर्यंत असे रक्ताचे साडे अधून मधून दिसले होते, लोकं बोलायचे पण त्यांना वाटायचं एखाद्या प्राण्याने कोणाचीतरी शिकार केली असावी.

आत्ता दोघांनी पुन्हा नवीन टपरी टाकली आहे, पण गावाच्या फाट्यावर नाही. . जवळच झालेल्या एका Restaurantच्या बाजूला. आत्ता सखाराम आणि त्याची बायको अंधार पडायच्या आधीच घरी निघून जातात.

# " पोलीस चौकी "

ए त्या तिकडे कोपऱ्यात घुसवून ठेव, बाकी गाड्या पण लावायच्या आहेत. दांडेकर हवालदार गेरेज वाल्याला सांगत होते. ठीक आहे साहेब आणि टोचन वाल्याने ती इनोवा गाडी त्या मैदानात जाऊन एका कोपऱ्यात उतरवली. गाडीचा पार चक्काचूर झाला होता, आत मधल्या बसायच्या सीट रक्ताने माकून गेल्या होत्या. गाडीचा निम्माच भाग शिल्लक होता. टोचन वाला संतोष, दांडेकर साहेबांना बोलला, साहेब लय खतरनाक अपघात झालाय हो. किती माणसं होती. १-२ तर गेलेच असतील.

दांडेकर हसत हसत बोलले, १-२ अरे ४ लोकं खलास झालेत ऑन दि स्पॉट. हे ऐकून संतोषने आपला चेहरा थोडा गंभीर केला. हवालदाराकडून आपलं भाडं घेतलं आणि आपली टोचनची गाडी घेऊन तो निघून गेला.

पाच्छापूर, मुंबई गोवा हायवेवर एक छोटसं शहर, शहर म्हणजे तालुक्याचं ठिकाण. बाहेर हायवेवर एक ट्राफीक पोलिसांची चौकी होती, आणि त्याच्यामागे एक मोठं मैदान, हायवेवर अपघात झालेल्या गाड्या इथे आणून टाकल्या जायच्या, गाडीवाल्यांचे नातेवाईक येऊन ह्या गाड्या इथून घेऊन जायचे. कोणी नाहीच आलं तर ह्या गाड्या इथे अश्याच पडून पडून सडून जायच्या. काही ग्यारेजवाले येऊन गाडीचे काही उपयोगी पडणारे सुटे भाग पण घेऊन जायचे. अर्थातच चहा पाणी देऊन.

एकदिवस हायवेवर एक भीषण अपघात झाला, एका इनोवा गाडीला वाळूच्या ट्रकने धडक दिली आणि इनोवा गाडीतलं कुटुंब जागीच ठार झालं. गाडी मध्ये २ स्त्रिया एक लहान मुलगी आणि २ पुरुष होते. गाडीची अवस्था छिन्न विच्छिन्न झाली होती. अपघातग्रस्तांना इस्पितळात हलवण्यात आलं पण ते जागीच ठार झाले होते. गाडी टोचनला

लावून हवालदाराने पोलीस चौकीच्या मागच्या मैदानात आणून टाकली. संध्याकाळी चार्ज घेणारे सावंत हवालदार आले. दांडेकरांनी त्यांना सांगितलं तिकडे मागे एक पांढरी इनोवा आणून टाकली आहे, खारपाड्या जवळ अपघात झाला, सगळे गेलेत, बॉडी नातेवाईकांना सोपवण्यात येतील, साहेबांना सविस्तर माहिती दिली आहे तशी मी. ठीक आहे मग निघतो मी. . . . मजा करा. . . . हाहा हा हा हा हो.

आज काय आमची रात्रपाळी. मजा तुमची आहे दांडेकर साहेब. . . . . सावंत बोलले. आणि संध्याकाळी ड्युटी संपवून दांडेकर आपल्या घरी निघून गेले. सावंत हवालदाराने आपली मोटर सायकल काढली आणि घटनास्थळी एक चक्कर मारली. रस्त्यावर काचांचा खच पडला होता, रस्त्यावर रक्ताचे डाग पण होते, बाजूच्या झाडावर आधळलेला ट्रक तसाच बाजूच्या शेतात पडला होता. सावंत साधारण ८ वाजता पुन्हा चौकीवर आले. घरून आणलेला डबा खाल्ला, पाणी प्यायले आणि थंड हवा घ्यायला चौकीच्या बाहेर आले. रस्ता सामसुम होता, गाड्यांची वर्दळ कमी झाली होती. सावंत खुर्ची टाकून बाहेर बसले. चौकीत ते आज एकटेच होते.

साधारण ११च्या सुमारास ते लघवी करायला मागे मैदानात गेले. लघवी करत असताना त्यांना मैदानाच्या कोपऱ्यात गाडीचा प्रकाश दिसला. म्हणून ते पुढे गेले. त्या मैदानात अपघातग्रस्त झालेल्या भरपूर गाड्या पडलेल्या, चारचाकी दुचाकी ट्रक टेम्पो सगळयाच प्रकारच्या. तिथलं वातावरण एकदम भयानक होतं, कारण ह्या सगळया गाड्या अपघातग्रस्त, त्यात चौकी एका बाजूला निर्जन स्थळी. सावंत पुढे गेले. कोपऱ्यात पडलेल्या इनोवाचे मागचे ब्रेक लाईट चालू होते.ही आजच आणलेली गाडी असावी. अपघातग्रस्त गाडी लाईट राहिले असतील चालू. ते गाडीच्या पुढचा भागात कडे गेले. . . . अरे रे रे चक्काचूर झालाय, काय बेवडा पिऊन गाड्या चालवतात काय समजत नाय. असं पुटपुटत त्यांनी गाडीच्या मोडलेल्या दरवाजातून आत डोकावलं.

आत मध्ये एक माणूस बसला होता, सावंत घाबरले. . . . ए. . ए. . ए कोण तू. तो माणूस डोळे ताठ करून त्यांच्याकडे बघत होता. सावंत त्याच्याकडे निरखून बघायला लागले,

हातातली टोर्च त्याच्या तोंडावर मारली, निम्मा चेहरा दिसत होता. . त्या माणसाने सावंतचा हात पकडला, सावंत मोठ्यामोठ्याने ओरडायला लागले. . . ए. . . . ए. . . . ए. . . भूत भूत. . . ए. . . . . . ए. . . . . पण सावंतचा आवाज ऐकायला तिथं कोणीच न्हवतं. सावंत जोर काढून हात सोडवण्याचा प्रयत्न करत होते पण हात सुटेना. आत्ता संपूर्ण गाडी हलायला लागली. सावंत एवढे घाबरले होते कि त्या माणसाकडे बघण्याचं त्यांचं धारिष्ट होईना, त्यांनी मागे चौकी कडे बघितलं आणि ओरडत सुटले वाचवा वाचवा मला वाचवा. . . .

तेवढ्यात त्यांच्या मागे एक बाई येऊन खाली जमिनीवर बसली. फक्त शरीर होतं, त्यावर मुंडक न्हवतं. ति सावंतच्या एकदम जवळ येऊन पायाजवळ बसली, तिने सावंतचे दोन्ही पाय पकडले आणि ते शरीर मोठ्यामोठ्याने रडायला लागलं. गाडीच्या टपावर येऊन एक बाई आडवी झोपली, तिचा चेहरा सावंतच्या एकदम तोंडाजवळ होता, तोंडातलं रक्त सावंतच्या अंगावर पडत होतं आणि ती बाई मोठ्यामोठ्याने हसायला लागली, सावंतच्या केसात आपली बोटं फिरवायला लागली एकीकडे तो माणूस दुसरीकडे ते भयावह हसणं आणि ते केविलवाण रडण, आत्ता सावंतची बोबडीच वळली तोंडातून आवाज बाहेर येईना, सावंत रडायला लागला त्याच्या अंगाला घाम सुटला, शरीराचा थरकाप उडाला आणि सावंत जागच्या जागीच बेशुद्ध पडला. हा प्रकार घडला साधारण संध्याकाळी ११च्या सुमारास, पण हे सगळं झालं ते फक्त १०-१५ मिनिटांसाठीच.

काही तासांनी सावंतचे डोळे उघडले. सावंतने हळूच इकडे तिकडे बघितलं, तिथे काहीच न्हवतं, सावंत जीव घेऊन त्या मैदानातून पळाला, चौकी जवळून मोटरसायकल काढली आणि भरधाव वेगाने गाडी पळवायला लागला, सावंतला असं झालं होतं कि कधी आपण घरी पोहोचतोय पोहोचतोय कि नाही. आत्ता वेळ होती पहाटे ३:३० ची. सावंतची गाडी ३ किलोमीटर पुढे आली त्याच अपघात झालेल्या ठिकाणी, आत्ता तर तो अजूनच घाबरून गेला. हीच ती जागा म्हंटल्यावर त्याला चालत्या मोटरसायकलवर घाम सुटला. त्याने वेग आणखी वाढवला. गाडी त्या ठिकाणी येताच समोर ती मुंडकं नसलेली बाई ह्याच्या मोटरसायकलला हात करत समोर दिसली, आत्ता सावंतच्या समोर जे दिसलं ते बघून सावंत मोटर सायकलवरून

ओरडत सुटला. आई आई आई मेलो मेलो आई मेलो ए. . . ए. . . ए. . . भूत भूत आणि सावंत पुन्हा रडायला लागला, राम राम राम राम. . . . . . . सावंतने तिच्याकडे फक्त एकदाच बघितलं आणि वेग वाढवला. . . . ती जोरात हसली. . . वाचलास वाचलास रे वाचलास, रस्त्याच्या बाजूला दिसलेलं हे चित्र बघून सावंत जीव वाचवून कसाबसा घरी पाद्धापुरात आला. आणि मोटरसायकल घराजवळ लावून घरात येऊन खाटेवर आडवा पडला. त्या दिवसापासून किमान २ आठवडे सावंत तापाने फणफणला होता.

त्या दिवसापासून सावंतने कधीच रात्रपाळी केली नाही, आणि काही महिन्यातच त्याने आपली बदली करून घेतली. त्या चौकीवर नोकरी करणारा एकही हवालदार आत्ता रात्रीच्या वेळी चौकीच्या मागे असलेल्या त्या मैदानात जात नाही. गाड्यांचे सुटे भाग काढायला कोणी आलाच तर त्याला सरळ सांगतात बाबा रे ती इनोवा सोडून बाकी कुठून पण समान काढ. . . . .

का हो साहेब? येड्या घरात भूतं घेऊन जायची आहेत काय, सावंत होईल हो तुझा. . . . . . . . . . . . . हा हा हा हा हा हा हा.

हवालदार लोकं थट्टा उडवतात पण ती वाटणारी थट्टा काळोख्या रात्री एक गंभीर रूप धारण करून सावंतच्या जीवावर उठली होती. .

# " अचंभित "

दहिसर आणि पोइंसर नदीच्या मधोमध आहेत महाकाली गुंफा, आजूबाजूला घनदाट जंगल, आणि एके काळी हिंस्र प्राण्यांचं माहेरघर. ह्या ठिकाणाला कित्येक हजार वर्षांपूर्वीचा इतिहास लाभलेला आहे. आज जी घटना सांगणार आहे ती ह्याच जंगलात होणाऱ्या अमानवीय घटनांची.

साधारण ४००-५०० वर्षांपूर्वीची घटना, एके काळी ह्या जंगलात एक साम्राज्य होतं, एक राजा ह्या विभागावर राज्य करत होता, हे राज्य तसं लहानच होतं, पोइंसर पर्वताच्या पायथ्याला वसलेलं हे राज्य साधारण दहिसर आणि पोइंसर नदीच्या तीरापर्यंत पसरलं होतं. इथे एक लहानशी बाजारपेठही होती, जंगलात आजूबाजूला छोटी छोटी खेडेगावं वसली होती.

एक दिवस ह्या राज्यात एकच हाहाकार उडाला. जंगलातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कोणीतरी लुटून ठार मारत असे.ही बातमी चारही दिशांना पसरली आणि एक भीतीचं वातावरण तयार झालं. हा डाकू लोकांना जंगलात लुटून ते दागिने घेऊन तो महाकाली गुंफांमध्ये पसार व्हायचा. असे कित्येक मृतदेह राजाच्या सैनिकांना ह्या जंगलात सापडले होते.

नेहमीप्रमाणे महिन्यातून एकदा राजाचा दरबार भरला. प्रधान सेवकांनी राजा समोर लोकांचीही व्यथा मांडली. राजा संतापला, ताबडतोब सैनिकांना फर्मान देण्यात आले, सापळा रचला गेला आणि तो डाकू पकडला गेला.

दुसऱ्याच दिवशी त्याला साखळदंड घालून राजा समोर उभं करण्यात आलं. गडी तसा ६-६.५ फुट उंच, ओठांवर पिळदार मिश्या, केसांच्या जठा हातात सोन्याचं जाड कडं आणि अंगावर घोंगडी. त्याला बघताच क्षणी राजाचा राग अनावर झाला.

"प्रधान मंत्री, विषय मांडा"

" महाराज हा सखा बंडोर, उत्तर भारतातून आपल्या साम्राज्यात आला, ह्याने लुटमारीचे थैमान माजवले, वाटसरुंची लुट - हत्या करून दागिने गुंफांमध्ये दडवायचा, योग्य त्या पुराव्यांची पाहणी करता, हा दोषी आढळला आहे. आपण न्याय करावा महाराज "

आणि राजा ताड करून उभा राहिला, ज्या ठिकाणी हा लोकांना लुटतो तिथेच नेऊन ह्याला दगडाखाली ठेचून मारण्यात यावं. . . . . . . .

ताबडतोब त्याला तिथून सैनिक घेऊन गेले, संध्याकाळी अंधार पडला आणि सखा बंडोरला दगडाखाली ठेचून ठार केलं गेलं, पण मरताना तो एकच वाक्य ओरडून ओरडून बोलत होता,

" मी इथून जाणार नाही, माझी दहशत कायम राहील. मी इथेच राहणार. . . . मी इथेच राहणार. . . . मी इथेच राहणार. . . आणि लुटत राहणार ह्या पांगया लोकांना" आणि त्या भल्यामोठ्या दगडाखाली त्याचा आवज बंद केला गेला.

पुढे शेकडो वर्ष निघून गेली काळ बदलला, आत्ता ह्या ठिकाणी बहुतांशी जंगलाची तोड करून मोठे मोठे रस्ते निर्माण झालेत. काही प्रमाणात जंगलंही आहेत शाबूत. पण दहिसर नदी पासून जवळच असलेल्या रस्त्यावर काही अमानवीय घटना घडतात अशी सर्वत्र बोंबाबोंब झाली.

सुरेश दहितुले, एकदा ह्याच रस्त्याने रिक्षाने चालला होता, अंधार पडलेला रस्त्यावर दिवे नसल्यामुळे फक्त रिक्षाचा मंद प्रकाश रस्त्यावर पडला होता. रिक्षाच्या मागेपुढे एकही गाडी न्हवती, सुरेशने मीटर मध्ये बघितलं, ६०/- झाले होते, सुरेश कडे मोजकेच पैसे असल्यामुळे तो रिक्षावाल्याला बोलला

" ठीक है भाईसाहब इधरही रोक दो, मेरा घर नजदीक है पैदल चला जाउंगा"

"साहब क्या हुवा? पैसा नही है तो कोई बात नही, मै छोड दुंगा, घर चल कर पैसा दे देना, लेकीन यहा से पैदल नही जाना "

सुरेश त्याला बोलला " नही नही वैसी बात नही, मै चला जाउंगा आप निकलो "

"देख लो साहब, संभालकर "

रीक्षावाल्याने गाडी फिरवली आणि तो निघून गेला, सुरेशने आपल्या वाटेकडे तोंड फिरवलं, हा भला मोठा रस्ता, एकाच बाजूचं बांधकाम पूर्ण झालं होतं, पलीकडे अजून बांधकाम अर्धवटच होतं. सुरेशने खिशातून मोबाईल काढला आणि इयरफोन कानात घालून गाणी ऐकत ऐकत तो पावलं टाकत जात होता. अचानक त्याच्या समोर एक ६-६.५ फुटाचा माणूस उभा रहिला, अंगावर घोंगडी आणि एकदम मजबूत बांधा. सुरेश घाबरला, त्याने त्याच्या बाजूने आपला मार्ग वेगळा केला आणि तो पुन्हा चालायला लागला, मागे वळून बघितलं तर तो तिथे न्हवता. सुरेश अजूनच घाबरला, कानातले इयर फोन काढून खिशात घातले. आत्ता त्याने आपल्या चालण्याचा वेग वाढवला, काही अंतरावर त्याला तो माणूस पुन्हा दिसला. सुरेश जागीच थबकला, दोघांच्या मधलं अंतर किमान २० फुट असावं. सुरेशने खिशातून मोबाईल फोन काढला, मित्राला फोन करूया, पण दुर्दैव असं कि त्याच्या मोबाईलला रेंज न्हवती. करायचं काय. मन खंबीर केलं आणि तो पुढे चालायला लागला, आत्ता सुरेश त्या माणसाच्या जवळ आला, अचानक त्या माणसाने सुरेश वर झडप घातली, त्याची मान पकडली आणि बोलला

" सोनं काढ, काय कडं साखळी काय असल नसल ते काढ " सुरेश गरीब माणूस, ह्याच्याकडे रिक्षाचे द्यायला पैसे न्हवते हा काय देणार.

मी गरीब माणूस आहे हो, माझ्याकडे काहीच नाही, खर सांगतो माझ्याकडे काहीच नाही.

काढ लवकर नायतर ठार करतो तुला.

सुरेश पार घाबरला, त्याला वाटलं नक्की हा कोणीतरी दरोडेखोर आहे. तेवढ्यात मागून एका गाडीचा उजेड दिसला. गाडी जवळ येताच त्या माणसाने सुरेशची मान सोडली आणि तो तिथून अचानक नाहीसा झाला. सुरेशने इकडे तिकडे नजर फिरवली, कोणीच न्हवतं. समोर सगळा रस्ता मोकळा होता, रस्त्याच्या बाजूला पण मोकळं उघडं माळ होतं मग हा गेला कुठे?

आत्ता मात्र तो समजून गेला हा माणूस न्हवता,ही भुताटकी होती. मागून येणारी गाडी बस होती. सुरेशने तिला हात केला आणि गाडी थांबतच तिच्यात चढला आणि तिथून निघून गेला.

स्वाती शेंडेही आपल्या नवऱ्या बरोबर स्कूटर वर जात असताना ह्याच मार्गावर त्यांना एका दरोडेखोरानं आडवलं, जीवे मारण्याची धमकी दिली, जीवाच्या भीतीने तिने आपले अंगावरचे सगळे दागिने त्याला देऊन टाकले. असे प्रकार किमान ३-४ लोकांबरोबर घडले, पोलिसात तक्रारी झाल्या. पण पोलिसांना काहीच सुगावा सापडेना.ही बातमी एकदा पेपरात छापून आली, सुरेश दहितुलेनेही बातमी वाचली आणि ताबडतोब त्याने पोलीस ठाण्यात धाव घेतली. आपल्या बरोबर घडलेला प्रकार त्याने पोलिसांना सांगितला. सुरवातीला पोलिसांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही, पण त्या दरोडेखोराचं वर्णन जे सुरेशने केलं ते इतर लोकांनी सांगितल्याप्रमाणेच तंतोतंत खरं होतं. सुरेश पाठोपाठ किमान ३-४ लोकांनी पोलिसांना येऊन हा भुताटकीचाच प्रकार आहे असे सांगितले.

ह्या घटनांचं सत्र तेव्हा पासून चालू झालं जेव्हापासून सरकारने जंगल तोडून हा नवीन हायवे बनवायला घेतला.

एकदिवस महाकाली गुंफांमध्ये साफसफाई करता करता एका माणसाला एका गुंफेत भरपूर दागिने सापडले. एवढे दागिने बघून तो अचंभित झाला. पण हे दागिने पळवून न्यायची त्याची हिंमत झाली नाही. त्याने ते दागिने उचलले कपड्यात बांधले आणि पोलिसांकडे स्वाधीन केले. पोलिसांनी तक्रार दाखल केलेल्या लोकांना संपर्क साधून, दागिन्यांची ओळख करायला सांगितली. दागिने तेच होते. लोकांनी आपापल्या दागिन्यांची ओळख पटवून दिली, पावत्या द्खवल्या आणि आपले दागिने घेऊन गेले.

हे प्रकार आत्ता कमी प्रमाणात घडतात, कारण आत्ता गाड्यांची रेलचेल वाढली आहे. रस्त्याच्या बाजूने उंच इमारती उभ्या व्हायला लागल्या आहेत. तरीपण अधून मधून ह्या घटना घडतच असतात.

# " गुरु "

समोर उभा असलेला बाप त्याची सगळी करणी आज उधळून लावत होता, आत्ता मात्र महाडिक पण त्या दुसऱ्या मांत्रिकाकडे पोहोचला, झाली हकीकत सांगितली होम पेटवला गेला आणि आत्ता दोघे मिळून जनार्दनचा बळी घ्याला जोर लावत होते. . . . . .

" गुरु सठ गुरु हठ गुरु हैं वीर, गुरु साहब सुमिरों बड़ी भांत सिंगी ढोरों बन कहो, मन नाउं करतार। सकल गुरु की हर भजे, छटटा पकर उठ जाग चैत संभार श्री परमहंस। "

तिकडे जनार्दनच्या सर्वांगाला टाचण्या टोचल्या जात होत्या श्वास कोंडला जात होता. काही झालं तरी आपण हे होऊ देणार नाही. . . . . . . बापाचा आत्मा समोर उभा ठाकला होता त्याची काळी करणी उधळून लावायला.

१९६० -७५चा काळ, वसिष्ठी नदीच्या तीरावर वसलेलं खानोळी गाव. गणपत गोविले नावाचा एक मांत्रिक ह्या गावात रहात होता. उपजीविकेसाठी शेती करायचा अथवा कोणाकडे गवंडी काम किंवा कोणाच्या घराला कुंपण घालायची असल्यास तो ते करून द्यायचा. पण ह्याच बरोबर गणपत हा आजूबाजूच्या गावात त्याच्याकडे असणाऱ्या मांत्रिकी विद्येसाठी प्रसिद्ध होता. कोणावर कोणी करणी केली, कोणाला भूतबाधा झाली, किंवा एखाद्याला सर्प चावला कि लोकं गणपत कडे धाव घ्यायचे. त्याच्याकडे आलेल्या प्रत्येक माणसाला त्याच्या त्रासातून मुक्त करणं ह्याला तो आपली जबाबदारी मानायचा. आजपर्यंत त्याने आपल्या विद्येचा वापर कोणाचं वाईट करण्यासाठी कधीच केला न्हवता. त्याला एक मुलगा, संजय. लहानपणापासून शाळा शिकता शिकता हळू हळू तोही आपल्या बापाच्या विद्या शिकू लागला. संजय आत्ता मोठा झाला होता, आपल्या बापासोबत तोही ह्या कडक साधना करायला लागला. अमावस्या पौर्णिमेला गणपत आणि संजय दोघेही वसिष्ठी नदीत पाण्यात रात्रभर साधनेला बसायचे. गावच्या कुलदेवीला प्रसन्न करून नंतरच पुढे त्यांच्या ह्या साधना चालू व्हायच्या.

असं करता करता, संजयची भेट बाजूच्या गावात असलेल्या एका मांत्रिका सोबत झाली. पण हा मांत्रिक आपल्या विद्येचा वापर वाईट कामांसाठी करायचा, कोणावर करणी करणं, कोणाची गुरं ढोरं मारणं. . कोणाला वशीकरण करणं, भानामती करून लुबाडणे, म्हणजे पैसे कमवण्यासाठी कोणी काही सांगेल ते तो करायचा. त्याच्याकडे एखादा माणूस गेला म्हणजे नक्कीच कोणाचं तरी वाईट घडणार. अनेक लोकांचे बळी पण घेतले होते. त्या मांत्रिकाची साधनाही आसुरी होती. गणपत त्या मांत्रिकाला चांगला ओळखून होता. अनेकवेळा दोघांमध्ये सूक्ष्म युद्ध चालायचे, त्याने करणी केली कि गणपत ती उधळून लावायचा. . . कधी कधी तर उलटी पण फिरवायचा पण हा मांत्रिक काय चीज आहे हे संजयला माहिती न्हवतं. एकदा शेतावर बैल चरायला गेला असता त्याची भेट ह्या मांत्रिका सोबत झाली. बोलता बोलता त्याने संजयला आपल्याकडे आकर्षित केलं. त्याने संजयला समजावलं "तू तुझ्या विद्येचा वापर करून बक्कल पैसा कमवू शगतस, मी बघ २ वर्षात घराला लाद्या मारल्या, नवीन बैलजोडी घेतली, हे सगलं तू पन कमवू शगतस "

कसं?

असे खूप लोकं आहेत ज्यांचं कोणा न कोणाशी वैर आहे, ते सांगतील तसं करायचं आपल्याला काय पैसा हवा.

" हो पण माझा बाप तसं काही करत नाही, मला पण करून देणार नाय "

तो बोलला ठीक आहे बाप जित्ता हाय तोवर काय करू नग, मी सांगतो तसं कर. . " तुया बापानं कोणावर झालेली करणी मोडायला काढली कि तू मंत्र चुकीचे मारत जा. . . . बास एवढा कर, मी तुया पैशाचा वाटा तुला देन "

आणि संजय पैशांचा आमिषाला भुलला, बाप घरात नसताना कोणी करणी मोडायला आलाच तर संजय चुकीचे मंत्र मारून फक्त नाटक करायचा. असं करता करता लोकं बोलायला लागले. . . . "गणपत तुझ्या पोराच्या हाताला गुण नाय, काय उपयोग होत नाय बघ " गणपतच्या लक्षात येऊ लागलं, नक्की काहीतरी गडबड आहे.

नेहमीप्रमाणे अमावस्या आली, आज गणपत संजयला घेऊन नदीवर निघाला. पण त्यादिवशी संजयने नदीवर जाण्यास नकार दिला, त्याने स्मशानाकडे जाण्याचा रस्ता पकडला. गणपत ओरडला" आरं पोरा तिकडं काय सैतानाची साधना करायला चाललास काय रं "

संजय बोलला हो " तू काय मिलवलास एवढ्या वर्षात लोकांची सेवा करून " हे ऐकून गणपत मनातून पार खचला, तो समजून गेला पोरगा आपलं ऐकत नाय, पोरगा आसुरी विद्येकडे वळला. बाजूच्या गावातल्या मांत्रिकाने गणपतच्या पोराला बरोबर फितवला.

पण गणपतने आपला मार्ग सोडला नाही, आत्ता तो अजून कडक साधना करायला लागला, कारण आत्ता त्याला गावातल्या लोकांचं रक्षण एक नाही दोघांकडून करायचं होतं.

ह्या तिघांमध्ये खूप महिने सूक्ष्मातून मांत्रिकी युद्ध झालं. वर्ष उलटून गेली, गणपतने जमेल तेवढं त्यांना रोखता येईल तेवढं रोखलं आणि लोकांचं रक्षण केलं. वर्ष उलटून गेली, गणपतने आत्ता सत्तरी ओलांडली, म्हातारा गणपत आत्ता पार थकला होता, पोराचे वाईट धंदे बघून दररोज मनातून कुढत बसायचा, " कुठं फेडशील रंही पापं पोरा ". आणि एकदिवस झोपेतच गणपत मेला.

रितीरिवाजाप्रमाणे गावातल्या लोकांनी गणपतचे अंत्यसंस्कार केले. आत्ता मात्र संजयला रान मोकळं झालं. गणपत मरून जेमतेम १५ दिवस झाले, एक दिवस संजय कडे बाजूच्या गावातून महाडिक नावाचा एक इसम आला, जनार्दन सावंतने आपला वाडा मोडला, त्याचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे. संजय म्हणाला ५००० होतील आणि सामान लागेल त्याचे पैसे वेगळे. तो महाडिक इसम तयार झाला.

संजयने त्याला सामानाची यादी दिली, ११ नासके नारळ, हळद पिंजर माचीस २१ लिंबू काळी बाहुली आणि १ टाचणीचं पाकीट.

महाडिकला अमावस्येच्या दिवशी बोलावलं, तो आला, संजयने सामान लावायला घेतलं, उत्तर दिशेला नारळाच्या शेंड्या फिरवल्या, लिंबू अर्धे कापले आणि तांब्यात पाणी आणायला तो उठून आत घरात गेला, महाडिक पण उठून लघवीला बाहेर गेला. संजय आल्यावर बघतो तर नारळाच्या शेंड्या दक्षिणेला झाल्या होत्या आणि लिंबू सगळया घरभर झाले होते. त्याने महाडिकला विचारलं " हे काय केलत महाडिक " महाडिक बोलला

"मला माहिती नाही, मी बाहेर लघवीला गेलो होतो. हा पण परत येताना बघितलं मी तुमच्या घरात कोणीतरी शिरलं "

" कोण शिरलं इथं आपण दोघेच आहोत " जाऊ दे मांजर आलं असल आणि संजयने पुन्हा मांडणी केली.

संजय ध्यान लावून बसला, महाडिक त्याच्या समोर बसला. संजयने डोळे मिटले महाडिक त्याच्याकडे बघत होता. अचानक महाडिकच्या पाठीत कोणीतरी जोरात लाथ घातली. महाडिक जोराने ओरडला. . . " आई आई गो मेलो मेलो " संजय चं ध्यान मोडलं, "काय झालं महाडिक ". . . .

माझ्या पाठीत लाथ घातली कोणीतरी. . . . . . "लाथ कोण घालेल दरवाजा बंद आहे महाडिक "

खरं सांगतोय मी. . . . संजय उठला त्याने उंबरठ्यावर हळद पिंजर टाकून मंत्र मारले आणि दरवाजा पुन्हा बंद केला. तो पुन्हा ध्यान लावून बसला, तोंडातल्या तोंडात मंत्र बोलायला लागला. . . . . . . आणि तिकडे जनार्दन सावंतला त्रास व्हायला लागला, जनार्दन गडाबडा जमिनीवर लोळायला लागला, त्याच्या घरातले घाबरले. काय होतंय कोणालाच समजेना. आजूबाजूची लोकं जमली जनार्दन डोळे फिरवायला लागला. . . . . . . इथे संजय मंत्रावर मंत्र मारायला लागला. . . .

" मोहिनी बन सर्पबिशंसख बातीश तेकेली बान बाघ बोंधा बिख बान झोर बान जुई निबरानी पाश आणि काम बान, र र र र र र र भूम फट "

आणि बघता बघता जनार्दन अर्धमेला होत चालला होता, त्याच्या संपूर्ण शरीराला टाचण्या टोचल्या जात होत्या तो वेदनांनी किंचाळत होता, अचानक गावातल्या कुठल्यातरी बाईने गणपत चं नाव घेतलं, ती जोराने ओरडली

" गणपता ये रं बाबा मांझ्या पोराला वाचव रं बाबा ये, रांडच्यांनी करणी केली र पोरावर वाचव र बाबा मांझे पोराला" आणि म्हातारीने गावदेवीकडे धाव घेतली देवळात म्हातारी जीवाच्या आकांताने गणपतला हाका मारू लागली, आणि तिकडे एक एक करून संजयच्या फुड्यात ठेवलेले नासके नारळ आपोआप फुटायला लागले, संजय उठला, कोणीतरी आपल्या शक्तीला निष्फळ करतोय.

दरवाजावर कोणीतरी लाथ मारली आणि घरात वारा शिरला, हळद पिंजर हवेत उडाली. आणि त्याचा समोर त्याचा बाप उभा राहिला. . . . . . गणपत गोविले.

गणपतला समोर बघून महाडिक घाबरला. . . आणि तो भूत भूत करत त्या घरातून बाहेर पळून गेला. आपण इथे करणी करायला आलो होतो हे कोणाला समजू नये म्हणून महाडिक गावाच्या मागच्या रस्त्याने पळून गेला.

संजय समोर उभा असलेला गणपत बोलायला लागला " पोरा बाप हाय म्या तुझा, कर करणी. . लाव जोर तुझ्या असुरी विद्येचा, आज तू जिंकशील नायतर म्या जिंकन" संजय समजून चुकला होता, मेलेला आपला बाप आत्ता अधिकच बळकट झाला आहे. ह्याला हरवनं आपलं काम नाय. पळून गेलेला महाडिक बाजूच्या गावातल्या मांत्रिकाकडे गेला, बुवा वाचवा मला. . . आणि त्याने झाला प्रकार त्याला सांगितला. गणपतचा बंदोबस्त करायला मांत्रिकाने ताबडतोब होम पेटवला. इकडे संजयने पुन्हा जनार्दन वर करणी करायला सुरवात केली. .

आणि जनार्दनच्या घराच्या बाजूला असलेलं जांभळी चं झाड हलायला लागलं. जनार्दन पुन्हा जमिनीवर लोळायला लागला, पोट पकडून रडायला लागला, तोंडाला फेस आला, शरीर काळ पडायला लागलं.

आत्ता मात्र ते गणपत चं भूतं भडकलं त्याने संजय चं सगळं सामान उडवून लावायला सुरवात केली. भुताने आपला आवेश बदलला. . . . . पोराला २-४ वेळा उचलून जमिनीवर आपटला. बाजूच्या गावात होम करायला बसलेला मांत्रिक आत्ता असहाय्य झाला होता, त्याचं काहीच चालेना. भुताच्या हल्ल्यात संजय बेशुद्ध पडला आणि तिकडे मांत्रिकाच्या घरावर असलेला पेंडा पेटला. अंगणातला मांडव पेटला, घराचं छप्पर पेटलय बघताच तोही आपल्या घरातून बाहेर पळाला. . . . . . . . .

इकडे जनार्दन जमिनीवर कोसळला, थोड्या वेळाने शुद्धीवर आला, जांभळीचं झाड स्थिर झालं सगळं काही शांत झालं. आणि लोकांनी जनार्दनला पाणी पाजलं.

जनार्दन व्यवस्थित झाला, बाजूच्या गावातला मांत्रिक गाव सोडून पळून गेला.

संजय आत्ता जवळच्या प्राथमिक शाळेवर शिपाई आहे, त्या दिवशी घडलेल्या प्रकारामुळे तो पार घाबरूनच गेला होता. काळया जादूच्या विरोधात सरकारने पण कायदे कडक केले. आपण करत असलेला धंदा आत्ता सोप्पा राहिला नाही हे त्याला कळलं.

वर्ष निघून गेली, तंटामुक्ती चं धोरण अवलंबलं गेलं, गावात लोकं सुखाने राहतात, लोकं सुशिक्षित झाले, काळाप्रमाणे तेही बदलले. आज खानोळ गावाला "आदर्श गाव" म्हणून घोषित केलं गेलं आहे. आत्ता करणी, काळी जादू हे शब्द फक्त विनोद म्हणून वापरले जातात कोणाचा जीव घेण्यासाठी नाही.

# " किल्लेदार "

समीर लहानपणापासून वात्रट, कधी त्याने आपल्या आई वडिलांचं ऐकलं नाही, दररोज भांडण खोड्या आणि आत्ता मोठा झाल्यावर रस्त्यावर मारामाऱ्या पण करायला लागला. कसाबसा १२ वी पास झाला, आई वडील वैतागले आणि त्याला त्याच्या आत्याकडे पाठवला. तिकडेच त्याने अभियांत्रिकीला प्रवेश घेतला, शिकत असताना ह्याच्या अंगातले दुर्गुण कमी न होता वाढतच गेले. महाविद्यलयात त्याने टपोरी मुलांची संगत पकडली आणि मित्रांबरोबर पार्ट्या करणं सिगारेट दारू तंबाखू सगळी व्यसनं लावून घेतली.

कान्हेरे अभियांत्रिकी महाविद्यालय, आजूबाजूचा सगळा परिसर हिरवागार जवळच एक नदी आणि दूरवर नजर टाकली कि एक किल्ला नजरेस पडायचा. समीर मित्रांसोबत बसला कि नेहमी म्हणायचा

"आपल्याला ना साला त्या किल्ल्यावर जायचंय, मस्त सिगारेटचा झुरका मारायचा, समोर दिसणारा मोकळा परिसर उंच उंच डोंगर बघून. . . बियर मारायचीय "

मुलं त्याच्यावर हसायचे. . . . . " साल्या जात जाऊ नको वाटेल तिथे, त्या किल्ल्यावर कोणीच जात नाही, ओसाड पडलेला किल्ला आहे तो, भुताटकी बिताटकि असेल तिथे "

लगेच दुसरा मित्र बोलला

" मरशील साल्या कुठेपण जात जाऊ नको "

घंटा वाजली. . . मुलं उठून आपापल्या वर्गात जायला निघाले, समीर पण उठला, हातातली सिगारेट जमिनीवर टाकून बुटाने चुरडली. . . . . . . "मी जाणार साला. . " असं बोलून तो पण वर्गात निघून गेला.

शनिवार होता, लेक्चर लवकर संपलं, समीर आपली बाईक घेऊन बाहेर आला, काय डोक्यात सनकी आली, जवळच असलेल्या हायवेवर गेला, बियर शॉपी मधून ५ बियर घेतल्या, सिगारेटची पाकिटं घेतली, वेफर आणि शेंगदाणे घेतले. . . गाडीची दिशा वळवली. . . . आणि आत्ता त्याच्या नजरे समोर दिसत होता तो घारीगड. असं मानलं जायचं कि त्या किल्ल्यात घारी आणि गिधाडं राहतात, तिकडे सहसा कोणी माणूस फिरकत नसे. समीरने आपली बाईक खाली बांद्लवाडी गावातच ठेवली, कारण किल्ला उंचावर होता. मित्रांनी नकार दिल्यामुळे रागाच्या भरात इथे तो एकटाच आला.

पाठीवर बॅग घेऊन तो किल्ला चढून वर आला. दुपारचे ३ वाजले. घामाघूम समीर किल्ल्यात आल्यावर षटकोनी आकाराचं एक तलाव त्याला दिसलं, पाणी हिरवं गार, त्याने आजूबाजूला एक नजर फिरवली, किल्ला पार मोडकळीस आलेला, त्या किल्ल्यात वटवाघळे उलटी टांगलेली दिसली. गिधाडं घारी असं काही न्हवतं तिथे. एकदम सामसूम वातावरण. वर एक बुरुज दिसला, आपली बॅग उचलून तो त्या बुरुजाकडे गेला, समोर अथांग पसरलेला मोकळा परिसर, हिरवं गार माळरान पायथ्याला वसलेलं छोटसं गाव आणि दूरवरून नागमोडी वळण घेत जाणारी नदी. समीरने बसायला रुमाल टाकला. बुरुजाला अनेक खोल्या बनवल्या होत्या, काही खोल्यांच्या खिडकीतून तोफा बाहेर तोंड करून उभ्या होत्या. एका रिकाम्या खोलीच्या खिडकीत तो बसला. समोरचं वातावरण बघून तो खुश झाला. खिशातून सिगारेट काढून पेटवली आणि डोळे मिटून त्याने एक झुरका मारला. बॅग मधून एक बियर बाहेर काढली आणि खिडकीतून समोर बघत. . . . तो प्यायला लागला.

बघता बघता तो ३ बियर प्यायला आणि कधी झोपला त्यालाच समजलं नाही. डोळे उघडले आत्ता अंधार पडलेला. खिशातून मोबाईल काढला आणि बघितलं तर ९ वाजले होते. आत्ता ह्या भयाण काळोखात डोंगर उतरून कसं जायचं. तो खूप नशेत होता धड उभंही राहता येत न्हवतं, त्याने विचार केला दुसरा मार्ग नाही, काही हरकत नाही

"साला उरलेल्या बियर पिऊन इथेच झोपू. . . बघू उद्याचं उद्या, आज कि शाम घारीगड के नाम" बाटलीचं बुच उडवलं आणि बाटली लावली तोंडाला. किल्ल्यात गार वारा घोंगावायला लागला होता, वटवाघळं चिवचिवाट करत इकडून तिकडे फिरण्याचा आवाज येत होता. मध्येच कुठूनतरी कोल्ह्यांचा आवाज कानावर पडत होता. आत्ता तर पायथ्याला असलेल्या गावातले टीमटीमणारे दिवे पण बंद व्हायला सुरवात झालेली. वातावरण अधिकच भयाण होत चाललं, किल्ल्यात उगवलेली वडाची झाडं आत्ता अधिकच आक्राळ विक्राळ दिसायला लागली. . . . समीर मनातून घाबरायला लागला. ह्या ओसाड किल्ल्यात काय काय रहस्य दडली असतील देव जाणे.

"त्याने आपल्या २ बियर काढल्या, चिप्स चं पाकीट काढलं आणि गटागटा २ बियर पोटात घातल्या. त्या थंड हवेने बियरची नशा ह्याच्या डोक्यात झींगली, उभा राहिला आणि जोरात ओरडला

" हुजूर, बंदा आपकी खिदमत में हाजीर है हुजूर, फर्मान दिजीये हुजूर अभी हम गाव में जायेंगे और अनाज कि लुट करवाके वापीस आयेंगे हुजूर "

आणि हसायला लागला. . . . . . . . हा हा हा हा हा हा हा.

त्याच्या हसण्याच्या पाठोपाठ त्या किल्ल्यात दुसरं पण कोणीतरी जोरजोराने हसायला लागलं. समोरच्या तलावातलं पाणी आपोआप आवाज करायला लागलं. आत्ता समीर गप्प बसला, तो एवढ्या नशेत होता कि त्याला वाटलं आपलाच आवाज भिंतींवर आपटून. . . बुरुजात घुमतोय. तो शांत झाला तरीपण ते हसणं चालूच होतं. थोड्यावेळाने शांतता पसरली.

"ओये, कौन है उधर, साला सामने आजाव अभी हम अपनी शमशेर निकाल के तुम्हारा सर कलम करते है, सामने आव "

मोडक्या हिंदीत तो ऐतिहासिक डायलॉग मारून पुन्हा हसायला लागला. आत्ता मात्र कोणाचाही हसण्याचा आवाज आला नाही. . . सर्वत्र शांतता पसरली आणि लटपटत तो पुन्हा खाली बसला. खाली बसताच समोरच्या तुटलेल्या बुरुजावरून मातीचा ढिगारा आणि त्यासोबत मोठमोठाली दगडं त्या तलावात पडली. . . एकच आवाज व्हायला सुरवात झाली आणि तो आवाज संपूर्ण घारीगडात घुमला. समीर घाबरला. पण उभं राहण्याची त्याच्यात ताकद न्हवती. काहीतरी बडबडत तो खाली बसला आणि पुन्हा झोपुन गेला.

रात्र वाढत गेली, डोळयावर चंद्र आला किल्ल्यात चंद्राचा प्रकाश पसरला, भयाण शांतता. . . . . . . . . . समीरला स्वप्न पडलं, तो किल्ल्याच्या त्याच बुरुजावर खिडकीत बसलेला दिसला, समोरच्या तालावातून एक घोडेस्वार बाहेर निघाला, एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात चाबूक. . . . . तो घोड्यावर एक एक पायरी चढून समीरच्या जवळ आला, आणि म्हणाला. . . . .

" काय रे हरामखोरा, लाज विकून खाल्लीस काय. तुझ्या बाप जाद्यांनी रक्त सांडून हे किल्ले शाबूत ठेवले, गोरगरिबांचे रक्षण केले आणि तू कसली लुट करणार रे भेकड माणसा "

आपल्याच माणसांचे धान्य लुटून आणायची वार्ता करतोस, चल उठ उभा रहा, किल्ले काय तुझ्या बापजाद्याची जायदाद आहे काय रे, दारू पितोस इथे येऊन आणि एक जोराचा चाबकाचा फटका त्याने समीरच्या पाठीत खेचला "

समीर ताड करून उभा राहिला, पाठ झोंबतच होती, हे खरं होतं कि स्वप्न त्याला कळेना. आत्ता त्याची दारू पार उतरली, डोळे चोळून तो इकडे तिकडे बघायला लागला. . . . आणि बघतो तर त्याच्या समोर एक माणूस घोड्यावर स्वार होऊन उभा राहिला. . . . " नामर्दा

दारू पितोस, आणि तेही इथे ह्या ऐतिहासिक किल्ल्यावर. . . " पुन्हा चाबकाचा फटका त्याच्या खांद्यावर खेचला गेला. . . . . .

आत्ता मात्र तो समजून गेला हा खरोखरचा माणूस आहे, तिथून धडपडत पळाला खाली उतरला आणि त्याच्या हाताला एक दगड सापडला, त्याने तो दगड त्या माणसाच्या दिशेने भिरकावला पण दगड त्याच्या हातातून सुटेना. . . . . हे काय होतंय, दगड फेकण्याचा प्रयत्न करतोय पण दगड हाताला चिटकून कसा बसला. चंद्राच्या प्रकाशात तो भला मोठा माणूस आणि त्याचा तो घोडा ह्याला स्पष्ट दिसत होता. खाली वाकला दुसरा दगड उचलणार एवढ्यात त्याच्या पाठीत आणखी एक चाबकाचा फटका बसला. . . . . . कळवळला खाली आडवा पडला आणि समोर नजर टाकली तो माणूस तिथेच होता त्या बुरुजावर. समीरने बाजूला वळून बघितलं तर तसाच एक माणूस ह्याच्या जवळ उभा होता. कोण आहेस कोण तू, मला कशाला मारतोस

" रखवालदार हाय म्या इथला, किल्लेदार सुभानराव " आणि तो माणूस अदृश्य झाला. समीर ताड करून उभा राहिला.

"किल्लेदार. . . . . . " समीर तोंडातल्यातोंडात पुटपुटला. हे सगळं विचित्र आहे, हा माणूस नाही. . . हे भूत आहे, पण ह्या अंधारात मी जाऊ कुठे, इथून बाहेर कुठून जाऊ? . . त्याच्या मनात प्रश्नांचं वादळ उठलं, अंगाला घाम सुटला आणि पायावर अजून एक चाबकाचा फटका बसताच तो जमिनीवर कोसळला. . . तोल गेलेला समीर खाली गडगडत आला आणि तलावाच्या बाजूलाच पडलेल्या दगडावर आपटला. डोकं धन्न करून दगडावर आपटताच तो जागीच बेशुद्ध पडला. रात्रभर तिथेच पडून राहिला,

डोळे उघडले सूर्य डोक्यावर होता. उठून बसला, अंगाला माती लागलेली डोक्यावरची जखम दुखायला लागली. डोक्याचं रक्त हाताला लागलेलं. पायात चप्पल न्हवती आणि पाठ झोंबत होती. रात्री घडलेला भुताटकीचा प्रकार डोक्यात वीज पडावी असा चमकला. ताबडतोब उठला आणि तिथून धावत धावत डोंगर उतरून खाली गावात आला. गाडी जवळ आला चावी काढायला हात खिशात घातला पण चावी सापडेना. लक्षात आलं

चावी तर बॅग मध्ये ठेवलेली, आणि बॅग वर किल्ल्यावर. . . . आत्ता वर जाणार तरी कसं. त्याने गाडीला धक्का मारत मारत त्या गावातून बाहेर आणली, बाहेर हायवेवर आला, जवळच "श्रीकृपा मोटर ग्यारेज " दिसलं. . . .

" एक भाऊ गाडीची चावी नाही माझ्याकडे गाडी चालू करून दे "

मेक्यानिकने ह्याच्याकडे बघितलं, पार मातीत लोळून आल्यासारखा वाटत होता, पायात चप्पल न्हवती आणि शर्ट मागून फाटलेला, मानेवर कसलातरी लाल वळ दिसत होता.

" काय रे गाडी काय चोरीची हाय काय ". . . . . . . "नाही हो माझीच गाडी आहे "

आणि समीरने आपल्यासोबत घडलेली घटना त्या मेक्यानिकला सांगितली. ग्यारेज्वाला पण ऐकून थक्क झाला.

"असा प्रकार आज पर्यंत ऐकून नाय रायलो बाबा, पयल्यांदाच ऐकून रायलो "

मेक्यानिकने समीरला गाडी चालू करून दिली आणि तो पुन्हा आत्याच्या घरी आला. . . . पाठीवर उठलेले वळ बघून आत्या बोलली. . . " काय रे सम्या काल रात्रभर कुठे होतास, आणि हे वळ कसले रे, परत मारामारी करून आलास वाटतंय, हे बघ बाबा इथे राहायचं तर व्यवस्थित रहा, नाहीतर जा तुझ्या बापाकडच जाऊन रहा. व्याप नको आमच्या डोक्याला"

" काय बोलावं त्याला समजेना. . . . . अंघोळ करून आला आणि गप्प बसून टी. व्ही. लावून बसला. समोर कार्यक्रम लागला होता " जय मल्हार " डोळ्यासमोर रात्र उभी राहिली, ताबडतोब Channel बदलून त्याने Discovery लावलं.

# " शाळा "

शिरीष एक प्राथमिक शिक्षक, पत्नी सुशीला आणि मुलगी स्वाती असं तिघांचं एक छोटसं कुटुंबं. शिरीष जिल्हा परिषदेच्या शाळेवर शिक्षक होता. सरकारी नोकरी असल्यामुळे नेहमीच बदली होत असायची. साल २००२ जानेवारी महिना होता. मुख्याध्यपकांनी शिरीषला बोलावून घेतलं. शिरीष तुझी बदली झाली आहे. मंडणगड तालुक्यातील नागावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेवर. शिरीष प्रामाणिक शिक्षक स्वभावाने पण गरीब. काहीच न बोलता त्याने आपल्या बदलीचा कागद हातात घेतला आणि घरी आला. घरी आल्यावर सुशीलालाही बातमी सांगितली. सुशीला सुरवातील शिरीष वर रागावली म्हणाली तुम्हाला बदली दिली कि तुम्ही काहीच बोलत नाही. त्यांना विनंती तरी करायची होती. पोरगी लहान आहे वारंवार शाळा बदलून तिचं अभ्यासात लक्ष लागणार नाही.

पण शेवटी नोकरी ती नोकरीच, सांगितलं तिकडे जावं लागणार होतच. फेब्रुवारी महिन्यात शिरीषचं कुटुंब नागावला पोहोचलं. गावाच्या बाहेरच एक घर भाड्याने मिळालं. सर्व समान सुमान लावून झालं. स्वातीचा शाळेत दाखला घातला गेला, आणि शिरीष पण नोकरी वर रुजू झाला. अहिल्याबाई प्राथमिक विद्यालय नागाव.

स्वाती इयत्ता ५विला शिकत होती. शिरीष पण त्याच शाळेवर इतिहासाचा शिक्षक होता. सुशीला नेहमी स्वातीला शाळेत सोडायला जायची. स्वाती शाळेतून आली कि आपलं दप्तर जागेवर ठेवून हात पाय धुवून जेवण करायची आणि थोडावेळ आई बरोबर गप्पा मारत बसायची. एक दिवस स्वाती आपल्या आईला बोलली, आई ग तू उद्या पासून मला आणायला आणि सोडायला येत जाऊ नको. सुशीला बोलली का ग? तू मोठी झालीस काय आत्ता. स्वाती बोलली मला एक नवीन मैत्रीण मिळाली आहे. बाजूच्या गावातली आहे ती. ती पण आपल्या घरासमोरूनच जाते येते. सुशीला :- हो का, काय नाव तिचं? कल्पना नाव तिचं.

दुसऱ्या दिवशी स्वाती शाळेत जायला तयार झाली आईला म्हणाली चल मी जाते कल्पना आली आहे. सुशीला घराच्या मागे झाडांना पाणी घालत होती. घरापासून शाळा तशी १०-१५ मिनिटांच्या अंतरावर होती. रस्ता पण मोकळा होता आणि रस्ता गावातूनच जायचा. म्हणून सुशीलाने स्वातीला तिच्या मैत्रिणी सोबत जायला परवानगी दिली. "नीट जा आणि सांभाळून ये ग " हो हो मी जाते, तू काळजी करू नको. आणि स्वाती घरातून बाहेर पडली.

संध्याकाळी शाळा सुटली आणि स्वाती आपल्या घरी आली. घरी आल्यावर नेहमीप्रमाणे दप्तर टाकून हातपाय धुवून चहा चपाती खाऊन आपल्या आई बरोबर गप्पा मारत होती. अस करता करता १ महिना उलटून गेला, स्वातीचं वागणं बदलायला लागलं, शाळेतून तक्रारी यायला लागल्या, स्वाती इतर मुलींसोबत भांडण करते, मुलींचे केस ओढते, त्यांच्यावर खेकसते, घरात पण स्वातीचं वागणं बदलायला लागलं होतं, जेवण नाही आवडलं तर ताट फेकून द्यायची, झोपेत बडबड करायची, दुपारच्या वेळी एकटीच घरामागे असलेल्या चिंचेच्या झाडाखाली बसून राहायची.

असंच एक दिवस, रात्र झाली. शिरीष पण कामावरून आला होता. सगळे जण जेवण करून झोपले. रात्री घराबाहेर काळोख होता. गाव १० मिनिटांवर होतं. पण ह्यांचं घर एका बाजूला माळावर होतं. सुशीलाला रात्री दरवाजाचा आवाज आला. म्हणून ती दचकून उठली. हळूच बाहेरच्या खोलीत आली. दरवाजा उघडा होता. ती पुन्हा घरात आली लाईट लावली, पण खाटेवर फक्त एकटा शिरीष होता स्वाती न्हवती. तिने शिरीषला उठवलं. पोरगी नाही. दरवाजा उघडा आहे. दोघेपण घाबरले आणि दरवाजाच्या बाहेर आले. समोर बघतात तर स्वाती कोणाबरोबर तरी बोलत होती. आणि लंगडी खेळत होती, हसत होती आणि लंगडी करत अंगणात कोणाच्या तरी मागे धावत होती. हा प्रकार बघून दोघे पण संतापले. सुशीलाने स्वातीच्या पाठीत धपाटा घातला. “स्वाती काय अक्कल आहे कि नाही.ही काय वेळ आहे काय लंगडी खेळायची. काय वेड्या सारखी एकटीच बडबड करत होतीस.” हात पकडला आणि स्वातीला घरात खेचत घेऊन आली. दरवाजा लावला. आणि स्वातीला विचारलं “कोणाबरोबर बोलत होतीस?”

स्वातीने उत्तर दिलं “कल्पना बरोबर खेळत होते.”

शिरीष :- काय? कोण कल्पना. सुशीलाने शिरीषला सांगितलं तिची मैत्रीण.

दोघेही स्वातीला बोलले स्वाती बेटा तिकडे कोणीच न्हवतं. तू एकटीच खेळत होतीस. स्वाती बोलली आम्ही दोघी खेळत होतो तुम्ही आमचा डाव मोडला. आणि रागात स्वाती अंथरुणात चादर ओढून झोपली. दोघेपण चिंतेत पडले. आत्ता झोपूया उद्या बघू. म्हणून सुशीलाने लाईट बंद केला. पण तिला खिडकीत कोणीतरी उभं असल्याचा भास झाला. तिने शिरीषला हाताने खुणावून सांगितलं. शिरीष बोलला झाडाची सावली आहे. झोप शांतपणे.

दुसऱ्या दिवशी शाळेत जायची वेळ झाली. स्वाती मोठ्याने बोलली. . . . आले आले.

सुशीला मुद्दाम बाहेर आली. “काय कोणाला बोललीस आले आले.”

“ आ. . . . ग कल्पना आली आहे ना, मला हाका मारते. चल मी चालले.”

सुशीलाने स्वातीचा हात पकडला. थांब इथेच. सुशीला घराबाहेर आली बघितलं तिकडे कोणीच न्हवतं. “स्वाती इकडे कोणीच नाही.”

स्वाती हसत म्हणाली “मगही समोर कोण आहे.”

समोर कोणीच न्हवतं. सुशीलाने स्वातीला थांबवलं. दरवाजा बंद केला आणि म्हणाली आज शाळेत जाऊ नको. तिला सांग जायला. स्वाती मोठ्याने बोलली तू जा ग मी आज नाही येणार. संध्याकाळी शिरीष शाळेतून आला, झाला प्रकार सुशीलाने त्याला सांगितला. ऐकून तो पण गांगरून गेला. नक्कीच काहीतरी गडबड आहे. आपण स्वातीला डॉक्टरांकडे घेऊन जाऊ उद्या. संध्याकाळी सगळे एकत्र जेवले आणि झोपले. पुन्हा रात्री दरवाजाचा आवाज आला आणि सुशीला जागी झाली. बघितलं दरवाजा उघडा होता आणि स्वाती न्हवती. शिरीष आणि सुशीला दोघेही बाहेर आले. पोरगी पुन्हा लंगडी खेळत होती. हसत होती आणि कोणाच्यातरी मागे धावत होती.

शिरीषने स्वातीचा हात पकडला. बेटा चल आत घरात. घरात स्वातीला आणलं दरवाजा लावला. पुन्हा प्रश्न विचारला कोण होतं. स्वाती खाटेवरून उठली खिडकीत जाऊन उभी राहून बाहेर काहीतरी बघत उभी राहिली होती. सुशीलाने हाक मारली बेटा इकडे ये.

स्वाती मागे वळून पुन्हा खाटेवर येऊन बसली. शिरीष आणि सुशीला दोघे तिच्या बाजूला बसून तिच्या डोक्यावर हात फिरवत होते. स्वाती आपले केस मोकळे करून मान फिरवायला लागली.

बघता बघता ती जोर जोरात आपली मान फिरवायला लागली आणि ताड करून उभी राहिली. तिने तिचे दोन्ही डोळे पांढरे केले. तिचे मोकळे केस खिडकीतून येणाऱ्या हवेने उडायला लागले. तिचं ते भयानक रूप बघून सुशीला आणि शिरीष दोघेपण घाबरले. जोर जोरात ओरडून ते दोघे धावत दरवाजा उघडायला गेले. दरवाजा उघडून बाहेर आल्यावर बघतात तर त्यांच्या समोर एक शाळेच्या ड्रेस मध्ये मुलगी लंगडी खेळत होती. आणि घरातून घोगऱ्या आवाजात स्वाती बोलत होती, पळताय कुठे मला एकटीला टाकून, या घरात या.

अचानक तिचा आवाज बदलला आई आई मला वाचव आई. . . सुशीलाने मागे वळून बघितलं तर स्वाती रडत होती. ती एकदम नॉर्मल होती. शिरीषने स्वातीच्या दिशेने धाव घेतली स्वातीने शिरीषला घट्ट मिठी मारली सुशीलाने पण पटकन दरवाजा बंद करून घेतला. स्वाती रडायला लागली, बाबा मला वाचवा बाबा मला खूप भीती वाटते.

आत्ता जो काही प्रकार घडत होता तो बघून सर्व कुटुंब भयभीत झालं होतं. सुशीलाने दरवाजाची कडी लावली. जशी कडी लावली गेली स्वातीने पुन्हा आपलं रूप बदललं तिने सुशीलाचे केस पकडून तिला भिंतीवर जोरात आपटलं. हे बघताच शिरीषने स्वातीला घट्ट पकडलं. सुशीलाने जवळच पडलेली बेडशीट उचलली आणि स्वातीला घट्ट बांधून ठेवलं. ती घोगऱ्या आवाजात बोलत होती सोडा मला नाहीतर दोघांना पण ठार मारून टाकेन. . . सोडा मला. . . आणि ती जोर काढायला लागली. सुशीलाने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण कडी उघडत न्हवती. खिडकीतून कल्पना विचित्र आवाजात किंकाळ्या फोडत होती. हे सगळं खूप भयानक होतं.

शिरीष आणि सुशीला मोठ्यामोठ्याने मदतीसाठी ओरडत होते पण त्यांचा आवाज कोणीही ऐकला नाही. पूर्ण रात्र अशीच निघून गेली.

सकाळ झाली आणि अचानक दरवाजा उघडला. स्वाती एकदम नॉर्मल झाली. सुशीला आणि शिरीषने तिला नाव विचारलं तर स्वाती एकदम घाबरलेल्या थकलेल्या आवाज म्हणाली आई मला का बांधून ठेवलय आई. बाबा सोडा ना मला. शिरीषने हळूच बेडशीट सोडली. स्वातीला मोकळं केलं पण तिच्या जवळ जाण्याचं धाडस दोघांना पण होईना. दिवसभर स्वाती एकदम नॉर्मल वागली.ही आपली स्वातीच आहे खात्री पटली. शिरीषने

विचार केला गावात जाऊन झाला प्रकार मी कोणाला तरी सांगतो. पण सुशीला बोलली मी एकटी नाही थांबणार इकडे. पण मग पोरीला एकटीला घरात ठेवून दोघांना गावात जाणं शक्य न्हवतं. असाच दिवस निघून गेला.

पुन्हा रात्र झाली आणि स्वातीच्या अंगात झटका आला. तिने झोपेत असलेल्या शिरीषचा गळा दाबायला सुरवात केली. पण सुशीलाने स्वातीला पकडून खाटेवरून खाली ढकलली. खिडकीत कल्पना उभी होती. डोळे मोठे करून रागाने सुशीला कडे बघत होती. सुशीला आणि शिरीष खूप घाबरले. शिरीषच्या हातात एक काठी सापडली. त्याने त्या काठीने स्वातीच्या पाठीत फटका मारला. स्वाती खाली पडली. खिडकीत उभी असलेली कल्पना आत्ता दरवाजावर लाथा मारायला लागली. काय करावं दोघांना सुचेना. शिरीषने पुन्हा एक फटका स्वातीच्या पाठीत मारला. स्वाती बेशुद्ध पडली. सुशीला रडायला लागली. तिला समजेना आपण नक्की आपल्याच मुलीला मारतोय कि भुताला मारतोय. हे आत्ता दररोज चं झालं होतं. दिवस उजाडला कि सुशीला आणि शिरीष स्वातीला झालेल्या जखमांना हळद तुरटी लावायचे.

त्या घरात नक्की काय चाललं होतं कोणालाच माहिती न्हवतं. शिरीष गेले २ दिवस शाळेत आला नाही. स्वाती पण आली नाही म्हणून शाळेचे मुख्याध्यापक एकदा शिरीषच्या घरी आले. कुटुंबातल्या तिघांचा अवतार बघून ते म्हणाले अरे काय हा अवतार करून ठेवला आहे. आणि स्वातीच्या हातापायावरचे वळ बघून ते म्हणाले पोरीला मारलत काय. एवढं मारायचं का मुलीला.

काय झालं बाळा बाबांनी मारलं काय. स्वाती रडत रडत म्हणाली माहिती नाही मला.

मुख्याध्यापकांनी जाताना शिरीषला घराबाहेर बोलावलं. काय झालं शिरीष तुझ्या बायकोच्या डोक्याला पण लागलेलं आहे पोरीच्या अंगावर पण मार आहे तुझा अवतार हा असा काय झालं काय प्रकार आहे हा सगळा?

शिरीषने झाला प्रकार त्यांना सांगितला, ते हसायला लागले आरे वेड्या शिक्षक ना तू, तू असल्या गोष्टींवर विश्वास ठेवतोस. बोलता बोलता शिरीषच्या डोळयात पाणी आलं. सर माझी मुलगी माझ्या हातातून चालली आहे सर. ह्या घरात विचित्र प्रकार घडतात रात्री.

सर बोलले शिरीष २ दिवस कुठेतरी फिरून ये हवा पालट होईल. आणि ह्या असल्या थोतांड गोष्टींवर विश्वास ठेवू नको, आणि दुसरं कोणाला सांगू नको. . लोकं हसतील तुला.

शिरीष असच मन मारून त्या घरात राहिला, हा प्रकार दररोज घडत राहिला, आणि एकदिवस रात्री स्वातीने दोघांवर जीवघेणा हल्ला केला, त्या रात्री कल्पना घराची कौलं काढून आत शिरली होती. कल्पना आणि स्वातीने मिळून दोघांवर हल्ला चढवला. दोघी एकाच स्वरात बोलायला लागल्या होत्या, घोगऱ्या आवाजात डोळे फिरवून त्या शिरीष आणि सुशीलावर नखांनी जखमा करायला लागल्या. स्वातीने हातात सुरी घेतली आणि सुशीलावर वार केला, शिरीष आणि सुशीलाने आपला जीव वाचवण्यासाठी स्वातीची हत्या केली. कल्पना जोरजोराने हसत हसत त्या घराचा दरवाजा उघडून बाहेर निघून गेली, रात्रभर दोघे स्वातीच्या मृत शरीराजवळ बसून शांत गप्प बसून राहिले. मुलीची झालेली हत्या बघून दोघांना जबर धक्का बसला असावा, सकाळ झाली, मुख्याध्यापक सहज भेटायला म्हणून आले आणि समोर घडलेला प्रकार बघून घाबरले. ते धावत गावात गेले आणि गावकऱ्यांना जमवून घेऊन आले.

धक्क्यातून दोघेही सावरले नाही आणि शिरीष सुशीलाला वेड लागलं. पोलिसांनी दोघांना पण अटक केली. मुख्याध्यापकांची साक्ष झाली, नवरा बायको दोघांना वेडाचे झटके येत असावे असं त्यांनी सांगितलं, शिरीष नवीनच नोकरीवर रुजू झाला होता. साक्ष पुराव्यांचा आणि वैद्यकीय चाचणीचा आधार घेऊन कोर्टाने दोघांना मेंटल हॉस्पिटल मध्ये पाठवण्याचे आदेश दिले.

सुशीला आणि शिरीष आजपर्यंत त्या धक्क्यातून बाहेर पडले नाही. आजही दोघे पुण्याच्या मेंटल हॉस्पिटल मध्ये आपल्या आयुष्याचे दिवस घालवत आहेत. मुख्याध्यापकांनी गावात मात्र शिरीष बरोबर होणारा प्रकार सांगितला. नागाव मधलं ते माळावरचं घर असच ओसाड पडून राहिलं.

# " पाऊस "

माझे आजोबा मिल्ट्री मधून निवृत्त झाले आणि मुंबईला घाटकोपरला एका कंपनीत कामाला लागले, तिथेच एक चाळीत त्यांनी एक खोली विकत घेतली. पावसाळ्याचे दिवस होते, हे लहापणापासून गावात राहिलेले म्हणून ह्यांना खेकडे पकडायची आवड, त्या काळात घाटकोपर म्हणजे आत्ता सारखं न्हवतं. चाळीच्या जवळच एक डोंगर होता, आजोबांनी त्यांच्या एका मित्राला दगडूला सोबतीला घेतलं, अंगावर घोंगडी हातात काठी आणि एक कंदील घेऊन ते निघाले, पाउस धो धो कोसळत होता, हे त्या डोंगराच्या पायथ्याशी पोहोचले, दगडूला पिशवी पकडायला सांगितलं आणि हे एक एक करत दगड उचलून बघायला लागले, खेकडी सापडायला लागली, आजोबा खेकडा पकडून दगडूच्या पिशवीत टाकायचे, हळू हळू ते वर वर जाऊ लागले, भरपूर खेकडी मिळायला लागली, दगडू तसा घाबरट तो सारखं आजोबांना सांगत होता, अरे नको वर इथे पायथ्यालाच बघू काय मिळतात काय, आजोबा बोलले अरे आज जाम खेकडी मिळताएत काय नाय होत चल. . .

डोंगराच्या मध्यावर गेल्यावर दगडूला थोड्या अंतरावर एका दगडावर बसून विडी फुकणारा कोणीतरी दिसला, त्याने आजोबांना सांगितलं, आजोबांनी बघितलं त्यांना दिसला तो. ते म्हणाले अरे आला असेल कोण हागायला. . . . . . आणि ते परत खेकडी पकडत बसले, हळू हळू ते आणखी वर गेले, आज पर्यंत एवढी खेकडी कधीच भेटली न्हवती. . . म्हणून आजोबा खुश होते. . . . तो माणूस पुन्हा त्यांना दिसला. . . परत एका दगडावर बसून विडी फुकताना. दगडूने पुन्हा दाखवला. . अरे तो बघ तो इथं पण दिसतोय, आजोबांनी पुन्हा नजर

टाकली तर खरोखर तो होता. त्यांना संशय आला. . .ही एवढी खेकडी कधीच मिळत नाहीत मग आज कशी काय, बघता बघता त्यांच्या कडच्या २ पिशव्या भरल्या. . . . . आजोबांना संशय आला, आत्ता ते डोंगराच्या मध्य भागावर होते, आत्ता तो माणूस ह्यांच्या जवळ जवळ यायला लागला होता. दगडूला घाम सुटला होता, आजोबांनी त्याला हळूच सांगितलं, खेकडी पकडायचं नाटक करत रहा आपण हळू हळू इथून खाली उतरुया, घाबरून जाऊ नको मी तुझ्या सोबत आहे सांगतो तसं कर. . . हळू हळू दोघे डोंगराच्या खाली उतरले, आत्ता तो माणूस ह्यांच्या एकदम जवळ येऊन उभा राहिला आणि बोलला. . . " ए खेकडी आण इकडं "

दोघांनी मागे वळून बघितलं तरही १०-१२ फुटाची आकृती. . . . हा लांब सडक माणूस उभा. दोघे पण पार घाबरले. आणि चप्पल टाकून धावत सुटले, धावून धावून धाप लागली पण हातातल्या पिशव्या तश्याच होत्या. ते चाळीच्या जवळ आले, आणि बघतात तर काय दोन्ही पिशव्या रिकाम्या होत्या, पिशवीत फक्त १-२ खेकडी होती, पिशवीचं तोंड बांधलेलं होतं मग खेकडी गेली कुठे.

ते दोघे पण समजून गेले ते भूत त्यांना डोंगरावर घेऊन जात होतं, त्यांना मिळणारी खेकडी हा फक्त भास होता. दोघांचा जीव वाचला, पुन्हा कधीच ते त्या डोंगरावर गेले नाहीत.

नंतर समजलं कि त्या डोंगरावर नेऊन खूप लोकांचे खून पण झाले होते.

# " जंगल "

उन्हाळ्याचे दिवस, अक्खा गाव अंगणात मांडवा खाली झोपायचा, गजानन पण दिवसभर काम करून दमला होता, अंगणात झोपला होता नेहमीप्रमाणे, हवेत गारवा यायला सुरवात झाली आणि गजाननला झोप लागली.

रात्री सुमारे २ वाजल्याच्या आसपास, त्याचा मेहुणा आला सखाराम.

“ए गजानन चल”, त्याने गजाननला हळूच उठवला. म्हणाला, “अरे चल जरा जाऊन येऊ.”

सखाराम म्हणजे लाकडं चोर, जंगलात चांगलं झाड बघायचं आणि ते रात्रीत तोडून विकायचं हा ह्याचा धंदा, गजाननला वाटलं तोडलं असेल ह्याने एखादं झाड नेहमीप्रमाणे. तो पण उठला आणि त्याच्या मागे मागे जंगलाकडे चालायला लागला, अर्धा तास झाला दोघे चालत होते, सखाराम पुढे आणि हा मागे.

पण आत्ता चालून चालून साधारण १ तास उलटला, गजानन सारखं विचारत होता, " अरे कुठे तोडून ठेवल आहेस झाड " पण सखाराम काहीच बोलत न्हवता, आत्ता मात्र कहर झाला, २ तासाहून अधिक वेळ उलटली, आत्ता पर्यंत गाव पण दिसेनासं झालं होतं, डोंगराच्या माथ्यावर पोहोचले होते दोघे.

आत्ता गजानन थांबला, बोलला “थांब, जाऊया परत चल, उद्या बघू,”

पण सखाराम पलटला नाही, गजाननला थोडा संशय आला, त्याने विचारलं कोण कोण आहेस कोण तू? , तेवढ्यात सखाराम धावत समोरच्या आंब्याच्या झाडावर चढला, तो एवढ्या वेगाने त्या झाडावर चढला कि गजानन बघत बसला, आणि मग सखारामने अक्खा आंबा हालवला, जोर जोरात एवढं मोठ आंब्याचं झाड हालवायला लागल्यावर गजानन पार घाबरला, समजून गेला हा सखाराम नाही हे दुसरंच काहीतरी आहे.

त्याने जोरात मिळेल त्या वाटेने गावाकडे धाव घेतली, ओरडत किंचाळत तो पळत होता पळत होता, आणि घामाघूम होऊन गावाच्या वेशीपाशी पोहोचला, तोच मागून एक जोरात आवाज आला " वाचलास वाचलास आज तू, " आणि गरम गरम रेती ह्याच्या पाठीत येऊन बसली.

कसा बसा घरी पळत पळत आला पार घाबरला होता. घरी आल्यावर तो हे सगळ्यांना सांगतच होता, कि तेवढ्यात बाजूच्या गावातून २ माणसं सायकलवर आली, त्यांनी निरोप दिला कि सखाराम मेला आहे, बैलगाडी खाली अडकून मेला.

हे ऐकताच गजान तापाने फणफणला. आजही त्या आंब्याच्या झाडाकडे कोणी फिरकत नाही, सखाराम काही लोकांना आजही दिसतो.

# " कॉलनी "

१९९८ साली, मी दहावीला होतो, पावसाळ्याचे दिवस होते, कोकणात म्हणजे मुसळधार पाउस, आम्ही एका घरात भाड्याने राहायचो, वर माडीवर, वर जायला जिना होता, एक माणूस जाईल एवढाच. त्या वेळी आमच्याकडे टी. व्ही. न्हवता, कॉलनीच्या मित्राकडे जायचो टी. व्ही. बघायला, आहट मालिका खूप आवडायची, नियमित बघायला जायचो दर गुरुवारी.

एक दिवस लवकर जेवलो आणि मालिका बघायला गेलो, जाताना पाउस न्हवता म्हणून छत्री नाही नेली. मालिका संपणारच होती तेवढ्यात लाईट गेली, आणि जोराचा पाउस चालू झाला, मी थोडा वेळ पागोळीला उभा राहिलो, पण पाउस काय थांबत न्हवता, विजांचा कडकडाट होत होता, जोराचा वारा पण सुटला होता, कॉलनीत म्हणजे घनदाट झाडं झुडपं होती. . . मी नंतर शेवटी भिजत धावत निघालो, घराजवळ आलो, दमलो होतो धावून, समोर बघितलं तर आमच्या पायरीवर केस मोकळे सोडून एक बाई, त्या पावसात भिजत बसली होती, तिला बघून मी दचकलो, च्यायला पावसात कोण ही. . . थोडा घाबरलो, आणखी थोडं पुढे गेलो.

मी जसा पुढे गेलो, ती बाई ताठ उभी राहिली आणि माझ्याकडे बघून जोरात हसली. तिचं ते कर्कश हसणं ऐकून माझी पार वाटच लागली. मी घाबरून जोरात ओरडलो. ओरडताच तिने मला जोरात धक्का मारला ती अंधारात आमच्या गल्लीत धावत गेली, गल्लीत जाताच एक जोरात आरोळी ऐकायला आली, मी मागे सुसाट धावत परत मित्राच्या घरी गेलो.

नंतर सगळे लोकं जमले, कारण ती खूपच जोरात किंचाळली होती, सगळीकडे आरडाओरड झाला, मी घाबरून सगळयांना सांगत होतो, काही लोकं टोर्च घेऊन आमच्या गल्लीत गेले बघायला पण तिकडे कोणीच न्हवतं.

सगळयांनी माझी समजूत पण काढली, पण माझ्या मनातून ती गोष्ट अजूनही गेली नाही.



# " साधू आणि भूत "

धरणाची वाडी नावाचं एक गाव होतं. मुंबई गोवा हायवेवर रस्त्याच्या नजीकच वसलेलं हे गाव. गाव हायवेच्या नजीक असल्यामुळे ह्या गावातल्या खूप लोकांनी हायवेवर झालेले अपघात बघितले होते. महिन्यातून २-४ असे अपघात व्हायचे कि त्यात माणसं मरायची.

स्वाती पण ह्याच गावातली. नवीनच लग्न झालं होतं. गावापासून किमान ३ किलोमीटर अंतरावर एक अंगणवाडी होती. स्वाती तिथे जाऊन आदिवासी मुलांची अंगणवाडी चालवायची. त्या अंगणवाडीपर्यंत जायला पायीच जावं लागायचं. सकाळी ७ वाजता घरातून ती निघायची आणि संध्याकाळी साधारण ३-४ पर्यंत घरी पोहोचायची.

एक दिवस मुसळधार पाउस पडत होता. सगळीकडे पाणी जमा झालं होतं. पायवाट पण दिसेनासी झाली. जिकडे तिकडे पाणीच पाणी. पावसाने काळोख केला होता. स्वातीला कळेना आत्ता घरी जायचं कसं! वाटेत एक नदी होती. नदीला पण पूर आला होता. नदी ओलांडून जायचं कसं? पण नाही गेली तर खूप उशीर होईल. अंधार दाटत चालला होता. तिने धाडस केलं आणि ती त्या नदीत उतरली. पाय सटकला तोच ती वाहून जायला लागली. . . डोकं एका दगडावर आपटलं आणि ती बेशुद्ध झाली.

स्वाती घरी आली नाही म्हणून सगळीकडे शोधाशोध चालू झाली. रात्रीच्या अंधारात गावातली खूप लोकं हातात Torch घेऊन त्या आदिवासीवाडीच्या दिशेने निघाले. प्रत्येक जण तिला हाका मारत होता. स्वाती स्वाती स्वाती स्वाती. मग एकाला थोडा संशय आला त्याला वाटलं आपण नदीत शोध घेऊया. कारण इतर कुठेही ती जाईल असं वाटत नाही.

म्हणून नदीच्या दोन्ही बाजूने लोकांनी शोध घ्यायचं ठरवलं. तोच एकाची नजर अचानक नदीच्या बाजूला असलेल्या वडाच्या झाडाखाली गेली. झाडाखाली त्याला स्वातीच्या डब्याची पिशवी दिसली. त्याने वर पाहिलं तर स्वाती झाडावर बसली होती. मग सगळ्यांनी एकमेकांना हाका मारून जमवलं. म्हणाले ती बघा तिकडे.

सगळ्यांनी तिला खाली उतरवलं. तिच्या डोक्याला मार बसला होता. ती काहीच बोलत न्हवती. नवऱ्याने घरी आणली डोक्याला हळद लावली. तिला जेवण वाढलं आणि झोपायला सांगितलं. १०-१५ दिवसात ती पुर्ववत झाली. पण स्वातीचं बोलणं खूप कमी झालं होतं. सासू तिला टोचून बोलायचीही काय भूता सारखी गप्प गप्प असते. बोलत नाही. फक्त काम करत बसलेली असते.

एक दिवस स्वातीने अंघोळीला पाणी तापवलं. बादलीत ओतलं आणि ती बादली घेऊन ती मोरीत गेली. जाताना तिच्या ओल्या पायांचे ठसे सारवलेल्या जमिनीवर उमटले होते. सासूने बघितलं आणि ती दचकली. पायाचे ठसे उलटे होते. सासूला संशय आला. म्हणून तिने मुद्दाम मोरीत डोकवलं तर स्वाती ते कडक गरम पाणी असंच अंगावर ओतून घेत होती.

झाला प्रकार सासूने तिच्या नवऱ्याला सुधीरला सांगितला. त्याने म्हातारीला वेड्यात काढली. म्हणाला तुचं तिचं भांडण आहे. . म्हणून काही बडबड करू नको.

असेच दिवस निघून गेले.

एकदिवस सुधीर शेतावरून घरी परत आला. दुपारची वेळ होती. दारावर एक साधू आला. " भिक्षां देई "

सुधीर स्वातीला बोलला. “ए स्वाती त्याला काहीतरी दे. भात भाजी काय असेल तर दे.” म्हणून स्वाती पुढे गेली.

तोच तो साधू जोरात ओरडला. “हे हट मागे! कोण आहेस तू? बोल, कोण आहेस तू? कुठून आलीस? बोल!. . . .”

हे ऐकताच सुधीर बाहेर आला. म्हणाला “ए काय झालं रे बोंबलायला.”

तेवढ्यात स्वाती घरात पळाली.

साधू बोलला “ती बाई कोण आहे?”

“माझी बायको.”

“बोलाव तिला बाहेर.”

सुधीरने साधूला दम दिला. “निघ इथून नाहीतर मार खाशील.”

तेवढ्यात सासू आली. बोलली “काय झालं?”

साधू बोलला “ती बाई नाही आहे. बोलवा तिला बाहेर. ती तुमची सून नाही तुमची बायको नाही ते काहीतरी वेगळच आहे.”

सासूला तेच हवं होतं. सासू बोलली “थांब आत्ता घेऊन येते.”

म्हणून सासू आत गेली पाठोपाठ सुधीर गेला. . . . आणि बघतात तर काय स्वाती माळयाच्या वाशाला जाऊन उलटी लटकली होती आणि डोळे मोठे करून हसत होती. सासू किंचाळली सुधीर पण ओरडला. हे ऐकताच आजू बाजूची माणसं त्या घराकडे धावली. . . . . . साधू पटकन घरात घुसला आणि झोळीतून विभूती काढून तिच्यावर फेकली. विभूती अंगावर पडताच स्वाती धाड करून जमिनीवर कोसळली. साधूने सगळयांना बाजू केलं. तिच्या जवळ गेला. म्हणाला गेली ती निघून. आसरा घेऊन राहिली होती ह्या घरात.

साधूने सुधीरला सांगितलंही बाई १५-२० दिवसांपूर्वीच मेली आहे. हिचा कधी अपघात झालाय का तुमच्या गावाच्या रोडवर. सुधीर बोलला नाही पण १५ दिवसांपूर्वीही नदीत पडली होती रात्री. डोक्याला मार बसला होता. आणिही वडाच्या झाडावर बसली होती. साधू बोलला त्याच वडाच्या झाडावरचीही बया होती.ही परत त्याच झाडावर गेली आहे. जाऊ नका त्या झाडावर आणि हिला जाळून टाका. मेली आहे हि.

सुधीरने तिचे अंत्यसंस्कार केले. नवीनच लग्न झालं होतं स्वातीचं पण तिचा हा दुर्दैवी अंत त्याला हेलावून गेला.

# "विहीर "

मुंबई गोवा हायवेवर मेढा गावात दिनेशचे आजी आजोबा रहात होते, दिनेश शिकायला मुंबईला होता, आई वडील आणि तो. गणपतीला दिनेश आपल्या मित्रांसोबत गावाला आला होता. पाउस कमी झाला होता, दिनेश आणि त्याचे मित्र गावाबाहेर फिरायला निघाले. घरातून निघताना आजी बोलली, दिन्या जास्त लांब जंगलात जाऊ नका रे. आणि त्या बेड्यात असलेल्या विहिरीत उड्या मारू नका. दिनेश हो हो करत घरातून बाहेर निघाला.

त्याच्या मित्रांनी दारूची बाटली आणली होती. जंगलात जाऊन पार्टी करायचा बेत ठरला. दिनेश त्याचे 2 मित्र अमित सचिन आणि सोनाली, दिनेशची प्रेयसी. सगळेजण चालत चालत जंगलात निघाले. घरातून निघताना भाकऱ्या आणि मटण बांधून घेतलं. आत्ता दुपार झाली, पाउस आज कमीच होता, सगळे सुकेच्या सुकेच. सगळे झाडाच्या सावलीला बसून जेवले, दारू पण प्यायले, अमितने टेप आणला होता, गाणी लावून सगळे नाचले.

आत्ता सुमारे ४ वाजले होते. परतीच्या मार्गावर निघाले. गावापासून थोड्या अंतरावर असलेल्या बेड्यात पोहोचले. तोच सोनालीने दिन्याचा हात पकडला, बोलली दिन्या विहीर. चला धमाल करूया अमित म्हणाला ए नको आजी बोलली होती विहिरीत उड्या मारू नका. पण त्याचं कोणीच ऐकलं नाही. सगळयांनी एक एक करून विहिरीत उड्या टाकल्या. सोनाली मात्र वर उभी राहून सगळयांचे फोटो काढत होती. दिन्याने आग्रह केला ए सोनाली राहू दे फोटो, तू पण ये. टाक. टाक उडी.

सोनाली पण मूड मध्ये होती. क्यामेरा ब्याग मध्ये ठेवला आणि ती एक एक पायरी पकडून उतरायला लागली. तोच ती अचानक पाण्यात पडली पाण्यात पडल्यावर सगळे



जण तिच्याशी मजा मस्करी करायला लागले. पण ती पार घाबरलेली होती. ती वारंवार दिनेशला सांगत होती, दिन्या मला कोणीतरी केसं पकडून ढकललं. सगळे तिची पुन्हा मस्करी करायला लागले तिच्या बोलण्याकडे कोणीच लक्ष दिलं नाही.

थोड्या वेळाने पोहून झाल्यावर सगळ्यांनी विचार केला चला निघूया आत्ता. हे शब्द ऐकताच त्या विहिरीत एक विचित्रपणे हसण्याचा आवाज आला, तो आवाज एवढा कर्कश आणि विचित्र होता कि तो ऐकताच सोनाली जोर जोरात रडायला लागली. अमितने विहिरीची पायरी पकडली, पण कोणीतरी पाण्याखालून त्याचा पाय खेचला. सोनाली किंचाळली तिने दिनेशला घट्ट पकडलं, आणि डोळयादेखत अमित पाण्यात बुडाला. तोच सोनालीला पाण्याखाली ओढलं. एवढ्या झटकन पाण्यात बुडाली कि दिनेश बघतच बसला. सचिन आणि दिनेश दोघेही हात पाय मारून विहिरीच्या पायऱ्या पकडण्याचा प्रयत्न करायला लागले. सचिन पायरीवर चढला, त्याने दिनेशकडे न बघता वरची पायरी पकडली.

दिनेश पहिल्या पायरी पर्यंत पोह्चलाच होता कि तेवढ्यात, सोनाली पाण्याच्या वर आली तिने दिनेशला हाक दिली, वाचव मला दिनेश, सचिन आणि दिनेशने ताबडतोब पाण्यात उड्या टाकल्या सोनालीचा हात पकडला आणि तिला खेचायला लागले. दोघांचे हात झटकून त्यांच्या समोर सोनाली पाण्यावर उभी राहिली, डोळे पांढरे केले जीभ बाहेर काढून एक केविलवाणा आवाज करायला लागली. सचिन आणि दिनेश ओरडत होते वाचवा वाचवा, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. सोनालीने त्या दोघांना पाण्यात बुडवून ठार केलं.

संध्याकाळ झाली काळोख पडला अजून पोरं का आली नाही म्हणून आजी आजोबा सगळयांना विचारत सुटले, संपूर्ण गाव निघाला पोरांना शोधायला पण पोरांचा पत्ता लागला नाही. तोच एकाची नजर विहिरीवर गेली पोरांचे कपडे दिसले. पण पोरं कुठेच न्हवती. संशय आला. पण विहिरीत गण्या बेल्दाराची बायको आहे हे सगळयांना माहिती होतं, म्हणून कोणी आत उतरायला तयार होईना. ५-६ लोकांनी सकाळी पोलिसांना बोलावलं.

आत्ता सकाळचे ९ वाजले होते एक एक करून प्रेतं फुगून वर यायला लागली होती पोलिसांनी सगळी प्रेतं पोस्टमॉटमला पाठवली. निकाल आला कि पोरं दारूच्या नशेत पाण्यात बुडाली. वर्तमान पत्रातही अश्याच बातम्या छापून आल्या कि मुंबईची ४ पोरं दारूच्या नशेत विहिरीत बुडून ठार. पोलिसांनी क्यामेरा तपासून बघितला तर प्रत्येक फोटोत त्यांना एक खेडवळ बाई त्या पोरांसोबत विहिरीत अंघोळ करताना दिसली. गावात चौकशी केल्यावर समजलं ती गण्या बेल्दाराची ८ वर्षांपूर्वी मृत झालेली बायकोच होती.

नंतर खूप दिवस लोकांना त्या विहिरीतून किंकाळया ऐकायला येत होत्या. गावकिने ठरवून आत्ता ती विहीर कायमची बुजवून टाकली आहे. लोकं म्हणतात अजूनही गण्या बेल्दाराची बायको त्या बुजलेल्या विहिरीवर बसलेली दिसते.

# " फेसबुक"

शशी इंजिनियरिंगला शिकायला गेला, त्या वेळी फेसबुक नवीनच होतं. मित्रांनी सांगितलं “अरे तू फेसबुकवर आहेस काय?”

म्हणाला “नाही”.

“अरे मस्त आहे ते. तिकडे जाम आयटम कटतात (मुली पटतात )”

शशी पण तरुणच होता. स्वाभाविकच आहे त्याला ह्या नवीन जगाचं आकर्षण वाटलं. संध्याकाळी त्याने नवीन खातं उघडलं. दिवसभर कॉलेजातून घरी आला कि हा फेसबुकवर तासंतास बसायचा. सुरवातीला कॉलेजातलेच मित्र मैत्रिणी भेटायचे. हळू हळू तो इतर अनेक ग्रुपवर जायला लागला, पेजेस ना विझिट द्यायला लागला. एक दिवस ह्याने आपलं फेसबुक नेहमीप्रमाणे उघडलं. एक फ्रेंड्स रिक्वेस्ट आली होती, अनघा कुलकर्णी. फोटो पण सुंदर होता, शशीने लगेच ती रिक्वेस्ट एक्सेप्ट केली. तिची प्रोफाईल उघडून बघितली. ती पुण्याची होती. आणि हा लोणावळयाचा. म्हणजे अंतर काही जास्त न्हवतं. दोघं मग एकमेकांसोबत बोलायला लागले, वर्ष ६ महिने बघता बघता निघून गेले, दोघांची ओळख वाढली. आणि हळू हळू दोघंही एकमेकांच्या प्रेमात पडले.

तारीख होती २१ जुलै २००८, अनघाने एकदिवस शशीला फोन केला. दोघांनी खूप गप्पा मारल्या, तुझ्या घरी कोण कोण असतं, अनघा बोलली माझी मम्मा, पप्पा आणि मी

आम्ही तिघेच असतो. अनघाने पण शशीला विचारलं आणि तुझ्या रे. . . शशी म्हणाला मी एकटाच आहे. एकटाच आहेस. . . . . हाहाहा कशाला मस्करी करतोस. मग राहतोस कुठे. गवरमेंट पॉलीटेक्निकच्या हॉस्टेल मध्ये. खोली क्रमांक ३२. अनघा पुन्हा हसत हसत म्हणाली आणि घर. तिकडेच राहतो मी. अनघा मस्करीत म्हणाली काय भूत आहेस काय. शशी बोलला हो.

अनघा :- ए बस कर हा आत्ता मला भीती वाटायला लागली आहे. आणि ती पुन्हा हसायला लागली. जोकरच आहेस तू.

पुन्हा दोघं फेसबुकवर भेटायचे फोनवर बोलायचे चालूच होतं. एक दिवस अनघाला शशी चं स्टेट्स दिसलं कि. . . . Birthday. अनघाने ताबडतोब शशीला फोन करून भेटायचं ठरवलं. शशीने पण होकार दिला. भेटायचं ठरलं, लोणावळा स्टेशन. अनघा पुण्याहून लोणावळयाला आली. दोघांनी खूप गप्पा मारल्या. हे दोघे बाजारातून चालत असताना फिरत असताना लोकं आपल्याकडे बघून का असे बघत आहेत अनघाला कळेना. शशी तिच्या सोबत गप्पा मारत मारत दोघे एका निर्जन ठिकाणी गेले. शाशिनेच बाईकवर तिला इथे आणलं होतं. हिरवा गार निसर्ग होता. सूर्यास्त व्हायला सुरवात झाली होती. हळू हळू अंधार व्हायला लागला. शशी पण मुद्दाम तिच्याशी गप्पा मारत बसला. दोघेही एका दरीच्या बाजूला एका दगडावर बसले होते. शशीने अनघाचा हात पकडला, खांद्यावर हात टाकला.

अनघा म्हणाली. . . ए शशी काय करतोस हे. हात सोड पहिल्यांदा. शशीने हात सोडला नाही. म्हणाला अनघा I LOVE yOU. अनघा ताड करून उठली, उभी राहिली. म्हणाली. . . ए तसलं काही चालणार नाही हं. आपण फक्त मित्र आहोत. Only Friends, thats all. माझं विकी वर प्रेम आहे. (तिचा प्रियकर). आणि आम्ही लग्न पण करणार आहोत, हे ऐकताच शशी दगडावर उभा राहिला, रडत रडत म्हणाला. . . अनघा तू खेळवलस मला. का केलास असं न्हवतं प्रेम तर का आलीस भेटायला मला, का एवढे दिवस माझ्याशी नातं बनवलस, खेळवलस तू मला. आणि त्याने रडत रडत त्या दरीत उडीच टाकली. अनघा घाबरली किंचाळली. आणि तिथून धावत सुटली. धावत धावत ती हायवे वर आली. तिथून एक मिनीडोर

चालली होती. तिला हात करून ती गाडीत बसली. खूप घाबरली होती, बाजूला बसलेल्या एका बाईने विचारलं काय ग काय झालं, एवढी घाबरलेली का? तिची पार बोबडीच वळली होती. काहीच बोलू शकत न्हवती, कारण मग पुन्हा पोलीस चौकशी आणि मगही इथे का आली कोणाला भेटायला आली. . . अनेक प्रश्न तिच्या मनात आले. ती गप्प बसली. तर बाजूची बाईच तिला म्हणाली. . . . तुला पण दिसला वाटतंय तो पोरगा. . . दरीत उडी मारताना. बास. . . आत्ता मात्र अनघा बेशुद्ध च पडायची बाकी होती. गाडी बस स्थानकावर आली. बस पकडून ती थेट पुण्याला निघून गेली. आत्ता मात्र तिला धक्का बसला होता. ती समजून गेली होती तो शशी न्हवता त्याचं भूत होतं. तिने आपलं फेसबुक उघडलं, मुद्दाम ती शशीच्या प्रोफाईल वर गेली, तिने त्याच्या एका मित्राला मेसेज करून शशीबद्दल विचारलं. सगळी हकीकत समजली.

प्रेम भंग झाल्यामुळे शशीने एक वर्षापूर्वी त्याच्या वाढदिवसाच्या दिवशीच दरीत उडी मारून आत्महत्या केली होती. तो ह्या दिवशी हमखास कुणाला ना कुणाला दिसतोच दिसतो. तो राहत असलेली हॉस्टेलची खोली नंबर ३२ मुद्दाम रिकामीच ठेवली आहे.

त्या खोलीतून आजही रात्री सिगारेटचा वास येतो असं कोलेजची पोरं बोलतात.

आजही शशी चं फेसबुक खातं चालू आहे. कुणास ठाऊक त्याच्या जाळयात आत्ता कोण अडकेल.

# वीज"

रमाबाई ना २ मुलं, सुरेश आणि समीर. सुरेश लहान, २४ वर्षाचा होता. समीर चं लग्न झालं होतं. सगळं कुटुंब शेतकरी. वडील ५ वर्षांपूर्वी शेतात काम करत असताना अंगावर वीज पडून गेले होते. त्या दिवशी खूप जोराचा पाउस होता. सुरेश शेतावर गेला होता. तोच त्याला शेतावर साप चावला आणि तो जागीच मेला. नंतर कोणीतरी त्याला पावसात पडलेलं बघितलं पण त्याच्या तोंडाला फेस आला होता. डॉक्टरांनी सांगितलं कि हा ३ तासांपूर्वीच मेला आहे.

हि घटना आहे खामगावातली. तारीख साधारण जून २००४. हॉस्पिटल मधून सुरेश चं मयत गावात आणलं आणि घरात ठेवलं होतं. बाजूला दिवा पेटताच ठेवला होता. मयत बाहेरच्या खोलीत मधोमध ठेवलं होतं. घरातली लोकं नातेवाइक आणि गावातल्या बायका आत घरात बसून रडत होत्या. पुरुष मंडळी घोंगड्या टाकून बाहेर अंगणात बसले होते. कुणीतरी मुंबईहून जवळचे नातेवाइक येणार म्हणून सगळे लोकं त्यांच्यासाठी थांबले होते. त्या रात्री लाईट पण गेली होती. तोच अचानक जोरदार वारा सुटला. मुसळधार पाउस. म्हणून अंगणातली पुरुष मंडळी उठून आत आली. सगळया बायका उठून मधल्या खोलीत गेल्या. तोच दारात एक काळं मांजर आलं. कोणीतरी त्याला हुसकवून लावलं. पुन्हा ते मांजर मागच्या दराने आत आलं. घरात शिरलं आणि सुरेशच्या मयताला चाटू लागलं. सगळयांनाच तो प्रकार विचित्र वाटला. बंटी (समीरचा छोटा मुलगा)ने काठी आणली आणि त्या मांजराला पळवत पळवत मागच्या पडवीत घेऊन गेला. बंटी जोरात ओरडला. झटकन ५-६ बायका उठून मागच्या पडवीत धावल्या आणि मागच्या दारात बघितलं तर एक अनोळखी माणूस उभा होता लांब लांब केसं, पांढरे फटक डोळे तो रागाने सगळयांकडे बघत मांजरीचा आवाज तोंडाने काढत होता. . हे दृश्य बघून बायका पण किंचाळल्या. हे ऐकताच घरातले सगळे लोकं मयताच्या इथून

उठले आणि घराच्या पडवी कडे धावले. आणि त्यांच्या डोळया देखत तो विचित्र माणूस मागच्या अंधारात गायब झाला.

लोकांनी टॉर्च मारून बघितलं पण कोणीच दिसलं नाही. आत्ता मात्र सगळे घाबरले होते. काही लोकं मुद्दाम म्हणायला लागले अरे काय नाय बेवडा असेल कोणीतरी. पण झाला प्रकार सगळयांनीच बघितला होता. एक एक करून लोकं बाहेरच्या खोलीत आले खोलीतला दिवा वाऱ्याने विजला होता. कंदिलाची पण वात गेली होती. एकदम काळोख काहीच दिसत न्हवतं. बबनने कंदील लावला. . . . . तोच सगळे लोकं अबो बो बो बो भूत भूत बोंबलत त्या घरातून बाहेर पळाले. बायका मात्र त्या मधल्या खोलीत आरडा ओरड करत किंचाळत होत्या. मागच्या दारात घडलेल्या घटनेमुळे त्यांना मागच्या दराने पण पाळता येईना.

पुढच्या खोलीत सुरेशची बॉडी हात पाय ताठ करून उभी होती. बाहेर पळालेली माणसं आजूबाजूच्या अंगणात उभे राहून बघत होते. खूप लोकांनी हातात काठ्या घेतल्या. तोच त्या घराच्या अंगणात बसलेली कुत्री केविलवाणी रडायला लागली. आणि सुरेशची बॉडी खूप जोरात धावत त्या घरातून निघाली आणि समोरच्या घराच्या गल्लीतून मागे नदी कडे जाणाऱ्या शेतातून धावत गेली. सगळा गाव त्या दिशेने काठ्या घेऊन धावत सुटला पण काळोखात सुरेश कुठे निघून गेला कोणालाच समजलं नाही. सगळे लोकं परत आले. मांत्रिक बोलावला. आत्ता सकाळचे ५ वाजले होते. पुन्हा गावकरी ती बॉडी शोधायला. मांत्रिक जोडीला होताच. बॉडी सापडली. नदीवर एका जांभळीच्या झाडावर टांगलेली. मांत्रिकाने त्या जागेवर एक नासका नारळ आणि उलट्या पिसाचा कोंबडा कापला. बॉडी गावात आणली. दिवसा उजेडात त्याच्यावर अंत्यसंस्कार केले.

आजही खामगावात मयत झालं कि नासका नारळ आणि उलट्या पिसाचं कोंबड घरा बाहेर ठेवण्याची प्रथा आहे. गावातले लोकं आजही ती रात्र विसरले नाहित.

# " बंगला "

मांत्रिक एका पाठोपाठ एक मंत्र मारतच होता पण चैताली त्याच असुरी आवाजात गुरगुरत होती " इसको समजा नही क्या मेरी कबर पर घर बनवा गयी हरामजादी. इसको मै लेकर इच जाउंगी.”

गारळ गावातलीही घटना. ऐतिहासिक वारसा असल्यामुळे ह्या गावात लहान मोठे असे अनेक वाडे होते. श्रीधर हा अमेरिकेत डॉक्टर होता. एकदा तो गावी आला असताना त्याच्या काकांनी सांगितलं गावातल्या एका माणसाचा वाडा विकायचा आहे. ते कुटुंब पुण्यात राहायला असतं. कधीतरी ४-५ वर्षातून ते इकडे येतात. वाडा पडीक आहे. कमी किमतीत सोडेल. कितीला सोडेल? २० लाखात तयार होईल. श्रीधर आणि चैताली त्याची बायको दोघेही वाडा बघून आले. वाड्याची जागा साधारण १ एकर होती. त्यात हा मोडकळीस आलेला वाडा. श्रीधरने विचारलं एवढ्या कमी किमतीत एवढी मोठी जागा आणि हा वाडा का विकत आहेत ते लोकं काका म्हणाले इथे थोडी गडबड आहे. लोकं म्हणतात ह्या जागेत भुताटकी आहे. श्रीधर आणि चैताली दोघेपण हसले...त्यांच्या जोडीला काका पण मुद्दाम हसले. चैताली वाड्यात फिरायला लागली. खूप जुना वाडा होता. किमान १०० - १५० वर्षांपूर्वीचा असावा. वाड्याला मोठा माळा होता. मागे विहीर तिच्यावर एक मोडकं रहाट आणि त्याला लागलेला दोर.

श्रीधर आणि चैतालीने ठरवलं इथे एक प्रशस्त बंगला बांधूया. अमेरिकेत राहायला असल्यामुळे श्रीधर कडे बक्कळ पैसा होता. दोघेही नवरा बायको डॉक्टर ह्या भूत प्रेत विषयांवर त्यांचा अजिबात विश्वास न्हवता. झालं सौदा ठरला आणि श्रीधरने तो वाडा विकत घेतला.

श्रीधरला गावातल्या एका माणसाने सांगितलं होतं हा वाडा ज्या जागेवर उभा आहे तिथे पूर्वी काळी कब्रस्तान होतं असं जुने लोकं बोलतात. तिथं एका बाई चं भूत आहे. चैतालीने ते हसण्यावारी घालवलं. श्रीधरने त्या जागेवर बंगला बांधायला शहरातल्या बड्या बिल्डरला कंत्राट दिलं आणि तो अमेरिकेत निघून गेला. वर्षभरात बंगला तयार झाला. कामात व्यस्त असल्यामुळे त्याने चैतालीला भारतात पाठवलं. ती काकांकडे उतरली होती.

दुसऱ्या दिवशी ती काकांसोबत बंगला बघायला गेली. आत्ता ती जागा पूर्वी सारखी भयाण वाटत न्हवती. बंगला बघून काका पण खुश झाले. बघता बघता दुपार झाली. काका म्हणाले तू थांब इथेच जेवणाचा डबा इथेच घेऊन येतो. काका निघून गेले आणि चैताली संपूर्ण बंगल्याचा व्हिडियो बनवण्यात मग्न झाली. तोच तिला बाथरूम मधल्या नळाचा आवाज आला. नळातून पाणी आपोआप चालू होतं. तिने जाऊन नळ बंद केला. वाटलं काका चुकून उघडा ठेवून गेले असतील. तोच वरच्या मजल्यावर दरवाजा आपटण्याचा आवाज ऐकू आला. कॅमेरा तिच्या हातातच होता. ती एक एक पायरी वर चढून जायला लागली. पायरीवर कोणाचे तरी ओले पाय दिसत होते. तिला वाटलं नक्की वर कोणीतरी आहे. पण वर कोणीच न्हवत. ती वरच्या खिडकीतून पुन्हा व्हिडियो शुटींग करायला लागली. तिची नजर विहिरीवर गेली. कोणीतरी बाई बुरखा घालून त्या विहिरीवर रहाटाने पाणी उपसत होती. आणि सगळा चिखल करत होती. चैताली खिडकीतूनच ओरडली “कोण ग तू काय वेड लागलंय काय तुला. कशाला चिखल करत बसलीस” आणि चैताली खाली उतरून त्या विहरीच्या दिशेने गेली. ती बाई तशीच उभी होती. चैताली जवळ जाताच तिने आपले डोळे फिरवले आणि हिंदीत बोलायला लागली ...

“ गिरह-बाज नटनी का जाया. चलती बेर कबूतर खाया. पीवे दारु. खाय जो मांस. रोग-दोष को लावे फाँस। कहाँ-कहाँ से लावे गी? गुदगुद में सुद्रावेगी. बोटी-बोटी में से लावेगी. चाम-चाम में से लावेगी. नौ नाड़ी बहत्तर कोठा में से लावेगी. मार-मार बन्दी कर लावेगी.

चैतालीने तिचा आवेश बघितला आणि ती घाबरली. ए ए कोण तू काय बडबडतेस तर ती बाई बोलली " हरामजादी मेरेकू निकलेगी इधर से. मै तेरीकू लेके इच जायेगी " आणि रागाच्या भरात ती बाई तो रहाट टाकून मागच्या जंगलात पळून गेली.

काका जेवण घेऊन आले आणि बघितलं तर चैताली घामाने भिजली होती बंगल्याच्या बाहेरच उभी होती. तिने झाला प्रकार काकांना सांगितला. ऐकून काका दचकले. म्हणाले “घाबरू नको आपण मांत्रिकाला बोलवून घेऊ. आणि सोक्षमोक्ष लावून टाकू.”

चैताली काकांवर रागाच्या भरात बोलली …”हे असले धंदे माझ्या बंगल्यात नको मला. हे मांत्रिक बिन्त्रिक असले फालतू लोकं इथे बोलावू नका.”

दुसऱ्या दिवशी श्रीधर आला. तिने श्रीधरला काहीच सांगितलं नाही. दोघेही बंगल्यात राहायला गेले. रात्र झाली. दोघांनी कामक्रीडा आटोपली. श्रीधरला तहान लागली त्याने चैतालीला पाणी आणायला सांगितलं. चैताली उठून गेली. श्रीधर झोपेतच होता. चैतालीने पाण्याचा ग्लास पुढे केला. तो डोळे झाकूनच पाणी प्यायला. आणि दोघेही पुन्हा झोपले.

श्रीधरने चैतालीच्या अंगावर हात टाकला. तिला जवळ घेतलं पण त्याला एक घाणेरडा उग्र वास आला आणि तो झटकन उठला. त्याने लाईट लावला आणि बघतो तर त्याच्या बेड वर एक बुरखा घातलेली बाई झोपली होती. तो बेड वरून बाजूला पळाला. ए कोण तू? विचारताच ती खिदळायला लागली …. तो जोर जोराने चैतालीला हाका मारू लागला. हळू हळू एक एक पाउल टाकत चैताली पण बेडरूम मध्ये आली. केसं मोकळे होते. तिने स्वतःला पाण्याने भिजवून घेतलं होतं आणि आत्ता दोघीही एका सुरात बोलत होत्या " हरामजादी मेरेकू निकलेगी इधर से. मै इसकू लेके इच जायेगी "

श्रीधर ओरडत किंचाळत रात्री ३ वाजता त्या बंगल्यातून बाहेर पळाला. चैताली वर गच्चीवर उभी राहून मोठ्याने हस्त खिदळत होती. श्रीधर थेट काकांच्या घरी पळाला. झाली हकीकत काकांना सांगितली. चैताली कुठे आहे. ती बंगल्यातच आहे. तिला झपाटलय.

काकांनी ताबडतोब आपली स्कूटर काढली आणि दोघेही मांत्रिकाकडे गेले. मांत्रिक बोलला “त्या वाड्यातलं भूत लय जुनं हाय. चला आज त्याचा बंदूबसतच करून टाकू.”

मांत्रिक हे दोघे आणि गावातली ८-१० लोकं त्या बंगल्यात शिरले वरच्या खोलीतून आवाज येत होता. . . . . गिरह-बाज नटनी का जाया. चलती बेर कबूतर खाया. पीवे दारु. खाय जो मांस. रोग-दोष को लावे फाँस। कहाँ-कहाँ से लावेगा? हा हा हा हा हा एक असुरी हसणं.

मांत्रिकाने मंत्र मारायला सुरवात केली. तोच चैताली धावत खाली आली आणि बोलायला लागली. . . . . . मै इसकू लेके इच जायेगी.

मांत्रिक बोलला. कौन है तू. बच्चे को काय कु पकडा तुने. मांत्रिक एका पाठोपाठ एक मंत्र मारतच होता पण चैताली त्याच असुरी आवाजात गुरगुरत होती " इसको समजा नही क्या मेरी कबर पर घर बनवा गयी हरामजादी. इसको मै लेकर इच जाउंगी.

“कालि देवि. कालि देवि. सेहो देवि. कहाँ गेलि. विजूवन खण्ड गेलि. कि करे गेलि. कोइल काठ काटे गेलि। कोइल काठ काटि कि करति। फलाना का धैल धराएल. कैल कराएल. भेजल भेजायल। डिठ मुठ गुण-वान काटि कटी पानि मस्त करै। दोहाई गौरा पार्वति क. ईश्वर महादेव क. कामरु कमख्या माई इति सीता-राम-लक्ष्मण-नरसिंघनाथ क।”

मांत्रिकाने पुन्हा मंत्र मारला. भुत चवताळलं. चैताली झटकन तिथून पळाली आणि किचन मध्ये घुसली. मांत्रिकाने लोकांना सांगितलं पकडो उसकू. पण, तिने आतून दाराची कडी लावून घेतली. अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतलं. पेटत्या अंगाने ती बाहेर आली

आणि मांत्रिकाने आवाज दिला. भागो भागो ये औरत मारेंगी सबको ...आणि मांत्रिक त्या बंगल्यातून बाहेर पळाला. सगळे लोकं तिथून बाहेर पळाले.

आत्ता आरडा ओरड ऐकून खूप लोकं जमा झाले. श्रीधर खूप रडत होता. माझी बायको. वाचवा रे वाचवा तिला. २०-२५ लोकं त्या बंगल्यात शिरले. बघितलं तर चैताली जमिनीवर पडली होती. तिचं शरीर जळून काळं पडलं होतं. लोकांनी तिला Blanket मध्ये उचलून बाहेर आणली ताबडतोब गाडीत टाकून पाटील हॉस्पिटलला घेऊन गेले. पण चैताली मृत झाली म्हणून डॉक्टरांनी सांगितलं. झाला प्रकार सगळया गावाला सुन्न करून गेला.

श्रीधरला खूप धक्का बसला. पश्चाताप झाला आपल्या समोर आपल्या बायकोने स्वतःला पेटवून दिलं आपण वाचवू शकलो नाही. लोकं म्हणत होते मांत्रिकाची चूक झाली. तिला सगळ्यांनी पकडून आधी बांधायला हवी होती. पण वेळ हातातून निघून गेली आणि चैतालीचा जीव गेला.

चैतालीचे कार्य विधी करून श्रीधर पुन्हा अमेरिकेत निघून गेला.

" देवकी " नावाचा त्याचा तो बंगला आजही ओसाड पडलेला आहे

# " मुंबई लोकल "

किरण म्हात्रे, हा राहणारा पनवेल चा, नोकरीला वडाळयाला, दररोज पनवेल हून सकाळची CST - Panvel हार्बर लोकल पकडून हा वडाळयाला कामावर जायचा, कधी साहेबाने संध्याकाळी थांबवला तर हा थांबायचा, उशीर झाला कि शेवटची लोकल पकडून पुन्हा पनवेल. सकाळी पनवेल स्टेशनला आला कि ह्याला नेहमीची सवय, त्या पेपर स्टॉल वरून रायगड टाईम्स घेतल्याशिवाय ह्याला चुकल्या चुकल्या सारखं वाटायचं.

एक दिवस नेहमीप्रमाणे ह्याने पेपर विकत घेतला, आपल्या ठरलेल्या सीट वर बसून पेपर वाचत बसला. वडाळा आलं आणि हा उतरून निघून गेला. आज साहेबाने ह्याला उशिरा पर्यंत थांबवलं, संध्याकाळी उशीर झाला, शेवटची CST to Panvel लोकल पकडली, खचाखच गर्दी होती, थोड्यावेळाने चुनाभट्टी टाकल्यावर ह्याला बसायला जागा मिळाली. बसल्या बसल्या ह्याला डुलकी लागली, हा ज्या डब्यात बसला होता तो लेडीज डब्याच्या बाजूलाच होता. कुर्ला आलं आणि सगळी गर्दी एकदम रिकामी झाली. डबा एकदम रिकामा झाला. डब्यात हा एकटाच होता, म्हणून हा दरवाजाच्या बाजूला येउन हवा खात उभा राहिला. खिशातून फोन काढला इयरफोन लावला आणि मस्त गाणी ऐकत होता.

किरण तरुण होता, म्हणून साहजिकच त्याची नजर लेडीज डब्यात जाणार होती. समोर एक तरुणी उभी होती. हा तिच्याकडे बघत होता. तिचं मात्र ह्याच्याकडे लक्ष न्हवतं. ती आपल्याकडे बघत नाही म्हटल्यावर हा पुन्हा दरवाजातून बाहेर बघत हवेवर आपले केस उडवत उभा राहिला. वाशीची खाडी आली. कानात वाजणारी मुकेशची गाणी थंड हवा आणि समोर दिसणारी अथांग खाडी. खाडीत टीमटीमणाऱ्या लहान मच्छी बोटींकडे हा बघत होता. ट्रेन खाडीच्या मध्यावर आली. तोच ह्याला बाहेरून कोणीतरी किंचाळल्याचा आवाज आला, ह्याने झटकन बाहेर लक्ष टाकलं तर समोरच्या डब्यातून एका मुलीने खाडीत उडी टाकल्याचं ह्याला

दिसलं, हा जोरात ओरडला..."ए", ट्रेन वेगात होती, पण चंद्राच्या त्या प्रकशात ह्याला खाली पाण्यात कोणीतरी पडलेलं दिसलं. गोंधळून गेला. मनातून घाबरला होता, दरवाजातून आत्ता हा आत डब्यात आला ह्याने समोरच्या डब्यात लक्ष टाकलं त्या डब्यात कोणीच न्हवतं, आत्ता २ मिनिटांपूर्वी आपण ज्या मुलीकडे बघत होतो तिने आपल्या समोर खाडीत उडी टाकली ...ह्या विचाराने तो विचलित झाला. त्याने रितेशला फोन लावला " अबे साले अभी मेरे सामने एक लाडकी वाशी कि खाडी में कूद गयी " रितेश समोरून बोलला " गांडू मेरेको चुतीया मत बना, साले पेपर में छपी हुई खबर पढ के फेक मत" और फोन रख साले साडे १२ बजे है ....... आणि रितेशने फोन बंद केला.

कोणती सुबह कि खबर ... रितेश का असं बोलला, क़िरणला समजलं नाही. किरणचा मूड खराब झाला, तो पूर्णपणे Disturb झाला होता. घरी आला, हात पाय धुतले, आई जेवण वाढत होती, टॉवेलने अंग पुसता पुसता झालेली घटना तो आपल्या भावाला सांगायला लागला, आईने हे ऐकलं आणि बोलली ...काय काय होतंय बघ मुंबईत. काल रात्री पण एका मुलीवर बलात्कार झाला त्या CST - Panvel लोकल ट्रेन मध्ये, इथे वाशीलाच, तिने पण बिचारीने जीव दिला, आज सकाळ पासून बातम्यांना तेच दाखवत बसलेत बघ. किरणची आतुरता वाढली त्याने पटकन ए. बि. पि. माझा लावलं बातमी चालू होतीच, आणि किरण चपापला ओरडला. . . . . . . .

"आईशप्पत आई ही बघ हीच मुलगी आज पण हीच मुलगी होती ” आई किचन मधून धावत आली. . . . . . . . . . . . . . . .

२००२ चीही घटना, त्या रिकाम्या लेडीज डब्यात रात्रीच्या शेवटच्या लोकल मध्ये एका तरुणीवर बलात्कार झाला होता. आणि तिने वाशीच्या खाडीत जीव दिला होता. आपल्या समोर लेडीज डब्यातून एका मुलीने खाडीत उडी टाकली असा भास होणारा किरण म्हात्रे एकटाच नाही असे खूप आहेत CST to Panvel शेवटच्या लोकल ट्रेन मध्ये तुम्हाला असा भास झाला तर नक्की सांगा.

# " वस्तीची गाडी "

माणगाव -जिता वस्तीची एस. टी माणगावहून संध्याकाळी १० वाजता निघाली.

अंतर किमान ७० किलोमीटर. पण रस्ता संपूर्ण सह्याद्रीच्या डोंगरातून जाणारा. घनदाट जंगल आणि जंगलात वसलेली गावं. जिता गाव एका मोठ्या डोंगराच्या माथ्यावर आहे. रस्ता पण एकदम कच्चा, जुना तुटलेला रस्ता. असं अंतर कापत गाडी उदळ आपट करत नागमोडी रस्ता कापत चालली होती.

त्यादिवशी खूप कमी प्रवासी होते १२-१३ लोकं होते फक्त. मास्तरने सगळ्यांची तिकिटं काढून पुन्हा आपली सीट पकडली. एक एक करून सगळे प्रवासी उतरून गेले. आत्ता गाडी मध्ये फक्त कंडक्टर आणि ड्रायवर दोघेच. कंडक्टर दिनेश मोहिते आणि ड्रायवर शशिकांत तांबे. कंडक्टर आपल्या नेहमीच्याच जागेवर बसून तिकिटांची एन्ट्री मारत होता. आत्ता गाडी चढावावर डागेत होती. वेग एकदम कमी होता आणि इंजिनाचा आवाज खूप जोरात येत होता.

तोच अचानक गाडी थांबली. कंडक्टरला वाटलं गाडीचा गेयर अडकला असेल. म्हणून तो आपल्या सीट वरून उठून ड्रायवर जवळ आला. दोघांच्या मध्ये जाळी होती. दिनेशने शशिकांतला विचारलं काय रे काय झालं गाडी अचानक का थांबली. शशिकांत बोलला “समोर बघ.” दिनेशने आपली नजर समोर रस्त्यावर टाकली. गाडीच्या उजेडात समोर एक जंगली डुक्कर धावत चाललं होतं. शशिकांतने दिनेशला विचारलं. . . . काय करूया उडवून मारुया?

दिनेश बोलला “अरे विचार कसला करतोस. बरेच दिवस झाले डुकराचं मटण नाही खाल्लं. उडव च्यायला.”

शशिकांतने गाडीचा गेयर टाकला. डाग चढून गाडी वर आली पण डुक्कर अजून लाईटच्या उजेडातच धावत होतं. शशिकांतने गाडीचा वेग वाढवला आणि दिली धडक. डुक्कर उडालं. आणि रस्त्यावर उताणी पडलं. ताबडतोब दोघेही गाडीतून खाली उतरले. डुकराला लाथ मारून बघितली. ते मेलं होतं.

दिनेश शशिकांतला बोलला थांब मी काहीतरी आणतो शोधून.

शशिकांत :- कशाला रे?

अरे ह्याचा एक कान कापुया.

अरे पण कशाला.

लोकं बोलतात ह्या जंगली डुकराच्या शरीराचा अवयव नाही कापला तर ह्याच्यावर भूत येऊन ह्याला जिवंत करतं.

दिनेशने बाजूला पडलेलं एक धारदार दगड उचलून त्याचा कान कापला. आणि फेकून दिला.

ती अमावस्येची रात्र होती. खूप काळोख दाटला होता. एस. टी. चं इंजिन बंद असल्यामुळे रातकिड्यांचा आवाज येत होता. थंड गार हवा सुटली होती. झाडांच्या हल्ण्यामुळे त्यांच्या पानांचा पण खूप आवाज येत होता. दोघांनी ते डुक्कर उचलण्याचा प्रयत्न केला. किमान ७०-८० किलोचं असावं. एवढ्या किर्र काळोखात दोघांना आत्ता मनातून थोडी थोडी भीती वाटत होती. कसं बसं ते डुक्कर उचलून त्यांनी गाडीत आणून टाकलं. ड्रायवर खाली उतरला आणि आपल्या सीट वर जाऊन बसण्यासाठी गेला. कंडक्टर जिन्यात उभा राहून दरवाजा ओढायला गेला.

तोच त्याला दरवाजाच्या समोरून कोणीतरी धावत गेल्या सारखं दिसलं. त्याने हाक मारली "शशिकांत " शशिकांतने ओ दिली. पण शशिकांत तर त्याच्या सीट वर केव्हाचाच बसला होता. दिनेश थोडा दचकला. मग इथून कोण धावत गेलं. शशिकांतने झटकन दरवाजा ओढला आणि तो वेगाने चालत पुढे ड्रायवर कडे गेला. अरे आत्ता ह्या दरवाजाच्या समोरून कोणीतरी धावत गेला. शशिकांत :- अरे एवढ्या रात्री काळोखात कशाला कोण मरायला जातोय धावत. तू जा बस जा. मी गाडी काढतो.

शशिकांतने गाडी चालू केली. लाईट लावली. गाडी ३-४ किलोमीटर अंतर पुढे आली. शशिकांतने पुन्हा अर्जंट ब्रेक मारला. दिनेश ओरडला. काय रे काय झालं. आणि तो पुढे गेला. काय रे शशी काय झालं. अरे आत्ता गाडी समोरून आडवं कोणीतरी धावत गेलं. समजलं नाही कोण होतं. पण नक्की माणूस होता कोणीतरी. आत्ता मात्र दोघे पण दचकले होते. दिनेश समोरच्या उघड्या जागेतून ड्रायवर केबिन मध्ये गेला. जाऊ दे चल आपण निघूया इथून पटकन. गाडी चालू झाली आत्ता मात्र शशिकांतने गाडी सुसाट काढली. त्या रात्रीच्या अंधारात गाडीच्या लाईट वर शशिकांतला रस्त्याचा अंदाज येईना. पण मनातून दोघेही पार घाबरले होते. मनातल्या भीतीमुळे शशिकांत गाडी भरधाव वेगाने पळवत होता. आणि एका वळणावर एक माणूस गाडीच्या समोरच येऊन उभा राहिला. शशिकांतने त्याला वाचवण्यासाठी स्टेरिंग गरागर फिरवलं. दिनेश ओरडला शशी गेलो आपण. . . . . . .

आणि गाडी रस्ता सोडून धडाधड खाली दरीत उतरली. . . आणि पलटी झाली. गाडीने किमान ३-४ पलट्या मारून जाऊन एका झाडावर आदळली. शशिकांत समोरच्या फुटलेल्या काचेतून बाहेर फेकला गेला होता. तो बेशुद्ध अवस्थेत झुडपात पडला होता. दिनेशला पण जबर मार बसला होता. अंग सुन्न झालं होतं काहीच समजत न्हवतं. . . . . . तोंडातून आवाज येत न्हवता. दिनेशचे डोळे उघडले. दिनेश कसा बसा उठला. काळोख होता काहीच दिसत न्हवतं. त्याला. गाडीत धडाड कोणीतरी उड्या मारल्याचा आवाज येत होता. मागे डुक्कर जिवंत माणसाच्या आवाजात रडत होतं.

अगोदर दिनेशला वाटलं शशिकांत रडतोय पण नंतर त्याने वाकून बघितलं अंधुक अंधुक थोडं दिसलं. डुक्कर माणसाच्या आवाजात रडत होतं. दिनेश आत्ता भयानक घाबरला तोंडाला छातीला जबर मार बसल्यामुळे त्याच्या तोंडातून आवाज येईना आणि तो पुन्हा बेशुद्ध पडला.

काल रात्री जीत्याला गेलेली वस्तीची गाडी अजून आली नाही कंट्रोलरने एका ड्रायवरला विचारलं. काय रे काल जीत्याला कोण " सर्जा राजा गेले " रे. पटकन ड्रायवर बोलला. . . . मोहिते आणि तांबे गेलेत साहेब. अरे जरा फोन लाव बघ कुठं गाडी बंद पडली काय.

तेवढ्यात ३-४ माणसं धावत आली. साहेब तुमची कालची वस्तीची गाडी तिकडं खरवली जवळ दरीत पडलीय. ड्रायवर कंडक्टरला आमी सरकारी दवाखान्यात नेलेत.. दोघे जिवंत हायेत. जा तुमी तिकडं. आणि ती माणसं निघून गेली.

दिनेश आणि शशिकांतने झालेली घटना कंट्रोलर साहेबांना सांगितली. त्यांनी पटकन विचारलं अरे मग ते डुक्कर कुठं आहे. साल्यांनो पोलीस केस होईल तुमच्यावर. दिनेश बोलला मला सकाळी त्या माणसांनी उचललं तेव्हा ते डुक्कर गाडीत न्हवतं. मी लोकांना विचारलं गाडीतलं डुक्कर कोणी उचललं काय. गावातले लोकं बोलले कुठलं डुक्कर. आहो साहेब तुमची गाडी दरवाजावर उलटी पडलीय आमी ड्रायवरच्या दरवाजातून आत शिरलो तुम्हाला काढायला. गाडीत डुक्कर बिककर काय नाय.

दिनेश मोहिते आणि शशिकांत तांबे आज पर्यंत कधीच त्या वस्तीच्या गाडीवर चढले नाहीत.

# " विडी "

माझी आत्या मुरुडला रहायची. तिचे मिष्टर तिकडे MSEB मध्ये नोकरीला होते. हे जिथे राहायचे ते घर समुद्राच्या किनारीच होतं. वरच्या माळयावर हे राहायचे. घराच्या मागे खूप खडकाळ भाग होता आणि त्यालाच लागून समुद्र. अधून मधून मृतदेह वाहून यायचे आणि खडकात अडकून पडायचे. कोणाला दिसलं तर तो लगेच पोलिसांना सांगायचा. हे नवीन न्हवतं. आत्ता हे नेहमीच झालं होतं.

एकदा माझे काका त्यांच्याकडे पाहुणे म्हणून गेले. संध्याकाळ झाली. सगळयांनी जेवून घेतलं. संध्याकाळचे साधारण ९:३० वाजले होते काकांनी विचारलं, संडास कुठे आहे. आत्याचा मुलगा दाखवायला घेऊन गेला. बबलू लहान होता. जिना उतरल्यावर काकांचं लक्ष जिन्या खाली असलेल्या दरवाज्या कडे गेलं. आत मध्ये झिरोच्या बल्बचा मंद प्रकाश दिसत होता. आणि दरवाजात विड्यांचे अर्धे अर्धे पुडके पडले होते. त्यांनी त्यातली एक विडी काढली आणि बबलूला विचारलं काय रे इथे कोण राहतं? बबलू सहज बोलून गेला घर मालकाचं भूत. काका हसले मोठा गमतीदारच आहेस रे. पुढे त्यांनी त्याच्या खांद्यावर हात टाकला आणि वरांड्यातून खाली उतरले. बाजूच्या गल्लीतून मागे नारळाच्या वाडीत संडसाकडे वाट जात होती. बबलूने गल्लीतुनच बोट दाखवलं ... ते बघा तिकडे. आणि बबलू त्या लाकडी जिन्यावरून धावत वर घरात गेला. संडास म्हणजे एकदम समुद्राच्या किनारीच होतं. हातात टोर्च घेऊन ते संडासाच्या जवळ गेले. आपल्या मागे कोणीतरी असल्याचा त्यांना भास झाला. ते मागे वळले पण तसं काहीच न्हवतं. हातातलं टमरेल खाली ठेवलं विडी पेटवली. एक झुरका

मारला टमरेल उचललं आणि ते पायऱ्या चढून आत संडासात जाऊन बसले. त्यांनी दरवाजा बंद केला.

५-१० सेकंद निघून गेली आणि दरवाजावर कोणीतरी जोरात लाथ मारली. अचानक एवढ्या जोरात कोणीतरी लाथ मारलेली ऐकून ते घाबरले. पुन्हा शांतता पसरली. हे निवांत झाले. बाहेरून आवाज आला "ती विडी दे मला". . . . . . .

कोण रे. काय फालतूपणा चाललाय. बाहेर आल्यावर तुला बघतो :- काका आतून बोलले. आणि त्या दरवाजावर आत्ता धडाड लाथा बसायला लागल्या. वाडीत ८- १० कुत्री मोठ्याने रडायला लागली.

काका समजून गेले हा काहीतरी विचित्र प्रकार आहे. लाथा थांबल्या. बाहेरून पुन्हा विडी मागणारा आवाज आला. ह्यावेळी आलेला आवाज मात्र खूप भयानक होता. काका घाबरले घामाने भिजले. हात पाय कापायला लागले. त्यांनी आपल्या हातातली पेटती विडी त्या दरवाजाच्या खालच्या फटीतून बाहेर टाकली आणि सगळं शांत झालं. कुत्र्यांचा रडण्याचा आवाज पण अचानक थांबला. काकांनी आपला विधी अर्धवट टाकून आटोपला. आत्ता बाहेर जायची त्यांची हिंमत होत न्हवती. ते आत मध्येच बसून राहिले. आत्ता मात्र दीड तास उलटून गेला होता. काका अजून आले नाही. म्हणून बबलूला आत्याच्या मिष्टरांनी विचारलं काय रे काकांना बरोबर दाखवलं होतस ना?

बोलला हो.

मग आत्याचे मिष्टर शेजारहून एक टोर्च घेऊन मागे वाडीत गेले. संडासाच्या जवळ येऊन त्यांनी काकांना हाक मारली " ओ दळवी" काहीच उत्तर आलं नाही म्हणून पुन्हा हाक मारली "दळवी" आवाज ओळखीचा वाटला. काकांच्या जीवात जीव आला. त्यांनी आवाज दिला आलो आलो आणि ते बाहेर आले. आत्याच्या नवऱ्याला बोलले चला लवकर घरी जाऊन सांगतो. काय झालं. काय सांगतो आणि पटापट पावलं टाकत दोघेही घरात आले. हात पाय

धुतले आणि झालेली घटना त्यांनी आत्याला आणि तिच्या नवऱ्याला सांगितली. नंतर त्यांनी विचारलं ते तुमच्या जिन्याखालच्या खोलीची काय भानगड आहे?

आत्या बोलली “तुला कोणी सांगितलं?”

“तिथे विड्या ठेवल्या होत्या दारात म्हणून बबलूला विचारलं”

आत्या बोलली “हो त्या खोलीत घर मालकाचं भूत आहे. तिथला तो झिरोचा बल्ब २४ तास चालू ठेवावा लागतो. आणि प्रत्येक आमावस्या पौर्णिमेला तिथं विडी बंडल माचीस ठेवावं लागतं. आज अमावस्या आहे. आज पण आम्ही तिथं विडी बंडल माचीस ठेवलेली. दिसली असेलच तुला. आज १२ वर्ष झाली आम्ही इथे राहतोय पण आजपर्यंत त्याने त्रास नाही दिला कोणाला.”

आपण त्यातलीच एक विडी उचलली हे सांगायला काका लाजले. सकाळी चहा नास्ता करून काका पुन्हा खोपोलीला निघून गेले.

आत्ता आत्याचे मिष्टर निवृत्त झालेत. त्यांनी मुरुड सोडलं. आत्ता ते गावी दापोलीला राहतात.

# " हळदीची रात्र "

साल २००२, एप्रिल महिना

ठिकाण :- आंबेगाव.

पाहुण्यांची सगळी रेलचेल चालू होती, संपूर्ण घराला लायटिंगने सजवलं होतं, अंगणात डीजे वाजत होता. त्या दिवशी सुमितचं लग्न होतं. सुमित एका बड्या कंपनीत इंजिनियर होता. घरची परिस्थिती चांगली होती, लग्नाचं वय झालं, वडिलांनी महाडच्या नातेवाईकांची मुलगी बघून सुमित चं लग्न ठरवलं. त्या दिवशी हळदी समारंभ होता, अंगाला हळद लागली होती, उद्या हॉल वर लग्न होणार होतं. बाहेर डीजे वाजत होता, सुमित आपल्या मित्रांसोबत नाचत होता, सगळं वातावरण एकदम उल्हासित झालं, थोड्यावेळाने एक मित्र येउन सुमितच्या कानात काहीतरी पुटपुटला. सुमित आणि ३-४ जण तसेच मांडवातून बाहेर निघाले, गाडीच्या लाईट लावल्या आणि गाडी चालू केली, तेवढ्यात त्याच्या आईचं लक्ष गेलं, आई गाडी जवळ गेली, काय रे कुठं चाललात. जरा जाउन येतो, कुठं? पाहुण्यांना दारू घेऊन येतो, कमी पडली आहे. आई सुमितला ओरडली आधी गाडीतून खाली उतर, मित्रांकडे पैसे दे आणि आणायला सांग काय हवंय ते. अंगाला हळद लागली आहे आणि कुठे निघालास बाहेर. गाडी निघून गेली, आणि सुमित पुन्हा मांडवात आला, बायकांनी विचारलं काय झालं हो जिजा आत्या (सुमितची आई)

त्याची आई -पोरगा बाहेर निघाला होता,

बायका :- बाई अंगाला हळद लागली आणि कुठे बाहेर निघाला, बरं झालं तुमचं लक्ष गेलं.

पटकन एका मुलीने विचारलं "काय झालं असतं हो?"

त्यातली एक बाई बोलली "जाऊ नये वाईट असतं, हळद लागलेल्या माणसाला रात्रीच्या वेळी चेटूक लगेच पकडतं."

(हिरवा चेटूक म्हणजे, लग्नाच्या आधी एखादी व्यक्ती मरते तिचं चेटूक बनतं, मग तो पुरुष असो वा स्त्री)

अंगणात डीजेची धूम दणांणत होती. गाडीतून बियर आल्या, मित्रांच्या आग्रहाने सुमितने पण ३ बियर मारल्या. नंतर एका बाजूला जेवणाच्या पंगती बसायला सुरवात झाली, वडे मटण भात पापड. खूप लोकं दारू पिउन झिंगले होते. ३ बियर प्यायल्यामुळे आत्ता सुमितला जोरात लघवीला लागली. तो समोरच्या घराच्या मागे शेतात काळोखात लघवीला गेला आणि पुन्हा आला. आत्ता डीजे बंद केला होता आणि लोकं जेवणाच्या पंगतीत बसत होते, एक पंगत उठली कि दुसरी. मित्रांसोबत सुमित पण जेवायला बसला, भात मटन मटण वडे पापड सगळं आल्यावर जेवायची सुरवात झाली, ताटातलं सगळं संपलं तेवढ्यात पुन्हा भात आला पाठोपाठ मटण पण आलं, सुमितने पुन्हा भात घेतला मित्रांनी पण घेतला आणि मित्र मस्करीत बोलले .... दुसरा राउंड आहे हा. सगळयांच्या आधी सुमितने भात संपवला.

आणि पुन्हा भात आणि मटण मागवलं. मित्र उठले, आमचं झालं रे आम्ही उठतो तुझा तिसरा राउंड आहे हो हा ...... हाहा हा हा हा हा करत मस्करीत सगळे जण हासत हासत उठले. सुमित मात्र हसला नाही, तो भात आणि मटण बकाबक खातच होता. बघता बघता त्याने ते पण संपवलं. आत्ता दुसरी पंगत उठून तिसरी पंगत बसली. तरीपण सुमित तिथेच बसून होता. पुन्हा भात आणि मटण घेतलं. आत्ता वाढणारा स्वतः बोलला अरे बास कर उद्या लग्न आहे, पोट बिघडेल, सुमित बोलला तू मटण वाढ आणि निघ चल.

हि अरे तुरेची भाषा ऐकून तो वाढणारा संतापला, त्याला वाटलं प्यायला आहे म्हणून बोलतोय. त्याला अपमानित वाटलं आणि तो मांडवातून निघून गेला.

तिसरी पंगत उठली चौथी बसली, तरी पण हा बसलेलाच. आत्ता सुमितच्या वडिलांचं त्याच्याकडे लक्ष गेलं, लोकं पण बोलायला लागली होती, हा काय करतोय तरी काय. त्यांनी त्याच्या वडिलांना बोलावून सांगितलं, वडील त्याच्या जवळ गेले आणि त्याला उभं केलं. अरे बास कर चल हात धुवून घे, असं बोलताच सुमितने वडिलांचा हात झटकला आणि त्यांच्या जोरात कानफटात वाजवली. तो मार एवढा जबर होता कि त्याचे वडील एका फटक्यात जमिनीवर पडले.

"मला का उठवलस, बोल काय रे बोल, ए भडव्या मटण आण चल" मटण पायजे मला बोकड घेऊन ये रे. “

आणि त्याने समोर उभा असलेल्या माणसाच्या हातातून मटणाचं टोप हिसकावलं आणि भिंतीच्या कोपऱ्यात बसून २ हाताने ते बकाबक खात बसला. हा सगळा प्रकार बघून लोकं पंगतीवरून उठून लांब पळाले. आत्ता लोकांना समजलं ह्याला १००% भुताने झपाटलंय. सुमितने संपूर्ण टोप संपवलं आणि उठला. ८-१० लोकांनी मोठी चादर आणली आणि त्याच्यावर टाकली, आणि फटाफट रस्सीने बांधला. भूत जोर करायला लागलं आणि आत्ता सुमितचा आवाजच बदलला. बाजूच्या गावातून ताबडतोब मांत्रिक बोलवला, मांत्रिकाने त्याला एका खांबावर बांधायला सांगितलं.

मंत्र मारून पुढ्यात एक पाण्याने भरलेला तांब्या ठेवला, विचारलं कोण तू? कशाला आलास, पोराला का पकडलं. बोल, बोल चल बोल. शिवराळ भाषेत तो बोलला " शेतात बसलो होतो हा मादरचोद मुतला माझ्यावर" कोण आहेस कोण? कुठला?

दानू कातकरी, कातवाडी वरचा.

हे नाव ऐकताच सगळे दचकले, २ वर्षांपूर्वी हा दानू झाडावरून पडून मेला होता. “चल सोड पोराला आणि निघ.”

पुन्हा शिवराळ भाषेत “मुतला का हा माझ्यावर, नाय सोडत भेन्चोद ला.”

“चूक झाली, काळोखात मुतला असेल, तू नाय दिसलास त्याला, चल सोड त्याला.”

“ मान दे माझा जातो मी बोकड दे, मटण दे बोकड दे.”

“ हा बघ हा नारळ घे आणि निघ. निघ नायतर तुला दगडाखाली ठेवतो आणि वर चंडिका बसवतो.” मांत्रिकाने नारळ त्याच्या वर फिरवला फोडला आणि फेकून दिला. समोरच्या तांब्याला लाथ मारून भूत निघून गेलं, सुमित बेशुद्ध होऊन खाली पडला. मांत्रिक बोलला खोला पोराला, अंघोळ घाला आणि उद्या लग्न लावा.

काय होत नाय, देवावर विश्वास ठेवा ...

मी आहेच कधी पण हाक मारा, आणि तो मांत्रिक निघून गेला,

दुसऱ्या दिवशी सुमित चं लग्न व्यवस्थित पार पडलं. आत्ता त्याला २ मुलं पण आहेत, सध्या पनवेलला राहतो आणि तळोजा MIDC त काम करतोय.

# "बाजारपेठ "

कासरं ओढून ठेव र, कासरं खेच, बैलं उधळली. . . . . . . . . . . . . . . . . . आणि गाडीला बांधलेली दोन्ही बैलं ३-४ फुट उंच उड्या मारत गाडीला मागच्या दिशेने लोटू लागली होती.

डोंगरवाडी गाव. नावाप्रमाणेच हे गाव पण सह्याद्रीच्या उंच डोंगरावर होतं. त्या डोंगरावर उंच उंच ठिकाणी अशी साधारण ६-७ गावं वसली होती. त्यातलंच एक गाव डोंगरवाडी. त्या डोंगरात एस. टी. बस जाण्यासाठी मार्ग न्हवता. रस्ता होता. पण कच्चा आणि डोंगरवाट. गावात बैल गाडी व्यतिरिक्त जाण्याचा एकही मार्ग न्हवता. सखाराम सावंत हा डोंगरवाडीत राहायचा. गावातल्या लोकांना बाजारपेठ म्हणजे डोंगर उतरून खाली जिता गावात यावं लागायचं. जिता गावात छोटीशी बाजारपेठ होती. दवाखानाही होताच. शाळा होती. म्हणजे गरजे पुरती सोय जिता गावात उपलब्ध व्हायची, पण डोंगर खाली उतरून पुन्हा गावात जाणं म्हणजे एक संपूर्ण दिवस निघून जायचा. अस सगळं असताना सखारामने गावात एक दुकान टाकल्यामुळे लोकांची गैरसोय टळली.

नेहमीप्रमाणे सखारामने दुकानाच्या सामानची यादी बनवली. गाडीला बैलं बांधली आणि तो गावातून निघणार तेवढ्यात त्याला वाटेत गजानन सुतार भेटला. गजाननला सखारामने गाडीत बसवला आणि दोघेही निघाले. जिता गावात पोहोचायला दुपार झाली. सर्व सामानाची खरेदी करून झाल्यावर गजानन सुतार आणि सखाराम दोघेही पुन्हा वर डोंगरवाडीची वाट धरून निघाले. डोंगर माथा खूप उंच होता. बघता बघता संध्याकाळ व्हायला लागली. बैलांच्या तोंडाला आलेला फेस बघून सखारामने गाडी एका नदीपाशी थांबवली. गाडीच्या खाली बांधलेली बादली काढली आणि नदीतून तो पाणी घेऊन आला. दोन्ही बैलांना पाणी पाजून थोडा वेळ थांबला. आणि पुन्हा निघाला. दगडांचा उभड खाबड

रस्ता. उंच चढाव. हळू हळू सूर्य मावळला. डोंगराच्या आड गेला. दिवस थंडीचे होते. आत्ता गार वारा पण सुटायला लागला होता. आकाशात बिलकुल चांदण न्हवतं. रातकिड्यांचा आणि बैलगाडीच्या चाकांचा खडा खड आवाज फक्त ऐकू येत होता. आजूबाजूला असलेल्या घनदाट झाडाच्या फांद्या आणि त्या आकृत्या भयावह वाटायला लागल्या होत्या. सखाराम आणि गजाननने आपापल्या घोंगड्या अंगावर घेतल्या. हळू हळू थंडी वाढतच चालली होती. गाडी डोंगर चढत होती. आत्तापर्यंत फक्त निम्मा डोंगर पार पडला होता.

दोघांच्या गप्पा रंगल्या. इकडच्या तिकडच्या गप्पा मारता मारता रस्ताही निघून चालला होता. अचानक गाडीचे बैल थांबले. अचानक चाकांचा आवाज थांबला. भयाण शांतता त्यात रातकिड्यांचा किरर्र आवाज. जंगलात टिटवयांची टीव टीव. सखाराम आणि गजानन आश्चर्यचकित झाले. काय झालं, म्हणून सखारामने बैलांना हाताने ढोसळलं. पण बैल जागचे हालेना. गजानन खाली उतरणार होता. तेवढ्यात सखाराम बोलला “थांब गज्या गाडीतून खाली उतरू नको. बैल दमले असतील. थांबूया थोडा वेळ. निघतील.”

१५-२० मिनिटं निघून गेली. आत्ता पण बैल जागेवरून हालेना. सखाराम वैतागला आणि त्याने बैलांना चाबकाचा फटका ओढला. . . . . . . . . . . . हौशा हौशा ओ. . . चल. . . . हुश्श.

चाबकाचा फटका बसताच बैलाने आपले पुढचे दोन पाय जमिनीवरून ३-४ फुट हवेत उचलले. बैल पुढे जायला तयारच न्हवते. जागेवरच बैल उधळायला लागले. आत्ता मात्र सखाराम आणि गजानन मनातून चरकले. बैल हलायला तयार नाही म्हणजे काहीतरी गडबड आहे. ह्याच्याकडे एक जुनी टोर्च लाईट होती. पण तिचा उजेड खूप कमी होता. सखाराम बोलला गज्या कासरं ओढून ठेव र. कासरं खेच. सखारामने पिशवीतून टोर्च काढली आणि समोर मारली. पण समोर काहीच दिसत न्हवतं. सखाराम ओरडला कोण रे कोण आहेस, ये समोर ये. घाबरवतोस कोणाला. ये समोर. गजानन पार घाबरला होता. गजानन बोलला कोण आहे? सखारामने गजाननला सांगितलं. गज्या काही झालं तरी गाडीतून खाली उतरू नको.

आत्ता मात्र बैलं एक एक पाउल मागे टाकत गाडीला मागच्या दिशेने ढकलायला लागली होती. गजाननने मागे नजर टाकली आणि जोरात ओरडला सखाराम. . . . हा कोण हा बघ सखा.

सखारामने मागे नजर फिरवली. गाडीच्या मागे अंगावर घोंगडी आणि हातात काठी घेऊन एक माणूस उभा होता. गज्या ह्याला घाबरू नको, काही होत नाही. घाबरून जाऊ नको. बघतो मी ह्याला. अस म्हणत सखाराम उभा राहिला आणि त्याने चाबूक त्या माणसाच्या दिशेने जोरात फिरवला. तोच तो माणूस जोर जोरात हसायला लागला. कोण आहेस तू. कशाला रस्ता पकडलास आमचा. चल बाजूला हो. जाऊ दे आम्हाला. काय पाहिजे तुला बोल. घे आणि रस्ता सोड.



तो माणूस हसतच होता. गजानन तर भर थंडीत घामाने भिजला. सखाराम गावदेवीचं नाव घ्यायला लागला. आई केळंबा आज धावून ये आई. मागे उभं असलेला हा

माणूस नाहीही भुताटकीच आहे ह्याची दोघांना खात्री झाली होती. सखाराम बोलला कोण आहेस तू काय पाहिजे?

ते भूत बोलायला लागलं. रामा कातवाडी. हित्लाच मी. कोंबडा दे. मान दे माझा नि निघ. सखाराम बोलला कोंबडा बिंबडा मिळणार नाय. मान म्हणून हा नारळ देतो. पिशवीतून एक नारळ काढला आणि त्याने तो नारळ फोडून त्याच्या अंगावर फेकला. हा घे. हेच मिळेल. भूत ओरडलं. दोघांना दाबून टाकेन हितच. कोंबडा दे. ते भूत काय रस्ता सोडेना. दोघेही गाडीत होते. भूत आजूबाजूची झाडं हलवायला लागलं. ह्यांच्या अंगावर पालापाचोळा फेकायला लागलं. गाडीच्या बाजूने गरागरा फिरायला लागला चित्र विचित्र आवाज काढू लागला. आत्ता सखारामने पिशवीतून ५ नारळ काढले आणि गाडीतून खाली फेकले. आज हा घे ५ नारळाचा मान. उदया येऊन देतो. कोंबड घरी आहे. उद्या घेऊन येतो आणि देतो. भूत अचानक गायब झालं. सखारामने बैलांना चाबूक न मारताच बैल पुन्हा पुढे चालायला लागले. गाडीचा वेग वाढला आणि बैलं जोरजोरात धावायला लागली. सखा सखा काय झालं बैलं का पाळायला लागली. कासरं खेच रं, सखाराम बोलला कासरं खेचून पण बैलं काय थांबत नाही. नाकपुड्या फुटतील ढोरांच्या. गज्या सुताराची बोबडीच वळली होती. तो सखारामला चिटकून बसला. आणि सारखं मागे वळून वळून बघत होता. गाडी गावाच्या वेशीपाशी आली आणि अचानक बैल थांबले. सखारामने बैलांना चाबूक ओढला. बैल पुन्हा पुढे चालायला लागले. दोन्ही बैल धापा टाकत होते. तोंडाला फेस आला होता. हळू हळू गाडी गावदेवीच्या मंदिरापाशी आली. गाडीतूनच दोघांनी गावदेवीला नमस्कार केला आणि गावात आले. रात्र खूप झाली होती. गज्या सुतार त्याच्या घरी निघून गेला आणि सखारामने आपले बैल गाडीच्या जोखडातून सोडले. आणि वाड्यात नेऊन बांधले. गजानन तापाने फणफणला होता. त्याने झालेली घटना आपल्या घरात सांगितली आणि संपूर्ण गावात बातमी पसरली. सखाराम सकाळी उशीरच उठला आणि हातात बादली घेऊन बैलांना पाणी पाजायला वाड्यात गेला. बघतो तर काय एक जोडीतला एक बैल मेला होता.

नंतर त्याला समजलं गज्या सुतार पण तापाने आजारी पडला आहे. सखारामने गावातल्या मांत्रिकाला झाला प्रकार सांगितला. मांत्रिकाने गजानन वरून विड्याचं पान आणि सुपारी ओवाळून टाकली. वाड्यात पण नारळ फोडला. आणि वाड्या जवळच एक कोंबडा कापला.

तू जो कोणी असशील. हा कोंबड्याचा मान घे आणिही जागा सोड.

आत्ता सगळं काही ठीक होईल अस सांगून सर्व लोकं आपआपल्या घरी निघून गेले. तासाभरात गजाननचा ताप पण उतरला.

सखाराम पुन्हा कधीच एकटा बैलगाडी घेऊन जीत्याला गेला नाही. जायचं झालं तर गावातली ३-४ लोकं निघत असतील कामानिमित्त्र तरच सोबतीला घेऊन पहाटे निघायचा आणि काळोख पडायच्या आत आपल्या घरी हजर व्हायचा.

आत्ता मात्र सरकारने रस्ता बनवला आहे. जिता डोंगरवाडी अशी गाडी दिवसातून २ वेळा जाते. गावात पण लोकांनी गाड्या घेतल्या आहेत. म्हणून आत्ता पूर्वीसारखी गैरसोय पण होत नाही. आजही त्या ५-६ गावातला कोणीच माणूस रात्रीच्या वेळी त्या रस्त्याने गाडी घेऊन येत नाही.

१०-१२ वर्षात चित्र बदललं पण लोकांच्या मनातली ती भीती आजही जिवंत आहे.

रामा कातवाडीच्या नावाने लोकांनी त्या जागेवर एक दगड बसवला आहे. आणि प्रत्येक अमावस्येला गावकी कडून त्या ठिकाणी एक नारळ आणि कोंबडा हा दिला जातोच.ही प्रथा आजही चालू आहे.

# Quarter No - 365

समीरने आपली जुनी नोकरी सोडून तो हिंदुस्तान केमिकल्सला लागला. पगार पण चांगला मिळाला आणि सुविधा पण. नव्या नोकरीमुळे आपल्याला आत्ता लग्नही करता येईल या विचाराने तो भलताच खुश होता. राहण्यासाठी कंपनीने त्याला एक स्वतंत्र Quarter पण दिलं होतं. कंपनी जॉईन केली आणि समीरच्या हातात Quarter No - 365च्या किल्ल्या दिल्या गेल्या.

त्यादिवशी समीरने आपली जनरल शिफ्ट केली. थोडा वेळ बाजारपेठेत चक्कर मारून भाजीपाला घेतला. तांदूळ डाळ वगैरे घेऊन तो आपल्या Quarter मध्ये आला. संध्याकाळी डाळ भात भाजी बनवून मस्त जेवण करून वरच्या खोलीत जाऊन तो टी. व्ही. बघत बसला. उद्या रविवारची सुट्टी होती म्हणून तो एकदम निवांत उशिरा पर्यंत टी. व्ही. बघत बसला. रात्रीचे २ वाजले म्हणून त्याने झोपायची तयारी केली. पंखा ५ वर लावून तो अंगावर पांघरूण घेऊन झोपला.

साधारण ३-३:३०च्या सुमारास त्याला जाग आली. त्याला किचन मधून भांड्यांचा आवाज ऐकू यायला लागला. त्याने हळूच उठून पंखा बंद केला आणि कान देऊन तो आवाज ऐकू लागला. नळाच्या पाण्याचा आवाज, भांड्यांचा आवाज असे आवाज त्याला यायला लागले. मनातून खूप घाबरला. घाम सुटला. पण खाली जाऊन कोण आहे, कोण नाही हे बघण्याचं त्याचं काही धाडस झालं नाही. त्याने पंखा पुन्हा ५ वर केला आणि तो अंगावर पांघरूण घेऊन डोळे मिटून पडून राहिला. मनात विचार केला, मांजर असावं एखादं. कारण त्याने शिल्लक राहिलेल्या जेवणाची टोपं तशीच ओट्यावर ठेवली होती. वासाने कुठूनतरी एखादं मांजर शिरलं असावं. आणि तो झोपून गेला.

सकाळ झाली. आजूबाजूला गाड्याचे आवाज यायला लागले. समीरचा डोळा उघडला. दरवाजा उघडून सगळयात आधी तो जिना उतरून खाली किचन मध्ये गेला. जाऊन बघतो तर काय, जेवणाची टोपं कोणीतरी चाटून पुसून खाल्ली होती आणि भांडी धुवून ओट्यावर पालथी करून ठेवली होती.

हा काय प्रकार आहे. समीरने ताबडतोब सिक्युरिटीला फोन केला. आपल्या Quarter No - 365 मध्ये बोलावून घेतलं आणि झाला प्रकार सांगितला. सिक्युरिटीने सर्व ऐकून घेतलं. समीर बोलला ह्या घरात आणखी कोण राहतं?

आणखी कोणाच्या हातात किल्ल्या आहेत? सी. सी. टी. व्ही बघा. कोणी चोर आला होता का? समीर एकापाठोपाठ एक प्रश्न विचारतच होता.

सिक्युरिटीने शांतपणे त्याला उत्तर दिलं. साहेब तुम्ही हे घर बदलून दुसरं घर घ्या. समीरने विचारलं का? इथे काय वाईट आहे? इथे काय भुताटकी आहे काय?

सिक्युरिटीने पुन्हा शांतपणे उत्तर दिलं, “नाही साहेब. तसं काही नाही. पण हे घर बदलून मिळालं तर बघा. बाकी काही अडचण आली तर केव्हाही फोन करा आम्ही येऊ.” असं म्हणून तो सिक्युरिटी तिथून निघून गेला.

समीरला काहीच कळेना, नक्की काय झालं, आणि काय होतंय. तो दिवस रविवारचा होता. समीरने मस्त सिनेमा बघून बाहेरच जेवण करायचा बेत ठरवला. अंघोळ करून फ्रेश होऊन तो बाहेर निघून गेला. संध्याकाळी उशीर झाला म्हणून तो जेवणाची पार्सल घेऊन आला. चिकन बिर्याणी आणि रायता. जेवण आटोपून शिल्लक राहिलेली बिर्याणी त्याने डब्यात भरून फ्रीज मध्ये ठेवली. उद्या गरम करून खाऊ.

आणि कालच्या प्रमाणे तो वरच्या खोलीत जाऊन टी. व्ही. बघत बसला. दुसऱ्या दिवशी सोमवार होता. सकाळीच उठून त्याला कामावर जायचं होतं, म्हणून आज तो लवकरच

झोपला. गाढ झोपेत असताना अचानक तो दचकून उठला. त्याला पुन्हा भांड्यांचा आवाज ऐकू यायला लागला. हळूच उठून त्याने पंखा बंद केला, आणि आवाज घेतला. भांड्यांचा आवाज आणि नंतर नळाच्या पाण्याचा आवाज. आत्ता त्याने ताबडतोब सिक्युरिटीला फोन फिरवला. हळूच आवाजात तो बोलला “साहेब मी समीर बोलतोय Quarter No - 365 मधून. ताबडतोब या. चोर सापडेल. माझ्या किचन मधून आवाज येत आहेत. भांड्यांचे आवाज.”

सिक्युरिटीने त्याला सांगितलं “तुम्ही तुमच्या खोलीच्या बाहेर बिलकुल पडू नका. आम्ही बघतो.”

तो बोलला “ठीक आहे”.

समीरने घड्याळात बघितलं ३:२० झाले होते. थोडा वेळ निघून गेला. आत्ता घड्याळात ४:०० वाजले. आवाज पण अचानक थांबले. सिक्युरिटीचा ५ मिनिटांनी फोन आला. “साहेब आत्ता आवाज थांबले का?”

समीर बोलला “होय! थांबले. काय झालं होतं? कोण होतं?”

सिक्युरिटी बोलला “कोणी नाही सकाळी सांगतो. तुम्ही आराम करा.”

समीर निवांत होऊन पुन्हा झोपला. काल फ्रीज मध्ये ठेवलेली बिर्याणी गरम करून डब्यात भरून कामावर घेऊन जाऊया. म्हणून त्याने फ्रीज उघडला, तर फ्रीज मध्ये बिर्याणीचा डबा चकाचक धुवून पुसून ठेवला होता. त्यात बिर्याणी न्हवती.

आत्ता मात्र समीरची खात्री पटली ह्या घरात नक्की कोणीतरी येतो आणि काही जेवण शिल्लक असेल तर खाऊन जातो.

समीर कामावर गेला. त्याने हा प्रकार आपल्या एका खास मित्राला सांगितला. दिनेश. दिनेशने पण समीर सोबत एकाच दिवशी कंपनी जॉईन केली होती.

ठरलं! आज दिनेश समीरच्या घरी झोपायला आला. मुद्दाम आज त्याने जेवणाने भरलेली टोपं ओट्यावरच ठेवली आणि दोघांनी ठरवलं आज आवाज आले तर आपण हातात काठी घेऊन स्वतः खाली जाऊन चोर पकडायचा.

रात्र झाली. समीर जागाच होता. दिनेशचा डोळा लागला, तो झोपला. समीर मात्र सारखं घड्याळात बघत होता. आत्ता रात्रीचे ३:०० वाजले. अजून काही आवाज येईना. ३:२० झाले आणि भांड्याचा आवाज चालू झाला. समीर उठला. दिनेशला उठवलं पंखा बंद केला. शांत आवाजात भांडी वाजण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. नक्की खाली किचन मध्ये कोणीतरी आलं आहे. खात्री झाली. हळूच दरवाजा उघडला. समीर पुढे आणि दिनेश मागे. दोघे चोर पावलांनी जिना उतरून खाली किचनच्या बाहेर आले. दोघांनी एकमेकांकडे बघितलं आणि हळूच आत मध्ये किचन मध्ये टोकावलं. समीरला एक बाई दिसली. किचनच्या लादीवर बसून बकाबका टोपातून भात खात होती. त्याने दिनेशला खुणावलं आणि तो मागे आला. दिनेशला पण ती बाई दिसली. दोघांनी ठरवलं आत्ता एकदाच आत घुसून तिला पकडायचं. दोघे आत घुसले आणि दिनेशने त्या बाईचा हात पकडला. ती बाई ह्यांच्या समोर ताड करून उभी राहिली. आणि कर्कश आवाज किंचाळली “ए ए ए ए ए ए ए” तिने तिचे दोन्ही डोळे पांढरे केले. तोंड उघडलं. तोंडातून रक्त व्हायला लागलं दिनेश आणि समीर घाबरून जोरात ओरडले. “अबो बो बो बो बो! वाचवा! वाचवा! भूSSत भूSSत भूSSत!”

ह्यांच्या डोळयादेखत ते भूत किचनच्या खिडकीतून उडी मारून बाहेर निघून गेलं.

दिनेश आणि समीर घराचा दरवाजा उघडून जोरात पळत पळत घराबाहेर आले आणि जोराने बोंबलायला लागले. आजूबाजूच्या घरातली माणसं धावून आली. काय झालं. दोघेपण पार घाबरले होते. समीरने तर त्याच्या half pant मध्येच लघुशंका केली होती.

ताबडतोब सिक्युरिटीला बोलावण्यात आलं. आणि दोघांना गेस्ट हाउस मध्ये घेऊन गेले. सिक्युरिटीने समीरला सांगितलं साहेब मी तुम्हाला आधीच बोललो होतो ते घर बदलून घ्या. पण तुम्ही माझं ऐकलं नाही. अहो खोलीतून बाहेर पडण्याआधी आम्हाला फोन तरी करायचा. पण समीर काहीच ऐकण्याच्या आणि बोलण्याच्या परिस्थितीत न्हवता.

दुसऱ्या दिवशी जाऊन त्याने आपलं घर बदललं आणि Quarter No - 365 पासून खूप लांब घर घेतलं.

सिक्युरिटीने सांगितल्या प्रमाणे त्या घरात एका मजूर बाईचा खून झाला होता. सुरवातीला सर्व Quarter's चं बांधकाम चालू असताना ह्या Quarter No - 365 मध्ये एका मजुराने रागाच्या भरात, जेवायला बसलेल्या आपल्या पत्नीचा खून केला होता.

हि घटना खूप लोकांना माहिती होती आणि त्यामुळे ह्या Quarter No - 365 मध्ये कोणीच राहायला मागत नाही. तुम्हाला माहिती न्हवतं म्हणून तुम्ही आलात इकडे. पण बरं झालं तुमच्या जीवाला काही धोका झाला नाही.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो , सहजासहजी फुकट काहीच मिळत नाही. न आरोग्य न धन न संपदा. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. "गोलमाल" करून, मेकओव्हर सर्व काही मिळवता येतं असा गैरसमज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात आहे. झटपट श्रीमंती, आठ दिवसांत गोरेपणा, महिन्याभरात लांबसडक केस, एक हनुमान यंत्र गळयात बाधले की आजारांपासून मुक्ती  अशा जाहिराती माथी मारल्या जात आहेत. अशा वेळी पुस्तकं वाचून माणूस "जमिनीवर" येतो.  फुकट काहीच मिळत नसतं. प्रत्येक गोष्टीसाठी कुणाला न कुणाला कष्ट पडतात. कधी आपल्याला, कधी आपल्या आईवडलांना, गुरूंना, तर कधी समाजातील इतरांना.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणुन लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण मराठी वाचकांना  विनामूल्य पुस्तकं मिळावी, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा मराठी लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.


अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान


ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com